# लोकलेखा समिती

## (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या
स्थानिक संस्था अहवालामधील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाशी संबंधित
(परिच्छेद २.१) यावरील

# अठ्ठेचाळीसावा अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहास
दिनांक फेब्रुवारी/मार्च, २०१९ रोजी सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर
फेब्रुवारी/मार्च, २०१९

# लोकलेखा समिती

## (२०१७-२०१८)

### (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या**
**स्थानिक संस्था अहवालामधील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाशी संबंधित**
**(परिच्छेद २.१) यावरील**

# अठ्ठेचाळीसावा अहवाल

# लोकलेखा समिती

## २०१७-२०१८

**समिती प्रमुख :**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

*(१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(१०-अ) ॲड. पराग अळवणी, वि.स.स.

(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(१२) श्री. सुरेश ऊर्फ बाळुभाऊ धानोरकर, वि.स.स.

(१३) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(१४) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(१५) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१६) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप वळसे-पाटील, वि.स.स.

(१९) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(२०) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

** (२१) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(२२) श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.

*** (२३) श्री. हेमंत टकले, वि.प.स.

(२३अ) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

****(२४) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

(२५) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

**निमंत्रित :**

*****(२६) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

**सदरहू समिती दिनांक २४ ऑगस्ट २०१७ रोजी विधानसभा व दिनांक ६ सप्टेंबर २०१७ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (का.)

(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव (EM).

(३) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(४) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि. अ.

(५) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

(६) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी.

(७) श्री. रवींद्र मेस्त्री, कक्ष अधिकारी.

* **श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर ॲड. पराग अळवणी, वि.स.स. यांची मा. अध्यक्ष, विधानसभा यांनी दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

** **श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स यांची दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स यांची पुन्हा दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

*** **श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांची मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

**** **श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांची दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे जागा रिक्त झाली.**

***** **श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांची मा. सभापती, विधानपरिषद यांनी निमंत्रित समिती सदस्य म्हणून दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी नामनियुक्ती केली होती. दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे त्यांची निमंत्रित समिती सदस्यत्वाची नियुक्ती संपुष्टात आली होती. ते विधानपरिषद सदस्य म्हणून पुन्हा निवडून आल्यामुळे मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांची दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून रिक्त जागेवर नामनियुक्ती केली.**

## प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरून भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या स्थानिक संस्था अहवालातील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.१) यावर विचार करून लोकलेखा समितीचा अठ्ठेचाळीसावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक १३ ऑगस्ट, २६ सप्टेंबर, व १६, ऑक्टोबर, २०१८ रोजी सचिव, सामाजिक न्याय विभाग व इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन महाराष्ट्र, नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरून बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचे देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट “अ” मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजीच्या बैठकीत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागासंदर्भात तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशीवर सुधारणा सुचवून प्रारुप अहवालाला मान्यता दिली.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १६ जानेवारी २०१९.

**गोपालदास अग्रवाल,**
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती.

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक (१) | विभाग व तपशील (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | **प्रस्तावना** ... ... ... ... ... | (पाच) |
| (१) | **सामाजिक न्याय विभाग** ... ... ... ... (परिच्छेद क्र. २.१) | १ |

ज्ञापन :-



## भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्या सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्रमांक २.१ बाबत अनुपालन अहवाल.

विषय : परिच्छेद क्रमांक २.१- महाराष्ट्रातील अनुसूचित जाती आणि नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करण्यासाठी योजनेचे कार्यान्वयन.

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | २.१.१ | **प्रस्तावना**<br>महाराष्ट्र शासनाने दलित वस्तीमध्ये वास्तव्य करणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौध्द लोकांचे राहणीमान उंचविण्याकरीता त्यांना मुलभूत सुविधा जसे पाणी पुरवठा, मलनि:स्सारण, पोच रस्ते, अंतर्गत रस्ते, वीज पुरवठा, समाज मंदिर इत्यादी पुरविण्यासाठी दलित वस्ती सुधार योजना सुरु केली (१९७४). महाराष्ट्र शासनाने या योजनेचे नाव बदलून अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास असे केले (डिसेंबर, २०११) ही योजना महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाव्दारे (SJSA) राबविण्यात येत आहे. SJSA व्दारे नोव्हेंबर, २००८ ते डिसेंबर, २०११ दरम्यान वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये स्पष्टपणे निकष मांडले आहेत, की प्रत्येक गावातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांची लोकसंख्या किती आहे. हे विचारात घेऊन त्या वस्त्या दलित वस्त्या म्हणून ग्राम पंचायतीने निश्चित कराव्यात, अशा प्रकारे निश्चित केलेल्या वस्त्या जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या संबंधीत जिल्ह्यातील दलित वस्त्या म्हणून या वस्तीत विकास कार्ये करण्यासाठी अधिसुचित कराव्यात. | अभिप्राय देण्याची आवश्यकता नाही. | अभिप्राय नाही | अभिप्राय देण्याची आवश्यकता नाही. | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | CEOs, ZPs यांना जिल्हा समाज कल्याण अधिकारी (DSWOs) योजनेचे जिल्हा स्तरावर संनियंत्रण आणि नियंत्रण करण्याकरीता मदत करतात. पंचायत समिती (PS) स्तरावर गट विकास अधिकारी (BDOs) आणि ग्राम पंचायत (GP) स्तरावर ग्रामसेवक योजनेच्या कार्यान्वयनास जबाबदार असतात. SJSA व्दारे पाच कालावधीसाठी १० ते ३०० लोकसंख्या असलेल्या वस्तीसाठी ठरविण्यात आलेली (डिसेंबर, २०११) अनुदान रक्कम रुपये दोन लाख ते १५ लाख दरम्यान आहे. आणि ३०० पेक्षा जास्त लोकसंख्येसाठी रुपये २० लाख आहे.<br>दलित वस्ती निश्चीत करणे, अनुदानाचे वाटप व उपयोग आणि कामांचे कार्यान्वयन प्रभावीपणे आणि कार्यक्षमतापूर्वक करण्यात आले आहे. याबाबत खातरजमा करण्यासाठी लेखा परिक्षेने (i) मंत्रालयातील SJSA (ii)राज्यातील ३५ पैकी ८ जिल्हा परिषदा (अकोला, औरंगाबाद, बीड, चंद्रपूर, लातूर, नाशिक, रत्नागिरी आणि ठाणे) (iii) १६ गट(प्रत्येक जि.प. मधून २ गट) आणि (iv)८० ग्रामपंचायती (प्रत्येक गटातील ५ ग्रामपंचायत) यांच्या २०१०-२०१५ या कालावधीच्या दस्तावेजांची नमूना तपासणी केली. याशिवाय राज्य सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) ज्यांना वर्ष २०१३-१४ मध्ये SJSA व्दारे थेट अनुदान देण्यात आले आहे, अशा आठ सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दस्तावेजांची सुध्दा नमूना तपासणी करण्यात आली. | | | | |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | २.१.२.१ | नियोजन<br>**बृहत आराखडा तयार करण्यासाठी कोणतेही प्रमाण प्रपत्रे नसणे.**<br>अधिसुचित वस्तीच्या स्थानिक परिस्थिती आणि गरजांनुसार ग्राम पंचायती त्या वस्त्यांमध्ये ग्राम स्तरावर करावयाची असलेली कामे निश्चीत करतात. आणि त्यासाठी, निर्णय पारित करतात. हे निर्णय गट स्तरावर बृहत आराखडा तयार करण्यासाठी PSs कडे पाठविण्यात येतात. बृहत आराखडे, नंतर जिल्हा परिषद स्तरावर DSWOs व्दारे संकलित करण्यात येतात. आणि संबंधित क्षेत्रिय उपायुक्त (समाजकल्याण) (RDCs)यांचेद्वारे मंजूर करण्यात येतात. हा मंजुर बृहत आराखडा एका ZP साठी पाच वर्षाच्या कालावधीसाठी प्रभावी असतो आणि या कार्यचलित कालावधीत हा बृहतआराखडा बदलण्यात येऊ शकत नाही.<br>एका विशिष्ट बृहतआराखडयात जिल्ह्याचे नांव, पंचायत समितीचे नांव, ग्रामपंचायतीचे नांव, वस्तीचे नांव, वस्तीचा सांकेतांक, जनगणनेनुसार अनुसूचित जाती/नवबौध्दांची लोकसंख्या, प्रत्यक्ष लोकसंख्या, लोकसंख्येच्या आधारावर अनुज्ञेय असलेले अनुदान, आधी देण्यात आलेले अनुदान, आधी निष्पादित केलेली कामे, करावयाची असलेली कामे आणि वस्त्यांना अनुदान वितरण आणि कामे निष्पादन करण्यासाठी द्यावयाचा प्राधान्यक्रम नमूद असावयास पाहिजे. | | | | |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | लेखा परिक्षेस असे निदर्शनास आले की, जरी २००८-२०१३ या कालावधीचा प्रथम बृहत आराखडा २००८-२००९ पासून क्रियाशील असला तरी SJSA ने पंचवार्षिक बृहत आराखडा तयार करण्यासाठी कोणतेही प्रमाण प्रपत्र (Standard format) नेमून दिले नव्हते. परिणामी, विविध ZPs च्या तसेच एकाच ZPs अंतर्गत असलेले PSs यांच्याव्दारे तयार करण्यात आलेल्या बृहत आराखड्यात समानता नव्हती. SJSA व्दारे बृहत आराखड्यांसाठी प्रमाण प्रपत्र विहित नसल्यामूळे ग्रामपंचायतीतील वस्तीतील तसेच एकूण सर्व वस्तीतील अनेक कामांचा विकास करण्यासाठी प्राधान्यक्रम ठरविण्यात येऊ शकला नाही. याशिवाय बृहत आराखड्यात समानता नसल्यामूळे वस्तींना अनुज्ञेयतेपेक्षा जास्त अनुदान देण्यात आले. बृहत आराखड्यामधील असमानता पुढील परिच्छेदांत चर्चिल्या आहेत.<br>निवडलेल्या आठ ZPs (निवडलेले १६ गट) च्या २०१३-१८ या कालावधीच्या बृहत आराखड्यामधील माहितीवरुन पुढील तफावती निदर्शनास आल्या. | | | | |
| | | • दोन (कळवण आणि मालेगाव) गटांमध्ये वस्तींना सांकेतांक देण्यात आले नव्हते. | सदर निरिक्षणाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, नाशिक जिल्ह्यातील आराखड्यात सांकेतांक नमूद नव्हते, परंतू स्वतंत्र यादीत जिल्ह्यातील सर्व १५ तालुक्यातील कळवण व मालेगाव गटासह १८९३ वस्त्यांना सांकेतांक देण्यात आले आहेत. | कळवण व मालेगाव या गटातील वस्त्यांना नव्याने सांकेतांक दिल्याबाबत सविस्तर तपशिल सादर करावा. | नाशिक जिल्ह्यातील गटांमध्ये वस्तींना सांकेतांक आराखड्यात नमूद नव्हते. परंतू जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील वस्तीच्या साकेतांकाबाबत स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आलेली आहे. वस्त्यांची यादी सोबत जोडली आहे. | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | • चार (अकोट, बार्शिटाकळी, कल्याण आणि शहापूर) गटांमध्ये २०११ च्या जनगणनेनुसार असलेली अनुसूचित जाती / नवबौध्दांची लोकसंख्या नमूद केली नव्हती. | **अकोला :-**<br>सदर निरिक्षणाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, अकोला जिल्ह्यातील अकोट व बार्शिटाकळी गटातील/ तालुक्यातील सर्व वस्त्यांच्या नावासमोर सन २०११ च्या जनगणनेनुसार असलेली अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांची लोकसंख्या नमूद केली आहे.<br>**ठाणे :-**<br>ठाणे जिल्ह्यातील कल्याण व शहापूर गटातील सर्व वस्त्यांच्या नावासमोर सद्याची म्हणजे बृहत आराखडा तयार करतानाची लोकसंख्या नमूद करण्यात आली आहे. | सदर गटामधील वस्त्यांना सन २०११ च्या लोकसंख्येनुसार अनुदान दिले आहे काय? तसेच लोकसंख्या नमूद केल्यानंतर संबंधीत वस्त्यांना लोकसंख्या नमूद करण्यापूर्वी व लोकसंख्या नमूद केल्यानंतर देय झालेल्या अनुदानामध्ये काय फरक पडला आहे? याबाबत सविस्तर तपशिल द्यावा. | **अकोला :-**<br>अकोट व बार्शिटाकळी या तालुक्यातील वस्त्यांच्या नावासमोर सन २०११ च्या जनगणनेनुसार असलेली अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांची लोकसंख्या नमूद केली आहे. <u>बृहत आराखड्याची प्रत सोबत जोडली आहे.</u><br>**ठाणे :-**<br>ठाणे जिल्ह्यातील तपासणी केलेल्या कल्याण व शहापूर तालुक्यातील दलित वस्त्यांच्या नावासमोर बृहत आराखड्यामध्ये दलित वस्तीची प्रत्यक्ष लोकसंख्या नमूद करण्यात आली होती. त्यामूळे वस्त्यांच्या नावासमोर नव्याने २०११ ची लोकसंख्या नमूद करण्यात आलेली नाही. वस्त्यांमध्ये नव्याने लोकसंख्या नमूद न केल्यामूळे अनुदान वाटपामध्ये फरक पडलेला नाही.<br>दिनांक ५ डिसेंबर, २०११ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार वस्त्यांना देय होणाऱ्या अनुदानाची गणना वस्तीमध्ये असलेली प्रत्यक्ष लोकसंख्या विचारात घेऊन करावयाची आहे. | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | • सहा (अंबेजोगाई, भद्रावती, चिमूर, कन्नड, पाटोदा आणि सिल्लोड) गटांमध्ये अनुसूचित जाती / नवबौध्दांची प्रत्यक्ष लोकसंख्या नमूद केली नव्हती. | **औरंगाबाद :-** औरंगाबाद जिल्हा परिषदेतील सिल्लोड तालुक्यात सन २००८-०९ ते २०१२-१३ च्या बृहत आराखड्यात ११ वस्त्या व सन २०१३-१४ ते २०१७-१८ च्या आराखड्यात १० वस्त्यांच्या नावासमोर अनुसूचित जातीची लोकसंख्या नमूद केलेली नाही. तसेच सन कन्नड तालुक्यातील सन २०१३-१४ ते २०१७-१८ या कालावधीच्या बृहत आराखड्यात ६२ वस्त्यांच्या नावासमोर अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांची प्रत्यक्ष लोकसंख्या नमूद केलेली नव्हती.<br>**बीड :-** बीड जिल्ह्यातील अंबेजोगाई व पाटोदा गट/तालुक्यातील वस्त्यांच्या नावासमोर अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांची प्रत्यक्ष लोकसंख्या नमूद केली आहे. | सदर बाबतीत औरंगाबाद जिल्हा परिषदने बृहत आराखडयात लोकसंख्या नमूद न करण्याची कारणे दयावीत.<br><br>चंद्रपूर व बीड जिल्हा परिषदानी वस्त्यांच्या नावासमोर लोकसंख्या नमूद केल्यानंतर लोकसंख्या नमूद करण्यापूर्वी व नव्याने लोकसंख्या नमूद केल्यानंतर सदर वस्त्यांना देय होणाऱ्या अनुदानामध्ये काय फरक पडला आहे, त्याचा तपशिल द्यावा. | **औरंगाबाद :-** शासन निर्णय दिनांक ५ डिसेंबर, २०११ नुसार लोकसंख्या नमूद नसल्यामूळे अनुदान देय केले नाही. सदर दोन्ही तालुक्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात अनुदान देय करण्यात आलेले आहे. त्यामध्ये कसलाही बदल नाही.<br><br>**बीड :-** शासन निर्णय दिनांक ५/१२/२०११ नुसार बीड जिल्ह्याचा बृहत आराखडा तयार केलेला असून अंबेजोगाई व पाटोदा तालुक्याच्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेप्रमाणे दर्शविलेली आहे. | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | **चंद्रपूर :-**<br>भद्रावती व चिमूर (जिल्हा चंद्रपूर) गट/तालुक्यातील वस्त्यांच्या नावासमोर अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांची प्रत्यक्ष लोकसंख्या नमूद केली आहे. | | **चंद्रपूर :-**<br>चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती व चिमूर तालुक्यात बृहतआराखड्यात लोकसंख्या नमूद आहे.<br>चंद्रपूर जिल्ह्यात सन २०११ च्या लोकसंख्येनुसार बृहतआराखड्यात सदर वस्त्यांची लोकसंख्या नमूद करण्यात आली आहे. त्यामूळे लोकसंख्या नमूद करण्यापूर्वी किंवा नव्याने लोकसंख्या नमूद केल्यानंतर सदर वस्त्यांना देय होणाऱ्या अनुदानात कोणताही फरक पडलेला नाही. | |
| | | • दोन (कन्नड आणि सिल्लोड) गटांमध्ये लोकसंख्येनुसार अनुदानाची अनुज्ञेयता नमूद केली नव्हती. | सदर निरिक्षणाच्या अनुषंगांने सादर करण्यात येते की, कन्नड व सिल्लोड या दोन गट / तालुक्यात सन २०१३-१४ ते २०१७-१८ या कालावधीच्या बृहत आराखड्यात वस्त्यांसमोर लोकसंख्येनुसार अनुदानाची अनुज्ञेयता नमूद केली नव्हती. मात्र सन २०१८-१९ ते २०२२-२३ या कालावधीच्या बृहत आराखड्यामध्ये लोकसंख्येनुसार अनुज्ञेयता नमूद करण्यात येत आहे. | सदर दोन गटांमध्ये लोकसंख्या नमूद नसताना अनुदान दिले असल्यास अशा वस्त्यांची सविस्तर माहिती/यादी दिलेल्या अनुदानाच्या तपशीलासह सादर करावी. | कन्नड तालुक्यातील सन २००८-०९ च्या बृहतआराखड्यात एकूण ७५ व २०१२-१३ च्या आराखड्यात ६२ वस्त्यांच्या नावासमोर लोकसंख्या नमूद नसल्याने देय अनुदान निरंक दर्शविण्यात आले आहे.<br>कन्नड व सिल्लोड तालुक्यातील ज्या वस्त्यांना लोकसंख्या नमूद नसताना अनुदान दिले आहे. अशा <u>वस्त्यांची माहिती / यादी दिलेल्या अनुदानाच्या तपशिलासह सादर करण्यात येत आहे.</u> | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायःशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | • पाच (अकोट, कळवण, कल्याण, मालेगाव आणि शहापूर) गटांमध्ये वस्त्यांना आधी देण्यात आलेल्या अनुदानाचे तपशिल नमूद केले नव्हते. | **अकोला :-**<br>अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यातील सर्व वस्त्यांच्या नावासमोर त्यांना पूर्वी दिलेल्या अनुदानाचा तपशिल नमूद केला आहे.<br><br>**नाशिक :-**<br>सदर निरिक्षणाच्या अनुषंगांने सादर करण्यात येते की, कळवण व मालेगाव (जिल्हा नाशिक) गट / तालुक्यात सर्व वस्त्यांच्या नावासमोर त्यांना यापूर्वी दिलेल्या अनुदानाचे तपशिल नमूद केले नाहीत, ही बाब सत्य आहे. यापुढे नवीन आराखडा तयार करताना अनुदानाचा तपशिल नमूद करण्याची दक्षता घेण्यात येईल. | सदर पाच गटातील वस्त्यांना सन २०१३-१४ ते २०१७-१८ या कालावधीत मंजूर केलेल्या अनुदानाची माहिती सादर करावी. | **अकोला :-**<br>अकोट तालुक्यात सर्व वस्त्यांच्या नावासमोर त्यांना पूर्वी दिलेल्या अनुदानाचा तपशिल नमूद केलेला आहे. त्याचा पुरावा म्हणून अनुदान नमूद केल्याची यादी सोबत सादर करण्यात येत आहे.<br>**नाशिक :-**<br>कळवण व मालेगाव या तालुक्यांत सर्व वस्त्यांच्या नावासमोर त्यांना यापूर्वी दिलेल्या अनुदानाचा तपशिल नमूद केलेला नाही. सन २०१८-१९ ते २०१२२-२३ चा बृहतआराखडा तयार करताना अनुदानाचा तपशिल नमूद करण्याची दक्षता घेण्यात आली आहे.<br>कळवण व मालेगाव तालुक्यातील वस्तींना सन २०१०-११ ते २०१६-१७ या कालावधीत मंजूर केलेल्या अनुदानाची यादी सोबत जोडली आहे. | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | **ठाणे :-**<br>ठाणे जिल्ह्यातील कल्याण व शहापूर या दोन तालुक्यांतील वस्त्यांच्या नावासमोर त्यांना यापूर्वी दिलेल्या अनुदानाचे तपशिल नमूद केलेले नाहीत, सदर बाबतीत यापूढे दक्षता घेण्यात येत आहे. | | **ठाणे :-**<br>कल्याण व शहापूर गटामध्ये सन २०१३-१४ ते २०१७-१८ या कालावधीत मंजूर केलेल्या <u>अनुदानाची माहिती सोबत जोडली आहे.</u> | |
| | | • आठ (अकोट, बार्शिटाकळी, चाकूर, कळवण, कल्याण, लातूर, मालेगाव आणि शहापूर) गटांतील वस्त्यांमध्ये आधी निष्पादित करण्यात आलेल्या कामांची नावे नमूद करण्यात आली नव्हती. | **अकोला :-**<br>अकोट व बार्शिटाकळी या तालुक्यांत अनुक्रमे २१५ व ११७ अशा एकूण ३३२ वस्त्या असून या वस्त्यांच्या नावासमोर त्यांना निष्पादित करण्यात आलेल्या कामांची नावे नमूद केली आहेत.<br><br>**लातूर :-**<br>सदर निरिक्षणाच्या अनुषंगांने सादर करण्यात येते की, सन २०१३-१४ व २०१७-१८ या वर्षासाठी बृहत आराखडा तयार करण्यात आला असून सर्व वस्त्यांमध्ये कामे नमूद करण्यात आली आहेत. | या आठ गटातील वस्त्यांना यापूर्वी मंजूर केलेल्या कामांचा तपशील बृहत आराखडयामध्ये समाविष्ट नव्हता. तसा समावेश करून सुधारीत आराखडा सादर करावा तसेच या वस्त्यांना मंजूर केलेल्या कामांचा सविस्तर तपशील दयावा व ही कामे दुबार झाली आहेत काय? हे नमूद करावे. | **अकोला :-**<br>अकोट व बार्शिटाकळी या तालुक्यांत अनुक्रमे २१५ व ११७ अशा एकूण ३३२ वस्त्या असून या वस्त्यांच्या नावासमोर त्यांना निष्पादित करण्यात आलेल्या कामांची नावे नमूद केली आहेत. <u>बृहत आराखड्याची प्रत सोबत जोडली आहे.</u><br>**लातूर :-**<br>सन २०१३-१४ व २०१७-१८ या कालावधीचा बृहत आराखडा तयार करण्यात आलेला असून सर्व कामे बृहत आराखड्यात नमूद केली आहेत. परंतू नजरचुकीने मौजे रामेश्वर ता.लातूर येथे बृहत आराखडा सुचीमध्ये नमूद नसताना सिमेंट नालीचे काम मंजूर केले आहे. दुबार कामे झालेली नाहीत. | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | **नाशिक :-**<br>सदर निरिक्षणाच्या अनुषंगांने सादर करण्यात येते की, कळवण व मालेगाव (जिल्हा नाशिक), या तालुक्यांत एकूण २८४ वस्त्या असून या सर्व वस्त्यांच्या नावासमोर त्यांना निष्पादित(मंजूर) करण्यात आलेल्या कामांची नावे नमूद करण्यात आली नव्हती. यापुढे आधी निष्पादित (मंजूर ) केलेली कामे बृहत आराखड्यात नमूद करण्याची दक्षता घेण्यात येईल.<br>**ठाणे :-**<br>सदर निरिक्षणाच्या अनुषंगांने सादर करण्यात येते की, कल्याण व शहापूर (जिल्हा ठाणे) या तालुक्यांतील १७३ वस्त्यांच्या नावासमोर त्यांना निष्पादित(मंजूर) करण्यात आलेल्या कामांची नावे नमूद करण्यात आली नव्हती, ही वस्तूस्थिती आहे. यापुढे सदर बाबतीत दक्षता घेण्यात येत आहे. | | **नाशिक :-**<br>कळवण व मालेगाव तालुक्यातील वस्त्यांमध्ये आधी निष्पादित करण्यात आलेल्या कामांची नावे नमूद करण्यात आलेली नाहीत, सन २०१८-१९ ते २०१२२-२३ चा बृहत आराखडा तयार करताना आधी निष्पादित केलेली कामे नमूद करण्याची दक्षता घेण्यात आली आहे. <u>सोबत यादी जोडली आहे.</u><br><br>**ठाणे :-**<br>ठाणे जिल्ह्यातील कल्याण व शहापूर गटामधील दलित वस्तींच्या बृहत आराखड्यामध्ये यापूर्वी मंजूर केलेल्या कामांचा समावेश नव्हता. मात्र सदर आराखड्यामध्ये यापूर्वी मंजूर केलेल्या कामांचा समावेश नव्याने करण्यात आला आहे. आराखड्यामध्ये या वस्त्यांना मंजूर केलेल्या कामांचा सविस्तर तपशिल व कामे दुबार झाली नसल्याबाबतची माहिती सोबत सादर करण्यात आली आहे. | |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | • दोन (अंबेजोगाई आणि पाटोदा)-गटांमध्ये निष्पादित करावयाची असलेली कामे नमूद केली नव्हती. | सदर निरिक्षणाच्या अनुषंगांने अंबेजोगाई व पाटोदा (जिल्हा बीड)) या दोन गट / तालुक्यात अंबेजोगाई तालुक्यात एकूण १७२ व पाटोदा तालुक्यात १५३ अशा एकूण ३२५ इतक्या वस्त्या असून सर्व वस्त्यांच्या नावासमोर त्यांना निष्पादित(मंजूर) करण्यात आलेल्या कामांची नावे नमूद करण्यात आली आहेत. | सदर दोन गटांमध्ये यापूर्वी मंजूर केलेल्या कामांचा सविस्तर तपशील नमूद करावा. | बीड जिल्ह्यातील अंबेजोगाई तालुक्यात १७२ वस्त्या व पाटोदा तालुक्यात १५३ वस्त्या अशा दोन्ही मिळून एकूण ३२५ वस्त्या असून त्यापैकी ३२५ वस्त्यांसमोर त्यांना निष्पादित करण्यात आलेल्या कामांची नावे नमूद करण्यात आली आहेत. | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |
| | | लेखा परिक्षेस पुढे असे निदर्शनास आले की, चंद्रपूर जिल्हा परिषदेमध्ये सन २००८-१३ या कालावधीसाठी PSs व्दारे गट स्तरावर बृहत आराखडा तयार करण्यात आला नव्हता. तथापि, जिल्हा परिषदेने याबाबत PSs कडे विचारणा केली नाही आणि PSs ने सुध्दा संबंधीत ग्रामपंचायतीकडे याबाबत विचारणा केली नाही. परिणामी, २०१३ अखेर ७१ वस्त्या योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्या. | सदर निरिक्षणाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, चंद्रपूर जिल्हा परिषदेने सन २००८-०९ ते २०१२-१३ या कालावधीचा बृहत आराखडा तयार केला नाही. जिल्ह्यामध्ये १०५८ इतक्या वस्त्या असून यापैकी १०११ वस्त्यांना कामे मंजूर केली आहेत.<br>सन २००८-०९ ते २०१२-१३ या कालावधीचा बृहत आराखडा तयार केला नाही. त्यामूळे जिल्ह्यातील ४७ इतक्या वस्त्या योजनेच्या लाभापासून वंचित आहेत. | | सदर वस्त्यांची ग्रामसेवकामार्फत माहिती घेतली असता, काही वस्त्यांमध्ये सन २०११ ची लोकसंख्या नमूद केली आहे. परंतू आता तेथे प्रत्यक्ष लोकसंख्या उपलब्ध नाही. काही वस्त्यांमध्ये इतर योजनेमधून कामे झाल्यामूळे कामे करण्यास वाव नाही. वस्ती विखुरलेली असल्यामूळे रिठीगाव (वस्ती नाही.) ग्रामपंचायत कडून प्रस्ताव अप्राप्त असल्यामूळे सदर वस्तीत कामे करण्यास वाव नसल्यामूळे ग्रामपंचायतीने बृहत आराखड्यात कामांची नावे समाविष्ट केलेली नाहीत. त्यामूळे सदर वस्त्यांना लाभ देता आला नाही. त्यामूळे सदर वस्त्यां लाभापासून वंचित राहिल्या, असे म्हणता येणार नाही. | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | प्रधान सचिव, SJSA यांनी वस्तुस्थिती मान्य केली (जानेवारी, २०१६) आणि एक समान बृहतआराखडा तयार करणे सुकर व्हावे, यासाठी एक प्रमाण प्रपत्र जारी करण्याचे मान्य केले. | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक दवसु-२००८/प्र.क्र.५२४/विघयो-१, दिनांक १४/११/२००८ सोबतच्या परिशिष्ट अ मध्ये निर्देश क्रमांक ९ व शासन शुध्दीपत्रक दिनांक १९/१२/२००८ व शासन निर्णय क्रमांक दवसु-२०१३/प्र.क्र.८५/अजाक-१, दिनांक १/०८/२०१३ नुसार जिल्हा परिषदेने प्रत्येक ५ वर्षांनी अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा बृहतआराखडा (Master Plan) तयार करणे अपेक्षित आहे.<br>सुरवातीस सन २००८-०९ ते सन २०१२-१३ व तदनंतर सन २०१३-१४ ते २०१७-१८ या कालावधीसाठी बृहतआराखडे तयार करण्यात आले आहेत. सदर आराखडे तयार करण्यासाठी शासनाने / समाजकल्याण आयुक्तालयाने प्रमाण प्रपत्रे (Standard Format) विहीत केले नव्हते.<br>समाजकल्याण आयुक्तालयाचे पत्र क्रमांक सकआ/मावक/अजानवव/ बृहतआराखडा/ २०१६/ का-१२/११९९, दिनांक २२ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रमाण प्रपत्र (Standard Format) विहीत केले असून या विहीत प्रपत्रात सन २०१८-१९ ते २०२२-२३ या ५ वर्षे कालावधीचा बृहत आराखडा तयार करण्याच्या सुचना | बृहत आराखडा न करण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यावर केलेल्या कारवाईचा तपशील सादर करावा. | सदर अनुषंगाने समाजकल्याण आयुक्तालयाच्या स्तरावरुन माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये संबधीत अधिकाऱ्यांना नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला आहे. खुलासा प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण कार्यालयामार्फत सर्व जिल्हा परिषदांना दिल्या आहेत. सदर विहीत प्रपत्रात आराखडा तयार करण्याचे काम जिल्हास्तरावर सुरु आहे. | | | |
| | २.१.२.२ | **अनुदान वाटपासाठी वस्तींची प्राधान्यक्रम सुची तयार न करणे.**<br>SJSA ने आयुक्त, समाज कल्याण, पुणे, ७ क्षेत्रिय उपायुक्त, सर्व ZPs आणि PSs यांना वस्तींना खालील प्राधान्य क्रमानुसार अनुदान वाटपाचे निर्देश दिले. (डिसेंबर, २०११)<br><br>**प्रथम प्राधान्य :** वस्त्या ज्यांनी कधीही कोणतेही लाभ घेतले नाही.<br><br>**दुसरे प्राधान्य :** एका विशिष्ट बृहत आराखड्याच्या पाच वर्षाच्या कालावधीत ज्या वस्तींना अंशत: अनुदान देण्यात आले.<br>**तिसरे प्राधान्य :** एका विशिष्ट बृहत आराखड्याच्या कालावधीत घेण्यात आलेल्या वस्तींना उरलेली कामे पूर्ण करण्यासाठी पुन: भेट देण्यात यावी.<br><br>**चौथे प्राधान्य :** ज्या वस्तींना एका विशिष्ट बृहत आराखड्याच्या कालावधीत दोन वेळा घेण्यात आले आहे, त्या वस्तींना उरलेली कामे पूर्ण करण्यासाठी पुन: भेट देण्यात | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक दवसु-२०११/प्र.क्र.४४२/अजाक, दिनांक ५/१२/२०११ सोबतच्या परिशिष्ट अ मधील मुद्दा क्रमांक १० मधील निर्देशानुसार गट विकास अधिकारी यांनी वस्त्यांची प्राधान्यक्रम यादी तयार करणे व त्यानुसार परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा परिषदेस सादर करणे आवश्यक आहे.<br>**ठाणे :-**<br>प्राधान्यक्रम यादी तयार केली नव्हती.<br><br>**रत्नागिरी :-**<br>प्राधान्यक्रम यादी तयार केली नव्हती.<br>**नाशिक:-**<br>प्राधान्यक्रम यादी तयार केली नव्हती.<br>**औरंगाबाद :-**<br>सन २००८-०९ ते २०१२-१३ व २०१३-१४ ते २०१७-१८ या बृहत आराखड्यात | वस्त्यांची प्राधान्यक्रम सूची तयार न केलेल्या अशा अधिकाऱ्यावर केलेल्या कारवाईचा तपशील लोकलेखा समितीस सादर करावा. | सदर अनुषंगाने समाजकल्याण आयुक्तालयाच्या स्तरावरुन माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये संबधीत अधिकाऱ्यांना नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला आहे. खुलासा प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

<table>
<tr><th>क्र.</th><th>परिच्छेद क्र./उप.क्र</th><th>परिच्छेदाचा सविस्तर तपशिल</th><th>आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय</th><th>मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks)</th><th>अनुपालन</th><th>शासनाचे अभिप्राय</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td><td>५</td><td>६</td><td>७</td></tr>
<tr><td></td><td></td><td>यावी.<br>तद्नूसार संबंधी BDOs नी त्यांच्या गटातील वस्तींची प्राधान्यक्रम सुची तयार करावयास पाहिजे होती आणि कामांचे प्रस्ताव मंजूरीसाठी ZPs कडे सादर करावयास पाहिजे होते. लेखा परिक्षेस असे निदर्शनास आले की, निवडलेल्या आठ पैकी सहा ZPs च्या BDOs नी त्यांच्या अधिकार क्षेत्राखालील वस्तींची प्राधान्य क्रम सुची तयार केली नव्हती. त्यामूळे २००८-१३ च्या बृहत आराखड्यातील २१३१ गरजू वस्तींना योजनेच्या लाभापासून वंचित करण्यात आले. तपशिल तक्ता १ मध्ये दर्शविले आहे.<br>तक्ता १ : कधीही लाभ न देण्यात आलेल्या वस्तींचे तपशिल :
<table>
<tr><th>ZP चे नांव</th><th>वस्तींची एकूण लोकसंख्या</th><th>ज्या वस्तींना कधीही लाभ देण्यात आले नाही त्या वस्तींची संख्या</th></tr>
<tr><td>अकोला</td><td>१५१४</td><td>८७९</td></tr>
<tr><td>औरंगाबाद</td><td>१४०३</td><td>१०१</td></tr>
<tr><td>बीड</td><td>२१४५</td><td>२७५</td></tr>
<tr><td>लातूर</td><td>२६२६</td><td>६९२</td></tr>
<tr><td>रत्नागिरी</td><td>११४२</td><td>१८१</td></tr>
<tr><td>ठाणे</td><td>५७</td><td>०३</td></tr>
<tr><td>एकूण</td><td>९४०२</td><td>२१३१</td></tr>
</table>
स्त्रोत संबंधीत जिल्हा परिषदेचे बृहत आराखडे<br><br>प्रधान सचिव, SJSA यांनी लेखा परिक्षा निरिक्षण मान्य केले.</td><td>गट विकास अधिकारी यांनी त्यांच्या गटातील प्राधान्यक्रम सुची तयार केली नव्हती. त्यामूळे जिल्हा परिषदेने बृहत आराखड्यामध्ये प्राधान्यक्रमानुसार वस्त्या व कामे घेतली नव्हती. परंतू जिल्हा स्तरावर २०१७-१८ मध्ये प्राधान्यक्रम सुची तयार करुन घेतली. त्यानुसार बृहत आराखडा तयार करण्यात आला होता. मार्च, २०१८ अखेर वंचित वस्त्यांची संख्या निरंक आहे.<br>बीड :<br>बीड जिल्हा परिषदेअंतर्गत एकूण ११ पंचायत समित्या असून त्यापैकी ११ गटविकास अधिकारी यांना दिनांक ५/१२/२०११ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार वस्त्यांची प्राधान्यक्रम यादी तयार करण्याबाबत लेखी सुचना दिल्या असून सदरचे काम प्रगतीपथावर आहे.<br>लातूर :-<br>लातूर जिल्हा परिषदेअंतर्गत एकूण १० पंचायत समित्या असून त्यापैकी १० गटविकास अधिकारी यांनी दिनांक</td><td></td><td></td><td></td></tr>
</table>

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | ५/१२/२०११ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार वस्त्यांची प्राधान्यक्रम यादी तयार केली नाही. तथापी, बृहतआराखड्यामधील कामांची सुची तयार केली आहे. वस्त्यांची प्राधान्यक्रम यादी संबंधीत गटविकास अधिकारी यांनी सादर न केल्यामूळे सन २००८-०९ ते २०१२-१३ च्या बृहतआराखड्यातील एकही वस्ती लाभापासून वंचित राहिलेली नाही.<br>सन २०१३-१४ मध्ये लेखा तपासणी करताना लातूरमध्ये ६९२ वंचित वस्त्या दर्शविण्यात आल्या आहेत. तथापी, आजपर्यंत एकही वस्ती वंचित राहिलेली नाही. सर्व २६२६ वस्त्यांना लाभ देण्यात आला आहे.<br><br>**अकोला :**<br>अकोला जिल्हा परिषदेअंतर्गत ७ पंचायत समित्या असून एकाही गट विकास अधिकारी यांनी प्राधन्यक्रम सुची तयार केली नाही, परंतू समाजकल्याण समितीने काम निवडताना दिनांक ५/१२/२०११ मधील मुद्दा क्रमांक १० | | | |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | मधील प्राधान्यक्रम १ ते ४ या प्रमाणे कार्यवाही केलेली आहे.<br>**चंद्रपूर :-**<br>चंद्रपूर जिल्हा परिषदेअंतर्गत १५ पंचायत समित्या असून त्यापैकी एकाही गटविकास अधिकारी यांनी दिनांक ५/१२/२०११ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार वस्त्यांची प्राधान्यक्रम यादी तयार केली नाही. परंतू गटविकास अधिकारी यांनी पंचायत समिती स्तरावरील प्राधान्यक्रमानुसार प्रस्ताव सादर केले आहेत.<br>तपासणी पथकाने तपासणी केलेल्या ठाणे, रत्नागिरी, नाशिक, औरंगाबाद, बीड, लातूर, अकोला व चंद्रपूर या आठ जिल्हा परिषदेमध्ये एकूण १३१८० इतक्या वस्त्या असून सन २००८-०९ ते २०१७-१८ या कालावधीत १२५६८ वस्त्यांना योजनेचा लाभ दिला असून ६१२ वस्त्या योजनेच्या लाभापासून वंचित आहेत. वंचित वस्त्यांचा जिल्हानिहाय तपशिल प्रपत्र क्र.१ मध्ये दिला आहे. | | | |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | २.१.२.३ | **बृहत आराखडा तयार करण्यासाठी अधिक लोकसंख्या गृहीत धरणे.**<br>SJSA ने निर्गमित केलेल्या सुचनांनुसार (ऑगस्ट, २०१३) GPs/PSs नी २०१३-१८ साठी बृहत आराखडा तयार करतेवेळी अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या लोकसंख्येचा अंदाज बांधण्यासाठी २०११ च्या जनगणनेचा अवलंब करावयाचा होता.<br>लेखापरिक्षेस असे निदर्शनास आले की, ZP लातूरच्या निवडलेल्या दोन (चाकूर व लातूर) गटांमधील ६५२ वस्तींपैकी ३७ वस्तींमध्ये जरी जनगणना २०११ नुसार अनुसूचित जाती व नवबौध्दांची लोकसंख्या ३०० पेक्षा कमी होती. तरीही २०१३-१८ च्या बृहत आराखड्यात लोकसंख्या ३०० पेक्षा अतिशय जास्त (३१% ते ३७८%) गृहीत धरली होती. ज्यामूळे या ३७ वस्तींना जास्त अनुदान वाटप करण्यात आले.<br><br>DSWO, लातूर यांनी नमूद केले (मार्च, २०१५) की बृहत आराखडा संबंधीत GPS /PSS यांनी सादर केलेल्या माहितीनुसार तयार करण्यात आला.<br>**प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी ही बाब तपासण्यात येईल, असे सांगितले.** | लातूर जिल्हा परिषदेत सन २०१३-१४ ते २०१७-१८ या कालावधीत कोणत्याही वस्तीची लोकसंख्या बृहत आराखडा तयार करताना जादा गृहीत धरलेली नाही. जिल्ह्यातील चाकूर व लातूर या जिल्ह्यात सन २००९-१० ते २०१४-१५ या कालावधीत संबंधीत वस्त्यांना नियमाप्रमाणे देय असलेला निधी दिला आहे, असे जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी कळविले आहे.<br>तपासणी पथकाने उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने शहानिशा करण्यासाठी प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, लातूर यांना आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक सकआ/मावक/अजानबौघवि/लोलेस/साक्ष/ परि.क्र.२.१/२०१८-१९/ का-१२/६२३, दिनांक ३० जुलै, २०१८ अन्वये चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सुचना दिल्या आहेत. | प्रधान सचिव सामाजिक न्याय यांनी माहे १५ जानेवारी २०१५ मध्ये सदर बाब तपासण्याचे आश्वासन दिले होते मात्र साडेतीन वर्ष होईपर्यंत प्रकरणात कोणतीही कारवाई केलेली नाही. | सदर प्रकरणी लातूर विभागाचे प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग यांनी लातूर व चाकूर तालुक्यातील प्रत्येकी ५ या प्रमाणे १० वस्त्यांची तपासणी केली असून अहवाल दिनांक २८/०८/२०१८ रोजी प्राप्त झाला आहे. अहवालाची तपासणी करण्यात येत आहे. त्यानुसार आवश्यक कारवाई करण्यात येईल | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | २.१.३<br>२.१.३.१ | **आर्थिक व्यवस्थापन**<br>**आयुक्त स्तरावर खर्चाच्या आकडेवारीचे चुकीचे संकलन.**<br>अधिसुचित वस्तींमध्ये विविध कामे निष्पादित करण्यासाठी SJSA आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांचे मार्फत ZP ना आणि ZP मार्फत PS ना आणि अंतिमत: ग्राम पंचायतींना अनुदान वितरीत होते. २०१०-१५ दरम्यान अधिसुचित वस्त्यांमध्ये कामे निष्पादित करण्यासाठी SJSA ने ३५ ZPs ना रुपये २००२.३१ कोटी वितरीत केले. ज्यात राज्य सार्वजनिक बांधकाम विभाग (२०१३-१४) यांना थेट वितरीत केलेले रुपये ३०९.६८ कोटी समाविष्ट होते. आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांच्या दस्ताऐवजांवरुन असे दिसते की, रुपये २००२.३१ कोटीचे संपूर्ण अनुदान २०१०-१५ दरम्यान ZPs नी खर्च केले.<br>निवडलेल्या आठ ZPs च्या दस्तऐवजांच्या पडताळणीत असे निदर्शनास आले की, २०१०-१५ दरम्यान ZPs नी रुपये ६१३ कोटी एकूण उपलब्ध अनुदानापैकी फक्त रुपये ३२४.८६ कोटी (५३%) PSs ना वितरीत केले. अशा प्रकारे या ZPs जवळ २०१०-१५ मध्ये रुपये २८८.१४ कोटी (४७%) अखर्चित अनुदान शिल्लक होते. ज्यावरुन असे निदर्शीत होते की, आयुक्त, समाज कल्याण स्तरावर संकलित केलेली खर्चाची रक्कम (रु.२००२.३१ कोटी) बरोबर नव्हती. | अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजनेअंतर्गत आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयाच्या सन २०१३-१४ ते २०१७-१८ या कालावधीत प्राप्त तरतूद व खर्चाचा तपशिल या सोबतच्या प्रपत्र -५ मध्ये दिला आहे.<br><br>महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागांच्या सुचनेनुसार संचालक, अर्थ व | सदर बाबतीत सन २०१३ ते २०१८ या कालावधीत समाज कल्याण आयुक्तालयास प्राप्त निधी व आयुक्तालयाने क्षेत्रिय कार्यालयांना वितरीत केलेला निधी याबाबतचा अचूक तपशील सादर करावा. | सदर योजनेसाठी प्राप्त निधी व क्षेत्रिय कार्यालयांना वितरीत निधी याबाबतचा तपशिल <u>सोबतच्या प्रपत्र १</u> मध्ये दिला आहे. त्यानुसार २०१०-११ ते २०१४-१५ या कालावधीत रु.१६१७.६२ कोटी इतका निधी प्राप्त झाला असून तो क्षेत्रिय कार्यालयांना वितरीत केला आहे.<br><br>महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागांच्या सुचनेनुसार संचालक, अर्थ | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | प्रधान सचिव, SJSA यांनी वस्तुस्थिती मान्य केली आणि नमूद केले की अनुदानाचा प्रभावीपणे उपयोग होणे निश्चित करण्यासाठी संनियंत्रण यंत्रणा मजबूत करण्यात येईल. | सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयामार्फत सदर योजनेंतर्गत २०१२-१३ ते २०१६-१७ या पाच वर्षाच्या कालावधीत झालेल्या कामांचे मुल्यमापन करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्याअनुषंगाने माहे जुलै,२०१८ मध्ये मूल्यमापनाचे काम सुरु आहे. सदर मुल्यमापन अहवाल प्राप्त होताच त्यातील शिफारशीनुसार योजनेच्या अंमलबजावणीत आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील. | | व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयामार्फत सदर योजनेंतर्गत २०१२-१३ ते २०१६-१७ या पाच वर्षाच्या कालावधीत झालेल्या कामांचे मुल्यमापन करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्याअनुषंगाने माहे जुलै,२०१८ मध्ये मुल्यमापनाचे काम पूर्ण झाले आहे. सदर मुल्यमापन अहवाल लवकरच अपेक्षित आहे. मुल्यमापन अहवाल प्राप्त होताच त्यातील शिफारशीनुसार योजनेच्या अंमलबजावणीत आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील. | |
| | २.१.३.२ | **अनुदानाच्या वाटपातील विलंब**<br>योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार (डिसेंबर २०११) कामांची निवड करणे, ZPs च्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (CEOs) यांच्या व्दारे कामांना प्रशासनिक मान्यता प्रदान करणे आणि SJSA व्दारे ग्राम पंचायत स्तरापर्यंत अनुदानाचे वाटप करणे ही संपूर्ण प्रक्रिया दर वर्षी सप्टेंबर अखेरपर्यंत पुर्ण व्हावयास पाहिजे आणि शक्यतोवर कामे त्याच आर्थिक वर्षात पूर्ण करावयास पाहिजे किंवा जास्तीस जास्त प्रशानिक मान्यता मिळाल्याच्या तारखेपासून एक वर्षात पूर्ण करावयास पाहिजेत. | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक दवसु-२०११/प्र.क्र. ४४२/अजाक, दिनांक ५/१२/२०११ मधील तरतूदीनुसार सदर योजनेंतर्गत दरवर्षी माहे सप्टेंबरपूर्वी कामांची निवड करणे अपेक्षित आहे. मात्र प्रत्यक्षात तालुका स्तरावरुन प्रस्ताव प्राप्त होणे, सदर प्रस्तावांची छाननी करणे, सदर प्रस्ताव समाज कल्याण समितीच्या बैठकीत ठेवून त्यास मंजूरी घेणे व | समाजकल्याण आयुक्तालयाने प्रादेशिक कार्यालयांना कोणकोणत्या तारखेस निधी वितरीत केला आहे त्याबाबतचा तपशील सादर करणे (सन २०१०-११ ते २०१४- | सन २०१०-११ ते सन २०१६-१७ या कालावधीत समाजकल्याण आयुक्तालयास प्राप्त झालेला निधी व आयुक्तालयाने क्षेत्रिय कार्यालयांना वितरीत केलेल्या निधीबाबतचा तपशिल सोबतच्या <u>प्रपत्र-२</u> मध्ये दिला आहे.<br><br>शासनाकडून जस-जसे अनुदान प्राप्त झाले, तस-तसे क्षेत्रिय | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | लेखा परिक्षेस असे निदर्शनास आले की २०१०-१५ दरम्यान निवडलेल्या आठ ZPs ना अनुदान वाटप करण्यात SJSA व्दारे एक ते सहा महिन्यांचा विलंब झाला. २६ प्रकरणात SJSA व्दारे ZPs ना अगदी आर्थिक वर्षाखेर (फेब्रुवारी आणि मार्च मध्ये) अनुदान वाटप करण्यात आले. SJSA व्दारे ZPs ना अनुदान वाटपात विलंब झाल्यामुळे पुढे PSs व ग्राम पंचायतींना अनुदान वाटप करण्यात आणखी एक ते सहा महिन्यांचा विलंब झाला.<br>प्रधान सचिव SJSA यांनी वस्तुस्थिती मान्य केली आणि ZPs ना अनुदानाचे वेळेत वाटप करण्याची खातरजमा करण्यासाठी संनियंत्रण यंत्रणा मजबूत करण्यात येईल, असे नमूद केले. | त्याबाबतचे प्रशासकीय मान्यता आदेश निर्गमित करणे यासाठी विलंब होतो, ही वस्तूस्थिती आहे. करीता सदर बाबीच्या अनुषंगाने विहीत वेळेत कार्यवाही व्हावी, यासाठी सर्व जिल्हा परिषदांना सविस्तर सुचना देण्यात येत आहेत.<br><br>महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागांच्या सुचनेनुसार संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयामार्फत सदर योजनेंतर्गत २०१२-१३ ते २०१६-१७ या पाच वर्षाच्या कालावधीत झालेल्या कामांचे मुल्यमापन करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्याअनुषंगाने माहे जुलै,२०१८ मध्ये मूल्यमापनाचे काम सुरु आहे. सदर मुल्यमापन अहवाल प्राप्त होताच त्यातील शिफारशीनुसार योजनेच्या अंमलबजावणीत आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील. | १५) | कार्यालयांना वितरीत करण्यात आले आहे.<br><br>सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून सदर योजनेचा निधी आर्थिक वर्षाच्या सुरुवातीलाच सहायक आयुक्त, समाजकल्याण यांचेकडे उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर निधी जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने संबंधीत यंत्रणेला त्यांचे मागणीनुसार उपलब्ध करुन देण्यात येत आहे. | |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | २.१.३.३ | **वस्तींना अनुज्ञेयतेपेक्षा जास्त अनुदानाचे वाटप**<br><br>योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार (डिसेंबर २०११) प्रत्येक वस्तीस दयावयाच्या असलेल्या अनुदानाची कमाल अनुज्ञेयता अनुसूचित जाती आणि नवबौध्द यांच्या लोकसंख्येच्या आधारावर ठरविण्यात येते.<br><br>दस्तावेजांच्या पडताळणीत असे निदर्शनास आले की निवडलेल्या १६ गटांपैकी चार (अंबेजोगाई, भद्रावती, चाकूर आणि चिमूर) मधील आठ वस्तींना २०१०-१५ दरम्यान अनुज्ञेय अनुदानापेक्षा रू. १३.५३ लाख (प्रत्यक्ष अनुदान अनुज्ञेयता रु. ३१ लाखांची होती, परंतू रुपये ४४.५३ लाख देण्यात आले.) अनुदान जास्त देण्यात आले. या आठ प्रकरणात संबंधित DSWOs नी अनूसूचित जाती आणि नवबौध्दांच्या लोकसंख्येच्या अंदाज बरोबर घेतला होता परंतू त्यांनी मार्गदर्शक तत्वांनुसार अनुदानाची अनुज्ञेयता ठरवितांना चूक केली होती. यामुळे इतर गरजू वस्तीं योजनेच्या तेवढया रक्कमेच्या लाभापासून वंचित झाल्या.<br>**प्रधान सचिव SJSA यांनी हे प्रकरण तपासण्यात येईल असे नमूद केले.** | तपासणी पथकाने उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने शहानिशा करण्यासाठी प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, लातूर, औरंगाबाद व नागपूर यांना आयुकत, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक सकआ/मावक/अजानबौघवि/ लोलेस/ साक्ष/ परि.क्र.२.१/२०१८-१९/ का-१२/६२२, दिनांक ३० जुलै, २०१८ अन्वये चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सुचना दिल्या आहेत.<br><br>अनुज्ञेयतेपेक्षा जास्त अनुदान दिलेल्या वस्त्यांबाबत ८ जिल्हा परिषदांचा तपशिल या सोबतच्या प्रपत्र-६ मध्ये दिला आहे. | सदर बाबतीत विभागाने साडेतीन वर्षाच्या कालावधीनंतर चौकशी सुरू केली आहे. चौकशीसाठी झालेल्या विलंबाची कारणे द्यावीत. | मा.महालेखापाल, नागपूर यांचा लेखा परिक्षण अहवाल समाजकल्याण आयुक्तालयास माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये प्राप्त झाला आहे. तदनंतर या अहवालाच्या अनुषंगाने सदर प्रकरणी उपायुक्त, समाजकल्याण विभाग यांच्यामार्फत चौकशी करण्याचे निर्देश दिले. आता चौकशी अहवाल प्राप्त झाला असून त्याची छाननी करण्यात येत आहे.<br>लेखा परिक्षण अहवाल विलंबाने प्राप्त झाल्याने चौकशी करण्यास उशिर झाला आहे. | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | २.१.३.४ | **कामे मंजूर न करणे आणि अनुदान प्रत्यर्पित करणे.**<br>ZP औरंगाबाद (२०१०-११ मध्ये) आणि ZP अकोला (२०११-१२ मध्ये) येथील अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बृहत आराखडा २००८-१३ मध्ये आधीच अंतर्भूत असलेल्या कोणत्याही कामांना प्रशासनिक मान्यता दिली नाही जेव्हा की ZPs जवळ अनुक्रमे रू १.०६ कोटी आणि रू. ५.५५ कोटी अनुदान त्या-त्या आर्थिक वर्षाखेर ( मार्च २०११ आणि मार्च २०१२) उपलब्ध होते. याशिवाय, निवडलेल्या आठपैकी चार (अकोला, औरंगाबाद, चंद्रपूर आणि लातूर) ZPs नी रू. २.४४ कोटी अखर्चित अनुदान SJSA ला २०११-१४ दरम्यान प्रत्यर्पित केले (मार्च २०१४) आणि बृहत आराखडयातील (२०१८-१३) आणि २०१३-१८ अनेक कामे अनिष्पादित सोडून दिली.<br>**प्रधान सचिव, SJSA यांनी लेखापरिक्षा निरीक्षण मान्य केले.** | औरंगाबाद जिल्हा परिषदेने सन २०१०-११ मध्ये, तसेच अकोला जिल्हा परिषदेने २०११-१२ मध्ये निधी उपलब्ध असताना कामे मंजूर केली नाहीत, असा आक्षेप लेखा परिक्षेने घेतला आहे. त्याचा खुलासा खालील प्रमाणे आहे :-<br><br>**१)जि.प.औरंगाबाद**<br>सन २०१०-११ मध्ये कामाचे नियोजन उशिरा झाले असून रुपये १०३.६८ लक्ष रक्कमेच्या प्रशासकीय मान्यता झालेल्या आहेत.<br>**२)जि.प.अकोला**<br>अकोला जिल्हा परिषदेस सन २०११-१२ या आर्थिक वर्षात रु.६२९.९३ लक्ष इतका निधी प्राप्त झाला. त्यापैकी रु.४९९.२४ लक्ष इतका निधी खर्च झाला असून रुपये १३०.६९ लक्ष इतका निधी सन २०१३-१४ मध्ये चलान क्रमांक १४ दिनांक १८/३/२०१४ अन्वये शासनखाती जमा केला आहे.<br>ठाणे, रत्नागिरी, नाशिक, औरंगाबाद, बीड, लातूर, अकोला व | | सन २०१०-११ ते २०१६-१७ या कालावधीत <u>प्राप्त तरतूद, खर्च व समर्पित तरतूदीचा तपशिल</u> <u>प्रपत्र-३ मध्ये दिला आहे.</u> | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | चंद्रपूर या आठ जिल्हा परिषदांना सन २०१०-११ ते २०१७-१८ या कालावधीत रु. ८३८.६७ कोटी इतका निधी प्राप्त झाला असून त्यापैकी रु. ७८१.१५ कोटी इतका निधी खर्च झाला असून रुपये ५७.५२ कोटी इतका निधी शिल्लक राहिला आहे. सदर कालावधीमध्ये रत्नागिरी जिल्हा परिषदेने रु. ६४.९२ लक्ष इतका निधी शासनास समर्पित केला आहे. तसेच या कालावधीत रत्नागिरी जिल्हा परिषदेने रुपये ८१.८३ लक्ष, नाशिक जिल्हा परिषदेने रु.१९५.८८ लक्ष, औरंगाबाद जिल्हा परिषदेने रु. २३९.५५ लक्ष व अकोला जिल्हा परिषदेने रु.१३०.६९ लक्ष असा एकूण ६४७.९५ लक्ष इतका निधी शासनखाती जमा केला आहे. सन २०१०-११ ते २०१७-१८ या कालावधीत प्राप्त तरतूद, खर्च, शिल्लक, समर्पित तरतूद व शासनखाती जमा केलेल्या अखर्चित तरतूदीचा जिल्हानिहाय तपशिल प्रपत्र-२ मध्ये दिला आहे. | | | |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | २.१.३.५ | **स्वतंत्र रोकडवही न ठेवणे**<br>SJSA नी ZPs आणि PSs स्तरावर योजनेसाठी स्वतंत्र वेगळी रोकड वही ठेवण्याबाबत विनिर्देश दिले नाही. ZP आणि PS स्तरावर वेगळया रोकड वहया नसल्यामूळे लेखापरिक्षेस दोन्ही स्तरावर अनुदान लेखांकनाच्या (जमा, खर्च, अखर्चित रक्कम, अर्जित व्याज इत्यादी) अचूकतेची खातरजमा करता आली नाही.<br>**प्रधान सचिव, SJSA यांनी नमूद केले की ZP आणि PS स्तरांवर योजनेसाठी वेगळी रोकडवही ठेवण्याबाबत सूचना देण्यात येतील.** | सदर योजनेसाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर स्वतंत्र रोकडवही ठेवण्याच्या सुचना देण्यात येत आहेत. | जिल्हा समाजकल्याण अधिकारी जिल्हा परिषद यांना पाठवायच्या पत्राची प्रत सादर करावी. | अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजनेसाठी जिल्हा व तालुका स्तरावर स्वतंत्र रोकडवही (कॅशबुक) ठेवणेबाबत सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना सुचना देण्यात येत आहेत. | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |
| | २.१.४<br>२.१.४.१ | **योजनेची अंमलबजावणी**<br>**कामांच्या निष्पादनात विलंब**<br>निवडलेल्या आठ ZPs मधील लेखापरिक्षेव्दारे संकलित केलेल्या माहितीवरुन असे निदर्शनास आले की रू. २५४.६२ कोटी रक्कमेची ७,८०७ कामे अतिरीक्त CEOs व्दारे २०१०-१४ दरम्यान मंजूर करण्यात आली होती ज्यापैकी ६,६२४ कामे पूर्ण करण्यात आली आणि १,१८३ कामे (१५ टक्के) ज्यावर रू. २३.६२ कोटी रक्कम खर्च करण्यात आली होती, ती कामे मार्च २०१५ पर्यंत अपुर्ण होती. अपूर्ण कामे (१,१८३) पुर्ण करावयाच्या विहित तारखेपेक्षा एक ते तीन वर्ष पर्यंतच्या विलंबाने करण्यात आली. तपशील खालील तक्ता २ मध्ये दर्शविले आहे.<br>**तक्ता २ : कामांच्या निष्पादनातील विलंबाचे तपशील** | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक दवसु-२०११/प्र.क्र. ४४२/अजाक, दिनांक ५/१२/२०११ सोबतच्या परिशिष्ट-अ मधील मुद्दा क्रमांक ९ नुसार कामाची निवड व निधी वितरणाची कार्यवाही दरवर्षी माहे सप्टेंबर अखेर पूर्ण करणे अपेक्षित आहे. तसेच मंजूर कामे त्याच आर्थिक वर्षात अथवा काम मंजूर दिनांकापासून एक वर्षाच्या आत पूर्ण करणे अपेक्षित आहे. सदर कामे पूर्ण करण्याची जबाबदारी | सन २००९-१० ते २०१६-१७ या कालावधीत मंजूर कामांचा तपशिल या सोबतच्या तक्त्यात सादर करावा. (प्रपत्र क्र.-३) | सन २००९-१० ते २०१६-१७ या कालावधीत मंजूर कामांचा तपशिल सोबतच्या <u>प्रपत्र-४</u> मध्ये दिला आहे. | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

<table>
<tr><th>क्र.</th><th>परिच्छेद क्र./उप.क्र</th><th>परिच्छेदाचा सविस्तर तपशिल</th><th>आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय</th><th>मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks)</th><th>अनुपालन</th><th>शासनाचे अभिप्राय</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td><td>५</td><td>६</td><td>७</td></tr>
<tr><td></td><td></td><td>रूपये कोटीत
<table>
<tr><th>वर्ष</th><th>मंजूर कामांची एकूण संख्या</th><th>एकूण मंजूर किंमत</th><th>पूर्ण झालेली कामे</th><th>पूर्ण झालेल्या कामांवर खर्च</th><th>अपूर्ण कामांची संख्या</th><th>अपूर्ण कामांवर झालेला खर्च</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td><td>५</td><td>६</td><td>७</td></tr>
<tr><td>२०१०-११</td><td>१७६६</td><td>३८.६२</td><td>१६६०</td><td>३७.५१</td><td>१०६</td><td>०.९६</td></tr>
<tr><td>२०११-१२</td><td>९३०</td><td>२१.७६</td><td>८४६</td><td>१०.८६</td><td>८४</td><td>१.०७</td></tr>
<tr><td>२०१२-१३</td><td>३०९७</td><td>११५.१७</td><td>२५८७</td><td>५५.५८</td><td>५१०</td><td>११.२३</td></tr>
<tr><td>२०१३-१४</td><td>२०१४</td><td>७९.०७</td><td>१५३१</td><td>२५.६२</td><td>४८३</td><td>१०.३६</td></tr>
<tr><td>एकूण</td><td>७८०७</td><td>२५४.६२</td><td>६६२४</td><td>१२९.५७</td><td>११८३</td><td>२३.६२</td></tr>
<tr><td colspan="7">स्त्रोत: निवडलेल्या ZPs नी पुरविलेली माहिती</td></tr>
</table>
ZPs नी कामे पूर्ण न होण्यासाठी मुख्यत: SJSA व्दारे अनुदान देण्यातील विलंब आणि कामांची निवड व कामे निष्पादित करण्यासाठी जागा निवडीबाबत ग्राम पंचायत सदस्यांमधील वाद कारणीभूत असल्याचे नमूद केले.<br>प्रधान सचिव SJSA यांनी प्रलंबित कामे प्राधान्य देऊन पूर्ण करण्याबाबतच्या सूचना देण्यात येतील असे नमूद केले.</td><td>संबंधीत ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांचेवर सोपविण्यात आली आहे. असे असले तरी मंजूर कामे विलंबाने पूर्ण होतात, ही वस्तूस्थिती आहे.<br><br>तपासणी पथकाने तपासणी केलेल्या ठाणे, रत्नागिरी, नाशिक, औरंगाबाद, बीड, लातूर, अकोला व चंद्रपूर या आठ जिल्हा परिषदांनी सन २००९-१० ते २०१६-१७ या कालावधीत २०३८४ इतकी कामे मंजूर केली असून त्यापैकी १९२९० इतकी कामे पूर्ण झाली असून १०९४ इतकी कामे अपूर्ण आहेत. पूर्ण झालेल्या कामांपैकी नाशिक जिल्हा परिषदेची ४८७ व चंद्रपूर जिल्हा परिषदेची ५५ कामे अशी एकूण ५४२ कामे विहीत कालावधीपेक्षा विलंबाने पूर्ण झाली आहे. जिल्हानिहाय तपशिल</td><td></td><td></td><td></td></tr>
</table>

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | प्रपत्र-३ मध्ये दिला आहे.<br>सदर योजनेंतर्गत काम मंजूरीची व निधी वितरणाची कार्यवाही विहीत मुदतीत व्हावी, यासाठी आयुक्त,समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक सकआ/मावक/ अजानबौघवि/ अखनि/ कार्यप्रणाली/२०१७-१८/का-१२/५३५९, दि.२१/७/२०१८ अन्वये स्तरावरुन सर्व जिल्हा परिषदांना सुचना दिल्या आहेत. | | | |
| | २.१.४.२ | **निवडलेल्या ग्राम पंचायती विषयी लेखापरिक्षा निरीक्षणे**<br>निवडलेल्या ८० ग्राम पंचायतीत १७७ वस्त्या होत्या १७७ पैकी १३६ वस्तींत २०१०-१५ दरम्यान २०२ (रस्ते-१३४, सार्वजनिक प्रसाधनगृहे-१३, मलनिस्सारण कामे-११, विद्युतीकरण कामे-०९, समाज मंदिराचे बांधकाम-०८, आणि इतर कामे-२७) कामे मंजूर केली होती. निवडलेल्या ग्राम पंचायतीमधील दस्तावेजांच्या लेखापरिक्षा पडताळणीत खालील प्रमाणे आढळले. | सदर बाबतीत सविस्तर तपशिल सोबतच्या प्रपत्र - ८ मध्ये दिला आहे. | | | |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | • ८० पैकी ७४ ग्रामपंचायती मध्ये बृहत आराखडा २०१३-१८ यामध्ये प्रत्यक्ष लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार दर्शविली आहे. जेव्हा की, उर्वरित सहा ग्राम पंचायतीत लोकसंख्या २०११ च्या जनगणनेपेक्षा जास्त दर्शविली आहे. | | सदर बाबतीत सर्व ८ जिल्हा परिषदांनी सविस्तर माहिती सादर करावी. | **१) ठाणे :-**<br>सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या दर्शविलेली आहे. त्यापेक्षा जास्त लोकसंख्या दर्शविण्यात आली नाही.<br>**२) रत्नागिरी:-**<br>सर्व ग्रामपंचायतीमध्ये सन २०१३-१४ ते २०१७-१८ च्या आराखड्यात सन २०११ च्या जनगणनेनुसार प्रत्यक्ष लोकसंख्या दर्शविली आहे.<br>**३) नाशिक:-**<br>कळवण व मालेगाव गटातील कोणत्याही ग्रामपंचायत आराखड्यात २०११ च्या जनगणनेपेक्षा जास्त लोकसंख्या दर्शविलेली नाही.<br>**४) औरंगाबाद:-**<br>प्रत्यक्ष लोकसंख्या बृहत आराखड्यामध्ये नमूद केली आहे.<br>**५) बीड:-**<br>बीड जिल्हा परिषदेत शासन निर्णय दिनांक ५/१२/२०११ अन्वये बृहत आराखडा तयार केलेला आहे. तसेच २०११ च्या जनगणनेनुसार जास्तीची लोकसंख्या दर्शविलेली नाही.<br>**६) लातूर:-** | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | .६ | ७ |
| | | | | | लातूर जिल्ह्यामध्ये लातूर व चाकूर या तालुक्यामध्ये १० ग्रामपंचायतीतील तपासणी केल्यानुसार संबंधीत गावाकडून २०११ च्या जनगणनेनुसार व प्रत्यक्ष लोकसंख्येनुसार कामांची माहिती घेण्यात आली आहे.<br>**७) अकोला:-**<br>जिल्हा परिषद अकोला या ठिकाणी ७ तालुक्यांचा एकसमान बृहत आराखडा तयार झालेला आहे.<br>**८) चंद्रपूर:-**<br>चंद्रपूर जिल्ह्यात सन २०११ चे जनगणनेपेक्षा कोणत्याही ग्रामपंचायती मध्ये जास्त लोकसंख्या दर्शविण्यात आलेली नाही. | |
| | | • सर्व ८० ग्रामपंचायतीत बृहत आराखडे तयार करण्यात आले होते परंतू, त्यांचे स्वरूप एकसमान नव्हते. | | बृहत आराखडे विहित प्रपत्रात तयार करण्यासाठी केलेल्या कार्यवाहीचा तपशिल सादर करावा. | **(१)ठाणे :-**<br>कल्याण व शहापूर तालुक्यातील ग्रामपंचायतीमध्ये बृहतआराखड्याचे स्वरुप एकसमान नव्हते. सदर बाबतीत यापुढे दक्षता घेण्यात येईल.<br>**(२)रत्नागिरी:-**<br>सर्व ग्रामपंचायतीत बृहत आराखडे तयार करण्यात आले असून त्याचे स्वरुप एकसमान आहे. | |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | **(३)नाशिक:-**<br>सन २०१८-१९ ते २०२२-२३ या वर्षाचा बृहत आराखडा विहीत प्रपत्रात तयार करण्यात येत आहे.<br>**(४) औरंगाबाद:-**<br>सन २००८-०९- ते २०१२-१३ या बृहत आराखड्यासाठी शासनाने विहीत प्रमाणपत्र ठरवून दिले नाही.<br>**(५) बीड:-**निरंक<br>**(६)लातूर:-**<br>जिल्ह्यात बृहत आराखड्याचे स्वरुप समान होते.<br>**(७)अकोला:-**निरंक<br>**(८)चंद्रपूर:-**<br>सन २००८-०९ ते २०१२-१३ या कालावधीत बृहत आराखडा तयार केला नाही. मात्र सन २०१३-१४ ते २०१७-१८ या कालावधीचा बृहत आराखडा तयार केलेला आहे. | |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | • ८० पैकी २१ ग्रामपंचातीत निष्पादित केलेली ३४ कामे बृहत आराखडयात समाविष्ट नव्हती. | | बृहतआराखड्यात समाविष्ट नसताना काम मंजूर केली असल्यास त्याचा तपशिल सादर करावा. | **(१)ठाणे :**<br>बृहत आराखड्यात समाविष्ट असलेल्या कामांना मंजूरी दिली आहे.<br>**(२)रत्नागिरी:-**<br>सर्व ग्रामपंचायतीमध्ये निष्पादीत केलेली कामे बृहत आराखड्यात समाविष्ट आहेत.<br>**(३)नाशिक:-**<br>कळवण व मालेगाव गटातील सर्व ग्रामपंचातीत निष्पादित केलेली कामे बृहतआराखड्यात समाविष्ट आहेत.<br>**(४) औरंगाबाद:-**<br>औरंगाबाद जिल्हा परिषदेने सन २०१३-१४ ते २०१४-१५ या कालावधीत मंजूर केलेली खालील ५ कामे बृहतआराखड्यात समाविष्ट नव्हती.<br>१)डोणगाव, ता.कन्नड- नाली बांधकाम, सन २०१३-१४, रु.२.०० लक्ष.<br>२)लोहगाव, ता.कन्नड, सिमेंट रस्ता, सन २०१४-१५, रु. २.०० लक्ष<br>३)बनकिनोळा, ता.सिल्लोड, सिमेंट रस्ता, सन २०१४-१५, रु.२.०० लक्ष.<br>४) कासोद, ता.सिल्लोड, सिमेंट रस्ता, | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | सन २०१३-१४, रु. ५.०० लक्ष<br>५)धामणी, ता.सिल्लोड सिमेंट रस्ता, सन २०१३-१४, रु. ५.०० लक्ष<br>**(५) बीड:-**<br>बिड जिल्हा परिषदेने एकही काम बृहत आराखड्या बाहेरील मंजूर केलेले नाहीत. सर्व कामे बृहत आराखड्यात समाविष्ट आहेत.<br>**(६)लातूर:-**<br>लातूर जिल्ह्यामध्ये मौजे रामेश्वर येथे साठेनगर मध्ये बृहत आराखडा सुचीमध्ये सिमेंट नालीचे काम समाविष्ट नसताना रु.२.९५ लक्ष मंजूरी देण्यात आली आहे.<br>**(७)अकोला:-**<br>संबंधीतांना सुचना देऊन विलंब होणार नाही, याची दक्षता घेण्यात येईल.<br>**(८)चंद्रपूर:-**<br>सन २०१३-१४ ते २०१८-१९ या बृहत आराखड्यात सर्व कामे समाविष्ट आहेत. त्यानुसार मंजूरी देण्यात आलेली आहे. | |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | • १३६ वस्तींतील २०२ कामांची मंजूर किंमत रू. ६.३७ कोटी होती ज्यापैकी रू. ५.२५ कोटी देण्यात आले होते. संबंधित PSs नी रू ५.२५ कोटीपैकी रू. ४६.०८ लाख एक ते सहा महिन्यांच्या विलंबाने ग्राम पंचायतींना दिले. | | याबाबत सर्व जिल्हा परिषदांनी माहिती सादर करावी. | **(१)ठाणे :-**<br>जिल्हा परिषदेने मंजूर कामाची रक्कम विनाविलंब गट स्तरावर वितरीत केली आहे. व गट स्तरावरुन सदर रक्कम ग्रामपंचायतींना त्वरीत अदा करण्यात आलेली आहे. सदर बाबतीत विलं झालेला नाही.<br>**(२)रत्नागिरी:-**<br>अशी बाब रत्नागिरी जिल्ह्यात घडलेली नाही.<br>**(३)नाशिक:-**<br>सन २०१२-१३ मध्ये सदर योजनेची तरतूद बीडीएसवर उशिराने प्राप्त झाल्याने (मार्च,२०१३) सदर निधी पंचायत समितींना वर्ग करण्यास उशिर झाला आहे.<br>**(४) औरंगाबाद:-**<br>सदर बाबतची माहिती पंचायत समिती स्तरावरुन उपलब्धल झाली नाही.<br>**(५) बीड:-**<br>बीड जिल्हा परिषदेअंतर्गत समाज कल्याण विभागाने पंचायत समितींना वेळोवेळी निधी वितरीत केला आहे. व निधी वेळेतच वितरीत करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत. | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | **(६)लातूर:-**<br>विलंबाने सुरु झालेल्या कामांची संख्या निरंक आहे.<br>**(७)अकोला:-**<br>संबंधीतांना सुचना देऊन विलंब होणार नाही, याची दक्षता घेण्यात येईल.<br>**(८)चंद्रपूर:-**<br>शासन निर्णय दिनांक ५/१२/२०११ अन्वये पंचायत समिती स्तरावर प्राप्त ९०% निधी पैकी २५ % निधी वितरीत केल्यानंतर ग्रामपंचायतीने सदर निधी खर्च करुन त्याचे मुल्यांकन सादर केल्यानंतर पुढील निधी ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार वितरीत करण्यात येतो. काही ग्रामपंचायतीचे प्रथम दिलेला निधी तात्काळ खर्च न केल्यामूळे पुढील निधी विलंबाने देण्यात आला आहे. | |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | • २०२ कामांपैकी १७० कामे रू ५.३१ कोटी वर २०१०-१४ दरम्यान मंजूर करण्यात आली १७० कामांपैकी १५७ कामे रू ४.२० कोटी किंमतीवर पूर्ण करण्यात आली आणि १२ कामे अपूर्ण राहिली मार्च २०१५ ज्यावर मंजूर किंमत रू. ५२ लाख पैकी रू १३.१७ लाख खर्च करण्यात आले. एक काम रद्द करण्यात आले. पूर्ण केलेल्या १५७ कामापैकी १४६ कामे रू. ३.८८ कोटी किंमतीवर एक वर्षाच्या विनिर्दिष्ट कालावधीत पूर्ण करण्यात आली आणि ११ कामे एक ते दोन वर्षाच्या विलंबाने पूर्ण करण्यात आली. | | संबंधीत जिल्ह्यात विलंबाने कामे पूर्ण झाली असल्यास त्याबाबतचा तपशिल कारणासह नमूद करावा. | **(१) ठाणे :-**<br>ठाणे जिल्हा परिषदेमध्ये एक ते दोन वर्ष विलंबाने कामे झालेली नाहीत.<br>**(२)रत्नागिरी:-**<br>लेखा परिक्षण केलेल्या ग्रामपंचायती मध्ये मंजूर कामे पूर्ण होण्यास विलंब झालेला असला तरी सदरची कामे पुढील आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात आली आहेत.<br>**(३)नाशिक:-**<br>मालेगाव गटातील ग्रामपंचायत पोहाणे अंतर्गत राजवाडा वस्तीत सन २०१०-११ मध्ये मंजूर झालेले कॉंक्रीट रस्त्याचे काम जागेचा वाद असल्याने एक वर्ष विलंबाने सुरु झाले आहे. सद्यस्थितीत काम पूर्ण असून रस्त्याचा वापर सुरु आहे.<br>**(४) औरंगाबाद:-**<br>सदर कामे विलंबाने पूर्ण झालेली असल्याने पंचायत समिती स्तरावरुन खुलासा प्राप्त झालेला नाही.<br>**(५) बीड:-**<br>शासन निर्णय दिनांक ५/१२/२०११ अन्वये सर्व गटविकास अधिकारी यांना वेळीच काम पूर्ण करणेबाबत सुचना | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | दिलेल्या असून सन २०१४-१५ वर्षात बीड जिल्हा परिषदेअंतर्गत पूर्ण कामे वेळेत पूर्ण केले आहेत.<br>**(६)लातूर:-**<br>या जिल्ह्यामध्ये सदरची कामे एक वर्षाच्या आत पूर्ण करण्यात आलेली आहेत.<br>**(७)अकोला:-**माहिती निरंक<br>**(८)चंद्रपूर:-**<br>चंद्रपूर जिल्ह्यात ५५ कामे विलंबाने पूर्ण झाली आहेत. त्याची कारणे पुढील प्रमाणे आहेत. १)शासनाकडून निधी विहीत मुदतीत प्राप्त नसणे, प्राप्त झाल्यास कोषागारातून तात्काळ आहंरीत न होणे, अनौपचारिक संदर्भाची मागणी करणे, २)ग्रामपंचायतीकडून प्रस्ताव तात्काळ प्राप्त न होणे ३)पंचायत समितीकडून तात्काळ अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी प्राप्त न होणे ४) जागेचा वाद निर्माण होणे. | |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | • ८० पैकी १७ ग्राम पंचायतीत २०१३-१५ दरम्यान १७० सौर उर्जा पथदिवे लावण्यात आले ज्यापैकी रू. ४.७६ लाख किंमतीचे २७ दिवे निष्क्रीय होते. | | २७ बंद पथदिव्यांची सद्यस्थिती सादर करावी. | **(१) ठाणे :-**<br>सन २०१३ ते २०१५ या कालावधीत सौर पथदिव्यांची कामे घेण्यात आली नाहीत.<br>**(२)रत्नागिरी:-**<br>जास्त कालावधी झाल्यामूळे सद्यस्थितीत पथदिवे बंद आहेत.<br>**(३)नाशिक:-**<br>सन २०१३-१५ या कालावधीत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजनेंतर्गत कळवण व मालेगाव गटातील ग्रामपंचायतीमध्ये सौर पथदिप या प्रकारचे काम मंजूर नाही. तसेच गावातील इतर पथदिव्याची देखभाल दुरुस्ती करुन ते सुस्थितीत ठेवण्यात आलेले आहेत.<br>**(४) औरंगाबाद:-**<br>जिल्हा परिषद औरंगाबादमध्ये सन २०१३-१४ व २०१४-१५ मधील १० ग्रामपंचायतीत कुठल्याही वस्तीमध्ये सौर पथदिव्यांची कामे घेण्यात आलेली नाहीत. | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | **(५) बीड:-**<br>बीड जिल्हा परिषदेअंतर्गत पंचायत समिती अंबेजोगाई व पाटोदा तालुक्यात सन २०१३ ते २०१५ कालावधीत एकही पथदिव्याचे कामे मंजूर केलेली नाहीत.<br>**(६)लातूर:-**<br>जिल्हा परिषद स्तरावरुन सौर पथदिव्यांची मंजूरी देण्यात आली नाही. शासनाकडून मंजूर करण्यात आलेल्या २३९० पैकी १५७४ सौर पथदिवे सद्यस्थितीत चालू आहेत.<br>**(७)अकोला:-**<br>अकोला जिल्ह्यातील दलित वस्तीतील पथदिवे सुरु आहेत.<br>**(८)चंद्रपूर:-**<br>चंद्रपूरं जिल्ह्यात सन २०१३-१४ या वर्षात एकूण २६७२ सौर पथदिवे प्राप्त झाले आहेत. सद्यस्थितीत ग्रामपंचायतीच्या देखभाल व दुरुस्ती अभावी सौर पथदिवे बंद आहेत. | |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | • योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यस्थळावर कंत्राटदाराचे तपशील आणि काम पूर्ण झाल्याची तारीख नमूद केलेले फलक लावावयास पाहिजे. पूर्ण झालेल्या १५७ पैकी १०१ कामांच्या कार्यस्थळावर ४२ ग्रामपंचायतींव्दारे फलक लावण्यात आले नव्हते. | | ४२ ठिकाणी कामाचे नामफलक लावल्याबाबत सद्यस्थिती सादर करावी. | **(१)ठाणे :-**<br>कल्याण व शहापूर तालुक्यामध्ये मंजूर कामांच्या ठिकाणी नामफलक लावले आहेत.<br>**(२)रत्नागिरी:-**<br>कामाच्या ठिकाणी बोर्ड लावण्यात आले आहेत. १० टक्के अनुदान वितरीत करण्यामध्ये कामाची माहिती दर्शविण्याऱ्या फलकाचा मुळ फोटो घेतला जातो.<br>**(३)नाशिक:-**<br>नासिक जिल्ह्यातील सर्व गटांमधील कामांना नामफलक लावलेले आहेत.<br>**(४) औरंगाबाद:-**<br>नामफलक लावण्यात आलेले आहेत.<br>**(५) बीड:-**<br>सन २०१४-१५ वर्षात आंबेजोगाई व पाटोदा तालुक्यातील ग्रामपंचायतीमध्ये पूर्ण झालेल्या कामांवर नामफलक लावण्यात आलेले आहेत.<br>**(६)लातूर:-**<br>या जिल्ह्यामध्ये मंजूर केलेल्या कामांचे खात्री करुनच नामफलक लावण्यात आलेले आहेत. | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | **(७)अकोला:-**<br>कामाच्या ठिकाणी कंत्राटदारांचा तपशिल व नामफलक लावण्यात आलेला आहे.<br>**(८)चंद्रपूर:-**<br>शासन निर्णय दिनांक १४/११/२००८ अन्वये काम सुरु करण्यापूर्वी सदर कामाच्या ठिकाणी नामफलक लावण्यात आले आहेत. | |
| | | • योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार योजनेच्या अंमलबजावणीची पारदर्शिता रहावी म्हणून BDOs नी काम करण्यापूर्वी व काम पूर्ण झाल्यानंतर कार्यरथळांचे छायाचित्र घ्यावयास पाहिजे. परंतू १५७ पूर्ण झालेल्या कामांपैकी ५३ कामांमध्ये BDOs नी छायाचित्र घेतले नव्हते. | | ५३ ठिकाणी कामाचे फोटो न घेतल्याबाबत ची कारणे सादर करावीत | **(१)ठाणे :-**<br>काम मंजूरीच्या आदेशात कामे सुरु करण्यापूर्वी व कामे पूर्ण झाल्यावर फोटो काढण्याची अट नमूद आहे. कल्याण तालुक्यातील मंजूर कामे सुरु करण्यापूर्वी व कामे पूर्ण झाल्यावर कामाचे फोटो काढलेले आहेत. मात्र शहापूर गटामध्ये अशी कार्यवाही झालेली नाही. या संदर्भात ग्रामपंचायत स्तरावर छायाचित्रकार वेळेवर उपलब्ध न होणे व ग्रामसेवकाकडे इतर कामांचा व्याप असल्यामूळे कामाचे फोटो काढण्याची कार्यवाही झालेली नाही. यापुढे दक्षता घेण्यात येईल. | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | **(२)रत्नागिरी:-**<br>सदरची बाब प्रशासकीय मंजूरी आदेशामध्ये नमूद केलेली असून १० टक्के अनुदान वितरीत करण्यापूर्वी कामाची माहिती दर्शविणारा फलकांचा मुळ फोटो घेतला जातो.<br>**(३)नाशिक:-**<br>नाशिक जिल्ह्यातील सर्व गटांमध्ये कामांची छायाचित्रे घेतली आहेत.<br>**(४) औरंगाबाद:-**<br>कामे पूर्ण झाल्याबाबतची छायाचित्रे घेण्यात आलेली आहेत.<br>**(५) बीड:-**<br>कामे पूर्ण झाल्याबाबतची छायाचित्रे घेण्यात आलेली आहेत.<br>**(६)लातूर:-**<br>या जिल्ह्यामध्ये सदर काम सुरु होण्याआगोदर व काम पूर्ण झालेल्या कामांचा फोटो उपअभियंता जिल्हा परिषद उपविभाग घेऊनच मोजमाप पुस्तिका तयार केली जाते.<br>**(७)अकोला:-**<br>दलित वस्तीमध्ये झालेल्या बांधकामाबाबत छायाचित्र घेण्यात आले आहे. | |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | **(८)चंद्रपूर:-** चंद्रपूर जिल्ह्यात काम सुरु करण्यापूर्वीचे फोटो व काम पूर्ण झाल्यानंतरचे फोटो घेण्यात आले आहेत. | |
| | | • सर्व ८० ग्रामपंचातींनी योजनेसाठी वेगळी रोकड वही ठेवली होती. | | --- | ----- | |
| | | • योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार ग्रामपंचायतींनी निष्पादित केलेली १०० टक्के कामे DSWOs ने तपासवयास पाहिजे. निवडलेल्या ८० पैकी एकाही ग्राम पंचायतीत DSWOs व्दारे करण्यात आलेल्या तपासणीचे दस्ताऐवज ठेवण्यात आले नव्हते. | | जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी कामाच्या तपासणीबाबत अभिलेख तपासणी पथकास काम उपलब्ध करून दिले नाहीत याची कारणे द्यावीत. | **(१) ठाणे :-** जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी मंजूर झालेल्या कामांना वेळोवेळी भेटी देऊन कामाची पहाणी केली आहे. मात्र भेटीचा तपशिल विहीत प्रपत्रात न घेतल्यामूळे तपासणीचे अभिलेख तपासणी पथकास सादर करता आले नाहीत. तसेच ठाणे जिल्ह्याचे क्षेत्र फळ व कामाची व्याप्ती मोठी असल्याने १०० टक्के कामांना भेटी देता आल्या नाहीत.<br>**(२)रत्नागिरी:-** जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी तपासणी केलेले दस्ताऐवज ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध करुन ठेवणेबाबत गटविकास अधिकारी यांना | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | सुचना देण्यात आलेल्या आहेत.<br>(२) नाशिक:-<br>जिल्हा समाजकल्याण अधिकारी समाजकल्याण विभागाचे समाज कल्याण निरिक्षक व इतर कर्मचाऱ्यांमार्फत होणाऱ्या तपासणीचा अहवाल ग्रामपंचायतीच्या शेरे पुस्तकात नमूद केलेले आहेत.<br>**(४) औरंगाबाद:-**<br>जिल्हा समाजकल्याण अधिकारी तथा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांचे ५ तपासणी अहवाल सोबत सादर करण्यात येत आहेत.<br>**(५) बीड:-**<br>सन २०१४-१५ वर्षात अंबेजोगाई पाटोदा तालूक्यातील पुर्ण झालेल्या कामांचे जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी तपासणी केलेली असून त्यांचे अभिलेलख पंचायत समिती / जिल्हा परिषद स्तरावर उपलब्ध आहेत.<br>**(६) लातूर:-**<br>जिल्हा समाजकल्याण अधिकारी १००% कामांची तपासणी करणे शक्य नाही परंतू २५ ते ३०% कामांची | |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | तपासणी केली जाते व तशी नोंद त्यांच्या लॉगबुकला केली जाते.<br>**(७) अकोला:-** माहिती निरंक<br>**(८) चंद्रपूर:-**<br>चंद्रपूर जिल्ह्यात तपासणी अहवलाचे अभिलेख तपासणी पथकास सादर केले आहेत. | |
| | | **प्रधान सचिव, सामाजिक न्याय यांनी लेखा परिक्षा निरिक्षण मान्य केले.** | महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागांच्या सुचनेनुसार संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयामार्फत सदर योजनेंतर्गत २०१२-१३ ते २०१६-१७ या पाच वर्षाच्या कालावधीत झालेल्या कामांचे मुल्यमापन करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्याअनुषंगाने माहे जुलै,२०१८ मध्ये मूल्यमापनाचे काम सुरु आहे. सदर मुल्यमापन अहवाल प्राप्त होताच त्यातील शिफारशीनुसार योजनेच्या अंमलबजावणीत आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील. | | महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागांच्या सुचनेनुसार संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयामार्फत सदर योजनेंतर्गत २०१२-१३ ते २०१६-१७ या पाच वर्षाच्या कालावधीत झालेल्या कामांचे मुल्यमापन करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्याअनुषंगाने माहे जुलै,२०१८ मध्ये मूल्यमापनाचे काम पुर्ण झाले आहे. सदर मुल्यमापन अहवाल प्राप्त होताच त्यातील शिफारशीनुसार योजनेच्या अंमलबजावणीत आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील. | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | २.१.४.३ | **राज्य सार्वजनिक बांधकाम विभागाला योजनेंतर्गत कामांच्या निष्पादनासाठी अनुदानाचे नियमबाहय वाटप करण्यात आले.**<br>२०१३-१४ मध्ये SJSA ने थेट राज्य सार्वजनिक बांधकाम विभागास (PWD) डिसेंबर,२०१३ ते मार्च २०१४ दमम्यान रू. ३०९.६८ कोटीचे अनुदान योजनेंतर्गत विविध कामे निष्पादित करण्यासाठी आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्या मार्फत दिले. हे अनुदान डिसेंबर, २०१३ ते मार्च २०१४ दरम्यान देण्यात आले असल्यामुळे राज्य PWD अंतर्गत असलेले सार्वजनिक बांधकाम विभाग त्याच आर्थिक वर्षात (२०१३-१४) अनुदान उपयोगात आणू शकले नाही. नंतर SJSA ने अनुदान (रू. ३०९.६८ कोटी) "सिव्हील डिपॉजिट्स"(सिव्हील डिपॉजिट शीर्षाखाली निधी आर्थिक वर्ष संपल्यानंतर व्यपगत होत नाही.) अंतर्गत ठेवावयाची परवानगी सार्वजनिक बांधकाम विभागांस दिली. (मार्च२०१४) सार्वजनिक बांधकाम विभागांनी कामे नंतरच्या वर्षात (२०१४-१६) केली.<br>SJSA द्वारे राज्य PWD ला थेट अनुदान वाटप करणे हे खालील कारणांमुळे नियमबाह्य होते.<br>• महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १०० च्या पोट कलम (१) च्या खंड (b) आणि कलम ६ च्या पोट कलम (२) अंतर्गत प्रदान केलेल्या शक्ती अंतर्गत महाराष्ट्र शासनाने नोव्हेंबर २००० मध्ये दलित वस्ती सुधारणेची योजना ZPs कडे हस्तांतरीत करण्यासाठी एक अधिसूचना निर्गमित केली. म्हणूनच योजनेंतर्गत असलेली कामे, जी आधीच ZPs कडे हस्तांतरीत केली गेली आहेत, त्यांच्या निष्पादनासाठी | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीमध्ये मुलभूत सुविधांची कामे करण्यासाठी अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत सबंधीत जिल्ह्यांना अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास या योजनेंतर्गत नियमित स्वरुपाची योजना म्हणून निधी वितरीत केला जातो. मात्र सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात शासन स्तरावरील अतिरिक्त निधीमधून रुपये ३०९.६८ कोटीची कामे मंजूर केली आहेत. त्यापैकी तपासणी पथकाने तपासणी केलेल्या ८ जिल्हा परिषदांना प्राप्त तरतूद , मंजूर कामांची संख्या, पूर्ण व अपूर्ण कामांची संख्या इत्यादींचा तपशिल यासोबतच्या प्रपत्र ४ मध्ये जोडला आहे. | बीड व अकोला जिल्हा परिषदेने माहिती सादर करावी. तसेच रत्नागिरी व चंद्रपूर जिल्हयात ४ कामे जागे अभावी अपूर्ण असल्याचे दर्शविले आहे. जागा उपलब्ध नसतांना कामे मंजुर करण्याची कारणे सादर करावीत.<br>तसेच ४ वर्षानंतरही ११६ कामे अपूर्ण असल्याची कारणे सादर करावीत. | सदर योजनेच्या अनुषंगाने सन २०१३-१४ मध्ये शासन स्तरावर उपलब्ध असलेल्या अतिरिक्त निधीमधून महालेखापाल यांनी तपासणी केलेल्या आठ जिल्ह्यांसाठी एकूण रु. ७२.१७ कोटीची एकूण ९८० कामे मंजूर केली आहेत. सदर कामांपैकी पूर्ण व अपूर्ण कामांचा तपशिल सविस्तर तपशिल **प्रपत्र-५** मध्ये दिला आहे. तसेच सदर योजनेंतर्गत आठ जिल्ह्यांना प्राप्त निधी व खर्च व शिल्लक निधीचा तपशिल **प्रपत्र-६** मध्ये दिला आहे. | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | अनुदान थेट राज्य PWD कडे देणे नियमबाह्य होते आणि यामुळे राज्य शासनाद्वारे पंचायती राज संस्थांच्या स्वायत्तता व कार्यप्रणाली वर अनावश्यक अतिक्रमण होत आहे.<br>• योजनेच्या मार्गदर्श तत्वांनुसार (डिसेंबर २०११) निष्पादनापूर्वी अधिसूचित वस्तींमधील कामे ग्राम पंचायतीद्वारे निश्चित केली असली पाहिजे आणि ZPs च्या अतिरिक्त CEO द्वारे मंजूर केली असली पाहिजे. परंतु या प्रकरणात सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे योजनेंतर्गत करावयाची कामे SJSA द्वारे मंत्रालय स्तरावर विविध लोकप्रतिनिधींच्या शिफारशींवर निवडण्यात आली.<br>**प्रधान सचिव SJSA यांनी वस्तुस्थिती मान्य केली आणि नमुद केले की, लोकप्रतिनिधींच्या मागण्यांनुसार तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी विशेष प्रकरण म्हणून वस्तींच्या विकासासाठी राज्य PWD ला अनुदान मंजूर केले.** | लेखा परिक्षणाच्या सदर निरिक्षणाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, सद्यस्थितीत अशाप्रकारे शासनाकडील अतिरिक्त निधीमधून कामे मंजूर केली जात नाहीत.<br>सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक दवसु-२०१५/प्र.क्र. ३४७/ अजाक, दिनांक ९/३/२०१८ अन्वये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना या नावाने सन २०१८-१९ या आर्थिक वर्षापासून स्वतंत्र योजना लागू केली असून या योजनेतून विद्यमान आमदार व खासदार यांच्या शिफारशीनुसार कामे मंजूर करण्याची तरतूद आहे. | | | |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | २.१.४.४ | **सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे कामांचे नियोजन आणि निष्पादन यातील त्रुटी.**<br>निवडलेल्या आठ ZPs मध्ये २०१३-१५ दरम्यान कामांचे नियोजन आणि निष्पादन यात राज्य सार्वजनिक बांधकाम (PW) विभागांद्वारे झालेल्या खालील त्रुटी लेखापरीक्षेस निदर्शनास आल्या. | | | | |
| | | • योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार (नोव्हेंबर २००८) फक्त बृहत आराखडयात समाविष्ट केलेली कामेच निष्पादित करावयास पाहिजे होती. तथापी, निवडलेल्या आठ PW विभागांपैकी सहामध्ये (अकोला, औरंगाबाद, चंद्रपूर, लातूर, नाशिक आणि रत्नागिरी) योजनेच्या मार्गदर्शक तत्वांविरूध्द बृहत आराखडयात समाविष्ट नसलेली समाज मंदिरे / सामुदायिक भवनांची ३१ कामे रू. २.२३ कोटी खर्चून करण्यात आली. | लेखा परिक्षणाच्या सदर निरिक्षणाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, सद्यस्थितीत अशाप्रकारे शासनाकडील अतिरिक्त निधीमधून कामे मंजूर केली जात नाहीत.<br><br>सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक दवसु-२०१५/प्र.क्र. ३४७/ अजाक, दिनांक ९/३/२०१८ अन्वये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना या नावाने सन २०१८-१९ या आर्थिक वर्षापासून स्वतंत्र योजना लागू केली असून या योजनेतून विद्यमान आमदार व खासदार यांच्या शिफारशीनुसार कामे मंजूर करण्याची | विभागाने सादर केलेले उत्तर अमान्य करण्यात येत असून ३१ समाज मंदिराची कामे बृहत आराखडयामध्ये समाविष्ठ नसतांना करण्यात आली. त्याची किंमत २.२३ कोटी इतकी आहे. सदर बाब योजनेच्या निकषाशी विसंतगत आहे. सदर बाबीस जबाबदार अधिकाऱ्यावर केलेल्या कार्यवाहीचा | सदर योजनेच्या अनुषंगाने सन २०१३-१४ मध्ये शासन स्तरावर उपलब्ध असलेल्या अतिरिक्त निधीमधून महालेखापाल यांनी तपासणी केलेल्या आठ जिल्ह्यांसाठी एकूण९८० इतकी कामे मंजूर केली असून त्यापैकी ३१६ इतकी कामे बृहत आराखड्यात समाविष्ट होती तर उर्वरीत ६६४ इतकी बृहतआराखड्यात समाविष्ट नव्हती.<br><br>सदर ९८० कामांमध्ये समाज मंदिराच्या २२१ कामांचा समावेश आहे. त्यासाठी रु. १६.४१ कोटी इतका निधी मंजूर असून या २२१ मंजूर कामांपैकी १८९ कामे पूर्ण | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | तरतूद आहे. | तपशिल समितीस सादर करावा. | झाली असून २२ कामे अपूर्ण आहेत. तसेच नाशिक जिल्ह्यातील ७ कामे, अकोला जिल्ह्यातील २ कामे व चंद्रपूर जिल्ह्यातील १ काम अशी एकूण १० कामे रद्द करण्यात आलेली आहेत.<br>सदर कामांचा सविस्तर तपशिल **प्रपत्र-५** मध्ये दिला आहे. | |
| | | • २०१३-१४ मध्ये PW विभागांच्या रू. ४२.२४ कोटी किंमतीच्या मंजूर ५१७ कामांपैकी २४० कामे एक वर्षाच्या विहित कालावधीत पूर्ण करण्यात आली आणि १८७ कामे ज्यावर रू. ५.८३ कोटी खर्च करण्यात आले होते. अपूर्णावस्थेत होती (जून २०१५) या शिवाय रू. २.६३ कोटी किंमतीची मंजूर ५० कामे PW विभागाद्वारे सुरू करण्यात येऊ शकली नाही आणि उरलेली ४० कामे अन्य एजन्सींना/नागरी स्थानिक संस्थांना (ULBS) हस्तांतरीत करण्यात आली. (मार्च २०१५) | | विभागाने उत्तर सादर केलेले नाही. | शासनाने अतिरिक्त निधीमधून एकूण ९८० कामे मंजूर केली असून सदर कामांपैकी आजअखेर ८६६ कामे पूर्ण झाली असून ७६ कामे विविध कारणास्तव(जागेअभावी-३५,<br>अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांची वस्ती नसल्याने-१८, अन्वय योजनेतून काम झाल्याने-४ व इतर कारणास्तव-१९) रद्द केली आहेत. तर ३८ कामे अपूर्ण अवस्थेत आहेत. या ३८ अपूर्ण कामांपैकी २१ कामे अद्याप सुरु झालेली नसून १७ कामे प्रगतीपथावर आहेत. | |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | सदर ९८० कामांपैकी पूर्ण, अपूर्ण, रद्द व प्रगतीपथावर असलेल्या कामांचा सविस्तर तपशिल **प्रपत्र-६** मध्ये दिला आहे.<br>**सदर योजनेंतर्गत प्राप्त निधी खर्च व शिल्लक रक्कमेचा तपशिल प्रपत्र-७ मध्ये दिला आहे.** | |
| | | • PW विभाग, ठाणेला २०१३-१४ मध्ये मंजुर करण्यात आलेल्या ९३कामांपैकी १८ कामे अधिसूचित वस्तींशी संबंधित नव्हती १० कामें आधिच ZP/ULB द्वारे करण्यात आली होती आणि तीन कामांसाठी जागा उपलब्ध नव्हती. | | विभागाने उत्तर सादर केलेले नाही. | शासनाने ठाणे जिल्ह्यासाठी अतिरिक्त निधीतून मंजूर केलेल्या कामांपैकी १८ कामे अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीत नसल्याने ती रद्द करण्यात आली आहेत. तसेच ९ कामे नगरपालिकेमार्फत करण्यात आली आहेत. तसेच जागेअभावी २० कामे रद्द करण्यात आली आहेत. | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |
| | | • २०१३-१४ मध्ये SJSA ने तीन (चंद्रपूर, नाशिक आणि रत्नागिरी) PW विभागांना १४ वस्तींमध्ये कामे निष्पादित करण्यासाठी रू. २.३२ कोटी मंजूर केले. जे त्या वस्तीच्या अनुज्ञेयतापेक्षा रू. १.०१ कोटीने जास्त होते. | | विभागाने उत्तर सादर केलेले नाही | चंद्रपूर जिल्ह्यासाठी रु.९.३७ कोटीची १४४ कामे, नाशिक जिल्ह्यासाठी रु.१४.५० कोटीची १४४ कामे व रत्नागिरी जिल्ह्यासाठी ५.०० कोटीची ९३ कामे मंजूर केली आहेत.<br><br>सदर योजनेंतर्गत शासन स्तरावर | |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | उपलब्ध असलेल्या निधीतून सदर कामे मंजूर केली असल्याने या कामांना दिनांक ५/१२/२०११ च्या शासन निर्णयातील लोकसंख्येनुसार अनुदानाची अनुज्ञेयता लागू नाही. अशा प्रकारे निधी मंजूर करणे ही बाब शासन धोरणाचा (Policy Decision ) भाग आहे. | |
| | | • PW विभागांना त्यांच्याद्वारे केलेल्या सर्व डिपॉजिट कामांसाठी आस्थापना आणि साधने/संयत्रे यासाठी टक्केवारी खर्च (centage charges) वसूल करावयाचे प्राधिकार आहेत. दोन (अकोला आणि ठाणे) PW विभागांनी त्यांच्याद्वारे योजनेंतर्गत केल्या गेलेल्या कामांसाठी रू. ३७.७३ लाख टक्केवारी खर्च म्हणून वसूल केले. जेव्हा की ही कामे डिपॉजिट कामे नव्हती यामुळे योजनेच्या अनुदानात कमी झाली. | | विभागाने उत्तर सादर केलेले नाही | सदर योजनेचा निधी शासनामार्फत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग केला असल्याने बांधकाम विभागाने टक्केवारी खर्च (centage charges) आकारला आहे. | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | २.१.५<br>२.१.५.१ | **२.१.५ संनियंत्रण आणि मूल्यांकन**<br>**२.१.५.१ संनियंत्रणाचा अभाव**<br>योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार (नोव्हेंबर २००८) पूर्ण झालेल्या कामांपैकी दोन टक्के कामे राज्य शासन स्तरावर पाच टक्के आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्या स्तरावर आणि १०० टक्के DSWOs यांच्या स्तरावर तपासावयास पाहिजे. निवडलेल्या आठ ZPs च्या दस्तऐवजांच्या पडताळणीत असे आढळले की शासन आणि आयुक्त स्तरावर २०१२-१३ पर्यंत कोणत्याही प्रकारची तपासणी करण्यात आली नव्हती आणि २०१०-१४ दरम्यान पुर्ण झालेल्या ६,६२४ कामांपैकी DSWOS नी फक्त १,९०० (२९%) कामे तपासली. परंतु DSWOS द्वारे करण्यात आलेल्या तपासणीच्या पुष्ट्यर्थ कोणतेही दस्तऐवज लेखापरिक्षेस सादर करण्यात आले नाही.<br>**प्रधान सचिव SJSA यांनी नमूद केले की DSWOS द्वारे १००% आयुक्तांद्वारे ५ % आणि शासन स्तरावर २% कामांची तपासणी व्यवहार्य दृष्टया शक्य नाही. प्रधान सचिव यांनी पुढे असेही नमूद केले की, तपासणी परिणामाचा आढावा घेण्यात येईल.** | आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक सकआ/मावक/ अजानबौघवि/लोलेस साक्ष/ परि.क्र.२.१/२०१८-१९/का-१२/६२४, दिनांक ३०/७/२०१८ अन्वये सदर योजनेंतर्गत मंजूर कामांची तपासणीचे उद्दिष्टे विहीत करण्यात आले असून गटविकास अधिकारी कार्यालयाने १००% कामांची तपासणी, तर जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी किमान १०% कामांची तपासणी करण्याचे उद्दिष्ट विहीत केले आहे.<br><br>तपासणी पथकाने तपासणी केलेल्या आठ जिल्हा परिषदांबाबत जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालयाने केलेल्या कामाच्या तपासणीचा तपशिल सोबतच्या प्रपत्र-७ मध्ये दिला आहे. | जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी मंजुर कामाची तपासणी केल्याबाबत अभिलेख सोबत जोडावे | जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी तपासणी केलेल्या कामांचा तपशिल **प्रपत्र- ८** मध्ये जोडला आहे. | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | २.१.५.२ | **कामांचे मोजमापन न करणे.**<br>महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ च्या नियम १६८ (१) (c) आणि महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका १९८४ (परिशिष्ठ २४) अनुसार ZPS आणि PW विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी (EES) त्यांच्या अधीन असलेल्या अभियंत्यांनी नोंद केलेल्या अंतिम मोजमापांचे चालू लेख्यांवर अनुक्रमे रू. २५,००० आणि रू. ५०,००० रकमेच्या प्रत्येक कामाची कमीत कमी ५ % या टक्केवारीने तपासणी करावयास पाहिजे.<br>निवडलेल्या आठ ZPS च्या दस्तऐवजांच्या तपासणीत असे निदर्शनास आले की, २०१०-१४ दरम्यान पूर्ण झालेल्या ६,६२४ कामांची कोणत्याही प्रभारी EES नी विहित तपासणी केली नाही. निवडलेल्या ZPS मधील आठ PW विभागांपैकी ५ (औरंगाबाद, बीड, नाशिक, रत्नागिरी आणि ठाणे) मध्ये पूर्ण केलेल्या २४० कामांपैकी ७४ कामांची संबंधित EES द्वारे तपासणी करण्यात आल्याचे सांगण्यात आले परंतू मोजमापांच्या तपासाबाबतचे दस्तावेज लेखापरिक्षेस उपलब्ध करण्यात आले नाहीत. उरलेल्या तीन PW विभागांत EE, PW विभाग, अकोला यांनी कामे उपअभियंत्यांद्वारे तपासण्यात आल्याचे सांगितले (जुलै २०१५). EE, PW विभाग लातूर यांनी कामांचा भार जास्त असल्यामुळे कामे तपासण्यात येऊ न शकल्याचे सांगितले (मार्च२०१५). EE, PW विभाग नाशिक यांनी नेमके उत्तर दिले नाही.<br>**प्रधान सचिव SJSA यांनी याबाबत आवश्यक सूचना देण्यात येईल असे नमूद केले.** | महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ च्या नियम १६८ (१) (c) आणि महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका १९८४ (परिशिष्ठ २४) अनुसार जिल्हा परिषद कार्यकारी अभियंता यांना रुपये २५०००/- व रु. ५००००/- रक्कमेच्या प्रत्येक कामाची कमीत कमी ५% तपासणी करणे आवश्यक आहे.<br>सदर बाबतीत आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यास्तरावरुन पत्र दि. १०.८.२०१८ अन्वये सर्व जिल्हा परिषदांना सुचना निर्गमित केल्या आहेत. | सदर कामाची बांधकाम विभाग जिल्हा परिषद येथील कार्यकारी अभियंता यांनी प्रत्येक कामाची कमीतकमी ५ % तपासणी करणे करण्याच्या सूचना ऑगस्ट २०१८ मध्ये दिल्या आहेत मात्र अशी तपासणी न केल्याबाबत संबंधितांवर केलेल्या कार्यवाहीचा तपशिल दयावा. | सदर प्रकरणी संबंधीतांवर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल. | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | २.१.५.३ | **भौगोलिक माहिती प्रणाली** (Geographical Information System-GIS) **द्वारे अधिसूचित वस्तींचे रेखांकन** (mapping) **न करणे**<br>SJSA ने ऑगस्ट २०१३ मधील शासन निर्णयाद्वारे सर्व ZPs ना GIS द्वारे अधिसूचित वस्ती रेखांकित करून ZPs च्या संकेत स्थळावर त्यांचे इलेक्टॉनिक डेटाबेस अपलोड करावयाचे निर्देश दिले. लेखापरिक्षेस असे निदर्शनास आले की, निवडलेल्या आठही ZPs मध्ये SJSA द्वारे या कारणास्तव निधी न देण्यात आल्यामुळे GIS रेखांकन करण्यात आले नाही.<br>उपसचिव, SJSA यांनी नमूद केले (सप्टेंबर२०१५) की GIS रेखांकन करण्याविषयीचा उद्देश दस्तऐवजात उपलब्ध नाही आणि त्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या तोंडी सूचनांवरून शासन निर्णयात समाविष्ट करण्यात आले होते.<br>GIS रेखांकन नसल्यामुळे अधिसूचित वस्तींचे नेमके स्थान या वस्तीमध्ये आधिच करण्यात आलेली विकास कामे भविष्यात करावयाची नियोजित कामे, आर्थिक तरतूद इत्यादी माहिती ZPS च्या संकेत स्थळावर व्यवस्थापन आणि हितसंबंधितांच्या उपयोगासाठी उपलब्ध नाही.<br>**प्रधान सचिव** SJSA **यांनी अधिसूचित वस्तींचे** GIS **रेखांकन करण्यात येईल असे नमूद केले.** | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक दवसु-२०१३/ प्र.क्र.८५/अजाक-१,दिनांक १/०८/२०१३ नुसार सर्व जिल्हा परिषदांना सर्व घोषीत वस्त्यांचे GIS मॅपिंग करावे व त्यांचा इलेक्टॉनिक डाटा बेस तयार करुन तो संबंधीत जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. मात्र या सुचनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेली नाही. त्यासाठी समाजकल्याण आयुक्तालयाने पत्र क्रमांक सकआ/मावक/ अजानबौघवि/२०१८/ का-१२/५८०, दिनांक १७ जुलै, २०१८ अन्वये राज्यातील सर्व वस्त्यांचे सर्वेक्षण व जीआयएस मॅपिंग करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. | सदर योजनेंतर्गत संबंधित वस्त्यांचे GIS मॅपिंग न करण्याची कारणे नमुद करावीत. | अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वस्त्यांचे सर्वेक्षण करणे व योजनेच्या संनियंत्रणासाठी GIS Based Dalit Vasti Geo Spatial portal तयार करणेबाबतचा प्रस्ताव आयुक्तालयाचे पत्र क्र.५८०, दिनांक १७/७/२०१८ अन्वये शासनास सादर करण्यात आला आहे. | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | २.१.५.४ | **कार्यसिध्दी लक्ष्य न ठरविणे आणि योजनेचे मूल्यांकन न करणे.**<br>जिल्ह्यांचे पंचवार्षिक बृहत आराखडे जरी ZP स्तरावर संकलित करण्यात येतात तरी एका विशिष्ठ कालावधीत ZPS नी किती कामे पूर्ण करावयास पाहिजे आणि किती अधिसूचित वस्तींचा विकास करावयास पाहिजे या विषयीचे कार्यसिध्दी लक्ष्य SJSA द्वारे ठरविण्यात आले नाही. त्यामुळे SJSA, ZPS स्तरावर (अतिरिक्त CEOs आणि DSWOs) जबाबदारी निश्चित करू शकत नाही. तसेच अशा अधिसूचित वस्ती जेथे सर्व मूलभूत सुविधा पुरविण्यात आल्या आहेत त्यांची संख्याही निर्धारित करू शकत नाही.<br>**प्रधान सचिव** SJSA **यांनी नमूद केले की कार्यसिध्दी बाबतचे लक्ष्य निश्चित करण्याच्या दृष्टीने योजनेच्या मार्गदर्शक तत्वांचा आढावा घेण्यात येईल.**<br>याशिवाय कोणत्याही योजनेची परिणाम निष्पत्ती जाणण्यासाठी आणि योजनेचे उद्दीष्ट कितपत साध्य झाले हे ठरविण्यसाठी योजनेंतर्गत घेण्यात येणा-या कामांच्या उद्देशपूर्णतेबाबत वेळोवेळी निर्धारण अथवा मूल्यांकन करावयास पाहिजे. लेखापरीक्षेस असे निदर्शनास आले की १९७४ मध्ये प्रारंभ झाल्यापासून SJSA ने योजनेचे कोणतेही नियतकालिक उद्देशपूर्णता निर्धारण अथवा मूल्यांकन केले नाही. त्यामुळे योजनेचे मुळ उद्दीष्ट (अनुसूचित जाती/नवबौध्दांचे राहणीमान उंचावणे) साध्य झाले अथवा नाही याची पडताळणी करणे अवघड होते. | | | | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | प्रधान सचिव SJSA यांनी लेखापरिक्षा निरीक्षण मान्य केले आणि स्वतंत्र एजेन्सीद्वारे योजनेचा मूल्यांकन अभ्यास करण्यात येईल असे नमूद केले. | महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागांच्या सुचनेनुसार संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयामार्फत सदर योजनेंतर्गत २०१२-१३ ते २०१६-१७ या पाच वर्षाच्या कालावधीत झालेल्या कामांचे मुल्यमापन करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्याअनुषंगाने माहे जुलै,२०१८ मध्ये मूल्यमापनाचे काम सुरु आहे. सदर मुल्यमापन अहवाल प्राप्त होताच त्यातील शिफारशीनुसार योजनेच्या अंमलबजावणीत आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील. | सदर योजनेचे मुल्यमापन संचालक अर्थ व सांख्यिकी संचालनालय यांनी केव्हा सुरु केले व ते केव्हा पर्यंत पूर्ण होणार याबाबतची माहिती दयावी. | शासनाच्या नियोजन विभागांतर्गत अर्थ व सांख्यिकी संचालनालयाने माहे जुलै, २०१८ मध्ये योजनेच्या मुल्यमापनासाठी क्षेत्रिय पातळीवर तपासणी केली असून सदर अहवाल लवकरच अपेक्षित आहे. | |
| | २.१.६ | **निष्कर्ष आणि शिफारशी**<br>महाराष्ट्रातील अनुसूचित जाती आणि नवबौध्द वस्तीच्या विकास योजनेच्या कार्यान्वयनाच्या नियोजनात कमतरता होती. बृहत आराखडा तयार करण्यासाठी असलेले प्रपत्र, ज्यात विकासासाठी निश्चित केलेल्या वस्तींचे तपशिल आणि वस्तींची आर्थिक अनुज्ञेयता दर्शविली असते, एकसमान नव्हते. अनुदान वाटपासाठी वस्तींची प्राध्यान्यता सूचीही तयार करण्यात आलेली नव्हती. ज्यामुळे अनेक गरजू वस्तींना योजनेच्या लाभापासूनच वंचित करण्यात आले. बृहत आराखडयात विचारात घेतलेली अनुसूचित जाती आणि नवबौध्दांची लोकसंख्या जनगणनेत दर्शविलेल्या | | | **(१)ठाणे :-**<br>सन २०१८-१९ ते २०२२-२३ या कालावधीचा बृहत आराखडा जिल्ह्यातील ५ तालुक्यांपैकी २ तालुक्यांचा प्राप्त झाला आहे. व इतर तालुक्यांचा बृहत आराखडा तयार करण्याचे काम प्रगतीपथावर सुरु आहे.<br>**(२)रत्नागिरी :-**<br>सन २०१८-१९ ते २०२२-२३ कालावधीचा बृहत आराखडा तयार | आयुक्त, समाज कल्याण यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | लोकसंख्येपेक्षा खूप जास्त होती. ज्यामुळे अनेक वस्तींना अनुज्ञेयतेपेक्षा जास्त अनुदान देण्यात आले.<br><br>*सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने बृहत आराखडा तयार करण्यासाठी एखादया व्यापक प्रमाणपत्र अविलंब विनिर्दिष्ट करावयास पाहिजे जेणे करून विकासाची गरज असलेल्या अधिसूचित वस्त्या योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या लाभापासून वंचित राहणार नाहीत.*<br><br>निवडलेल्या आठ जिल्हापरिषदांना अनुदान वाटप करण्यात विभागाद्वारे SJSA एक ते सहा महिन्यांचा विलंब झाला. जिल्हा परिषदांनी पंचायत समितींना अनुदान संपूर्णत: दिले नाही आणि २०१०-१५ मध्ये रू. २८८.१४ कोटी एवढी मोठी रक्कम अखर्चित राहिली. २०१०-१४ दरम्यान निवडलेल्या आठ जिल्हा परिषदांसाठी मंजूर केलेल्या पंधरा टक्के कामांना पूर्ण करावयाच्या विहित तारखेपेक्षा एक ते तीन वर्षाचा विलंब मुख्यत: जिल्हा परिषदांना अनुदान देण्यातील विलंबामुळे झाला.<br><br>*विभागाने जिल्हा परिषदांना अनुदानाचे वाटप वेळेवर करावयाची खातरजमा करावयास पाहिजे म्हणजे ग्राम पंचायतीद्वारे वस्तींना कार्यक्षमतापूर्वक सेवा देता येईल.* | समाजकल्याण आयुक्तालयाचे पत्र क्रमांक सकआ/मावक/अजानवव/ बृहतआराखडा/ २०१६/ का-१२/११९९, दिनांक २२ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रमाण प्रपत्र (Standard Format) विहीत केले असून या विहीत प्रपत्रात सन २०१८-१९ ते २०२२-२३ या ५ वर्षे कालावधीचा बृहत आराखडा तयार करण्याच्या सुचना प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण कार्यालयामार्फत सर्व जिल्हा परिषदांना दिल्या आहेत. सदर विहीत प्रपत्रात आराखडा तयार करण्याचे काम जिल्हास्तरावर सुरु आहे.<br><br>सदर योजनेंतर्गत काम मंजूरीची व निधी वितरणाची कार्यवाही विहीत मुदतीत | सन २०१८-१९ ते २०२२-२३ या कालावधीचा बृहत आराखडा तयार करण्याबाबत प्रगती काय आहे याबाबतचा तपशिल सादर करावा. | करुन मान्यतेसाठी प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, मुंबई कार्यालयास सादर करण्यात आला आहे.<br>**(३)नाशिक :-**<br>सन २०१८-१९ ते २०२२-२३ कालावधीचा बृहत आराखडा तयार करण्याचे काम प्रगतीपथावर सुरु आहे.<br>**(४)औरंगाबाद :-**<br>सन २०१८-१९ ते २०२२-२३ कालावधीचा बृहत आराखडा तयार करण्याचे काम प्रगतीपथावर सुरु आहे.<br>**(५)बीड :-**<br>सन २०१८-१९ ते २०२२-२३ कालावधीचा बृहत आराखडा तयार करण्याचे काम प्रगतीपथावर सुरु आहे.<br>**(६)लातूर :-**<br>सन २०१८-१९ ते २०२२-२३ कालावधीचा बृहत आराखडा तयार करुन मान्यतेसाठी प्रादेशिक | |

| क्र. | परिच्छेद क्र./उप.क्र | परिच्छेदाचा सविस्तर तपशिल | आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय | मा.महालेखापालांचे अभिप्राय (Vetting Remarks) | अनुपालन | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | नोव्हेंबर २००० पासून जरी ही योजना जिल्हा परिषदांना हस्तांतरीत करण्यात आली असली तरी २०१३-१४ मध्ये SJSA ने राज्य PWD ला अधिसूचित वस्तींमधील विविध कामांच्या निष्पादनासाठी रू. ३०९.६८ कोटी दिले. जे नियमबाहय होते. विभागीय आणि क्षेत्रिय स्तरावर योजनेचे संनियंत्रण कमकुवत होते. विभागाने योजनेच्या उद्देशपूर्णतेबाबत निर्धारण अथवा मुल्यांकन केले नाही. अधिसूचित वस्तींचे GIS रेखांकन केले नाही.<br>*विभागाने कामांची नियमीत तपासणी आणि योजनेच्या उद्देशपूर्णतेबाबत नियतकालिक निर्धारण करून संनियंत्रण आणि मूल्यांकन पध्दती बळकट करावयास पाहिजे. जबाबदारी निश्चित करावयासाठी विभागाने नेमके आणि मापनयोग्य कार्यसिध्दी लक्ष्य देखील विहीत करावयास पाहिजे.*<br><br>ही बाब नोव्हेंबर २०१५ मध्ये शासनास कळविण्यात आली. एप्रिल २०१६ पर्यत त्यांचे उत्तर प्रतिक्षित होते. | व्हावी, यासाठी आयुक्त,समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक सकआ/मावक/ अजानबौघवि/ अखनि/ कार्यप्रणाली/२०१७-१८/का-१२/५३५९, दि. २१/७/२०१८ अन्वये स्तरावरुन सर्व जिल्हा परिषदांना सुचना दिल्या आहेत.<br><br>सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर मार्गदर्शक सुचना शासनस्तरावरुन सर्व संबधितांना देण्यात येत आहेत. | | उपायुक्त, समाजकल्याण विभाग, लातूर कार्यालयास सादर करण्यात आला आहे.<br>**(७)अकोला :-** २०१८-१९ ते २०२२-२३ कालावधीचा बृहत आराखडा चुकीचा तयार केला असल्यामूळे सुधारीत बृहत आराखडा तयार करण्याचे काम प्रगती पथावर सुरु आहे.<br><br>**(८)चंद्रपूर :-**<br>सन २०१८-१९ ते २०२२-२३ कालावधीचा बृहत आराखडा चुकीचा तयार केला असल्यामूळे सुधारीत बृहत आराखडा तयार करण्याचे काम प्रगती पथावर सुरु आहे.<br>उपरोक्त ८ जिल्हा परिषदांशिवाय इतर जिल्हा परिषदांचे बृहत आराखडे तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. | |

* * * * *

प्रपत्र- १

सन- २०१०-११ ते २०१४-१५ या कालावधीत आयुक्तालय स्तरावरून वितरीत करण्यात आलेल्या तरतुदीचा तपशिल.

( आकडे लाखात )

| क्र. | आर्थिक वर्ष | निधी वितरण आदेश दिनांक | वितरीत तरतुदीचा विभागनिहाय तपशिल | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुंबई | पुणे | नाशिक | औरंगाबाद | लातूर | अमरावती | नागपूर | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | २०१०-११ | ९/१२/२०१० १६/३/२०११ | ७७२.८२ | १६७५.६२ | २३३०.६८ | १२१२.८९ | १६८३.३७ | २२८२.६६ | २३९०.२६ | **१२३४८.३०** |
| २ | २०११-१२ | १८/७/२०११ २७/२/२०१२ | ६४५.९९ | १८४७.९४ | २४३५.१२ | १४९९.३२ | १७०४.६१ | २४३९.०० | २१७५.२२ | **१२७४७.२०** |
| ३ | २०१२-१३ | ३१/५/२०१२ ३०/३/२०१३ | ९७०.३८ | ७०५८.०० | ५९९८.३० | ३५०२.४५ | ७७८४.८७ | ५२७२.२९ | ७४७४.६१ | **३८०६०.९०** |
| ४ | २०१३-१४ | ९/५२०१३ १८/७/२०१३ | १०००.०० | ६९४१.२७ | ६११४.६४ | ४१३२.०० | ८७६२.३२ | ८८०६.५९ | ८१११.२१ | **४३९४८.०३** |
| ५ | २०१४-१५ | ९/७/२०१४, ४/९/२०१४, ९/३/२०१५, १२/३/२०१५, १६/३/२०१५ | १९५५.४९ | ८९२६.९५ | ८९७०.७६ | ६५१५.०० | ९२१६.२२ | १०३०५.६५ | ८७६८.२५ | **५४६५८.३२** |
| | एकूण | | **५३४४.६८** | **२६४४९.७८** | **२५९२९.५०** | **१६८६१.६६** | **२९१५१.३९** | **२९१०६.१९** | **२८९१९.५५** | **१६१७६२.७५** |

प्रपत्र- २

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे

परिच्छेद क्र. २.१ मधील मुद्दा क्रमांक- २.१.३.२

सन- २०१०-११ ते २०१६-१७ या कालावधीत क्षेत्रिय कार्यालयांना वितरीत निधीचा तपशील

| क्र. | आर्थिक वर्ष | निधी वितरण आदेश दिनांक | वितरीत तरतुदीचा विभागनिहाय तपशिल | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुंबई | पुणे | नाशिक | औरंगाबाद | लातूर | अमरावती | नागपूर | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | २०१०-११ | ९/१२/२०१०<br>१६/३/२०११ | ७७२.८२ | १६७५.६२ | २३३०.६८ | १२१२.८९ | १६८३.३७ | २२८२.६६ | २३९०.२६ | **१२३४८.३०** |
| २ | २०११-१२ | १८/७/२०११<br>२७/२/२०१२ | ६४५.९१ | १८४७.९४ | २४३५.१२ | १४९९.३२ | १७०४.६१ | २४३९.०० | २१७५.२२ | **१२७४७.२०** |
| ३ | २०१२-१३ | ३१/५/२०१२<br>३०/३/२०१३ | ९७०.३८ | ७०५८.०० | ५९९८.३० | ३५०२.४५ | ७७८४.८७ | ५२७२.२९ | ७४७४.६१ | **३८०६०.९०** |
| ४ | २०१३-१४ | ९/५/२०१३<br>१८.७.२०१३ | १०००.०० | ६९४१.२७ | ६११४.६४ | ४१३२.०० | ८७६२.३२ | ८८०६.५९ | ८१११.२१ | **४३९४८.०३** |
| ५ | २०१३-१४<br>अति. निधी | २६/३/२०१४ | ३२४६.०० | ८२९४.७४ | ५७१८.०० | २६०२.०० | ३२३८.०० | ४३१२.०० | ३५५७.९५ | **३०९६८.६९** |
| ६ | २०१४-१५ | ९/७/२०१४<br>४/९/२०१४<br>९/३/२०१५<br>१२/३/२०१५<br>१६.३.२०१५ | १९५५.४९ | ८९२६.९५ | ८९७०.७६ | ६५१५.०० | ९२१६.२२ | १०३०५.६५ | ८७६८.२५ | **५४६५८.३२** |
| ७ | २०१५-१६ | ३१.३.२०१६ | २४१८.४९ | १२५५९.४७ | १४७१०.४१ | ८२५४.६६ | १५२४२.७६ | १२६६५.०७ | ९४९५.४८ | **७५३४६.३४** |
| ८ | २०१६-१७ | ८.६.१६ | १९८९.३६ | ११७९९.७४ | १५७९७.७६ | ८७५६.३० | १६०४३.६९ | १२४७८.१७ | ८७७९.७५ | **७५६४४.७७** |
| | एकूण | | **१२९९८.५३** | **५११०३.७३** | **६२१५५.६७** | **३६४७४.६२** | **६३६७५.८४** | **५८५६१.४३** | **५०७५२.७३** | **३४३७२२.५५** |

प्रपत्र-३

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे

परिच्छेद क्रमांक २.१ मधील मुद्दा क्रमांक २.१.३.४

सन २०१०-११ ते २०१६-१७ या कालावधीचा प्राप्त तरतूद व खर्चाचा तपशिल.

(रु.लाखात)

| क्र. | जिल्हा | आर्थिक वर्ष | अर्थसंकल्पीय तरतूद | बीडीएसवर प्राप्त तरतूद | शासनास समर्पित तरतूद | उपलब्ध तरतूद(५-६) | खर्च | शिल्लक तरतूद | शासन खाती जमा केलेली तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| १ | ठाणे | २०१०-११ | २५०.०० | २०४.२४ | ०.०० | २०४.२४ | २०४.२४ | ०.०० | ०.०० | |
| | | २०११-१२ | १००.०० | ८५.०० | ०.०० | ८५.०० | ८५.०० | ०.०० | ०.०० | |
| | | २०१२-१३ | २००.०० | २००.०० | ०.०० | २००.०० | २००.०० | ०.०० | ०.०० | |
| | | २०१३-१४ | २००.०० | २००.०० | ०.०० | २००.०० | २००.०० | ०.०० | ०.०० | |
| | | २०१४-१५ | १३१७.०० | ११९५.३६ | ०.०० | ११९५.३६ | ११९१.५२ | ०.०० | ०.०० | |
| | | २०१५-१६ | ११०८.५२ | ११०८.५२ | ०.०० | ११०८.५२ | ११०८.५२ | ३.८४ | ०.०० | |
| | | २०१६-१७ | ७०४.२५ | ७०४.२५ | ०.०० | ७०४.२५ | ७०४.२५ | ०.०० | ०.०० | |
| | | **एकूण** | **३८७९.७७** | **३६९७.३७** | **०.००** | **३६९७.३७** | **३६९३.५३** | **३.८४** | **०.००** | |
| २ | रत्नागिरी | २०१०-११ | २६५.०० | २६५.०० | ०.०० | २६५.०० | २६५.०० | ०.०० | १२.३१ | |
| | | २०११-१२ | २७७.५० | २७७.५० | ०.०० | २७७.५० | २७७.५० | ०.०० | ५.३८ | |
| | | २०१२-१३ | ३००.०० | ३००.०० | ६४.९२ | २३५.०८ | २३५.०८ | ०.०० | २९.७७ | |
| | | २०१३-१४ | २५०.०० | २५०.०० | ०.०० | २५०.०० | २५०.०० | ०.०० | ९.२० | |
| | | २०१४-१५ | १३५.३५ | १३५.३५ | ०.०० | १३५.३५ | १३५.३५ | ०.०० | १७.७७ | |
| | | २०१५-१६ | २२०.०० | २२०.०० | ०.०० | २२०.०० | २२०.०० | ०.०० | ५.८७ | |
| | | २०१६-१७ | २००.०० | २००.०० | ०.०० | २००.०० | २००.०० | ०.०० | ०.०० | |
| | | **एकूण** | **१६४७.८५** | **१६४७.८५** | **६४.९२** | **१५८२.९३** | **१५८२.९३** | **०.००** | **८०.३०** | |
| ३ | नाशिक | २०१०-११ | ८५९.८२ | ८५९.८२ | ०.०० | ८५९.८२ | ८५९.८२ | ०.०० | १७.४३ | |
| | | २०११-१२ | ७३८.८१ | ७३८.८१ | ०.०० | ७३८.८१ | ७३८.८१ | ०.०० | २२.२० | |
| | | २०१२-१३ | १९८७.२५ | १९८७.२५ | ०.०० | १९८७.२५ | १९८७.२५ | ०.०० | ५९.७७ | |
| | | २०१३-१४ | १५००.०० | १५००.०० | ०.०० | १५००.०० | १५००.०० | ०.०० | ९६.४८ | |
| | | २०१४-१५ | १९०५.९० | १९०५.९० | ०.०० | १९०५.९० | १९०५.९० | ०.०० | ०.०० | |
| | | २०१५-१६ | ३५८१.४२ | ३५८१.४२ | ०.०० | ३५८१.४२ | ३४६०.६२ | १२०.८० | ०.०० | २०१५-१६ व २०१६-१७ |
| | | २०१६-१७ | ३५३५.०० | ३५३५.०० | ०.०० | ३५३५.०० | ३२५६.६९ | २७८.३१ | ०.०० | मधील कामाचे १०% |
| | | **एकूण** | **१४१०८.२०** | **१४१०८.२०** | **०.००** | **१४१०८.२०** | **१३७०९.०९** | **३९९.११** | **१९५.८८** | |

प्रपत्र-३

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे

परिच्छेद क्रमांक २.१ मधील मुद्दा क्रमांक २.१.३.४

सन २०१०-११ ते २०१६-१७ या कालावधीचा प्राप्त तरतूद व खर्चाचा तपशिल. (रु.लाखात)

| क्र. | जिल्हा | आर्थिक वर्ष | अर्थसंकल्पीय तरतूद | बीडीएसवर प्राप्त तरतूद | शासनास समर्पित तरतूद | उपलब्ध तरतूद(५-६) | खर्च | शिल्लक तरतूद | शासन खाती जमा केलेली तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| ४ | औरंगाबाद | २०१०-११ | २१४.८७ | २१४.८७ | ०.०० | ४१४.८७ | ४१४.८७ | ०.०० | ०.०० | २०० लक्ष धनादेशाव्दारे प्राप्त |
| | | २०११-१२ | ४६८.३० | ४६८.३० | ०.०० | ४६८.३० | ४६८.३० | ०.०० | ०.०० | |
| | | २०१२-१३ | ५६४.९२ | ५६४.९२ | ०.०० | ५६४.९२ | ५३५.४० | २९.५२ | २९.५२ | |
| | | २०१३-१४ | ९००.०० | ९००.०० | ०.०० | ९००.०० | ९००.०० | ०.०० | ०.०० | |
| | | २०१४-१५ | १४९६.९४ | १४९६.९४ | ०.०० | १४९६.९४ | १४९६.९४ | ०.०० | ०.०० | |
| | | २०१५-१६ | १६१५.३२ | १६१५.३२ | ०.०० | १८७५.३२ | १६६५.२९ | २१०.०३ | २१०.०३ | २६० लक्ष धनादेशाव्दारे प्राप्त |
| | | २०१६-१७ | २०००.०० | २०००.०० | ०.०० | २०००.०० | १३५५.६३ | ६४४.३७ | ०.०० | |
| | | **एकूण** | **७२६०.३५** | **७२६०.३५** | **०.००** | **७७२०.३५** | **६८३६.४३** | **८८३.९२** | **२३९.५५** | |
| ५ | बीड | २०१०-११ | ६६४.७५ | ६६४.७५ | ०.०० | ६६४.७५ | ६६४.७५ | ०.०० | ०.०० | |
| | | २०११-१२ | ५२५.०० | ५२५.०० | ०.०० | ५२५.०० | ५२५.०० | ०.०० | ०.०० | |
| | | २०१२-१३ | १३३४.३६ | १३३४.३६ | ०.०० | १३३४.३६ | १३३४.३६ | ०.०० | ०.०० | |
| | | २०१३-१४ | १३००.०० | १३००.०० | ०.०० | १३००.०० | १३००.०० | ०.०० | ०.०० | |
| | | २०१४-१५ | २०००.०० | १५०९.०० | ०.०० | १५०९.०० | १५०९.०० | ०.०० | ०.०० | |
| | | २०१५-१६ | २८००.०० | २६२१.०० | ०.०० | २६२१.०० | २६२१.०० | ०.०० | ०.०० | |
| | | २०१६-१७ | २८००.३० | २८००.३० | ०.०० | २८००.३० | २७७१.३३ | २८.९७ | ०.०० | |
| | | **एकूण** | **११४२४.४१** | **१०७५४.४१** | **०.००** | **१०७५४.४१** | **१०७२५.४४** | **२८.९७** | **०.००** | |
| ६ | लातूर | २०१०-११ | २३२.७५ | २३२.७५ | ०.०० | २३२.७५ | २३२.७५ | ०.०० | ०.०० | |
| | | २०११-१२ | ४८६.२५ | ४८६.२५ | ०.०० | ४८६.२५ | ४८६.२५ | ०.०० | ०.०० | |
| | | २०१२-१३ | २५००.०० | २५००.०० | ०.०० | २५००.०० | २५००.०० | ०.०० | ०.०० | |
| | | २०१३-१४ | २८००.०० | २८००.०० | ०.०० | २८००.०० | २८००.०० | ०.०० | ०.०० | |
| | | २०१४-१५ | २५३८.८७ | २५३८.८७ | ०.०० | २५३८.८७ | २५३८.८७ | ०.०० | ०.०० | |
| | | २०१५-१६ | ५५६२.६९ | ५५६२.६९ | ०.०० | ५५६२.६९ | ५५६२.६९ | ०.०० | ०.०० | |
| | | २०१६-१७ | ५५५७.५९ | ५५५७.५९ | ०.०० | ५५५७.५९ | ५५५७.५९ | ०.०० | ०.०० | |
| | | **एकूण** | **१९६७८.१५** | **१९६७८.१५** | **०.००** | **१९६७८.१५** | **१९६७८.१५** | **०.००** | **०.००** | |

प्रपत्र-३

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे

परिच्छेद क्रमांक २.१ मधील मुद्दा क्रमांक २.१.३.४

सन २०१०-११ ते २०१६-१७ या कालावधीचा प्राप्त तरतूद व खर्चाचा तपशिल.

(रु.लाखात)

| क्र. | जिल्हा | आर्थिक वर्ष | अर्थसंकल्पीय तरतूद | बीडीएसवर प्राप्त तरतूद | शासनास समर्पित तरतूद | उपलब्ध तरतूद(५-६) | खर्च | शिल्लक तरतूद | शासन खाती जमा केलेली तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| ७ | अकोला | २०१०-११ | ९६२.५० | ९६२.५० | ०.०० | ९६२.५० | ९६२.५० | ०.०० | ०.०० | |
| | | २०११-१२ | ६२९.९३ | ६२९.९३ | ०.०० | ६२९.९३ | ४९९.२४ | १३०.६९ | १३०.६९ | |
| | | २०१२-१३ | १२६०.५० | १२६०.५० | ०.०० | १२६०.५० | १२६०.५० | ०.०० | ०.०० | |
| | | २०१३-१४ | १८०१.२५ | १८०१.२५ | ०.०० | १८०१.२५ | १८०१.२५ | ०.०० | ०.०० | |
| | | २०१४-१५ | १२८६.०० | १२८६.०० | ०.०० | १२८६.०० | १२८६.०० | ०.०० | ०.०० | |
| | | २०१५-१६ | २०७८.७५ | २०७८.७५ | ०.०० | २०७८.७५ | २०७८.७५ | ०.०० | ०.०० | |
| | | २०१६-१७ | २०३१.०० | २०३१.०० | ०.०० | २०३१.०० | १८२७.९० | २०३.११ | ०.०० | |
| | | **एकूण** | **१००४९.९३** | **१००४९.९३** | **०.००** | **१००४९.९३** | **९७१६.१४** | **३३४.६०** | **१३०.६९** | |
| ८ | चंद्रपूर | २०१०-११ | १०००.०० | २९४.०० | ०.०० | २९४.०० | २९४.०० | ०.०० | ०.०० | |
| | | २०११-१२ | १०००.०० | ४२५.०० | ०.०० | ४२५.०० | ४२५.०० | ०.०० | ०.०० | |
| | | २०१२-१३ | १०००.०० | १००५.०० | ०.०० | १००५.०० | १००५.०० | ०.०० | ०.०० | |
| | | २०१३-१४ | १०००.०० | १०००.०० | ०.०० | १०००.०० | १०००.०० | ०.०० | ०.०० | |
| | | २०१४-१५ | १०००.०० | ९०८.०० | ०.०० | ९०८.०० | ९०८.०० | ०.०० | ०.०० | |
| | | २०१५-१६ | १०००.०० | ८३३.७५ | ०.०० | ८३३.७५ | ८३३.७५ | ०.०० | ०.०० | |
| | | २०१६-१७ | १०००.०० | १०००.०० | ०.०० | १०००.०० | १०००.०० | ०.०० | ०.०० | |
| | | **एकूण** | **७०००.००** | **५४६५.७५** | **०.००** | **५४६५.७५** | **५४६५.७५** | **०.००** | **०.००** | |
| * | एकूण ८ जिल्हे गोषवारा | २०१०-११ | ४४४९.६९ | ३६९७.९३ | ०.०० | ३८९७.९३ | ३८९७.९३ | ०.०० | २९.७४ | |
| | | २०११-१२ | ४२२५.७९ | ३६३५.७९ | ०.०० | ३६३५.७९ | ३५०५.१० | १३०.६९ | १५८.२७ | |
| | | २०१२-१३ | ९१४७.०३ | ९१५२.०३ | ६४.९२ | ९०८७.११ | ९०५७.५९ | २९.५२ | ११९.०६ | |
| | | २०१३-१४ | ९७५१.२५ | ९७५१.२५ | ०.०० | ९७५१.२५ | ९७५१.२५ | ०.०० | १०५.६८ | |
| | | २०१४-१५ | ११६८०.०६ | १०९७५.४२ | ०.०० | १०९७५.४२ | १०९७१.५८ | ०.०० | १७.७७ | |
| | | २०१५-१६ | १७९६६.७० | १७६२१.४५ | ०.०० | १७८८१.४५ | १७५५०.६२ | ३३४.६७ | २१५.९० | |
| | | २०१६-१७ | १७८२८.१४ | १७८२८.१४ | ०.०० | १७८२८.१४ | १६६७३.३९ | ११५५.५६ | ०.०० | |
| | | **एकूण** | **७५०४८.६६** | **७२६६२.०१** | **६४.९२** | **७३०५७.०९** | **७१४०७.४६** | **१६५०.४४** | **६४६.४२** | |

प्रपत्र -४

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे

परिच्छेद क्र. २.१ मधील मुद्दा क्र. २.१.४.१

**कामाच्या निधी वाटपात झालेल्या विलंबाचा तपशिल**

**कालावधी : सन २००९-१० ते २०१६-१७**

| क्र. | जिल्हा | वर्ष | मंजूर कामे | पूर्ण कामे | अपूर्ण कामे | विहीत कालावधीपेक्षा विलंबाने पूर्ण झालेली कामे (संख्या) | कामे विलंबाने पूर्ण होण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | ठाणे | २००९-१० | ० | ० | ० | निरंक | ० |
| | | २०१०-११ | ९७ | ९७ | ० | निरंक | मंजूर कामे मुदतीत पूर्ण झाली. |
| | | २०११-१२ | २९ | २९ | ० | निरंक | वरील प्रमणे |
| | | २०१२-१३ | ६२ | ६२ | ० | निरंक | वरील प्रमणे |
| | | २०१३-१४ | ९३ | ९३ | ० | निरंक | वरील प्रमणे |
| | | २०१४-१५ | ३४२ | ३४२ | ० | निरंक | वरील प्रमणे |
| | | २०१५-१६ | २८५ | २८५ | ० | निरंक | वरील प्रमणे |
| | | २०१६-१७ | १८५ | १८५ | ० | निरंक | वरील प्रमणे |
| | | **एकूण** | **१०९३** | **१०९३** | ० | ० | |
| २ | रत्नागिरी | २००९-१० | ५६ | ५६ | ० | निरंक | मंजूर कामे मुदतीत पूर्ण झाली. |
| | | २०१०-११ | १४८ | १४८ | ० | निरंक | वरील प्रमणे |
| | | २०११-१२ | ६ | ६ | ० | निरंक | वरील प्रमणे |
| | | २०१२-१३ | ५८ | ५८ | ० | निरंक | वरील प्रमणे |
| | | २०१३-१४ | ६५ | ६५ | ० | निरंक | वरील प्रमणे |
| | | २०१४-१५ | २० | २० | ० | निरंक | वरील प्रमणे |
| | | २०१५-१६ | ३२ | ३२ | ० | | वरील प्रमणे |
| | | २०१६-१७ | ४८ | ४७ | १ | निरंक | नळ पाणी पुरवठा योजनेचे काम असल्याने व विहीरीचा उदभव कोरडा लागल्यामूळे काम पूर्ण होण्यास विलंब |
| | | **एकूण** | **४३३** | **४३२** | १ | ० | |

प्रपत्र -४

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे

परिच्छेद क्र. २.१ मधील मुद्दा क्र. २.१.४.१

**कामाच्या निधी वाटपात झालेल्या विलंबाचा तपशिल**

**कालावधी : सन २००९-१० ते २०१६-१७**

| क्र. | जिल्हा | वर्ष | मंजूर कामे | पूर्ण कामे | अपूर्ण कामे | विहीत कालावधीपेक्षा विलंबाने पूर्ण झालेली कामे (संख्या) | कामे विलंबाने पूर्ण होण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ३ | नाशिक | २००९-१० | २४९ | २४९ | ० | ० | |
| | | २०१०-११ | ६७९ | ६७९ | ० | ४ | |
| | | २०११-१२ | २२३ | २२३ | ० | ८ | |
| | | २०१२-१३ | ७५१ | ७५१ | ० | २७ | |
| | | २०१३-१४ | २२५ | २२५ | ० | १८ | |
| | | २०१४-१५ | ३६७ | ३६७ | ० | ८९ | |
| | | २०१५-१६ | ७३५ | ६०४ | १३१ | ३४१ | ग्रामस्तरावर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या आर्थिक अडचणीमूळे. |
| | | २०१६-१७ | ७७४ | १४९ | ६२५ | ० | |
| | | **एकूण** | **४००३** | **३२४७** | **७५६** | **४८७** | |
| ४ | औरंगाबाद | २००९-१० | १५५ | १५५ | ० | निरंक | |
| | | २०१०-११ | ४८ | ४८ | ० | निरंक | |
| | | २०११-१२ | २३६ | २३६ | ० | निरंक | |
| | | २०१२-१३ | २०५ | २०३ | २ | निरंक | |
| | | २०१३-१४ | ६५ | ६४ | १ | निरंक | |
| | | २०१४-१५ | ४८१ | ४८० | १ | निरंक | |
| | | २०१५-१६ | ५०४ | ५०१ | ३ | निरंक | |
| | | २०१६-१७ | ४७३ | ४४९ | २४ | निरंक | |
| | | **एकूण** | **२१६७** | **२१३६** | **३१** | ० | |

प्रपत्र -४

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे

परिच्छेद क्र. २.१ मधील मुद्दा क्र. २.१.४.१

**कामाच्या निधी वाटपात झालेल्या विलंबाचा तपशिल**

**कालावधी : सन २००९-१० ते २०१६-१७**

| क्र. | जिल्हा | वर्ष | मंजूर कामे | पूर्ण कामे | अपूर्ण कामे | विहीत कालावधीपेक्षा विलंबाने पूर्ण झालेली कामे (संख्या) | कामे विलंबाने पूर्ण होण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ५ | बीड | २००९-१० | ९० | ९० | ० | ० | मंजूर कामे मुदतीत पूर्ण झाली. |
| | | २०१०-११ | १७३ | १७३ | ० | ० | वरील प्रमणे |
| | | २०११-१२ | २०८ | २०८ | ० | ० | वरील प्रमणे |
| | | २०१२-१३ | ५८७ | ५८७ | ० | ० | वरील प्रमणे |
| | | २०१३-१४ | ४३९ | ४३९ | ० | ० | वरील प्रमणे |
| | | २०१४-१५ | ६४१ | ६४१ | ० | ० | वरील प्रमणे |
| | | २०१५-१६ | ६७२ | ६७२ | ० | ० | वरील प्रमणे |
| | | २०१६-१७ | ० | ० | ० | ० | |
| | | **एकूण** | **२८१०** | **२८१०** | ० | **०** | |
| ६ | लातूर | २००९-१० | ३१७ | ३१७ | ० | | |
| | | २०१०-११ | २५२ | २५२ | ० | | |
| | | २०११-१२ | २१३ | २१३ | ० | | |
| | | २०१२-१३ | ६६० | ६६० | ० | | |
| | | २०१३-१४ | ७५३ | ७५३ | ० | | |
| | | २०१४-१५ | ५०६ | ५०६ | ० | | |
| | | २०१५-१६ | २१६८ | २१६८ | | | |
| | | २०१६-१७ | १५४९ | १५४९ | ० | | |
| | | **एकूण** | **६४१८** | **६४१८** | ० | **०** | |

प्रपत्र -४

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे

परिच्छेद क्र. २.१ मधील मुद्दा क्र. २.१.४.१

**कामाच्या निधी वाटपात झालेल्या विलंबाचा तपशिल**

**कालावधी : सन २००९-१० ते २०१६-१७**

| क्र. | जिल्हा | वर्ष | मंजूर कामे | पूर्ण कामे | अपूर्ण कामे | विहीत कालावधीपेक्षा विलंबाने पूर्ण झालेली कामे (संख्या) | कामे विलंबाने पूर्ण होण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ७ | अकोला | २००९-१० | २४० | २४० | ० | | |
| | | २०१०-११ | २८९ | २८९ | ० | | |
| | | २०११-१२ | ० | ० | ० | | |
| | | २०१२-१३ | २४८ | २४८ | ० | | |
| | | २०१३-१४ | २८७ | २८७ | ० | | |
| | | २०१४-१५ | १७४ | १७४ | ० | | |
| | | २०१५-१६ | २७० | २७० | ० | | |
| | | २०१६-१७ | २७३ | ० | २७३ | | |
| | | **एकूण** | **१७८१** | **१५०८** | **२७३** | **०** | |
| ८ | चंद्रपूर | २००९-१० | २७० | २७० | ० | ३ | |
| | | २०१०-११ | ११८ | ११८ | ० | ९ | |
| | | २०११-१२ | ६९ | ६९ | ० | ३ | |
| | | २०१२-१३ | २८१ | २७९ | २ | ५ | |
| | | २०१३-१४ | २८२ | २६८ | १४ | १२ | |
| | | २०१४-१५ | २२५ | २२३ | २ | ८ | |
| | | २०१५-१६ | १६३ | १५८ | ५ | ६ | |
| | | २०१६-१७ | २७१ | २६१ | १० | ९ | |
| | | **एकूण** | **१६७९** | **१६४६** | **३३** | **५५** | |
| | **८ जिल्हे एकूण** | | **२०३८४** | **१९२९०** | **१०९४** | **५४२** | |

भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्या सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्रमांक २.१

प्रपत्र-५

मुद्दा क्रमांक २.१.४.३ (शासन स्तरावरील अतिरिक्त निधीमधून राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागास मंजूर केलेली कामे)

**बृहतआराखड्यात समाविष्ट नसलेल्या कामांचा तपशिल** (रु.लाखात)

| क्र. | जिल्हा | सार्वजनिक बांधकाम विभागाचे नांव | मंजूर कामांची संख्या | रकाना ४ पैकी बृहत आराखड्यात समाविष्ट असलेल्या कामांची संख्या | रकाना ४ पैकी बृहत आराखड्यात समाविष्ट नसलेल्या कामांची संख्या | रकाना ४ पैकी समाजमंदिराच्या मंजूर कामांची संख्या | समाज मंदिरासाठी मंजूर रक्कम | रकाना ७ मधील समाजमंदिराच्या कामापैकी | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | पुर्ण कामे | अपूर्ण कामे | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| १ | ठाणे | सा.बां.वि. क्र. १ ठाणे | ९३ | ११ | ८२ | ९ | ९२.०० | ६ | ३ | जागेची अडचण असल्याने. |
| | | सा.बां.वि. क्र. २ ठाणे | ५४ | १२ | ४२ | ४ | २०.०० | ० | ४ | जागेची अडचण असल्याने. |
| | | सा.बां.वि. क्र. जव्हार | १६ | ६ | १० | ५ | ४८.०० | ० | ५ | जागेची अडचण असल्याने. |
| | | **एकूण** | **१६३** | **२९** | **१३४** | **१८** | **१६०.००** | **६** | **१२** | ० |
| २ | रत्नागिरी | सा.बां.वि.रत्नागिरी | ६२ | २८ | ३४ | २ | ७.०० | १ | १ | |
| | | सा.बां.वि.चिपळूण | ३१ | १३ | १८ | ४ | १२.०० | ४ | ० | |
| | | **एकूण** | **९३** | **४१** | **५२** | **६** | **१९.००** | **५** | **१** | ० |
| ३ | नाशिक | सा.बां.वि.नाशिक | ४६ | २२ | २४ | २६ | २९७.०० | २१ | ० | ७ कामे रद्द केलेली आहे. |
| | | सा.बां.वि.(उ) नाशिक | १० | १ | ९ | ७ | ६५.०० | ७ | ० | |
| | | सा.बां.वि.(पू)नाशिक | ५० | ३८ | १२ | १४ | १३१.०० | १३ | ० | |
| | | सा.बां.वि.(मालेगाव)नाशिक | २९ | १४ | १५ | ४ | ५५.०० | ४ | ० | |
| | | सा.बां.वि.(कळवण)नाशिक | ९ | ६ | ३ | ५ | ५५.०० | ४ | ० | |
| | | **एकूण** | **१४४** | **८१** | **६३** | **५६** | **६०३.००** | **४९** | **०** | |
| ४ | औरंगाबाद | सा.बा.वि.औरंगाबाद | ९७ | ७७ | २० | ० | ०.०० | ० | ० | |
| | | सा.बा.वि.(प)औरंगाबाद | २० | १७ | ३ | १० | १००.०० | १० | ० | |
| | | **एकूण** | **११७** | **९४** | **२३** | **१०** | **१००.००** | **१०** | **०** | |
| ५ | बीड | सा.बां.वि. बीड | ७८ | ० | ७८ | २ | १०.०० | २ | ० | |
| | | सा.बां.वि.अंबाजोगाई | ६६ | ० | ६६ | ५ | २५.०० | ५ | ० | |
| | | **एकूण** | **१४४** | **०** | **१४४** | **७** | **३५.००** | **७** | **०** | |

**भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्या सन २०१४-१५ या आथिक वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्रमांक २.१**

**प्रपत्र-५**

मुद्दा क्रमांक २.१.४.३ (शासन स्तरावरील अतिरिक्त निधीमधून राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागास मंजूर केलेली कामे)

**बृहतआराखड्यात समाविष्ट नसलेल्या कामांचा तपशिल** **(रु.लाखात)**

| क्र. | जिल्हा | सार्वजनिक बांधकाम विभागाचे नांव | मंजूर कामांची संख्या | रकाना ४ पैकी बृहत आराखड्यात समाविष्ट असलेल्या कामांची संख्या | रकाना ४ पैकी बृहत आराखड्यात समाविष्ट नसलेल्या कामांची संख्या | रकाना ४ पैकी समाजमंदिराच्या मंजूर कामांची संख्या | समाज मंदिरासाठी मंजूर रक्कम | रकाना ७ मधील समाजमंदिराच्या कामापैकी | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | पुर्ण कामे | अपूर्ण कामे | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| ६ | लातूर | सा.बां.वि.लातूर | ६४ | ० | ६४ | १५ | ९३.०० | ९ | ६ | |
| | | सा.बां.वि.निलंगा | ५४ | ० | ५४ | १० | ४९.०० | ८ | २ | |
| | | **एकूण** | **११८** | **०** | **११८** | **२५** | **१४२.००** | **१७** | **८** | |
| ७ | अकोला | सा.बां.उ.वि. क्र.१ | ३० | ० | ३० | २३ | १५७.०० | २२ | १ | ० |
| | | सा.बां.उ.वि. क्र.२ | १८ | ० | १८ | ० | ०.०० | ० | ० | ० |
| | | सा.बां.उ.वि. अकोट | ९ | ० | ९ | ६ | ४०.०० | ४ | ० | २ कामांची रक्कम शासन खाती जमा |
| | | सा.बां.उ.वि. मुर्तीजापूर | ० | ० | ० | ० | ०.०० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **५७** | **०** | **५७** | **२९** | **१९७.००** | **२६** | **१** | **०** |
| ८ | चंद्रपूर | सा.बां.वि.क्र.१ चंद्रपूर | ८२ | ५१ | ३१ | २२ | १६७.०० | २१ | ० | १-काम रद्द |
| | | सा.बां.वि.क्र.२ चंद्रपूर | १९ | ११ | ८ | ६ | ४३.०० | ६ | ० | |
| | | रो.ह.यो(सा.बां.) चंद्रपूर | ४३ | ९ | ३४ | ४२ | १७५.०० | ४२ | ० | |
| | | **एकूण** | **१४४** | **७१** | **७३** | **७०** | **३८५.००** | **६९** | **०** | |
| | | **८ जिल्ह्यांची एकूण** | **९८०** | **३१६** | **६६४** | **२२१** | **१६४१.००** | **१८९** | **२२** | |

भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्या सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्रमांक २.१

**प्रपत्र-६**

मुद्दा क्रमांक २.१.४.३ (शासन स्तरावरील अतिरिक्त निधीमधून राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागास मंजूर केलेली कामे)

**मंजूर कामे, पूर्ण कामे व अपूर्ण कामांचा तपशिल.** (रु.लाखात)

| क्र. | जिल्हा | सार्वजनिक बांधकाम विभागाचे नांव | मंजूर कामांची संख्या | मंजूर रक्कम | पूर्ण कामे | रद्द केलेली कामे | | | | | रकाना १२ पैकी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | जागे अभावी | दलित वस्ती नसल्याने | अन्य योजनेतून काम झाल्याने | इतर कारणास्तव | एकूण (७ ते १०) | अपूर्ण कामे (४- ६-११) | अद्याप सुरु न झालेली कामे | प्रगतीपथावर असलेली कामे |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| १ | ठाणे | सा.बां.वि. क्र. १ ठाणे | ९३ | ९७८.०० | ६२ | ३ | १८ | १ | ९ | ३१ | ० | ० | ० |
| | | सा.बां.वि. क्र. २ ठाणे | ५४ | ४३१.०० | ४३ | ८ | ० | ३ | ० | ११ | ० | ० | ० |
| | | सा.बां.वि. क्र. जव्हार | १६ | १७०.०० | ७ | ९ | ० | ० | ० | ९ | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **१६३** | **१५७९.००** | **११२** | **२०** | **१८** | **४** | **९** | **५१** | **०** | **०** | **०** |
| २ | रत्नागिरी | सा.बां.वि.रत्नागिरी | ६२ | ३१०.०० | ५४ | १ | ० | ० | ० | १ | ७ | ० | ० |
| | | सा.बां.वि.चिपळूण | ३१ | १९०.०० | २५ | १ | ० | ० | ५ | ६ | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **९३** | **५००.००** | **७९** | **२** | **०** | **०** | **५** | **७** | **७** | **०** | **०** |
| ३ | नाशिक | सा.बां.वि.नाशिक | ४६ | ६४७.०० | ३९ | ७ | ० | ० | ० | ७ | ० | ० | ० |
| | | सा.बां.वि.(उ) नाशिक | १० | ८५.०० | १० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | सा.बां.वि.(पू)नाशिक | ५० | ३२८.०० | ४६ | ४ | ० | ० | ० | ४ | ० | ० | ० |
| | | सा.बां.वि.(मालेगाव)नाशिक | २९ | ३००.०० | २९ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | सा.बां.वि.(कळवण)नाशिक | ९ | ९०.०० | ६ | ० | ० | ० | ३ | ३ | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **१४४** | **१४५०** | **१३०** | **११** | **०** | **०** | **३** | **१४** | **०** | **०** | **०** |
| ४ | औरंगाबाद | सा.बां.वि.औरंगाबाद | ९७ | ६३७.०० | ९१ | ० | ० | ० | ० | ० | ६ | ६ | ४ |
| | | सा.बां.वि.(प)औरंगाबाद | २० | २०५.०० | २० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **११७** | **८४२.००** | **१११** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **६** | **६** | **४** |
| ५ | बीड | सा.बां.वि. बीड | ७८ | ६०५.०० | ६७ | ० | ० | ० | ० | ० | ११ | ४ | ७ |
| | | सा.बां.वि.अंबाजोगाई | ६६ | ३१७.०० | ६६ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **१४४** | **९२२.००** | **१३३** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **११** | **४** | **७** |
| ६ | लातूर | सा.बां.वि.लातूर | ६४ | ३५८.०० | ५५ | ० | ० | ० | ० | ० | ९ | ८ | १ |
| | | सा.बां.वि.निलंगा | ५४ | २४८.०० | ४९ | ० | ० | ० | ० | ० | ५ | ० | ५ |
| | | **एकूण** | **११८** | **६०६.००** | **१०४** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१४** | **८** | **६** |

**भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्या सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्रमांक २.१**

**प्रपत्र-६**

मुद्दा क्रमांक २.१.४.३ (शासन स्तरावरील अतिरिक्त निधीमधून राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागास मंजूर केलेली कामे)

**मंजूर कामे, पूर्ण कामे व अपूर्ण कामांचा तपशिल.** (रु.लाखात)

| क्र. | जिल्हा | सार्वजनिक बांधकाम विभागाचे नांव | मंजूर कामांची संख्या | मंजूर रक्कम | पूर्ण कामे | रद्द केलेली कामे | | | | | रकाना १२ पैकी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | जागे अभावी | दलित वस्ती नसल्याने | अन्य योजनेतून काम झाल्याने | इतर कारणास्तव | एकूण (७ ते १०) | अपूर्ण कामे (४- ६-११) | अद्याप सुरु न झालेली कामे | प्रगतीपथावर असलेली कामे |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| ७ | अकोला | सा.बां.उ.वि. क्र.१ | ३० | १९७.०० | २९ | ० | ० | ० | १ | १ | ० | १ | ० |
| | | सा.बां.उ.वि. क्र.२ | १८ | १००.०० | १८ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | सा.बां.उ.वि. अकोट | ९ | ८३.६२ | ७ | १ | ० | ० | १ | २ | ० | २ | ० |
| | | सा.बां.उ.वि. मुर्तीजापूर | ० | ०.०० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **५७** | **३८०.६२** | **५४** | **१** | **०** | **०** | **२** | **३** | **०** | **३** | **०** |
| ८ | चंद्रपूर | सा.बां.वि.क्र.१ चंद्रपूर | ८२ | ५१५.५० | ८१ | १ | ० | ० | ० | १ | ० | ० | ० |
| | | सा.बां.वि.क्र.२ चंद्रपूर | १९ | २४५.०० | १९ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | रो.ह.यो(सा.बां.) चंद्रपूर | ४३ | १७७.०० | ४३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **१४४** | **९३७.५०** | **१४३** | **१** | **०** | **०** | **०** | **१** | **०** | **०** | **०** |
| | | **८ जिल्ह्यांची एकूण** | **९८०** | **७२१७.१२** | **८६६** | **३५** | **१८** | **४** | **१९** | **७६** | **३८** | **२१** | **१७** |

**भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्या सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्रमांक २.१**

**प्रपत्र-७**

मुद्दा क्रमांक २.१.४.३ (शासन स्तरावरील अतिरिक्त निधीमधून राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागास मंजूर केलेली कामे)

**प्राप्त निधी, खर्च व शिल्लक तरतूदीचा तपशिल.** **(रु.लाखात)**

| क्र. | जिल्हा | सार्वजनिक बांधकाम विभागाचे नांव | मंजूर कामांची संख्या | मंजूर रक्कम | झालेला खर्च | शिल्लक तरतूद (५-६) | रकाना ७ पैकी शासनखाती जमा केलेली तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| १ | ठाणे | सा.बां.वि. क्र. १ ठाणे | ९३ | ९७८.०० | ६६५.०० | ३१३.०० | ३८३.०० | रु. ७०.०० लक्ष इतका निधी मंजूर रक्कमेपेक्षा जादा प्राप्त झाल्याने सदरचा निधी शासनास जमा करण्यांत आला आहे. |
| | | सा.बां.वि. क्र. २ ठाणे | ५४ | ४३१.०० | ३६३.०० | ६८.०० | ६८.०० | |
| | | सा.बां.वि. क्र. जव्हार | १६ | १७०.०० | ८९.४६ | ८०.५४ | ८०.५४ | |
| | | **एकूण** | **१६३** | **१५७९.००** | **१११७.४६** | **४६१.५४** | **५३१.५४** | **०.००** |
| २ | रत्नागिरी | सा.बां.वि.रत्नागिरी | ६२ | ३१०.०० | २५५.२० | ५४.८० | ११.५२ | |
| | | सा.बां.वि.चिपळूण | ३१ | १९०.०० | १३६.२८ | ५३.७२ | ३५.०० | |
| | | **एकूण** | **९३** | **५००.००** | **३९१.४८** | **१०८.५२** | **४६.५२** | **०** |
| ३ | नाशिक | सा.बां.वि.नाशिक | ४६ | ६४७.०० | ४८८.०४ | १५८.९६ | २.७२ | |
| | | सा.बां.वि.(उ) नाशिक | १० | ८५.०० | ८२.२८ | २.७२ | ३७.८५ | |
| | | सा.बां.वि.(पू)नाशिक | ५० | ३२८.०० | २९०.१५ | ३७.८५ | ५.०० | |
| | | सा.बां.वि.(मालेगाव)नाशिक | २९ | ३००.०० | २९५.०० | ५.०० | ४४.१३ | |
| | | सा.बां.वि.(कळवण)नाशिक | ९ | ९०.०० | ४५.८७ | ४४.१३ | २४८.६६ | |
| | | **एकूण** | **१४४** | **१४५०.००** | **१२०१.३४** | **२४८.६६** | **३३८.३६** | |
| ४ | औरंगाबाद | सा.बां.वि.औरंगाबाद | ९७ | ६३७.०० | ५७२.०० | ६५.०० | ०.०० | |
| | | सा.बां.वि.(प)औरंगाबाद | २० | २०५.०० | २०५.०० | ०.०० | ०.०० | |
| | | **एकूण** | **११७** | **८४२.००** | **७७७.००** | **६५.००** | **०.००** | |

**भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्या सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्रमांक २.१**

**प्रपत्र-७**

मुद्दा क्रमांक २.१.४.३ (शासन स्तरावरील अतिरिक्त निधीमधून राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागास मंजूर केलेली कामे)

**प्राप्त निधी, खर्च व शिल्लक तरतूदीचा तपशिल.** (रु.लाखात)

| क्र. | जिल्हा | सार्वजनिक बांधकाम विभागाचे नांव | मंजूर कामांची संख्या | मंजूर रक्कम | झालेला खर्च | शिल्लक तरतूद (५-६) | रकाना ७ पैकी शासनखाती जमा केलेली तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| ५ | बीड | सा.बां.वि. बीड | ७८ | ६०५.०० | ५२०.३१ | ८४.६९ | ०.०० | |
| | | सा.बां.वि.अंबाजोगाई | ६६ | ३१७.०० | ३१७.०० | ०.०० | ०.०० | |
| | | **एकूण** | **१४४** | **९२२.००** | **८३७.३१** | **८४.६९** | **०.००** | |
| ६ | लातूर | सा.बां.वि.लातूर | ६४ | ३५८.०० | ३०२.६६ | ५५.३४ | ०.०० | |
| | | सा.बां.वि.निलंगा | ५४ | २४८.०० | २१९.९९ | २८.०१ | ०.०० | |
| | | **एकूण** | **११८** | **६०६.००** | **५२२.६५** | **८३.३५** | **०.००** | |
| ७ | अकोला | सा.बां.उ.वि. क्र.१ | ३० | ३८०.६२ | ३६५.०० | १५.६२ | १५.६२ | |
| | | सा.बां.उ.वि. क्र.२ | १८ | | | ०.०० | | |
| | | सा.बां.उ.वि. अकोट | ९ | | | ०.०० | | |
| | | सा.बां.उ.वि. मुर्तीजापूर | ० | | | ०.०० | | |
| | | **एकूण** | **५७** | **३८०.६२** | **३६५.००** | **१५.६२** | **७.००** | |
| ८ | चंद्रपूर | सा.बां.वि.क्र.१ चंद्रपूर | ८२ | ५१५.५० | ५०८.५० | ७.०० | ०.०० | |
| | | सा.बां.वि.क्र.२ चंद्रपूर | १९ | २४५.०० | २४५.०० | ०.०० | ०.०० | |
| | | रो.ह.यो(सा.बां.) चंद्रपूर | ४३ | १७७.०० | १७७.०० | ०.०० | ०.०० | |
| | | **एकूण** | **१४४** | **९३७.५०** | **९३०.५०** | **७.००** | **०.००** | |
| | | ८ जिल्ह्यांची एकूण | **९८०** | **७२१७.१२** | **६१४२.७४** | **१०७४.३८** | **९२३.४२** | |

# प्रपत्र -८

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे

परिच्छेद क्र. २.१ मधील मुद्दा क्र. २.१.५.१

**सन २००९-१० ते २०१७-१८ या कालावधीत जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालयाने तपासणी केलेल्या मंजूर कामांची माहिती**

| क्र. | जिल्हा | मंजूर कामे (सन २०१०-११ ते २०१७-१८) | तपासणी केलेल्या कामांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | ठाणे | १०९३ | १०९३ |
| २ | रत्नागिरी | ५०८ | ३३० |
| ३ | नाशिक | ४७४६ | ३२०७ |
| ४ | औरंगाबाद | २६१७ | २२११ |
| ५ | बीड | ३७७४ | २००८ |
| ६ | लातूर | ७७६९ | ६७५५ |
| ७ | अकोला | १९३५ | ९०४ |
| ८ | चंद्रपूर | १८७९ | १५१७ |
| | **एकूण** | **२४३२१** | **१८०२५** |

**साक्ष :**

**भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-१५ च्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्र. २.१ - महाराष्ट्रातील अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करण्यासाठी योजनेचे कार्यान्वयन या परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी सामाजिक न्याय विभागाचे सचिव तसेच विभागीय प्रतिनिधींची दिनांक १३ ऑगस्ट, २६ सप्टेंबर व १६ ऑक्टोबर, २०१८ रोजी समितीने साक्ष घेतली.**

**परिच्छेद क्रमांक - २.१.२.१ - नियोजन**

**१.१.** साक्षीच्या वेळी औरंगाबाद जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यात ११ आणि १० वस्तींच्या नावासमोर तसेच कन्नडमध्ये ६२ वस्त्यांच्या नावासमोर लोकसंख्या नमूद न करण्याची कारणे काय आहेत? अशी विचारणा समितीने केली असता, याबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी विदित केले की, सन २००८-०९ मध्ये तयार केलेल्या आराखड्यात सिल्लोड तालुक्यातील ११ वस्त्यांसमोर प्रत्यक्षात लोकसंख्या नमूद केलेली नव्हती. सन २०१२-१३ ते २०१७-१८ पर्यंतच्या आराखड्यात १० वस्त्यांसमोर प्रत्यक्षात लोकसंख्या नमूद करण्यात आली नव्हती. परंतु सन २०११ ची लोकसंख्या उक्त आराखड्यात नमूद करण्यात आली होती. तसेच ज्या वस्त्यांसमोर किमान सन २०११ नुसार लोकसंख्या नमूद केली त्या वस्त्यांना निधी देण्यात आला. तसेच ज्या वस्त्यांसमोर सन २०११ ची किंवा कोणतीही लोकसंख्या नमूद केलेली नाही अशा वस्त्यांना निधी दिलेला नाही.

सन २००८-०९ च्या बृहत आराखड्यात २०११ ची लोकसंख्या कशी येणार? अशी पृच्छा समितीने केली असता, सन २०१२-१३ ते २०१७-१८ पर्यंतच्या आराखड्यात १० वस्त्यांसमोर सन २०११ ची लोकसंख्या नमूद करण्यात आली होती. तसेच सन २००८-०९ च्या बृहत आराखड्यात २००२ च्या जनगणनेनुसार आकडेवारी नमूद करण्यात आली होती असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

वस्त्यांसमोर लोकसंख्या नमूद नसल्याची बाब विभागाने मान्य केली असल्याचे समितीने निदर्शनास आणले असता, यात जनगणनेनुसार लोकसंख्या नमूद करणे आणि प्रत्यक्षात असलेली लोकसंख्या नमूद करणे असे दोन विषय आहेत. जेव्हा आराखडा तयार केला तेव्हा या वस्त्यांसमोर त्यावेळची लोकसंख्या नमूद करण्यात आली नव्हती असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

विभागाकडून जनगणनेबाहेरील लोकसंख्या प्रत्यक्षात कशी मोजली जाते? अशी विचारणा समितीने केली असता, ग्रामसेवकांकडून त्यांच्या वस्तीमधील लोकसंख्येची गणना केली जाते. तसेच शासन निर्णयानुसार प्रत्यक्षात असलेली लोकसंख्येची गणना करणे क्रमप्राप्त आहे असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

महालेखाकारांनी काढलेल्या आक्षेपामध्ये काही वस्त्यांच्या समोर लोकसंख्या नमूद नव्हती. तरी सुद्धा विभाग सांगत आहे काही ठिकाणी लोकसंख्या नमूद केली होती. वस्त्यांसमोर लोकसंख्या नमूद नसल्याची बाब विभागाने मान्य केली आहे. या संदर्भात कोणती कारवाई करण्यात आली? समितीने सन २०१५ च्या अहवालाचे वाचन केले आहे. तो मार्च, २०१७ मध्ये सादर झाला आहे. १६ महिने उलटून गेलेले आहेत. विभागाने या संदर्भात सर्व आदेश दिनांक २५ जुलै २०१८ नंतर काढलेले आहेत. विभागाने १६ महिने कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नाही. त्यानंतर आता विभाग केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला देत आहे. परंतु मागील काळात झालेल्या चुकासंबंधी एकाही ठिकाणी विभागाकडून कारवाई करण्यात आली नाही. प्रत्यक्ष लोकसंख्या तपासून ती नमूद करावी हे बंधनकारक आहे. समितीची अशी अपेक्षा आहे की, ज्या ठिकाणी लोकसंख्या नमूद केली नसल्याची बाब विभागाने मान्य केली आहे, त्यासंबंधी विभागाने काही तरी कारवाई करणे अत्यावश्यक आहे. विभागाकडून बृहत आराखडा तयार केला जातो असे समितीने निदर्शनास आणले असता, बृहत आराखड्यासंबंधी ग्रामसभेचा ठराव होतो असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

प्रत्यक्ष लोकसंख्या नमूद करण्याची जबाबदारी नेमकी कोणाची आहे? अशी पृच्छा समितीने केली असता, प्रत्यक्ष लोकसंख्या नमूद करण्याची जबाबदारी ग्रामसेवकांची असते. तसेच बीडीओ यांच्याकडून त्याचे संकलन केले जाते असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

या संदर्भात ग्रामसेवकांवर कारवाई का करण्यात आली नाही? अशी विचारणा समितीने केली असता, ग्रामसेवक जिल्हा परिषदेच्या अखत्यारित येत असल्यामुळे सीईओ यांनी यासंबंधी कारवाई करावयाची आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

ग्रामसेवकांवर कारवाई करण्यासंबंधी विभागाने ऑर्डर काढली आहे का? त्यांनी बृहत आराखडा तयार केल्यानंतर विभागाने निधी दिला आहे. त्यांनी चुकीचा बृहत आराखडा केल्यामुळे ग्रामसेवकावर का कारवाई करीत आहात? जिल्हा समाजकल्याण अधिकारी तसेच अतिरिक्त सीईओ यांनी शिफारस केल्यानंतर विभागाने बृहत आराखड्याला मान्यता दिली. ५ वर्षांकरिता बृहत आराखडा अंतिम करण्यासाठी अतिरिक्त सीईओ फायनल ॲथॉरिटी आहेत. प्रत्यक्ष लोकसंख्या नसताना विभागाने बृहत आराखड्याला कशी मान्यता दिली? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, याबाबत सांगता येणार नाही असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

जिल्हा परिषदेच्या माध्यमातून जिल्हा समाजकल्याण अधिकारी आणि त्यांचे अधिकारी या नात्याने अतिरिक्त सीईओ यांनी बृहत आराखड्याला मान्यता देऊन त्यावेळी तो शासनाच्या मान्यतेसाठी पाठविला. अशा परिस्थितीत १० व ११ वस्त्यांच्या संदर्भात शासन स्तरावर मान्यता मिळण्यासाठी बृहत आराखडा कसा पाठविला? प्रत्यक्ष वस्त्यांची लोकसंख्या नमूद करून बृहत आराखडा शासनाच्या मान्यतेसाठी पाठवावा लागतो. परंतु तसे घडलेले नाही. ही बाब विभागाने मान्य केली आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, सदर आराखडा २०१२-१३ मध्ये झाला होता असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

समिती सन २०१२-१३ मधील साक्ष घेत असून त्यासंबंधी जबाबदारी निश्चित करण्यासाठी ही साक्ष घेत आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, आराखड्यामध्ये जनगणनेप्रमाणे लोकसंख्या आणि प्रत्यक्ष लोकसंख्या या दोन बाबी आहेत. सन २०११ च्या शासन निर्णयानुसार प्रत्यक्ष लोकसंख्येनुसार कामे वाटप करावीत असे निर्देश आलेले आहेत. परंतु ग्रामसेवकांनी जनगणनेप्रमाणे लोकसंख्या नमूद केली आहे. मात्र त्यांनी प्रत्यक्ष लोकसंख्या नमूद केलेली नाही. तसेच कामाचे वाटप करीत असताना त्यांनी प्रत्यक्ष लोकसंख्येनुसार केलेले आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

लोकसंख्या नमूद नसताना लोकसंख्येनुसार कामाचे वाटप कसे करण्यात आले? अशी पृच्छा समितीने केली असता, जनगणनेनुसार लोकसंख्या नमूद केलेली आहे. परंतु प्रत्यक्षात लोकसंख्या त्यांनी नमूद केलेली नाही. तसेच लोकसंख्येप्रमाणे त्या त्या वस्तींची अनुज्ञेयता ठरवताना त्यांनी प्रत्यक्षात लोकसंख्या विचारात घेतलेली नाही असे विभागीय सचिवांनी विदित केले.

विभाग जे सांगत आहे ते धोरण आहे ते समितीच्या लक्षात आलेले आहे. नियम असा आहे की, सेन्ससच्या संख्येबरोबर प्रत्यक्षात लोकसंख्येप्रमाणे कामाचे वाटप करायचे. परंतु प्रत्यक्षात लोकसंख्या किती आहे हे त्या वर्षी नमूद केलेले नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, सेन्ससची संख्या नमूद केलेली आहे असे विभागीय सचिवांनी विदित केले.

विभागाने सेन्ससची संख्या नमूद केलेली आहे, परंतु तो चर्चेचा मुद्दाच नाही. विभागाने प्रत्यक्ष लोकसंख्या नमूद केलेली नाही. प्रत्यक्ष लोकसंख्या नमूद केलेली नसताना देखील विभागाचे असे मत आहे की, कामांचे वाटप प्रत्यक्ष लोकसंख्येच्या आधारे केले आहे. मग प्रत्यक्ष लोकसंख्येचा आकडा आला कुठून? दुसरा मुद्दा असा आहे की, ज्यावेळी बृहत आराखड्याला मंजुरी मिळाली त्यावेळी प्रत्यक्ष लोकसंख्येची आकडेवारी नमूद केलेली नव्हती. अशा परिस्थितीत समाजकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांनी आराखड्याला मान्यता कशी दिली? सदर दोन प्रश्नांची विभागाने उत्तरे द्यावीत. कारवाई का केली नाही या प्रश्नावर विभागाने उत्तर दिले की, ग्रामसेवक हे ग्रामविकास विभागांतर्गत येतात. सदर आराखडा विभागीय समाजकल्याण अधिकारी मंजूर करतात. त्यांनी सर्व काम पाहून निर्णय घेतला पाहिजे परंतु विभागीय समाजकल्याण अधिकारी यांनी याकडे दुर्लक्ष केले. अनुज्ञेयतेचा मुद्दा हा " on the basis of the actual population. " वर आधारित आहे. विभागाला पैसे वाटप करायचे आहेत. मग ही रक्कम दोन लाख, तीन लाख, पाच लाख, दहा लाख द्यायची की वीस लाख द्यायची हे ठरवावे लागेल. त्यासाठी लोकसंख्येचा निकष आहे. परंतु लोकसंख्येची आकडेवारीच विभागाकडे नाही. तसेच सिल्लोड आणि कन्नड या दोन्ही तालुक्यांमध्ये सन २०१३-१४ ते २०१७-१८ पर्यंतच्या आराखड्यामध्ये विभागाने अनुज्ञेयताच लिहिली नसून त्याबाबत पुढील परिच्छेदामध्ये उल्लेख आहे. या सर्व बाबींना कोणी तरी जबाबदार आहे की नाही? संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून विभागाने का कारवाई केली नाही? अशी विचारणा समितीने केली असता, ग्रामपंचायतीकडून कामांचे जे प्रस्ताव येतात त्यामध्ये गावाची प्रत्यक्ष लोकसंख्या नमूद केलेली असते असे विभागीय सचिवांनी विदित केले.

या ठिकाणी बृहत आराखड्यासंबंधी चर्चा केली आहे. त्याबाबत विभागाने समितीला माहिती द्यावी. बृहत आराखड्यामध्ये दलित वस्ती नोटिफाय करताना सदर वस्तीची सेन्ससप्रमाणे व प्रत्यक्ष लोकसंख्या नमूद असलीच पाहिजे. प्रत्यक्षात लोकसंख्येच्या आधारेच सदर वस्तीला किती अनुदान देय आहे हे निश्चित करता येते. अनुदान का देय आहे हे विभागाने नोट केले नाही तसेच लोकसंख्या नमूद नाही. पुढील परिच्छेदामध्ये हे नमूद केलेले आहे. सदर दोन्ही बाबी एकमेकांशी निगडित आहेत. कारण लोकसंख्येची आकडेवारी नमूद असती तर दुसरी बाब देखील प्रलंबित राहिली नसती. विभागाने याबाबत जबाबदारी निश्चित करून आपल्या समाजकल्याण अधिकाऱ्यावर कारवाई केली का? ग्रामसेवकावर विभागास कारवाई करता येत नाही हे समिती मान्य करते परंतु आपल्या विभागीय समाजकल्याण अधिकाऱ्यावर विभागाने कारवाई केली का? ज्या ठिकाणी चूक झाली आहे त्याबाबत स्पष्टीकरण केले तर कारवाई नका करू परंतु स्पष्टीकरण करता येत नसेल तर कारवाई करा असे समितीने निर्देशित केले असता, यामध्ये एक प्रॅक्टिकल अडचण आहे. बृहत आराखडा तयार करताना विभागाने प्रपत्र विहित केलेले नव्हते. वेगवेगळ्या प्रपत्रांमध्ये हे आराखडे मंजूर केले जात होते. याबाबत महालेखापालांनी देखील निरीक्षण नोंदवलेले आहे. महालेखाकारांनी म्हटले आहे की, विभागाने यासाठी प्रपत्र दिलेले नाही. त्या अनुषंगाने विभागाने प्रपत्र तयार केले असून सन २०१८-१९ ते २०२२-२३ च्या आराखड्यासाठी हे प्रपत्र दिले असून सर्व जिल्ह्यांमध्ये त्यानुसार आराखडे तयार करण्याचे काम सुरू आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

विभागाचे असे मत आहे का, की विभागाने आराखड्याचे प्रपत्र दिले नाही व त्यामुळे केलेली ही चूक क्षमापित करणे योग्य आहे? हे विभागाचे काम होते व सन २००८ पासून विभागाने करायला हवे होते. विभागाने सन २००८-१३, सन २०१३-१८ दरम्यान कार्यवाही केली नाही. आता विभाग यामध्ये सुसूत्रता आणण्याचे काम करीत आहे. मागील दहा वर्षांमध्ये आवश्यक असलेल्या बाबी प्रपत्रामध्ये सुचित केल्या नाहीत व त्यामुळे याबाबत कार्यवाही झाली नाही, असे विभागाचे म्हणणे आहे का? अशी पृच्छा समितीने केली असता, विभागाचे तसे म्हणणे नाही. प्रत्यक्ष लोकसंख्येची संकल्पना सन २०११ पासून आली. त्यापूर्वी जनगणनेच्या आकडेवारीप्रमाणे कामांची अनुज्ञेयता ठरविली जात होती असे विभागीय सचिवांनी विदित केले.

सन २०११ पासून सन २०१७-१८ पर्यंत विभागाने प्रत्यक्ष लोकसंख्या नमूद केलेली नाही, याचे कारण काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता, प्रत्येक जिल्हा परिषदेमध्ये असे झाले आहे, असे नाही. काही जिल्हा परिषदांनी प्रत्यक्ष लोकसंख्या नमूद केलेली आहे. केवळ औरंगाबाद जिल्हा परिषदेने प्रत्यक्ष लोकसंख्या नमूद केलेली नाही असे विभागीय सचिवांनी विदित केले.

जर असे असेल तर विभागाने केलेला बचाव चुकीचा आहे की, विभागाने प्रपत्र दिले नाही म्हणून त्यांनी लोकसंख्या भरली नाही. ज्या अधिकाऱ्यांनी यामध्ये चुका केल्या आहेत त्यांनाच दंड किंवा कारवाई करण्याबाबत समिती सांगत आहे. ज्यांनी चूक केलीच नाही त्यांच्यावर दंड किंवा कारवाई करण्याचा प्रश्नच येत नाही. अनेक अधिकाऱ्यांनी बरोबर काम केलेले आहे. ८ तालुक्यांचे तपशील काढले परंतु त्यातील दोन तालुक्याच्या आराखड्यात अडकलो आहोत. जरीही सन २०११ सोडले तरीही सन २०१३-१८ पर्यंतच्या आराखड्यामध्ये देखील प्रत्यक्ष लोकसंख्या नमूद केलेली नाही. This is the problem. समिती सन २०११ या वर्षाचे देखील मान्य करते कारण त्यापूर्वी लोकसंख्येच्या आकडेवारीप्रमाणे कार्यवाही करण्याबाबतचा नियम होता असे मत समितीने व्यक्त केले असता, औरंगाबाद जिल्हापरिषदेमध्ये आराखडा मंजूर करताना विभागाच्या उपायुक्तांकडून लॅप्सेस झाले आहेत असे विभागीय सचिवांनी विदित केले.

हे समितीने मान्य केलेले आहे. विभागीय सचिवांच्या स्वाक्षरीनेच प्रस्ताव आलेला आहे. समिती त्याच्या बाहेर जाऊन काहीही विचारणा करीत नाहीत. ज्या अधिकाऱ्यांनी हे केले आहे त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून त्यांची विभागीय चौकशी करण्यात यावी असे समितीने निदेशित केले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

नाशिक जिल्ह्यामधील कळवण व मालेगाव आणि ठाणे जिल्यातील कल्याण व शहापूर या तालुक्यांमधील पूर्वी देण्यात आलेल्या अनुदानाचे तपशिल नोंद केले नव्हते. एखाद्या वस्तीमध्ये समजा पंधरा लाख रुपये देय असतील व त्यापैकी १० लाख रुपये अगोदर देण्यात आले आहेत. परंतु या १० लाख रुपयांची नोंद घेतलेली असेल तरच विभागाने नंतर उर्वरित ५ लाख रुपये देण्यात यावे. अन्यथा संपूर्ण १५ लाख रुपये देण्यात यावे असे समितीने सूचित केले असता, या आराखड्यामध्ये जरी त्रुटी असल्या तरीही प्रत्यक्ष कामांचे वाटप करताना प्रत्यक्ष लोकसंख्या तसेच पूर्वी दिलेले अनुदान या सर्व बाबी विचारात घेण्यात आलेल्या आहेत असे विभागीय सचिवांनी विदित केले.

विभागाच्या या विधानाला काय बेस आहे? प्रत्यक्ष लोकसंख्या लिहिलेली नसतानाही विभागाचे मत आहे की, प्रत्यक्ष लोकसंख्या विचारात घेऊन कामांचे वाटप केले आहे. विभागाने लेखी उत्तरात नमूद केले आहे की, " अनुदानाचा तपशील नमूद करण्याची पुढील काळात दक्षता घेण्यात येईल. " याचा अर्थ असा होतो की, विभागाने यापूर्वी हे केलेले नाही. यापूर्वी दिलेल्या अनुदानाचे तपशील नमूद केलेले नाहीत ही बाब सत्य आहे, हे विभागाने मान्य केलेले आहे. तसेच पुढील वेळी याबाबत दक्षता घेण्यात येईल याचा अर्थ नेमका काय होतो? नाशिक जिल्ह्यातील कळवण व मालेगाव आणि ठाणे जिल्ह्यातील कल्याण व शहापूर या चारही तालुक्यांमध्ये ज्या वस्त्यांना पूर्वी दिलेल्या अनुदानाची नोंद केलेली नव्हती त्याबाबत विभागाने सांगितले की, त्या चार तालुक्यांना त्यांच्या मर्यादेच्या बाहेर अनुदान देण्यात आलेले नाही. ही बाब विभाग प्रमाणित करून समितीला सांगण्यात येत असे गृहित धरुन, Committee will ask for detailed enquiry. विभागाने जर प्रमाणित केले तर समितीला मान्य करावे लागेल असे समितीने मत मांडले असता विभागीय सचिवांनी या ८ जिल्हा परिषदांबाबत करायला सुरूवात केली. त्यावर समिती विभागास केवळ ४ तालुक्यांबाबत बोलत आहे. अकोट, बार्शी टाकळी, लातूर येथे नमूद केलेले आहे. परंतु नाशिक आणि ठाणे जिल्ह्यांतील ४ तालुक्यांमध्ये केलेले नाही. ज्या ठिकाणी केलेले आहे त्याबद्दल समितीला काही मत व्यक्त करायचे नाही. परंतु नाशिक आणि ठाणे जिल्ह्यातील ४ तालुक्यांमध्ये पूर्वी दिलेले पैसे नमूद केलेले नव्हते. समजा, एखाद्या ठिकाणासाठी १५ लाख रुपये देय असतील व पूर्वी १० लाख रुपये दिलेले असतील तर नंतर पाच लाख रुपयांचेच काम दिले गेले का? तसेच विभागाने याची पूर्ण शहानिशा केलेली आहे का? अशी विचारणा समितीने केली असता, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी आजच्या बैठकीस उपस्थित आहेत. त्यांना याबाबत विचारल्यास ते सांगू शकतील असे विभागीय सचिवांनी विदित केले.

समितीचा मुद्दा स्पष्ट आहे. चार तालुक्यांनी पद्धती अवलंबिली नाही. विभागाने सांगितले की, प्रत्यक्ष लोकसंख्या पाहूनच कार्यवाही केली आहे. त्यामुळे समितीने विभागास पुन्हा विचारले की, सदर चारही तालुक्यांमध्ये त्यांच्या मर्यादेतच कामे झालेली आहेत का? जर विभागाला त्याबाबत खात्री असेल तर समितीला याबाबत काहीही बोलायचे नाही. परंतु जर असे नसेल तर यामध्ये चूक झालेली आहे. जर पूर्वी पैसे देऊन नोंद केलेली नसेल तर जास्तीचे पैसे मंजूर केले जातील. नाशिक व ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सांगतील का की, यामध्ये पूर्वी दिलेल्या पैशांची नोंद न करता देखील आम्ही मर्यादेपेक्षा एकही पैसा एकाही ठिकाणी खर्च केलेला नाही? माहिती देण्या अगोदर समितीने सूचित केले की, जर दिलेल्या माहितीमध्ये चुका आढळल्या तर शासनाकडून निलंबनाचे आदेश काढण्यात येईल.

दिनांक ५ डिसेंबर २०११ च्या शासन निर्णयानुसार लोकसंख्येप्रमाणे देय असलेल्या निधीबाबत पूर्वी दिलेला निधी वजा करूनच पुढील कामे केली जातात. याबाबत १०० टक्के मर्यादेत राहून कार्यवाही झाली आहे का, याबाबत समितीने विचारणा केली आहे. याबाबत नाशिक जिल्हापरिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना विदित केले की, नाशिक जिल्हापरिषदेने तशी दक्षता घेतली आहे.

समितीला नियमांबाबत माहिती आहे. परंतु या नियमांचे पालन नाशिक जिल्हापरिषदेने केले आहे का ते समितीला सांगण्यात यावे असे समितीने निदेशित केले असता, नियमांचे पालन केलेले आहे असे विभागाचे प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

त्यावर हे विभाग १०० टक्के खात्रीने सांगत आहे का? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय प्रतिनिधींनी त्यास होकारार्थी उत्तर दिले.

अनुदानाची रक्कम नमूद न करता विभाग हे बरोबर करीत आहे असे विभागाच्या कसे निदर्शनास आले? अशी विचारणा समितीने केली असता, ५ वर्षांचा आराखडा तयार केलेला आहे, अगोदरच्या पंचवार्षिकमध्ये किती पैसे दिले हे नमूद केलेले नाही. असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

समितीचा तोच मुद्दा आहे की, समजा एखाद्या वस्तीला २० लाख रुपये देणे क्रमप्राप्त आहे व मागील वेळा काही पैसे दिलेले असले तरीही नमूद केलेले नसल्यामुळे विभागाने त्या वस्तीला पुन्हा २० लाख रुपये देऊन टाकले आहेत अशी समितीने विचारणा केली असता, तो निधी नमूद केलेला नाही असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

तो निधी नमूद केला नाही याचा अर्थ चूक झाली आहे असे समितीने निदर्शनास आणले, समितीने विभागाला याबाबत विचारणा केली त्यावेळी विभागाने सांगितले की, १०० टक्के बरोबर आहे. त्या-त्या पाच वर्षापुरते नियम पाळलेले आहे असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

मराठवाड्यामध्ये एका वस्तीला या योजनेखाली जास्तीत-जास्त २० लाख रुपये निधी आहे. It is not for 5 years but it is for the entire locality. जर मागील आराखड्यामध्ये सदर वस्तीला ५ लाख रुपये दिले असतील तर ते पुढील आराखड्यादरम्यान विचारात घेतले पाहिजेत. त्यानंतर उर्वरित १५ लाख रुपये एकाच वर्षामध्ये द्या किंवा पुढील १० वर्षांमध्ये द्या. ते ग्रामपंचायतींच्या मागणीनुसार जिल्हा परिषदेवर अवलंबून आहे. परंतु पूर्वी दिलेला निधी नमूदच केलेला नसल्यामुळे आणखी २० लाख रुपये देण्यात आले असे समितीने निदर्शनास आणून दिले असता, यामध्ये अडचण अशी आहे की, कामांची निवड जिल्हा परिषदेची समाजकल्याण समिती लवकर करीत नाही असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण समितीला काम अंतिम करण्याचा अधिकार आहे परंतु याबाबत विभागाने मर्यादा ठरविलेली आहे. समिती गेल्या २५ वर्षांपासून जिल्हा परिषदेच्या कामाशी संबंधित आहे. विभागाने ठरवून दिलेल्या निकषांच्या बाहेर जिल्हापरिषद समाजकल्याण समितीला जाता येत नाही. गोंदिया जिल्ह्यामध्ये पैसे कुठे खर्च करायची ही अडचण आहे. असे असताना विभागाच्या आराखड्यामध्ये पूर्वी दिलेले १५ लाख रुपये नमूदच केलेले नसतील तर आणखी १५ लाख रुपये मिळतील. कल्याण आणि शहापूर तालुक्यांचा देखील हाच मुद्दा आहे. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती देण्यात यावी असे समितीने निदेशित केले असता, ठाणे जिल्ह्यातील कल्याण आणि शहापूर या दोन तालुक्यांमध्ये यापूर्वी दिलेल्या अनुदानाचे तपशील नव्हते, परंतु पंचवार्षिक आराखड्यामध्ये संबंधित वस्तीला अनुज्ञेय निधीपेक्षा जास्तीचा निधी निश्चितपणे दिलेला नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

पूर्वी किती निधी दिला हे विभागाला माहितीच नसेल तर विभाग असे कसे सांगू शकतो? ही खूप साधी गोष्ट आहे. This is a very simple case. If department you are not aware of the earlier disbursement and expenses then how department can derive that you are limited to Rs. 20 lakhs or 15 lakhs only. विभागाने पूर्वी किती निधी दिला त्याचे रेकॉर्ड असलेच पाहिजे. अशा प्रकारे घोळ होऊ नये म्हणूनच आराखडा बनविण्याची पद्धत आहे. त्यानुसार प्रत्येकाला न्याय मिळालाच पाहिजे. कोणतेही सरकार असले तरीही " समान न्याय, समान विकास " हे धोरण असते. जर असे झाले नाही तर एखाद्याला एक कोटी रुपये मिळतील तर दुसऱ्याला ५ लाख रुपये देखील मिळणार नाहीत.तयाला कॅपिंग केली आहे. लोकसंख्या नमूद केलेली पाहिजे त्याचबरोबर पूर्वी दिलेले

अनुदान नमूद केलेले पाहिजे असे समितीने व्यक्त केले असता, यामध्ये अडचण अशी आहे की, सन १९७४ पासून ही योजना सुरू झाली असे विभागीय सचिवांनी विदित केले.

जर विभागाला अडचण असेल तर विभागाकडून याची मर्यादा वाढविण्यात यावी. एका वस्तीसाठी १ कोटी रुपये मर्यादा करण्यात यावी. विभागाकडून नियमांचे पालन झाले नाही हे पाहण्याचे काम महालेखापालांचे आहे. त्यामध्ये काही प्रॅक्टीकल अडचणी असतील तर महालेखापालांचा आक्षेप असूनही समिती विभागाची अडचण मान्य करते. परंतु अनिवार्य गोष्टींचेच विभाग पालन करीत नसेल तर ते योग्य नाही. एखादे काम पाच लाखांमध्ये होत नसेल व ते सहा लाखांमध्ये केले व महालेखापालांनी आक्षेप घेतला असता तर ते समितीने ओव्हररुल केले असते. परंतु मूलभूत धोरणाचे तरी पालन केले पाहिजे. हे सर्व का नाही केले याचे कारण असे आहे की, त्यांना नियम पाळायचे नव्हते, मर्यादेचे पालन करायचे नव्हते. त्यासाठीच मागील रेकॉर्ड ठेवले गेले नाही. या सर्व एन्ट्री न होण्याचे कारण हेच आहे. तिच जिल्हा परिषद आहे व त्यांनी पूर्वी काम केलेले असतानाही त्यांच्याकडे याबाबतचे रेकॉर्ड कसे उपलब्ध नाही? असायलाच पाहिजे. सरकारने पैसे दिले, खर्च केले त्याचे रेकॉर्ड ग्रामपंचायत, कार्यकारी अभियंता या सर्वांकडे असले पाहिजे. परंतु यातील नोंदी नमूद करून दिलेल्या पैशांमध्ये १५ लाख रुपये दिले तर नंतर उर्वरित ५ लाख रुपयेच मिळतील त्यामुळे हे सर्व केले आहे. यासंदर्भात जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता आहे. Everything in this matter will have to be look after by the District welfare officer and Additional CEO. या संदर्भात केलेल्या चुकांबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी. तसेच पुर्वीचे अनुदान न तपासता निधीचे वाटप का केले, याचा जाब विचारण्यात यावा. विशेषतः या ४ तालुक्यांमध्ये झालेल्या कामांची तपासणी करून या कामांकरिता जास्तीचा निधी खर्च झाला किंवा कसे याबाबत तालुकानिहाय अहवाल सादर करण्यात यावा, असे समितीने निदेश दिले. जिल्हा परिषदेमध्ये समाजकल्याण विभागातील जिल्हा समाजकल्याण अधिकारी असतात.तत्यांच्यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नियंत्रण असते. तसेच जिल्हा परिषदेमध्ये कॅफो चिफ अकाऊंट आणि फायनान्स अधिकारी असतात. या सर्वांकडे रेकॉर्ड असायला पाहिजे. परंतु काही ठिकाणी खरोखर प्रॅक्टीकल अडचणी आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जिल्हा परिषदेमध्ये कॅफो यांच्या मान्यतेशिवाय निधी खर्च केला जात नाही असे प्रधान महालेखाकार यांनी समितीच्या माध्यमातून निदर्शनास आणून दिले असता, जिल्हा परिषदेकडून निधी पंचायत समितीकडे जातो आणि पंचायत समितीकडून ग्रामपंचायतीकडे जातो असे विभागीय सचिवांनी सांगितले.

It should be disbursed by the end of September आणि दिनांक ३१ मार्च पर्यंत निधी खर्च करता येतो. जिल्हा परिषद तर ३१ मार्च नंतरही निधी खर्च करते. याचे कारण असे की, जिल्हा परिषदेला निधी खर्च करण्याकरिता २ वर्षाचा कालावधी मिळतो असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाने पाठपुरावा करूनही समाजकल्याण समिती शेवटपर्यंत काम फायनल करीत नाही. त्यामुळे पंचायत समिती, ग्रामपंचायतीकडे त्या त्या कामांकरिता निधी जाण्यास विलंब होतो असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

हा निधी लॅप्स झाल्याचे किंवा हा निधी लॅप्स होईल असे विभागाने सांगितले तर जिल्हा परिषदेकडून निधी खर्च केला जाईल. निधी खर्च करण्याकरिता डेड लाईन दिल्यास निधी खर्च होईल. सामाजिक न्याय विभागाकरिता जास्त निधी मिळत असल्यामुळे विभागाने निधी वाटप केल्यानंतर तो खर्च करण्याबाबत त्यांच्याकडून दोन-दोन वर्षे निर्णय घेतला जात नाही. त्यामुळे विभागाने सांगितले पाहिजे की, आराखड्याप्रमाणे निधीची मागणी करण्यात यावी व काम मंजूर करून पाठविण्यात यावे, अशी सूचना समितीने केली असता, निधी खर्च करण्याबाबत कोणत्या अडचणी येतात, याबाबत जिल्हा परिषदेकडून माहिती घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जिल्हा परिषदेमध्ये काम मंजूर झाल्यानंतर २ महिन्यांमध्ये काम पूर्ण होते. ग्रामपंचायतीला निधी प्राप्त झाल्यावर तो निधी खर्च कशा प्रकारे करायचा, कोणत्या कामावर खर्च करायचा, कोण खर्च करणार याकरिता मधमाशांसारखी माणसे धडकतात. परंतु याकरिता ग्रामपंचायतीला निधी पोहोचला पाहिजे. निधीच पोहचला नाही तर तो खर्च कसा होईल? त्यांच्याकडे पुढील सर्व बाबी तयार असतात. केवळ निधी मिळालेला नसतो असे समितीने मत व्यक्त केले असता, या कामांकरिता सर्वसाधारण सभेची मान्यता असावी, असा शासनाचा निर्णय आहे. त्यानंतर हे अधिकार समाजकल्याण विषय समितीला देण्यात आले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

दर ३ महिन्यांनी सर्वसाधारण सभेची बैठक घेणे प्रत्येक जिल्हा परिषदेला अनिवार्य आहे. विषय समितीची बैठक तर दर महिन्याला होते. त्यामुळे हे काम आणखी सोपे झालेले आहे यामध्ये कुठेच अडचण येत नाही. अडचण ही असते की, निधी आलेला आहे, तो कुठेही जाणार नाही, कारण जिल्हा परिषद निधी परत करणार नाही, असे त्यांना वाटत असते. परंतु त्यामध्ये राजकारण येते आणि कामाला गती मिळत नाही असे समितीने मत व्यक्त केले असता, लोकसंख्येची मर्यादा आणि असलेल्या लोकसंख्येकरिता जेवढा निधी देय आहे, तेवढ्या मर्यादेमध्ये ५ वर्षांसाठी बृहत आराखडा तयार करावा, असे शासनाकडून प्रपत्र आलेले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

यासंदर्भातील नियम पूर्वीपासूनच होता. परंतु विभाग जाणूनबुजून त्याचे पालन करीत नव्हते. त्यामुळे त्यांना पुन्हा मायक्रोस्कोपीक सूचना करावी लागली. परंतु हे सुरूवातीपासून अनिवार्य आहे. हे करीत नसल्यामुळे विभाग सविस्तर सांगत आहे. यांनी वेळेवर केले पाहिजे. विभाग अगोदर पैसे पाठविते व त्यानंतर ते आराखडा तयार करतात. जिल्हा परिषदेकडून अमूक एका तारखेपर्यंत आराखडा आला तरच निधी दिला जाईल अशा सूचना करण्यात याव्या. याबाबत योग्य तारीख ठरविण्यात यावी. त्यानुषंगाने कार्यवाही करावी असे समितीने निदेश दिले.

चंद्रपूर मध्ये ७१ दलित वस्त्यांची नोंदणीच केलेली नाही. याला कोण जबाबदार आहे? सदरहू ७१ वस्त्यांना लाभापासून वंचित रहावे लागलेले आहे. यामध्ये बृहत आराखडा मंजूर केलेला नाही, असे दिलेले आहे. जिल्हामध्ये १०५८ वस्त्या आहे. परंतु सदरहू ७१ वस्त्यांचा उल्लेख करण्यात आला नाही. त्यामुळे त्यांना लाभापासून वंचित रहावे लागले. याबाबत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी माहिती द्यावी.असे निदेश समितीने दिले असता, २००८-२००९ मध्ये आराखडा बनविण्यात आला नव्हता, ही वस्तुस्थिती खरी आहे. विभागाकडे २०१२-२०१३ चा आराखडा मंजूर केलेला आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

आराखडा न बनविण्याची कारणे काय होती? अशी समितीने विचारणा केली असता, तत्कालीन परिस्थितीमध्ये आराखडा बनविलेला नाही. २००८ मध्ये पहिल्यांदाच आराखडा बनविण्यात यावा, अशा सूचना आल्या होत्या. परंतु तत्कालीन अधिकाऱ्यांनी आराखडा बनविलेला नव्हता. ही वस्तुस्थिती आहे. परंतु तो आराखडा २०१३-२०१४ मध्ये बनविण्यात आला होता असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

जेव्हा आराखडा बनविला नव्हता, तेव्हा निधी कसा वाटप करण्यात आला? अशी समितीने विचारणा केली असता, बजेट प्रत्येक जिल्हा परिषद वाईज असते. पूर्वी अशी पद्धत होती की, हे पैसे आयुक्तांमार्फत विड्रॉल करून त्या त्या जिल्हा परिषदेला दिले जात होते. जिल्हा परिषद त्यांच्या आराखड्याप्रमाणे कामे घेत होती. त्यामुळे शासनाकडून जिल्हा परिषदेला गेलेले पैसे कामनिहाय गेलेले नाही. लमसम त्या वर्षीचे जे बजेट आहे. त्याप्रमाणे वितरीत करण्यात आल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

आराखडा तयार नसताना पैसे कसे काय वाटप करण्यात आले? आराखडा म्हणजे लमसम प्लॅन आहे, असेच म्हणता येईल. विभागाने आराखडाच तयार केलेला नव्हता. पहिल्या वर्षामध्ये पाठविले, ते समिती मान्य करते. सन २००८-२००९, २००९-२०१०, २०१०-२०११, २०११-२०१२ व २०१२-२०१३ मध्ये पाठविलेले आहे. विभाग म्हणतो त्या बाबींचे पालन करायचे की, नाही? जिल्हा परिषदेकडून याबाबत पालन केले जात नसेल तर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली पाहिजे. त्यांनी एका वर्षामध्ये आराखडा दिला नाही, तर त्यांचे अनुदान थांबविण्यात आले पाहिजे. अशा प्रकारची केस राज्यात केवळ चंद्रपूर जिल्हा परिषदेची असल्याचे आढळून येत आहे. यामधील ८ जिल्ह्यांमध्ये आराखडा तयार करण्यात आलेला आहे. असे असतानाही विभाग चंद्रपूर जिल्हा परिषदेवर काहीच कारवाई करीत नाही. २०१३ पासून आराखडा तयार केल्याचे त्यांनी सांगीतले. Why it is not prepared? यामध्ये ४७ वस्त्या आलेल्या नाहीत. ही संख्या कमी नाही. इतर वस्त्या आराखड्याशिवाय कशा काय आल्या? समितीला स्थानिक लेव्हलवरील अधिकाऱ्यांकडून उत्तर अपेक्षित नाही. याबाबत शासन या नात्याने सचिवांनी उत्तर द्यावे असे समितीने निदेश दिले असता, चंद्रपूर जिल्हा परिषदेचा २००८-२००९ ते २०१२-२०१३ या कालावधीमध्ये आराखडा तयार झालेला नसला तरी त्यांनी पंधराव्या पंचायत समिती अंतर्गत १०५८ वस्त्यांपैकी १०११ वस्त्यांना लाभ दिलेला आहे. आराखडा नव्हता तरी त्यांनी लाभ दिलेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आराखडा तयार नसल्यामुळेच १०५८ पैकी १०११ वस्त्यांना लाभ मिळाला व ४७ वस्त्यांना लाभ देण्यात आलेला नाही, असे समितीचे स्पष्ट मत आहे असे समितीने सूचित केले असता, आता या ४७ वस्त्या कव्हर करणार आहोत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ती बाब वेगळी आहे. आराखडा तयार नसताना निधी वितरित का करण्यात आला? तसेच ५ वर्षामध्ये आराखडा का तयार केला नाही, याचे उत्तर अपेक्षित आहे. महालेखाकार यांचे म्हणणे आहे की, ७१ वस्त्यांना लाभ देण्यात आलेला नाही. विभागाने सांगितले की, ४७ वस्त्यांना लाभ मिळालेला नाही. आराखडा तयार नसताना अनुदान देता येत नाही. तरी देखील विभागाने अनुदान दिलेले आहे. अनुदान कशाच्या आधारावर देण्यात आले? विभागाच्या मर्जीप्रमाणे अनुदान देण्यात आलेले आहे काय? विभागास गांभीर्य असल्याचे दिसून येत नाही. ५ वर्षांपासून म्हणण्याप्रमाणे ४७ वस्त्यांना योजनेच्या लाभापासून वंचित रहावे लागले. महालेखाकार यांचे असे म्हणणे आहे की, ७१ वस्त्यांना लाभापासून वंचित रहावे लागलेले आहे. परंतु विभागाच्या म्हणण्याप्रमाणे या ४७ वस्त्या असल्या तरी त्यांना लाभापासून वंचित रहावे लागलेले असून ही बाब गंभीर स्वरूपाची आहे असे समितीने मत व्यक्त केले.

आराखड्यामध्ये घेतलेल्या वस्त्यांकरिता पुरेशी तरतूद नसते. त्यामुळे प्रत्येक जिल्हा परिषदेमध्ये अनेक वस्त्या लाभापासून वंचित रहातात. चंद्रपूर मध्ये ४७ वस्त्या वंचित राहिलेल्या आहेत. इतरही जिल्हा परिषदेमध्ये काही वस्त्या वंचित राहिलेल्या आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ही बाब तर अतिशय गंभीर आहे. इतर जिल्ह्यामध्ये वस्त्या वंचित राहिल्याची माहिती यामध्ये कुठे दिलेली आहे? इतर तालुक्यामध्ये किती वस्त्या वंचित राहिल्या याचा उल्लेख यामध्ये केलेला नाही. या वस्त्यांचा नंबर केव्हा लागला? निधीच्या कमतरतेमुळे वस्त्या लाभापासून वंचित राहिलेल्या आहेत असे विभागाचे मत आहे. परंतु येथे असे लिहिलेले आहे की, २००८-२००९ ते २०१२-२०१३३ या कालावधीचा बृहत आराखडा तयार केला नाही. त्यामुळे जिल्ह्यातील ४७ इतक्या वस्त्या योजनेच्या लाभापासून वंचित आहेत. आयुक्त समाजकल्याण यांचे अभिप्राय. यापुढे असे आहे की, शासनाचा अभिप्राय असा आहे की, आयुक्त समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे. परंतु आता विभागाचे म्हणणे आहे की, त्यामुळे वस्त्या वंचित राहिल्या नसून निधी कमी असल्यामुळे वस्त्या लाभापासून वंचित राहिलेल्या आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, बृहत आराखड्यामध्ये असलेल्या वस्त्यांकरिता पुरेल इतका निधी त्या त्या जिल्हा परिषदेकडे उपलब्ध रहात नाही असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

चंद्रपूर जिल्ह्यातील प्रकरणाबाबत माहिती द्यावी असे समितीने निदेश दिले असता, आराखडा नसल्यामुळेच चंद्रपूर मधील ४७ वस्त्या लाभापासून वंचित राहिलेल्या आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याला कोण अधिकारी जबाबदार आहे? या प्रकरणातील संबंधित दोषी अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी असे समितीने निदेश दिले असता, यासंदर्भात संबधित अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करून समितीच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आराखडा मंजूर नसताना निधीचे वाटप करण्यात आलेले आहे. अशा प्रकारे निधी वितरित करण्याला कोण अधिकारी जबाबदार आहे? ही बाब अतिशय गंभीर आहे. आराखडा तयार झाल्यावरच निधी वितरित केला जाईल, असा सरकारचा निर्णय आहे. १ वर्षापर्यंत त्यांच्यावर विश्वास ठेवू शकतो. परंतु चंद्रपूर जिल्हा परिषदेने आराखडा तयार न करता आपल्या मर्जीप्रमाणे ५ वर्षे निधीचे वाटप केले. तसेच काही लोकांना त्यातून वंचित ठेवले. याला कोण जबाबदार आहे? तसेच निधी वाटप करण्याचे काही नियम किंवा कायदे आहे की, नाही? If this is the case, then right from the Director everybody is responsible. बृहत आराखडा तयार नसेल तर प्रत्यक्षात लोकसंख्यावर सुद्धा येईल, असे काही कारण नाही. त्यामुळे १०५८ वस्त्या खरोखर दलित वस्त्या आहे की, नाही हा देखील संशोधनाचा विषय आहे. विभाग ॲझ्युम करीत आहे की, ज्या बाबीकरिता निधीची तरतूद आहे, त्या बाबीकरिताच निधी खर्च झाला. परंतु आराखडाच तयार नसेल तर कसे होईल? ५ वर्षे आराखडा तयार होत नसल्याची बाब अतिशय गंभीर आहे असे समितीने मत व्यक्त केले.

**परिच्छेद क्रमांक २.१.२.२. : अनुदान वाटपासाठी वस्तींची प्राधान्यक्रम सूची तयार न करणे**

**१.२.** अनुदान वाटपासाठी वस्तीची प्राधान्यक्रम सूची तयार न करणे, याबाबत विभागाने सप्टेंबर, २०१८ मध्ये संबंधितांना कारणे दाखवा नोटिस पाठविली आहे. विभागाने दिनांक ३१ मार्च २०१६ रोजी सभागृहात अहवाल सादर केलेला आहे. त्याला आता अडीच वर्षे झालेली आहेत. या अडीच वर्षामध्ये लोकलेखा समितीची साक्ष लागेपर्यंत विभागाकडून कोणतीही कारवाई न होण्याचे कारण काय आहे? ठाणे, रत्नागिरी, नाशिक, औरंगाबाद, लातूर, अकोला कोणीही प्राधान्यक्रम यादी तयार केली नाही. बीड यांनी असे नमूद केले आहे की, दिनांक ५ फेब्रुवारी २०११ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार वस्त्यांची प्राधान्यक्रम यादी तयार करण्याबाबत लेखी सूचना दिली, ती कधी दिली आहे, ती आता दिली असेल याचा अर्थ ती केलीच नाही, असे समितीने निदर्शनास आणले असता, प्राधान्यक्रम सूची जरी तयार केली नाही तरी, कामे अलॉट करताना सन २०११ च्या शासन निर्णयाप्रमाणे जे प्राधान्यक्रम विहित केले होते, त्याचप्रमाणे केले असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने आपल्या मनाप्रमाणे प्राधान्यक्रम ठरविला. प्रथम, व्दितीय, तृतीय प्राधान्य कोणाला द्यायचे याबाबतचे शासनाचे नियम आहेत. मात्र त्यांचे कुठेही पालन केलेले नाही. विभागाने तेथील आवश्यकतेप्रमाणे केले असेल हे समिती मान्य करू शकते किंवा लोकांची जास्त आग्रही भूमिका असल्याने मान्य केले असेल, ते मान्य करू शकते. परंतु, ठरलेल्या नियमाचे पालन झालेले नाही कारण प्राधान्यक्रम नाही. एखाद्या ठिकाणी विभागाला प्राधान्यक्रमाशिवाय करावे लागले कारण कुठे शौचालयाची, कुठे पाण्याची, कुठे येण्याजाण्याच्या रस्त्याची अडचण होती, मात्र प्राधान्यक्रम नाही त्यामुळे फक्त लोकांच्या मागणीच्या तिव्रतेच्या आधारावरच हे सर्व काम केलेले आहे, विभागाने प्राधान्यक्रमच ठरविलेला नाही. जेथे काम झालेच नाही तेथे प्रथम करावे, जेथे एकदा झाले असेल तेथे सेकंड ऑप्शन द्या, जेथे दोनदा झाले असेल तेथे थर्ड ऑप्शन द्या, असा प्राधान्यक्रम द्यायचा असतो. विभागाने प्राधान्यक्रमाची यादी तयार केली नसताना प्राधान्यक्रमाप्रमाणेच केले आहे हे सांगणे कितपत योग्य आहे? आता बैठकीस उपस्थित असलेले सर्व ॲडिशनल सी.ओ. त्यावेळेस नव्हते. त्यांना पेपरवर जे दिसेल तेच ते बोलतील. त्यांच्याकडे प्राधान्यक्रमाची यादीच नाही. त्यामुळे जे झाले ते बरोबर असे ते म्हणतील. विभागही अडीच वर्षे झाली तरी काहीच कारवाई करीत नाही. विभागाने सन २०११ मध्ये पारित केलेल्या निर्देशांचे पालन होत नाही, हे विभागाच्या सन २०१६ पर्यंत लक्षात आले नाही, असे मत

समितीने व्यक्त केले असता, सुरुवातीला बृहत आराखडा तयार करताना फॉरमॅट विहित केलेले नव्हते. मात्र नंतर महालेखापालांनी निदर्शनास आणल्यानुसार बृहत आराखड्याचा फॉरमॅट केला असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २०११ च्या शासन निर्णयामध्ये प्राधान्याबाबत ज्या वस्त्यांना कधीही लाभ मिळाला नाही त्यांना पहिले प्राधान्य, दुसरे प्राधान्य ज्यांना काही फॉर्मल अनुदान दिले आहे, तिसरे प्राधान्य ४ ते ९, ९ ते १३ असे आराखड्यातील एखाद्या आराखड्यामध्ये काम केले आहे, बाकी काम सुटले आहे त्यांना व ज्या वस्तीमध्ये दोन वेळा काम घेण्यात आले त्यांना चौथे प्राधान्य असे एकदम सिम्पल आहे. त्याकरिता फॉरमॅट कशाला पाहिजे, फॉरमॅट दिले नाही तर, प्राधान्यक्रम द्यायचा होता. १, २, ३ अशा कोणत्या निकषामध्ये ती वस्ती बसते इतकेच तेथे ठरवायचे होते.

विभागाने त्याच्याकडे लक्ष दिले नसल्यामुळे खालच्या झेडपी लेव्हलवर काही अंमलबजावणी झाली नाही. विभागाने शासन निर्णय काढला नसता तर महालेखापालांनी हा परिच्छेद टाकला नसता. शासन निर्णयाची अंमलबजावणी होत नाही म्हणून हा परिच्छेद आहे. कमीत कमी तेथे बसलेल्या लोकांना हा विषय महालेखापाल यांच्याकडून लक्षात येतो, त्याबाबत शहानिशा करून अधिकाऱ्यांवर कारवाई केली पाहिजे. विभागाने काही कारवाई केली नाही. केवळ नोटीसेस मागितलेल्या आहेत. विभाग म्हणत आहे की, प्राधान्य क्रमाने केलेले आहे. विभागाकडे या विषयी काही कागदपत्रे आहेत का? अतिरिक्त मुख्याधिकारी असे सांगू शकतात का? आम्ही हे प्राधान्यक्रमाने केलेले आहे, याचा काही पुरावा देऊ शकतात का? अशी समितीने विचारणा केली असता, विभागाने दोन प्रस्तावांच्या छायांकित प्रती आणलेल्या आहेत. १५-१६ आणि १२-१३ चा प्रस्ताव आहे. त्यावेळी ग्रामपंचायतीकडून जे प्रस्ताव घेतले गेलेले आहेत. त्या प्रस्तावामध्ये बीडीओकडून आणि ग्रामसेवकाकडून प्रस्ताव घेतलेले आहेत. सन २०११ मध्ये जो काही प्राधान्यक्रम नमूद केलेला आहे, त्यानुसार प्रस्ताव सादर करीत आहोत. ते प्रमाणपत्र त्यांनी सर्टिफाय केल्यानंतर या कामाला सुरुवात होईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ग्रामपंचायत हे सर्टिफाय करू शकत नाही. विभागाने आणि बीडीओने हे सर्टिफाय केलेले आहे का? बीडीओने जर हा प्रस्ताव तपासला असेल तर त्याची वेटिंग करून घ्यावी लागणार. बीडीओ ने हे सर्टिफिकेट लावलेले आहे. प्राधान्यक्रमाने हे शासन निर्णयाप्रमाणे केलेले आहे. ग्रामपंचायतीला आपल्या मनाप्रमाणे काम पाहिजे. ते कोणती सर्टिफिकेट देतील? आपण आपला रेकॉर्ड न बघता त्यांच्या प्रमाणपत्रानुसार केवळ काम करून दिले. त्यांच्या सर्टिफिकेटला बीडीओने काऊंटर सिग्नेचर केलेली आहे. रेकॉर्ड तपासून पाहावे. अन्यथा विभागाने जिल्हापरिषदेच्या जबाबदार अधिकाऱ्यावर कारवाई करावी, असे समितीने निदेश दिले. पाणीपुरवठा, पोच-रस्ते, मलनिःस्सारण, वीजपुरवठा हा आपला प्राधान्यक्रम असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

प्राधान्य क्रमामध्ये पहिले प्राधान्य ज्यांनी कधीही कोणताही लाभ घेतला नाही. एका विशिष्ट बृहत आराखड्याच्या पाच वर्षाच्या कालावधीत वस्त्यांना अंशतः अनुदान दिलेले आहे. २०१५-१६ नंतर ज्यांनी शासनाच्या निर्देशाचे पालन केले नाही, ग्रामपंचायतीच्या मागणीप्रमाणे ही कामे केलेली आहेत. त्यामुळे हे जे निर्देश देण्यात आलेले आहेत, ते स्वतःच्या मनाप्रमाणे ठरविण्यात आलेले आहे, असे समितीने मत व्यक्त केले असता, वंचित वस्त्या यामध्ये राहिलेल्या आहेत. यासंदर्भात विभागाने प्राथमिक कारणे दाखवा नोटीस दिलेल्या आहेत. चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वास्त केले.

यासंदर्भात एका महिन्याच्या आत कारवाई करून समितीला माहिती सादर करावी असे समितीने निदेश दिले.

**२.१.२.३. बृहत आराखडा तयार करण्यासाठी अधिक लोकसंख्या गृहित धरणे.**

**१.३.** या परिच्छेदा संदर्भात माहिती देण्यात यावी असे समितीने निदेश दिले असता, लातूर जिल्हापरिषदेमध्ये २०१३-१४ ते २०१७-१८ या कालावधीमध्ये वस्तीची लोकसंख्या, बृहतआराखडा तयार करताना २०११ च्या जनगणनेचा अवलंब करावयाचा होता. असे महालेखाकार यांचे म्हणणे आहे. २०१३-१४ च्या आराखड्यामध्ये ३१ टक्के ते ३७८ टक्के गृहित धरली होती, असे महालेखाकार यांचे म्हणणे आहे. २०११ चा शासन निर्णय आहे. त्याच्यामध्ये असे म्हटले आहे की, २०११ ची लोकसंख्या आणि प्रत्यक्ष लोकसंख्या यामध्ये फरक आहे. ज्या दिवशी त्या गावामधून गावामध्ये ठराव होतो, ठरावाच्या दिवशी गावाची प्रत्यक्ष लोकसंख्या असेल, त्यानुसार त्या गावाची अनुज्ञेयता ठरविणे अपेक्षित असते. त्यामुळे २०११ च्या लोकसंख्येनुसार अनुज्ञेयता ठरवायची असे नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

प्रत्यक्ष लोकसंख्या घेण्याबाबत समितीची हरकत नाही. परंतु ती ३७८ टक्के जास्त होऊ शकत नाही. ३१ टक्के वाढ समिती समजू शकते. ३७८ टक्के वाढ दाखविणे अतिरेक आहे, असे समितीने मत व्यक्त केले असता, उपायुक्त, लातूर यांच्यामार्फत चौकशी केलेली आहे. प्रादेशिक उपायुक्तांनी अहवाल दिलेला आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्या अहवालामध्ये काय आले? अशी समितीने विचारणा केली असता, ही चौकशी उपायुक्तांनी केलेली आहे, त्यामध्ये त्यांनी त्या वस्तीमधील जी कामे घेण्यात आली होती त्याची तपासणी केली. २०११ ची लोकसंख्या किती होती आणि प्रत्यक्ष लोकसंख्या किती होती? त्याच्या अनुषंगाने प्रत्येक वर्षी किती कामे घेण्यात आली? यासंदर्भात असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

उपायुक्त, लातूर यांनी प्रत्यक्ष लोकसंख्येपेक्षा जास्त लोकसंख्या गृहित धरली आहे काय, अशी समितीने विचारणा केली असता, लातूर जिल्ह्यामध्ये दहा गावांना भेट दिल्या, असून लोकसंख्येच्या प्रमाणात निधी देण्यात आलेला आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

६५२ पैकी ३७ वस्त्यांमध्ये सन २०११ नुसार अनुसूचित जाती व नवबौद्धांची लोकसंख्या ३०० पेक्षा कमी होती तरीही सन २०१३-१८ च्या बृहत आराखड्यात अतिशय जास्त गृहित धरली होती. ती ३१ टक्क्यांपासून ३७८ टक्के प्रत्यक्ष लोकसंख्या गृहित धरली तर एका गावातील लोकसंख्या एवढ्या कमी कालावधीत ३७८ टक्के वाढत नाही. ३१ टक्के लोकसंख्या पाच-सहा वर्षात वाढू शकते. परंतु ३७८ टक्के लोकसंख्या वाढत नाही. ग्रामपंचायती क्षेत्रात १० टक्क्यांच्या वर लोकसंख्या वाढत नाही. तेथे नॅचरल ग्रोथ दीड टक्क्याच्या वर दरवर्षी होत नाही. त्या दृष्टीने पंधरा टक्के दहा वर्षामध्ये वाढली पाहिजे. जनगणनामध्ये जे काही असेल त्यापेक्षा जर ३१ टक्के किंवा ३७८ टक्के जास्त दाखविली आहे का, हा आपला मूळ महालेखापालांचा परिच्छेद आहे. अनुज्ञेय किती आणि किती खर्च केला हा दुसरा भाग आहे. विभागाने लोकसंख्या जास्तीची गृहित धरलेली आहे, हा येथे विषय आहे. त्याची विभागाने तपासणी केली नाही का? असा प्रश्न समितीने केला असता, यासंदर्भात विभागाने दहा दलित वस्त्यांमध्ये तपासणी केलेली आहे. ती कामे दलित वस्तीमध्ये झालेली आहे का? लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना निधी दिलेला आहे का, या बाबी पाहिलेल्या आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

लातूर जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौद्धांची जी लोकसंख्या गृहित धरलेली आहे, तीच विवादित आहे. जनगणनेपेक्षा ३७८ टक्के लोकसंख्या जास्त असेल तर लोकसंख्याच्या आधारावर निधी दिलेला आहे, तर हेच अयोग्य आहे. लोकसंख्याच चुकीची आहे, असे महालेखापालांचे म्हणणे आहे. लोकसंख्येमध्ये दोन पॅरामीटर्स लावले. एक जनगणनेप्रमाणे लोकसंख्या दुसरी प्रत्यक्ष लोकसंख्या हे दोन भाग आहे. जनगणनेमध्ये २०११ ची लोकसंख्या गृहित धरण्यात येते. सन २०१५ मध्ये चार-पाच वर्षांची वाढीव लोकसंख्या असते, त्याला दीड-दोन टक्के घेतले तर त्यामध्ये दहा टक्के आणखी वाढ होईल. ३७८ टक्के वाढ कशी होणार? त्याची तपासणी विभागाने केली पाहिजेत. त्या तपासणीचे आदेश विभागाने दिलेच नाहीत, असे समितीने मत व्यक्त केले असता, ज्या वस्तीमध्ये तपासणी केलेली आहे, तेथे असे आढळून आले नाही. लोकसंख्येचे पर्सेंटेज जास्त वाढलेले आहे, असे आढळून आले नाही, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

जनगणनेप्रमाणे दहा वस्तीमध्ये किती लोकसंख्या वाढली? याची माहिती देण्यात यावी. सन २०११ ते २०१८ ची लोकसंख्या २० टक्क्यांपर्यंत गृहित धरावी परंतु ३१ टक्के, ४० टक्के, ३७८ टक्के समिती मान्य करू शकत नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, जगलपूर खुर्द, तालुका चाकुर, जि. लातूर या ठिकाणी व्हिजिट केलेली आहे. वस्ती क्रमांक ०२, भीम नगर येथे व्हिजिट केली आहे. सन २०११ मध्ये तेथे ८४ लोकसंख्या होती, तेथे आता ११७ लोकसंख्या आहे. यामध्ये ४० टक्के दरम्यान वाढ झालेली आहे, लातूर येथील रमाईनगर येथे २०११ ची लोकसंख्या १९ आहे, तेथे आज मितीस ५४ लोकसंख्या आहे. हा आकडा जवळपास तीन पट झालेला आहे. ही वाढ ३०० टक्क्यापर्यंत गेलेला आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

जेथे लोकसंख्या खूप कमी असेल तेथे समिती समजू शकते. जेथे विषय लिमिटेड होता. तेथे प्रत्यक्ष लोकसंख्या आणि जनगणनेप्रमाणे लोकसंख्या त्यामध्ये तफावत कशी का? विभागाला महालेखापालांनी ३७ गावांची यादी दिली असेल असा समितीने प्रश्न केला असता, विभागाकडे गावांची यादी नाही, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाने गावांची यादीच नाही तर विभागाने तपासणी कशी केली? २०१५ पासून अडीच वर्षे काहीच केले नाही. ही कारवाई जुलैपासून सुरू आहे. आता साक्ष लावली म्हणून पुन्हा तपासणी सुरू केलेली आहे. ३७ गावांची यादी घ्यावी आणि या ३७ गावांच्या यादीमध्ये जी जास्तीची लोकसंख्या दिलेली आहे, त्याची पूर्ण तपासणी करून घ्यावी. सध्या किती लोकसंख्या आहे, सन २०११ प्रमाणे किती लोकसंख्या आहे, जर हे समर्थनीय होत आहे का याची तपासणी करून त्याचा अहवाल एक महिन्याच्या आत समितीला सादर करावा, असे समितीने निदेश दिले.

**२.१.३ आर्थिक व्यवस्थापन**

**२.१.३.१ आयुक्त स्तरावर खर्चाच्या आकडेवारीचे चुकीचे संकलन**

**१.४.** या मुद्यासंदर्भात माहिती देण्यात यावी असे समितीने निदेश दिले असता, आयुक्त स्तरावर खर्चाच्या आकडेवारीचे चुकीचे संकलन असा हा परिच्छेद आहे. त्याच्यामध्ये विभागाने सर्व आकडे रिवाईज्ड केलेले आहेत. त्यामध्ये २०१०-११ ते २०१४-१५ या वर्षामध्ये वितरित तरतुदींचा विभागनिहाय तपशील दिलेला आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २०१०-२०१५ दरम्यान विभागाने ३५ झेडपीला २००२ कोटी रुपये दिलेत व सन २०१०-२०१५ मध्ये पूर्ण खर्च झाले, असे विभागाने नमूद केले होते. आता आठ जिल्हापरिषदेमध्ये तीच परिस्थिती आहे. ६१३ कोटी रुपये विभागाने त्यांना उपलब्ध करून दिले त्यांनी केवळ ३२४ कोटी रुपयांचे वाटप केले. आता जितके दिले तितके खर्च केले, असे ते सांगतील. आठ जिल्हापरिषदेमध्ये जेवढे पैसे दिले, त्यामधून ४५ टक्के

निधी पडून आहेत. पूर्ण राज्याची जी आकडेवारी आहे, त्यामध्ये हे आठ जिल्हे समाविष्ट आहेत. जर या आठ जिल्ह्याची ही परिस्थिती असेल तर पूर्ण राज्याचीही तीच परिस्थिती असेल. विभागाने जो तक्ता दिला, तो प्रत्येक जिल्ह्याचा तक्ता दिलेला आहे. विभागाने १६१७ कोटी रुपये सन २०१०-११ पासून सन २०१५-१६ पर्यंत या सहा विभागाला दिलेले आहे. हे पैसे पूर्ण खर्च झाले का, अशी समितीने विचारणा केली असता, कमिशनर ऑफिसकडून जिल्हापरिषदेकडे दाखविलेले पैसे वितरित केल्याचे दाखविलेले आहेत. बीडीएसवरुन विथड्रॉ झाले तर खर्च झाले असे समजण्यात येते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ते विभागाने वितरित केलेले आहेत. ते वेळेवर वितरितच होणार नाही, तर खर्च कसे होईल? जोपर्यंत पैसा शेवटपर्यंत पोहोचत नाही तो पर्यंत खर्च होऊ शकत नाही. कारण कामाच्या प्रगतीप्रमाणे पैसे रिलीज केले जातात. ग्रामपंचायतीला बीडीओ ऑफिस पूर्ण पैसे एकाच वेळी देत नाही. हे पैसे त्याच वर्षी खर्च होऊ शकत नाही. विभागाकडून पैसे जिल्हापरिषदेकडे जातात. विभागाने पैसे डिस्बर्स केले तर बजेटमध्ये पूर्ण युटिलायलेजशन दाखवितात. जिल्हापरिषदेला एका वर्षाची मुदत असते. तो पैसा ते पुढच्या वर्षी ते खर्च करतात. जिल्हापरिषदेने पंचायत समितीला दिले की नाही हे पाहिले पाहिजे. पंचायत समितीला एका वर्षाची मुदत आहे किंवा त्याच वर्षामध्ये खर्च करावे, किंवा पुढील वर्षी खर्च करण्याची मुदत दिली जाते. विभागाकडून पैसे गेले म्हणजे त्याचा पूर्ण उपयोग होतो असे नाही. ग्रामपंचायतीला पैसे प्रगतीप्रमाणे टप्प्याटप्प्याने दिले जाणार आहे. हे पैसे त्याच वर्षी खर्च होत आहेत, असे दाखविले जात आहे, ते योग्य नाही. तरी सुद्धा ते पैसे पंचायत समिती स्तरावर पूर्ण पोहोचले पाहिजेत याची काळजी अशी विचारणा समितीने केली असता, घेतली जात नसेल तर त्यासंदर्भात परिपत्रक काढले आहे काय?

यापूर्वी आयुक्त स्तरावरुन निधी देण्यात येत होता. आता जिल्हास्तरावर योजना झालेली असल्यामुळे जिल्हाधिकारी स्तरावर निधी वितरित होतो. ८ जिल्ह्यांचे लेखापरीक्षण झाले त्यामध्ये सन २०११ ते २०१६-२०१७ पर्यंत अर्थसंकल्पीय तरतूद ७५० कोटी रुपयांची होती आणि बीडीएसवर ७२६ कोटी रुपये प्राप्त झाले. त्यापैकी जिल्हापरिषदेने ६४.९२ लाख रुपये समर्पित केले. उपलब्ध तरतूद ७३० कोटी रुपये होती त्यापैकी ७१४ कोटी रुपये खर्च केले, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आयुक्तांनी सांगितले की, २००२ कोटी रुपये खर्च केले. विभागाने जो तक्ता दिलेला आहे मध्ये १६१७ कोटी रुपये खर्च झाल्याचे नमूद केलेले आहे. ३८५ कोटी रुपयांची तफावत का येत आहे? २००२ कोटी रुपये ही आकडेवारी चुकलेली आहे. आता विभागाने १६१७ कोटी रुपयांची आकडेवारी दिलेली आहे, याबाबत माहिती देण्यात यावी असे समितीने सूचित केले असता, सदरचा निधी आयुक्त कार्यालयातून वितरित झालेला आहे. ३८५ कोटी रुपयांची तफावत ही पूर्ण राज्याची आकडेवारी आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महालेखाकारांचे म्हणणे आहे की, विभागाकडून वितरित करण्यात आलेला संपूर्ण निधी खर्च होत नाही. आता विभागाने त्या आकडेवारीमध्ये दुरुस्ती केलेली आहे की, सदरची रक्कम २००२ कोटी नसून ती १६१७ कोटी रुपये आहे व ती मागील पाच वर्षात वितरित केलेली आहे. दुसरा मुद्दा म्हणजे ८ जिल्ह्यांचे लेखापरीक्षण करण्यात आले. विभागाने त्यांना ६०० कोटी रुपये दिले त्यापैकी ३०० कोटी रुपये पंचायत समितीपर्यंत पोहोचले तर निधी खर्च कसा होणार, १०० टक्के निधी खर्च होऊ शकत नाही असा महालेखकारांचा आक्षेप आहे. त्यामध्ये २००२ कोटी रुपये हा आकडा कोठून आला हे समितीला माहीत नाही. विभागाने दिलेला तक्ता समिती मान्य करते कारण रु. २००२ कोटी ही आकडेवारी चुकीची आहे आणि रु. १६१७ कोटी ही आकडेवारी समिती मान्य करते. रु. १६१७ कोटी ही आकडेवारी कोठून आली हा प्रश्न आहेच, विभागाने प्रपत्र क्रमांक १ मध्ये माहिती दिलेली आहे आणि त्यामध्ये रु,१६१७ कोटी ही आकडेवारी दिलेली आहे. म्हणजे रु. २००२ कोटी ही आकडेवारी चुकीची आहे. विभागाने पैसे दिले म्हणजे ते पैसे खर्च झाले नाहीत तर त्यांना पैसे वितरित केले असे म्हणावे आणि पंचायत समितीने पुढील वर्षाच्या आत तो निधी खर्च केला पाहिजे. सन २०१५-२०१६ मध्ये दिलेला निधी सन २०१६-२०१७ पर्यंत खर्च केलाच पाहिजे अन्यथा त्यांनी तो निधी सर्मपित करावा अशी विभागाने भूमिका घेतली पाहिजे, असे समितीने सूचना केली असता, विभाग पंचायत समित्यांना एक वर्षापर्यंत निधी वापरण्यास परवानगी देतो. सप्टेंबर, २०१७ मध्ये वित्त विभागाने हा निधी खर्च करण्याची अखेरची संधी दिली होती. जी कामे पूर्ण झालेली आहेत, जेथे रनिंग देयके प्रलंबित आहेत त्याचे पेमेंट करण्यास मुभा दिली होती, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीकडे ऑडीट पॅरा आल्यानंतर प्रधान सचिव पातळीवर फॅक्टस आणि फिगर ॲक्सेसेबल आहेत असे म्हटले जाते आता ती फिगर रु. २००२ कोटीवरुन रु. १६१७ कोटींवर आली हे आम्हाला समजलेले नाही. विभागाकडून ऑडीटच्यावेळी चुकीची आकडेवारी देण्यात आली की, विभागामध्ये दोन बुक्स ऑफ अकाऊन्टस मेन्टेन केले जाते काय? परसेप्शनमध्ये बदल होऊ शकतो पण आकडेवारीमध्ये बदल होऊ शकत नाही. विभागाने ऑडीटच्यावेळी जी माहिती दिली तीच माहिती येथे आली आहे. मग आकडेवारीमध्ये कसा बदल होऊ शकतो? विभागाने ऑडीटच्यावेळी चुकीची आकडेवारी दिली काय? पॅराबाबत उत्तर देण्याबाबत चार-पाच वेळा संधी देण्यात येते. शेवटचे उत्तर मंत्री महोदयांकडून येते. तेव्हा देखील आपण सांगता की, फॅक्टस ॲण्ड फिगर्स बरोबर आहेत, असे का होते हे विभागाने समजावून सांगावे, असे उपमहालेखापाल यांनी सांगितले.

शासनाने २००२ कोटी रुपये वितरित केले आणि रु. १६१७ कोटी खर्च झाले असे काही झाले काय? असा प्रश्न समितीने केला असता, विभागाने रु. १६१७ कोटी बीडीएसद्वारे वितरित केले, ते ट्रेझरीमधून काढण्यात आलेले आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मग रु. २००२ कोटी हा आकडा कोठून आला? आयुक्त स्तरावर २००२ कोटी रुपये कोठून आले? सन २०१० च्या पूर्वीचे पैसे खर्च केले आणि ती रक्कम यामध्ये समाविष्ट केली काय? अशी विचारणा समितीने केली असता, तत्कालीन फाईल्स आणि रेकॉर्डसवर हे ऑडीट केलेले आहे, ती रक्कम वितरित केल्याचा रेकॉर्ड आहे. पण विभाग पुन्हा रिकन्सीलिएशन करतो, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

आकडेवारीमध्ये इतका फरक पडत नाही. आयुक्त पातळीवरुन सांगण्यात येते की, रु. २००२ कोटी खर्च केले. विभाग सांगतो रु. १६१७ कोटी वितरित केले. त्यांनी त्यांच्या पातळीवर तेवढा जास्तीचा खर्च केला काय? सार्वजनिक बांधकाम विभागाला रु. ३०९ कोटी ६८ लाख थेट दिलेले आहेत. आयुक्त, समाजकल्याण विभागाकडून रु. २००२.३१ कोटी वितरित केले. आपण समितीला जी रु. १६१७ कोटींची माहिती देत आहात, त्यामध्ये ३०९ कोटी रुपयांचा समावेश आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, ती रक्कम समाविष्ट आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने महालेखाकार कार्यालयाबरोबर रिकन्सीलिएशन करून घ्यावे. अे. जी. कार्यालयाने रु. २००२ कोटी ही आकडेवारी कोठून आणली? दुसरा मुद्दा म्हणजे विभागाने सांगितले की, ती रक्कम खर्च झाली. ती रक्कम खर्च झाली नसून ती वितरित केली आहे. विभागाकडे खर्चाची विगतवारी उपलब्ध नाही, जिल्हापरिषदेला किती निधी वितरित केला, पंचायत समितीला किती निधी वितरित केला याची विभागास माहिती नाही. विभागाने थेट निधी देणे बंद करावे अशी समितीची सूचना आहे. त्याऐवजी ग्राम विकास विभागाने जी पद्धत अवलंबिली आहे त्याप्रमाणे कार्यवाही करावी. म्हणजे ग्राम विकास विभाग निधी मंजूर करते. जिल्हापरिषदेने त्यांचे देयक बीडीएसवर सबमिट करावे, त्यास विभागाच्या मान्यतेची आवश्यकता नाही. त्यांना तो निधी लगेच मिळतो. समाजकल्याण विभागाने देखील हीच पद्धत वापरावी. विभाग एका बाजूला ओव्हर ड्राफ्ट काढून त्यावर व्याज भरतो आणि दुसरीकडे हजारो कोटी रुपये अखर्चित राहत असतील तर ते योग्य नाही. तेव्हा समितीची अशी सूचना आहे की, ग्राम विकास विभाग जी पद्धत वापरत आहे ती पद्धत समाजकल्याण विभागाने देखील वापरावी. असे समितीने सूचित केले असता, विभागाने ही योजना जिल्हास्तरावर सुरू केलेली आहे. जिल्हाधिकाऱ्यांना प्रशासकीय अधिकार दिलेले आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीने रु. २००२ कोटी आणि रु. १६१७ कोटी अशी जी विसंगती दिसून येत आहे त्याबाबत महालेखाकार कार्यालयाबरोबर रिकन्सीलिएशन करून त्याबाबतचा अहवाल समितीला एक महिन्यात सादर करावा, असे समितीने निदेश दिले.

**परिच्छेद क्रमांक २.१.३.२ – अनुदानातील वाटपबाबत विलंब**

**१.५.** विभागाने जो तक्ता दिलेला त्यावरुन असे दिसते की, डिसेंबर आणि मार्च महिन्यात काही निधी दिलेला आहे. सदर योजनेचा निधी वर्षाच्या सुरुवातीला सहायक आयुक्त यांच्याकडे देण्याबाबतची नवीन पद्धत सन २०१७-२०१८ मध्ये सुरू केलेली आहे. सन २०१७-२०१८ मध्ये त्याप्रमाणे अंमलबजावणी केली काय? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी त्यास होकारार्थी उत्तर दिले.

राज्य शासनाच्या योजनेचा निधी असला तरी त्यास जिल्हापरिषदेच्या सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळाल्याशिवाय तो निधी खर्च करता येत नाही आणि ती सभा विलंबाने होते किंवा काही वेळा होत नाही, त्यामुळे निधी खर्च होत नाही. तेव्हा राज्य शासनाच्या योजनेचा थेट निधी मिळतो तो खर्च करण्यास परवानगी द्यावी. जिल्हापरिषदेने ठराविक कालमर्यादेमध्ये बैठक घेऊन त्यास मंजुरी द्यावी. कारण ३७४ व्या घटनादुरुस्तीप्रमाणे जिल्हापरिषदेचे अधिकार कमी करता येणार नाही. फक्त जिल्हा परिषदेने सप्टेंबर महिन्यापर्यत मान्यता द्यावी अशाप्रकारचे बंधन घालता येईल. विभाग त्यांच्या अधिकारावर अतिक्रमण करीत नाही. जी योजना राज्य किंवा केंद्र शासनाची आहे त्यामध्ये जिल्हापरिषद काही बदल करू शकत नाही. ही योजना जिल्हा स्तरावर दिल्यामुळे डीपीसीला जिल्हापरिषदेच्या बॉडीची शिफारस मान्य करावी लागते आणि जिल्हाधिकारी फक्त प्रशासकीय मान्यता देतात. जिल्हापरिषदेने सप्टेंबर महिन्यापर्यंत आराखड्यास मान्यता दिली पाहिजे असे विभाग बंधनकारक करू शकतो, या योजनेपुरता जिल्हापरिषदेच्या मान्यतेची आवश्यकता नाही. आपण पाच वर्षाचा आराखडा मंजूर केल्यानंतर तो बंधनकारक असतो, त्यामध्ये काही बदल करायचा नाही. डीपीसीच्या निधीबाबत जिल्हापरिषद काही करू शकत नाही, असे मत समितीने व्यक्त केले.

३०५४ आणि ५०५४ हेड जिल्हापरिषदेकडे आले. सर्व निधीचे निर्धारण करण्याचे अधिकार जिल्हापरिषदेला आहेत. जिल्हापरिषदेला बृहत आराखड्याचे पालन करून कामांची यादी तयार करावी लागणार, परंतु त्यासाठी जिल्हापरिषदेची मान्यता घ्यावी लागणार. जर त्यांना डावलून समाजकल्याण अधिकाऱ्यांच्या शिफारशीवर किंवा समाजकल्याण समितीच्या शिफारशीवर कामाला मान्यता दिली त्यांच्या अधिकारावर गदा आणण्याचे काम होईल. त्यांना शासनाच्या वतीने मॅन्डेटरी करू शकतो की त्यांनी आराखडाप्रमाणे उपलब्ध निधीच्या मर्यादेत काम मंजूर करून घ्यावे, त्याप्रमाणे आदेश काढावेत, असे समितीने निदेश दिले.

**परिच्छेद क्रमांक २.१.३.३ वस्तींना अनुज्ञेयतेपेक्षा जास्त अनुदानाचे वाटप**

**१.६.** सन २०१७-२०१८ ला सुरुवातीला फंड रिलीज केला त्याप्रमाणे सन २०१८-२०१९ मध्ये फंड रिलिज केला काय? अशी समितीने विचारणा केली असता, अजूनपर्यंत फंड रिलिज झालेला नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २०१७-२०१८ ला पद्धत सुरू केली आणि सन २०१८-२०१९ मध्ये बंद केली काय? अशी समितीने विचारणा केली असता, अजून अंतिम आराखडा मंजूर झालेला नाही. आराखडा अंतिम झाल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांची मान्यता घेतल्यानंतर त्यांना फंड मिळेल, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

आराखड्याचा मुद्दा वेगळा आहे. आराखड्याशिवाय मान्यता देऊ नये हे मान्य आहे. विभागाकडून शेवटच्या क्षणी निधी दिला जातो असा आरोप आहे. तेव्हा वर्षाच्या सुरुवातीला निधी दिला पाहिजे किंवा अमुक इतका निधी मिळणार आहे त्याप्रमाणे नियोजन करा असे त्यांना सांगितले पाहिजे. त्यांनी आरडीडी पॅटर्न वापरला तर निधी वाटपाची गरज नाही. फक्त त्यांनी वर्ष मार्क करायचे आहे, अशी सूचना समितीने केली असता, या वर्षीचा निधी हस्तांतरित केलेला आहे. कार्यपद्धती अशी आहे की, विषय समित्यांनी कामाचे नियोजन करून मान्यता दिली पाहिजे. प्रशासकीय मान्यतेचे अधिकार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा अधीक्षक अभिंयता, उप अभियंता, यांनी त्यांच्या अधिकाराप्रमाणे मान्यता दिल्यानंतर त्या सर्व प्रती जिल्हाधिकाऱ्यांना दिल्यानंतर जिल्हाधिकारी पैसे रिलिज करतात. सद्यःस्थिती काय आहे हे मला माहीत नाही. कारण विषय समित्यांसमोर प्रकरण लवकर जात नसल्यामुळे प्रकरण फायनल होत नाही आणि त्यामुळे अधिकाऱ्यांना प्रशासकीय मान्यता देण्यास अडचण निर्माण होते. सन २०१८-२०१९ ते २०२२-२०२३ असा पाच वर्षाचा नवीन आराखडा बनवावयाचा आहे. पहिला टप्पा दलित वस्त्या घोषित करणे हा होता. त्यासाठी ग्रामसभेचे ठराव घेऊन प्रत्येक दलित वस्तीमध्ये आज रोजी किती लोकसंख्या आहे, सन २०११ मध्ये किती लोकसंख्या होती, या माहितीचे संकलन झालेले आहे. दलित वस्त्या घोषित करणे आणि बृहत आराखड्याबाबत आयुक्तालयाने नमुना ठरवून दिलेला आहे. आराखडा तयार असून त्यास पुढील आठ दिवसांत मंजुरी मिळेल. आराखड्यास जेवढी तरतूद आहे त्या मर्यादेमध्ये समाजकल्याण समितीमार्फत कामांची निवड केली जाईल. पूर्वी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची कमिटी होती परंतु ते अधिकार पुन्हा समाजकल्याण समितीला दिलेले आहेत. दलित वस्ती घोषित करण्याचे अधिकार अतिरिक्त मुख्य कार्यकारी यांना आहेत. बृहत आराखडा मंजूर करण्याचा अधिकार रिजनल डेप्युटी डायरेक्टर यांना आहे. तो आमच्यामार्फतच होईल. गट विकास अधिकारी, समाजकल्याण अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सहीने रिजनल डेप्युटी डायरेक्टरकडे जाते, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

बृहत आराखडा सादर करण्याची अंतिम तारीख काय आहे? असा प्रश्न समितीने केला असता, अंतिम तारीख उलटून गेलेली आहे. सप्टेंबर अखेरपर्यंत बृहत आराखडा तयार करण्यास सांगितले होते. आता त्यांना स्पीड-अप करण्यास सांगून पुढील पंधरा दिवसांत बृहत आराखडा तयार करण्यास सांगण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ही परिस्थिती फक्त औरंगाबाद जिल्हापरिषदेची आहे की, अन्य जिल्ह्यामध्ये देखील आहे काय? असा प्रश्न समितीने केला असता, राज्यात सर्वत्र आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

नियमाप्रमाणे अनुज्ञेय असलेल्या अनुदानापेक्षा जास्त अनुदान दिल्याबाबतची माहिती वस्त्यांबाबतच्या मुद्यातील प्रपत्र ६ यामध्ये दिली असल्याचे विभागाने म्हटले आहे. प्रपत्र ६ हे मंजूर काम आणि तपासणी केलेले काम याबाबत जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचे आहे. त्यामुळे विभागाचे काही वेगळे प्रपत्र आहे काय? अशी समितीने विचारणा केली असता, ते जुने कंम्प्लायन्स होते त्यानंतर महालेखापालांचे वेटींग रिमार्क्स होते की, सदर बाबतीत विभागाने ३.५ वर्षाच्या कालावधीनंतर चौकशी केली आहे. त्या चौकशीसाठी झालेल्या विलंबाची कारणे द्यावीत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जुन्या पुस्तकामध्ये प्रपत्र ६ आहे आणि नवीन पुस्तकामध्ये ते नाही. जुन्या पुस्तकात ९० लाख रुपये जास्तीचे दिले असे विभागाने मान्य केले आहे. औरंगाबाद मध्ये ५५ लाख रुपये आणि चंद्रपूरला ३४ लाख रुपये जास्तीचे दिलेले आहेत. त्यामध्ये विभागाने चंद्रपूर बाबत सांगितले की, प्रत्येक जिल्ह्यात लोकसंख्येनुसार अनुदान दिलेले आहे. पण औरंगाबाद बद्दल माहिती नाही. २.५ वर्ष झाले आहेत तर औरंगाबादचा अहवाल कधी मिळणार आहे? अशी समितीने विचारणा केली असता, या अनुषंगाने विभागाने संबंधीत डेप्युटी कमिशनर यांना चौकशीचे आदेश दिलेले आहेत. त्यापैकी लातूर आणि नागपूर या दोन डेप्युटी कमिशनरचे आदेश विभागास प्राप्त झालेले आहेत. औरंगाबादचा अहवाल अजूनपर्यंत आलेला नाही. नागपूर आणि लातूर या दोन्ही जिल्ह्यांचा अहवाल मिळालेला आहे. एक आठवड्यामध्ये औरंगाबादचा अहवाल प्राप्त करून घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

औरंगाबाद जिल्ह्याचे अधिकारी त्यांनी याची माहिती द्यावी, असे समितीने निदेश दिले असता, ज्या ग्रामपंचायतीच्या अनुषंगाने हा परिच्छेद आहे त्या सिल्लोड तालुक्यातील ५ आणि कन्नड तालुक्यातील ५ अशा एकूण १० ग्रामपंचायतीच्या तपासणी केलेल्या आहेत तर तिथे अनुज्ञेयपेक्षा जास्तीचा निधी दिलेला नाही. लोकसंख्येनुसार जितका निधी अनुज्ञेय आहे तितकाच निधी दिलेला आहे. सुरुवातीला जो अहवाल दिला होता त्यामध्ये माहिती दिलेले आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाच्या प्रधान सचिवांनी असे सांगितले होते की, " The matter would be investigated " . तपासणी केल्यानंतर विभागाने लोकलेखा समितीमार्फत आम्हाला अहवाल द्यायला पाहिजे. ते अहवाल महालेखापाल कार्यालयाकडे आले नाही म्हणून त्याची काही तपासणी करू शकलो नाही. विभागाकडे जी कागदपत्रे असतात ती आम्ही घेऊन गेल्यानंतर त्या आधारे अहवाल तयार होतो ती कागदपत्रे महालेखापाल कार्यालय क्रॉस चेक करून बघत नाही असे प्रधान महालेखाकार यांनी विदित केले.

लातूर व नागपूर या दोन जिल्ह्याचा अहवाल आलेला आहे तो आज समितीसमोर सादर करतो आणि एका जिल्ह्याचा अहवाल शिल्लक आहे तो एका आठवड्याच्या आत सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समाजकल्याण आयुक्त यांनी म्हटले आहे की, लेखापरिक्षण अहवाल विलंबाने प्राप्त झाल्याने चौकशी करण्यास उशिर झाला आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, हे परिक्षण आधीच दोन्ही सभागृहात सादर झालेले असताना लेखापरिक्षण अहवालास विलंब का झाला आहे? नेमका कोणत्या प्रकारे विलंब झालेला आहे, असा प्रश्न प्रधान महालेखाकार यांनी उपस्थित केला. ऑक्टोबर, २०१७ मध्ये हे कमिशनर ऑफिसला पोहोचले म्हणजे विधीमंडळाचा अहवाल कमिशनर ऑफिसला पोहोचण्यासाठी १.५ वर्ष लागले आहेत. मार्च २०१६ ला विधीमंडळाचा अहवाल सादर झाला आहे आणि विधीमंडळाच्या अधिकाऱ्यांच्या म्हणण्याप्रमाणे हा अहवाल ऑनलाईन पण जातो. त्यामुळे प्रत्येकाने आपआपले संबंधीत परिच्छेद बघितले पाहिजे, अशी समितीने सूचना केली असता, विलंबास जे जबाबदार आहेत त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वस्त केले.

**परिच्छेद क्र. २.१.३.४ - कामे मंजूर न करणे आणि अनुदान प्रत्यार्पित करणे**

**१.७.** या परिच्छेदा संदर्भात माहिती देण्यात यावी अशी समितीने सूचना केली असता, प्रपत्र ३ मध्ये या ८ जिल्ह्याचा पूर्ण गोषवारा दिला आहे. त्यामध्ये सन २०१०-११ ते सन २०१६-१७ या कालावधीमध्ये ७५० कोटी रुपये अर्थसंकल्पीय तरतूद होती आणि बीडीएसवर ७२६ कोटी रुपये प्राप्त झाले आहेत. सन २०१२-१३ मध्ये शासनास ६४.९२ लाख रुपये समर्पित झाले आहेत. ७३० कोटी रुपये एवढा निधी जिल्हा परिषदांना उपलब्ध होता त्यापैकी ७१४ कोटी रुपये त्यांनी खर्च केले आहेत. आज १६.०५ कोटी रुपये जिल्हा परिषदांकडे शिल्लक आहेत. जिल्हा परिषदांनी ६.४६ कोटी रुपये जमा केले आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कामे मंजूर न करणे आणि अनुदान समर्पित करणे, हा महालेखापालांचा आक्षेपाचा मुद्दा आहे. औरंगाबाद जिल्हा परिषदेने सन २०१०-११ मध्ये, अकोला जिल्हा परिषदेने सन २०११-१२ मध्ये निधी उपलब्ध असताना पैसे परत केले आहेत. सन २०१०-११ मध्ये कामाचे नियोजन उशिरा झाले असून १०३ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता झालेली आहे. शेवटी तो निधी सरेंडर झाला आहे. कामाचे नियोजन न केल्यामुळे तो निधी सरेंडर केला आहे म्हणजे नियोजन न करण्याचाच हा दोष आहे. पैसे आल्यानंतर तुम्ही नियोजन करू शकत नाही मग याचे काय कारण आहे? निधी सरेंडर केल्यामुळे त्यावर तोडगा निघत नाही तर काम करणे हाच त्यावरील तोडगा आहे. आपण नियोजन न करता तो निधी का सरेंडर केला आहे हे सांगावे, असे समितीने निदेश दिले असता, ते पैसे परत केले नाहीत तर पुढच्या वर्षी त्याचे नियोजन केलेले आहे. ते पैसे अखर्चित राहिल्यामुळे शासनखाती जमा केलेले आहेत. पण नियोजन न करता ते पैसे समर्पित केलेले नाहीत. उशिरा नियोजन केल्यामुळे तो निधी खर्च होऊ शकला नाही म्हणून ते पैसे सरेंडर केले, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

नियोजन उशिरा का केले आहे, यासाठी कोण जबाबदार आहे? किती निधी लागणार आहे याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवल्यानंतर त्यातून आपल्याला कोणकोणती कामे करायची आहेत हे ठरवलेले असते. याचे काय कारण आहे ते तपासून समितीला सांगावे असे समितीने निदेश दिले असता हे तपासून घेण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

परिच्छेद साक्षीला आल्यानंतरही विभागीय प्रतिनिधी तपासून बघतो असे सांगतात म्हणजे अडीज वर्षानंतरही तपासणीच करणार काय? एवढ्या दिवसानंतर विचारल्यानंतरही विभाग समाधानकारक उत्तर देत नाही. अकोला जिल्ह्याचा काय विषय आहे ते सांगावे अशी समितीने सूचना केली असता, सन २०११ पासून जी ५२५ जुनी कामे होती त्यावर हा निधी खर्च केलेला आहे. मार्च, २०१८ पर्यंत विभागाचे नियोजन झाले नव्हते आणि वर्ष संपण्यासाठी व ते पैसे खर्च करण्यासाठी शेवटचे २ ते ३ दिवस उरले होते. त्यामुळे ते पैसे खर्च होऊ शकत नव्हते म्हणून सरेंडर केले आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

औरंगाबाद आणि अकोला या जिल्ह्यातील ज्या ज्या लोकांनी पैसे खर्च केले नाहीत म्हणजे १ वर्षाची मुभा असतानाही ते पैसे खर्च करीत नाहीत तर यांच्यावर विभागाने जबाबदारी निश्चित करावी. १ महिन्याच्या आत ही सर्व कार्यवाही करून समितीला माहिती द्यावी असे समितीने निदेश दिले.

रत्नागिरी जिल्हा परिषदेने ८१ लाख रुपये, नाशिक जिल्हा परिषदेने १९५ लाख रुपये, औरंगाबाद जिल्हा परिषदेने २३९ लाख रुपये आणि अकोला जिल्हा परिषदेने १३० लाख रुपये असे एकूण ६४७.९५ लाख रुपये एवढा निधी शासनखाती जमा केले आहे. १ वर्षामध्ये नियोजन करून ते पैसे खर्च केले नाहीत काम प्रलंबित असताना निधी का खर्च होत नाही, असा प्रश्न समितीने केला असता, यामध्ये दोन भाग आहेत काही जिल्हा परिषदेने सुरुवातीलाच तो निधी समर्पित केला आहे म्हणजे तो पैसे विड्रॉल झाला नाही आणि काही जिल्हा परिषदांनी निधी खर्च झाला नाही म्हणून शासन जमा केला आहे. बीडीएसवर एकूण ६४.९२ लाख रुपये सरेंडर केले आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यासाठी तांत्रिक अडचण झाली आहे त्यामुळे त्याला जिल्हा परिषदेचे अधिकारी जबाबदार नाहीत. पण १ वर्षाच्या आत जे खर्च करू शकले नाही त्यासाठी समाजकल्याण अधिकारी, सीईओ किंवा ॲडिशनल सीईओ यांच्यावर जबाबदारी निश्चित करावी. पैसे सरेंडर केल्यामुळे हा परिच्छेद विनियोजनामध्ये येतो आणि तिथे हे पैसे कसे सरेंडर केले हे विभागाला विचारले जाते. जेव्हा विभाग मागणी करतो तेव्हा कामाचे नियोजन करीत नाही काय? असे असेल तर एवढे पैसे लागणार अशी मागणी कशी करता, असा प्रश्न समितीने केला असता, हा विषय जिल्हा नियोजन समितीकडे दिलेला आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जिल्हा नियोजन समितीला जिल्ह्यासाठी उद्दिष्ट असे आहे की, दलित वस्ती, शहर एरियाला लोकसंख्येच्या आधारावर जो एकूण आऊटले दिला जातो तो लोकसंख्येच्या आधारावर नागरी क्षेत्रामध्ये वाटप होत असतो. कारण तसा शासन निर्णयच आहे. ग्रामीण क्षेत्रामध्ये आपण जे पैसे देतो ते दरवर्षी ४ ते ५ टक्के वाढवून आऊटले देत असतो. त्याचे जिल्हापरिषदेने वेळेवर नियोजन करावे. कारण त्यांची मागणी खूप जास्त असते. राज्याच्या एकूण आऊटलेच्या दृष्टीने त्या क्षेत्रातील लोकसंख्येच्या आधारावर विभाग ते पैसे राज्यातून प्रत्येक जिल्ह्याला वाटप करत असते. डीपीडीसी जिल्हा परिषदेला आलेल्या खर्चाचे नियोजन करते. ते प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या समितीकडून आले पाहिजे त्यानंतर जिल्हाधिकारी फक्त शिक्कामोर्तब करीत असतात. त्याच्यापलिकडे काहीही कामे होत नाहीत. हा सर्व आराखडा बघण्याचे काम आणि त्याची मान्यता घेण्याचे काम जिल्हा परिषदेच्या सर्व अधिकारी व पदाधिकाऱ्यांनी केले पाहिजे. ते फक्त शिक्कामोर्तब करण्यासाठी डीपीडीसीमध्ये जात असते कारण ते सर्व अधिकार जिल्हा परिषदेचे असतात. त्या दृष्टीने आपण जितके पैसे दिले तितके खर्च केले पाहिजे. कारण त्यांची मागणी ही १० पटीने असते म्हणून हे पैसे त्यांनी वेळेवर म्हणजे १ वर्षाच्या आत खर्च केले नाही तर सुरुवातीलाच त्यांनी सांगितले पाहिजे की, आमच्याकडे नियोजन होत नाही. १ वर्ष ते पैसे ठेवायचे आणि शेवटी काम होत नाही म्हणून पैसे परत करायचे, हे योग्य नाही, असे मत समितीने व्यक्त केले.

**परिच्छेद क्र. २.१.३.५ - स्वतंत्र रोकडवही न ठेवणे**

**१.८.** स्वतंत्र रोकडवही न ठेवण्याची योजना आता सुरू केली की पूर्वीपासूनच आहे? असा प्रश्न समितीने केला असता, जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर स्वतंत्र रोकडवही ठेवण्याची पद्धत नाही. परंतु विभागाने तसे डायरेक्शन दिले आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

स्वतंत्र रोकडवही ठेवण्याचा सल्ला देण्याचे काय कारण आहे? असा प्रश्न समितीने केला. जेव्हा महालेखापाल कार्यालयाने ते ऑब्जर्व्हेशन दिले होते तेव्हा असे म्हटले होते की, " Due to non-maintenance of separate Cash Book and Bank Account, the actual grant receipt expenditure incurred and balance in each year under the scheme could not be ascertained in different intervals from 2010 to 2015. In the absence of separate Bank Account, interest to be earned under the scheme could not be ascertained " . हे दोन मुद्दे उपस्थित केलेले होते. सेप्रेट असेल तर ते योजनेनुसार आहे त्यामुळे कुठे किती खर्च झाला आहे, कुठे किती आवक आली आहे ते विभागाला माहीत पाहिजे. ते आपण बघु शकत नाही कारण विभागाने ते एकाच जागी मेंटेन केलेले आहे, असे प्रधान महालेखाकार यांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले. हे सर्व जिल्हा स्तरावर, तालुका स्तरावर आहे का ग्रामीण स्तरावर आहे, या संदर्भात विभागीय प्रतिनिधींने विनंती केली असता, हे सर्व जिल्हा आणि तालुका स्तरावर असल्याचे प्रधान महालेखाकार यांनी सांगितले.

विभागाचा अकाऊँट कोड सेप्रेट आहे त्यामुळे तो पूर्ण निधी जिल्हा परिषदेच्या फंडातच जातो, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

हे सेप्रेट करता येणार नाही असे आपण म्हणत आहात पण आपण जे उत्तर दिलेले आहे ते बघा " Instructions are being issued to all ZPs and PSs " . हे दोन्ही आपल्याला कॉन्ट्रॅडक्टी वाटत नाहीत काय? असे प्रधान महालेखाकार यांनी समितीच्या

निदर्शनास आणून दिले असता, सामाजिक न्याय विभागाने अशा सूचना दिलेल्या आहेत की, जेव्हा जिल्हा परिषदेकडे पैसे जातात तेव्हा त्याला जिल्हा परिषद अकाऊँट कोड द्यावा लागत होता आणि त्या कोडप्रमाणे प्रत्येक योजनेनुसार सेप्रेट कॅशबुक ठेवण्याची तरतूद नाही. त्यामुळे त्यांनी यासाठी सुद्धा सेप्रेट कॅशबुक ठेवलेले नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने जर ते अकाऊँट वेगळे केले तर सोपे जाईल, अशी प्रधान महालेखाकार यांनी सूचना केली. पण तसा वित्तिय कोड नाही, असे समितीने निदर्शनास आणले असता, जिल्हा परिषदेच्या कोडमध्ये दुरुस्ती करण्याचा सेप्रेट विषय आहे. पण सध्या तरी तशी एकत्र तरतूद आहे, असे वित्त विभागाच्या सचिवांनी सांगितले.

किती पैसे आले आणि किती पैसे गेले याची सेप्रेट किंवा मॅन्युएली एक नोंदवही करावी. जेणेकरून जेव्हा जेव्हा ऑडिट होईल तेव्हा त्यांना सर्व माहिती मिळू शकेल. सेप्रेट कॅशबुक नसले तरी चालेल पण समाजकल्याण अकाऊँटचे एक सेप्रेट लेजर विभाग तयार करू शकते. जेणेकरून आलेले पैसे क्रेडीट होतील आणि तेच पैसे पंचायत समितीला दिले तर डेबिट होतील, अशी समितीने सूचना केली. सेप्रेट कॅशबुक नाही पण आपण सेप्रेट नोंद करतो. जिल्हा परिषद पातळीवर स्वतंत्र कॅशबुक नसले तरी नमुना नं. २१ मध्ये खर्चाच्या नोंदवह्या असतात. दलित वस्ती सुधार योजनेच्या खर्चाचे वेगळे लेजर मेंटेन केले आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

डेबीट आणि क्रेडिट या दोन्ही बाजूची सांगड समितीला दिसली पाहिजे. त्या माध्यमातून किती निधी प्राप्त झाला, त्यापैकी किती निधी शिल्लक आहे, किती निधी खर्च झाला व किती निधीचे वाटप केले आहे? यासंबंधी लेजर वेगळे ठेवावे व एक अकाऊंट ठेवावे. विभागाने त्यानुसार निदेश द्यावेत, अशी समितीने सूचना केली.

**परिच्छेद क्रमांक २.१.४.१ – कामांच्या निष्पादनात विलंब**

**१.९.** १०९४ कामे विलंबाने झाल्याची माहिती विभागाने प्रपत्र क्र.४ मध्ये दिली आहे. सदर कामे १ ते ३ वर्षांपर्यंत विलंबाने केलेली आहेत, या संदर्भात माहिती द्यावी अशी समितीने सूचना केली असता, महालेखापाल कार्यालय विभागामधून जेव्हा आकडेवारी घेतो तेव्हा वेगळी आकडेवारी दिली जाते. आता समितीसमोर विभाग वेगळी आकडेवारी देत आहे. विभागाला रिकन्सीलिएशन करण्यासाठी वेळ का लागतो? आकडेवारी जुळली पाहिजे त्यात बदल होता कामा नये. महालेखापाल कार्यालय ऑडिट पॅरा देतो तेव्हा याबाबतची तपासणी केली नव्हती का? ही सर्व माहिती सचिव स्तरावर गेल्यानंतर आपण येथे चर्चा करीत असतो, असे उप महालेखापाल यांनी समितीच्या निदर्शनास आणले.

यासंबंधी जिल्ह्याकडून प्राप्त झालेली माहिती जमा केली असून त्यात आकडेवारी बदललेली आहे. पूर्वीच्या माहितीमध्ये त्यांनी सुधारणा केल्यामुळे आकडेवारीत बदल झाला आहे. तसेच कामे करण्यामध्ये विलंब झाला आहे ही वस्तुस्थिती आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

महालेखाकार कार्यालय व विभागाची आकडेवारी यात तफावत येण्याचे मूळ कारण असे आहे की, एजी कार्यालयाकडे सन २०१४-१५ पर्यंत आणि विभागाकडे सन २०१६-१७ पर्यंतची आकडेवारी आहे. मध्यंतरीच्या काळात ११८३ ची आकडेवारी कमी होऊन ती १०९४ पर्यंत आली आहे. ५ वर्षांची आकडेवारी ११८३ इतकी होती त्यानंतर ७ वर्षांची आकडेवारी १०९४ इतकी आली आहे. सर्व कामांना १ ते ३ वर्षांपर्यंत विलंब झाल्यामुळे यावर आळा बसविण्यासाठी विभाग कोणती कारवाई करीत आहे? असा प्रश्न समितीने केला असता, शासन निर्णयानुसार काम सुरू केल्यानंतर त्यांनी ते एक वर्षात पूर्ण केले पाहिजे. त्यांना त्यासंबंधी एक + एक वर्षे निधी वापरण्याची तरतूद आहे. तसेच एक वर्षामध्ये ग्रामपंचायतीने कामे पूर्ण न केल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्याविरुद्ध कारवाई केली पाहिजे, अशी तरतूद असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

५४२ कामे विलंबाने पूर्ण झाली असून ५५२ कामे पूर्ण झालेली नाहीत. २०१६-१७ ची कामे असल्यास सन २०१७-१८ पर्यंत करावयास पाहिजे होती. परंतु तसे न झाल्यामुळे ५५२ कामे रद्द करून त्यासंबंधीचा निधी परत घेतला पाहिजे, अशी सूचना समितीने केली असता, नाशिक जिल्ह्यात सन २०१५-१६ मधील १३१ कामे आणि सन २०१६-१७ मधील ६२५ कामे अपूर्ण आहेत. नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेत त्यांचे पैसे अडकलेले असल्यामुळे त्यांना अडचणी येत आहेत.

नाशिक जिल्ह्यात जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या अडचणीमुळे सन २०१५-१६ मधील ५५ सन २०१६-१७ मधील ३४६ कामे अपूर्ण आहेत. २ महिन्यांपासून याबाबत सातत्याने पाठपुरावा घेत आहोत. आता एनडीसीसी बँकेतून बऱ्यापैकी निधी रिलिज होत आहे. अपूर्ण कामे एक ते दीड महिन्यांत पूर्ण होतील, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

विभागाने सादर केलेल्या यादीनुसार ६२५ पैकी ३४१ कामे पूर्ण झालेली आहेत. बाकीच्या कामांची सद्यःस्थिती काय आहे? अशी समितीने विचारणा केली असता, ती कामे प्रगतीपथावर आहेत. एनडीसीसी बँकेच्या अडचणीमुळे ग्रामपंचायतींना निधी मिळत नव्हता. दीड ते दोन महिन्यांपासून सातत्याने पाठपुरावा करून बँकेतून बऱ्यापैकी निधी रिलीज करून घेतला आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

समितीने विभागाला सन २०१०-११ ते २०१३-१४ पर्यंत माहिती विचारली आहे. परंतु विभागाने २०१६-१७ पर्यंत आकडेवारी दिली आहे. ११८३ पैकी किती कामे पूर्ण झाली आहेत? तसेच ती कामे करीत असताना किती विलंब झाला हा मूळ आक्षेप आहे, असे उप महालेखापाल यांनी प्रश्न केला असता, सन २०१४-१५ मधील सर्व कामे पूर्ण झाली आहेत. त्याकरिता एक ते दीड वर्ष लागला होता. सन २०१४-१५ मधील अपूर्ण असलेली कामे त्याच वर्षी भौतिक दृष्ट्या पूर्ण झाली होती, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

११८३ पैकी किती कामे पूर्ण झाली आहेत याबाबत विभागाने महालेखापाल कार्यालयास कागदोपत्री माहिती द्यावी, अशी सूचना उप महालेखापाल यांनी केली असता विभागीय प्रतिनिधींनी होकारार्थी उत्तर दिले.

विभागाने अपूर्ण असलेली कामे दोन महिन्यांत पूर्ण करणार असल्याबाबत समितीला सांगितले आहे, असा प्रश्न समितीने केला असता, सन २०१४-१५ मधील सर्व कामे पूर्ण झाली आहेत. तसेच अपूर्ण कामांची दर्शविलेली आकडेवारी होती. ती कामे पूर्ण केलेली असून त्यांचे फोटो व सीसी उपलब्ध आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

अकोला जिल्ह्यामध्ये सन २०१६-१७ मध्ये २७३ कामे मंजूर होती. त्यापैकी एक सुद्धा काम केलेले नाही. त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे? अशी समितीने विचारणा केली असता, त्या कामांना विलंबाने मंजुरी मिळाली होती. त्यामुळे ती कामे यावर्षी पूर्ण करणार आहोत. तसेच सर्व कामे ३ लाख रुपयांपेक्षा जास्त रकमेची असल्यामुळे त्यांचे ई-टेंडर झालेले आहे. त्यामुळे देखील विलंब झाला आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

ज्यावर्षी निधी दिला जातो त्याच आर्थिक वर्षात त्या निधीच्या उपलब्धतेनुसार पुढील एक वर्षात कामे करून घेतली पाहिजेत. यासंबंधी विभाग गाईड लाईन्स बंधनकारक करीत नाहीत तोपर्यंत हे प्रकार सुरू राहतील, असे समितीने मत व्यक्त केले असता, जीआरमध्ये नमूद केले आहे की, काम सुरू झाल्यापासून ते एक वर्षात पूर्ण केले पाहिजे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

काम मंजूर करण्यासाठी विलंब होत असल्यामुळे त्याकरिता एक मर्यादा ठेवावी. मंजुरीला विलंब होत असल्यामुळे कामे पूर्ण करण्यासाठी विलंब होत असल्याची कारणे समितीला सांगितली जातात. यापुढे असे घडता कामा नये. तसेच आर्थिक वर्षात निधी खर्च करण्याचे बंधन नसले तरी सुद्धा त्याच आर्थिक वर्षी कामे मंजूर करण्याचे बंधन पाळले पाहिजे. अन्यथा अशा प्रकारची कारणे वारंवार सांगितली जातील व कामे पूर्ण होणार नाहीत, असे समितीने मत व्यक्त केले.

**परिच्छेद क्रमांक २.१.४.२ – निवडलेल्या ग्रामपंचायती विषयी लेखापरीक्षा निरीक्षणे**

**१.१०.** या परिच्छेदासंदर्भात माहिती देण्यात यावी अशी समितीने सूचना केली असता, प्रपत्र-८ जुन्या पूर्ततेच्या माहितीमध्ये आहे. एजी यांनी असे रिमार्क दिले होते की, ८ जिल्ह्यांची माहिती सादर करावी. त्यानुसार ८ जिल्ह्यांनी मुद्देनिहाय माहिती सादर केली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

रत्नागिरी जिल्ह्याच्या अनुपालन अहवालामध्ये जनगणनेनुसार प्रत्यक्ष लोकसंख्या दर्शविली असल्याचे नमूद केले आहे. औरंगाबाद जिल्ह्यात बृहत आराखड्यात लोकसंख्या नमूद केली आहे. नाशिक जिल्ह्यामध्ये जनगणनेपेक्षा जास्त लोकसंख्या दर्शविलेली नाही, असे समितीने निदर्शनास आणले असता, बृहत आराखड्यामध्ये २०११ ची लोकसंख्या नमूद केली आहे. प्रत्यक्ष लोकसंख्या नमूद केलेली नाही, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

८० पैकी ७४ ग्रामपंचायतीमध्ये प्रत्यक्ष लोकसंख्या दर्शविली आहे. परंतु ६ ग्रामपंचायतीमध्ये प्रत्यक्ष लोकसंख्या दर्शविलेली नाही. या संदर्भात एक नियम पाळला पाहिजे. यासंबंधी विभागाने प्रॉपर डायरेक्शन दिल्या पाहिजेत. एका जिल्ह्यात सोयीसाठी वेगळे नियमांचे पालन केले जात आहे ही बाब योग्य नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, २०११ च्या जीआरमध्ये यासंबंधी क्लिअर डायरेक्शन दिलेल्या आहेत. त्यात असे नमूद केले आहे की, सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या गृहीत धरल्यास अनेक जणांवर अन्याय होतो, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सर्व ग्रामपंचायतीमध्ये एकच नियम पाळला पाहिजे. परंतु विभागाने यासंबंधी दोन नियमांचा वापर केला आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, प्रत्यक्ष लोकसंख्येसंबंधी नियम आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परंतु काही ग्रामपंचायतीमध्ये जनगणनेनुसार लोकसंख्या दर्शविलेली आहे. ८० ग्रामपंचायतीचे तयार केलेल्या बृहत आराखड्यांचे स्वरुप सारखे नव्हते. ठाणे जिल्ह्यात कल्याण व शहापूरमध्ये बृहत आराखडे समान नसल्याची बाब आपण मान्य केली आहे. औरंगाबादमध्ये विहित प्रमाण ठरवून दिलेले नाही. तसेच बीड जिल्ह्याची माहिती देण्यात आली नाही. अकोल्याची माहिती दिलेली नाही. तसेच चंद्रपूरने आराखडा

तयार केलेला नाही, असे समितीने मत व्यक्त केले असता, ही कार्यवाही सन २०११ नंतर केलेली आहे. २०११ पूर्वी जनगणनेनुसार लोकसंख्या नमूद केली पाहिजे अशा प्रकारच्या डायरेक्शन होत्या. तत्कालीन अधिकाऱ्यांनी सूचना दिल्यानंतर सुद्धा आराखडा तयार केला नव्हता. त्यामुळे संबंधित तत्कालीन अधिकाऱ्यांना आयुक्त स्तरावरुन नोटीस देण्यात आली. त्यानंतर त्यांच्याकडून दिनांक १९ सप्टेंबर २०१८ रोजी प्राप्त झालेला खुलासा तपासून आयुक्त यांच्याकडे पाठवित आहोत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सन २००८-०९ ते २०१२-१३ या काळात एकच अधिकारी कार्यरत होते का? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी होकारार्थी उत्तर दिले तसेच चंद्रपूरला सन २००८-०९ ते सन २०१२-१३ पर्यंत आराखडे तयार केलेले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. यासंबंधी विभागाने आताच त्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन कारवाई सुरू केली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

चंद्रपूरला सन २००८-०९ ते सन २०१२-१३ पर्यंत आराखडे तयार केलेले नाहीत. याकरिता विभागाने त्यांना २०१८ मध्ये कारणे दाखवा नोटीस देऊन कारवाई सुरू केली आहे. अशी परिस्थिती राहिल्यास सदर प्रकरणी संबंधितांविरुद्ध लवकर कारवाई होणार नाही. २१ ग्रामपंचायतींमध्ये बृहत आराखड्याच्या बाहेर ३४ कामे केली. त्यामध्ये औरंगाबादचा नंबर १ आहे. याकरिता काय कारवाई केली? अशी समितीने विचारणा केली असता, त्यामध्ये दोन ठिकाणी नाल्यांची कामे होती. अनुज्ञेय कामामध्ये रस्ता काम आहे. त्या रस्त्याला जोडून आपण नाला करतो. एका ग्रामपंचायतीमध्ये समाजमंदिराचे काम आराखड्यामध्ये नव्हते परंतु, त्यांनी ते घेतले होते. ते अनुज्ञेय आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ते अनुज्ञेय आहे असे समितीला सांगू नये. नाली, रस्ता, समाज भवन, स्वच्छता, पाणीपुरवठा अशी सर्वच कामे अनुज्ञेय आहेत. कामे अनुज्ञेय असणे ही वेगळी गोष्ट आहे. ही कामे बृहत आराखड्यामध्ये नव्हती, हे विभागाला मान्य आहे काय? असा प्रश्न समितीने केला असता विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली.

जर ती कामे बृहत आराखड्यामध्ये नव्हती तर त्याकरिता कोणती कारवाई केली? ए.जीं.चा जेव्हा असा परिच्छेद येतो की, बृहत आराखड्यामध्ये मान्य कामे घेतली पाहिजेत. जेवढी कामे अनुज्ञेय असतील ती घेता येत असतील तर आराखडा तयार करण्याची गरजच काय? आराखड्यामध्ये असे असते की, अमुक ठिकाणी पाण्याची लाईन पाहिजे, अमुक ठिकाणी शौचालय पाहिजे, अमुक ठिकाणी रस्ता पाहिजे, अमुक ठिकाणी नाला पाहिजे, याकरिता आराखडा तयार केला जातो. तो आराखडा प्रथम दुरुस्त करावा व आराखड्याच्या दुरुस्तीला मान्यता घ्यावी नंतर ते काम मान्य करावे. आराखडा तयार केला तर त्याचे पालन करावेच लागेल. ग्रामपंचायत विभागाला नंतर काही ठराव करून देईल ती प्रत्येक गोष्ट विभाग ॲड करत जाणार काय? त्या आराखड्यानुसार निधी असतो. ग्रामपंचायत अजून काही तरी ॲडिशनल ठराव करून आम्हाला हे पाहिजे, ते पाहिजे असे सांगते. ते विभाग करून देणार काय? आराखडा यासाठीच केला जातो, त्या आराखड्यानुसार निधीची मागणी करतो. याबाबत अकोल्याचा रिप्लाय असा आहे की, 'संबंधितांना सूचना देऊन विलंब होणार नाही ....' याचा अर्थ काय, आराखड्याच्या बाहेर तुम्ही किती कामे केली? अशी विचारणा समितीने केली असता, जी कामे घेतली ती ग्रामसभेच्या ठरावानेच घेतली. आराखड्याच्या बाहेर एकही काम केले नाही. फक्त ऑडिटमध्ये ज्या नोट्स आल्या त्या त्यांना कळविल्या, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ऑडिटमध्ये काय आक्षेप आले? अशी समितीने विचारणा केली असता, उपरोक्त जिल्ह्यातील ग्राम पंचायती विषयी दुसऱ्यांना ज्या सूचना आल्या त्या आम्ही त्यांना त्यावेळेस पुटअप करून दिल्या, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

अकोला येथे विभाग आराखड्याच्या बाहेर काम केले आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाचा कृति आराखडा सारखाच होता. अकोला येथे ग्राम पंचायतीने आराखड्यामध्ये जी कामे अगोदरच नमूद केली होती, तीच कामे समितीने मंजूर केली आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

फक्त औरंगाबादने असे कबूल केले आहे की, आराखड्याच्या बाहेरची अशी-अशी कामे घेतली आहेत. बाकी सर्वांनी असे सांगितले आहे की, कामे बृहत आराखड्यामध्ये समाविष्ट आहेत मग महालेखापालांनी या ८ ग्राम पंचायतीबाबत आक्षेप का काढले आहे? या ८ ग्राम पंचायती कोणत्या आहेत, २१ ग्राम पंचायती कोणत्या जिल्ह्यामध्ये आहेत? लातूर येथे २ लक्ष ९५ हजारचे काम हे आराखड्याच्या बाहेरचे केले आहे. १३६ वस्तीतील २०२ कामांचे मंजूर पैसे आपण पंचायत समितीला विलंबाने दिले. नाशिकचे लोक असे म्हणतात की, पैसे आलेच नाहीत. औरंगाबादचे लोक म्हणतात की माहितीच उपलब्ध झाली नाही. हे कसे काय शक्य आहे? अशी विचारणा समितीने केली असता, औरंगाबाद जिल्ह्याची माहिती दिलेली आहे. कुठेही विलंब झालेला नाही. विभागाकडे चार्ट आहे. १० ग्राम पंचायतींना निधी कधी दिलेला आहे त्याचे प्रपत्रही विभागाकडे आहे. एकाही ग्राम पंचायतीला विलंब झालेला नाही, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

अकोला जिल्ह्याने प्रत्येक गोष्टीला एकच साचेबद्ध उत्तर दिलेले आहे की, संबंधितांना सूचना देऊन विलंब होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. मागच्या व या परिच्छेदालाही तेच उत्तर आहे. ज्या जिल्ह्यातील ग्राम पंचायतींची अडचण आहे त्यांनीच उत्तर दिले पाहिजे.

१३६ वस्त्या कोणकोणत्या जिल्ह्यातील आहेत? त्यामध्ये ठाणे, रत्नागिरी, नाशिक, औरंगाबाद, बीड, लातूर, चंद्रपूर अकोल्याचे काही आहे काय? मागच्या परिच्छेदामध्येही तीच अडचण आहे. सर्वच जिल्हे असे सांगत आहेत की, आमचे तसे काही नाहीच आहे. विलंब झालेलाच नाही. पुढच्या बैठकीमध्ये समिती या १३६ वस्त्यांची यादी घेणार आहे व सांगणार की, कोणत्या जिल्ह्यामध्ये इतका विलंब आहे. विभागाने १२ जिल्ह्यांतील २१ ग्राम पंचायतीतील ३१ गावांची यादी द्यावी. १३६ वस्त्यांची यादी द्यावी. ज्यांचे ज्यांचे असेल त्यांनी समितीला उत्तर द्यावे नसेल तर पुढच्या वेळेस ज्यांची कमतरता असेल त्यांच्यावर कारवाई करण्याची शिफारस करावी लागेल. २०२ कामांपैकी १७० कामे मंजूर झाली. १५७ कामे पूर्ण करण्यात आली. १२ कामे अपूर्ण राहिली व १ काम रद्द करण्यात आले. त्यापैकी ११ कामे १ ते २ वर्षाच्या विलंबाने पूर्ण करण्यात आली. त्यामध्ये औरंगाबादचा रिप्लायच आलेला नाही. प्रत्येक गोष्टीमध्ये औरंगाबाद खूप पुढे आहे, असे समितीने मत व्यक्त केले. औरंगाबाद जिल्ह्याचा रिपोर्ट दिलेला आहे. औरंगाबाद विभागाचा असू शकेल कदाचित, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

कमिशनरच्या उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, सदर कामे विलंबाने पूर्ण झालेली असल्याने पंचायत समिती स्तरावरुन खुलासा प्राप्त झालेला नाही. अकोला जिल्ह्याची माहिती दिलीच नाही. चंद्रपूरने जिल्ह्याबाबत सांगितले आहे की, ५५ कामे विलंबाने पूर्ण झालेली आहेत कारण शासनाकडून वेळेवर निधी मिळाला नाही. दुसरा मुद्दा असा आहे की, ग्राम पंचायतीकडून प्रस्ताव मिळाला नाही. पंचायत समितीकडून अंदाजपत्रक मंजूर झाले नाही, जागेचा वाद असे सर्व साचेबद्ध उत्तरे आहेत. असे सर्व सांगून ५५ कामे विलंबाने झाल्याचे नमूद केले आहे. चंद्रपूरचे काय म्हणणे आहे? अशी समितीने विचारणा केली असता, ५५ कामे विलंबाने पूर्ण झालेली आहेत, ही वस्तुस्थिती आहे. चंद्रपूर जिल्ह्यात सन २०१३-२०१४ पर्यंत एकूण १०२० कामे मंजूर होती. त्यातील १००४ कामे पूर्ण झालेली आहेत. सन २०१३-२०१४ पर्यंतची १६ कामे अपूर्ण आहेत. जी विलंबाने पूर्ण झालेली आहेत त्यामध्ये काही मान्यता उशिरा होणे, काही ग्राम पंचायतींची कामे उशिरा सुरू करणे, काही निधी उशिरा मेजरमेंट होणे अशी जनरल कारणे आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

कामे उशिरा सुरू करणे, मेझरमेंट उशिरा घेणे हा प्रशासकीय विलंब आहे. ज्या कॉंट्रॅक्टरने काम उशिरा सुरू केले असेल त्याच्यावर कारवाई करावी. त्यांनी मेझरमेंट उशिरा का घेतले? अशी समितीने विचारणा केली असता, मेझरमेंट शाखा अभियंता घेतात. कामाच्या वर्कलोडमुळे आहे. यामध्ये कुठे मेजर अनियमितता नाही. विलंब झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

रत्नागिरी येथे पथ दिवे बंद आहेत कारण खूप वेळ झाला, असे विभागाने नमूद केले आहे. चंद्रपूरमध्ये ग्राम पंचायत देखभाल दुरुस्ती करतच नाही. पथ दिवे जेव्हा मंजूर करता तेव्हा देखभाल दुरुस्तीची मान्यता घेता काय? अशी समितीने विचारणा केली असता, पथ दिव्यांबाबत राज्य शासन स्तरावर आदेश झालेला होता. दिनांक ३० जानेवारी २०१४ रोजी दलित वस्तीमध्ये सौर पथ दिवे लावण्याबाबतचा निर्णय झाला. या शासन निर्णयामध्ये या सौर पथ दिव्यांचा पुरवठा निश्चित करणे, पुरवठादारांमध्ये विभाजन करणे व पथ दिव्यांच्या इन्स्टॉलेशनचा उल्लेख होता. मात्र त्यांच्या देखभाल दुरुस्तीच्या संदर्भात काही उल्लेख नाही. सामान्यता जेव्हा आपण ग्राम पंचायतीमध्ये कुठल्याही पायाभूत सुविधा निर्माण करतो तेव्हा त्याच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी ही त्या ग्राम पंचायतीची असते. पथ दिवे ज्या ग्राम पंचायतीमध्ये बसविले गेले, त्या ग्राम पंचायतीने त्यांची देखभाल दुरुस्ती केली पाहिजे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सौरपथदिव्यांची देखभाल दुरुस्ती ग्राम पंचायत करू शकत नाही. सौर पथ दिवे खराब झाले तर ग्राम पंचायतींना त्याचा देखभाल दुरुस्ती खर्च परवडणारा नाही. त्याचा साधा सेलही त्यावेळेस खूप महाग होता आता तो स्वस्त झाला असेल. परंतु, ग्राम पंचायतीला त्यांची देखभाल दुरुस्ती परवडणारी नाही. साधे एल.ई.डी. बल्बवाले पथ दिवे आता स्वस्त झाले म्हणून ठीक आहे. परंतु, ग्राम पंचायत पूर्वी ते देखील बदलू शकत नव्हते. सौर दिव्यांचे पॅनेल गेले तर ग्राम पंचायत काय करणार? ते पॅनेल महाग आहे. त्यामुळे या सौर पथ दिव्यांच्या दुरुस्तीची वेगळी तरतूद केली पाहिजे, असे मत समितीने व्यक्त केले असता, या योजनेचा उद्देश चांगला होता. कारण ग्रामीण भागात विजेचा सुरळीत पुरवठा होत नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

योजना चांगली आहे हे बरोबर आहे. मात्र हा दुरुस्तीचा प्रश्न आहे. दुरुस्तीची जबाबदारी ग्राम पंचायतींवर टाकून चालणार नाही. नाही तर मग सौर पथ दिव्यांच्या दुरुस्तीकरिता वेगळा निधी द्यावा. कारण ग्राम पंचायत त्यांची देखभाल करू शकणार नाही, अशी सूचना समितीने केली असता, जेवढा वॉरंटी पिरियड आहे त्यामध्ये सप्लायर करेल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

वॉरंटी पिरियड नंतरची अडचण आहे, असा प्रश्न समितीने केला असता, ग्राम पंचायतीने ते काम केले पाहिजे होते. परंतु, दुर्दैवाने ग्राम पंचायतींनी लक्ष दिले नाही.

सन २०१३-२०१४ ते सन २०१६-२०१७ अशा ४ वर्षांसाठी ही योजना होती. मात्र फक्त एकच वर्ष ती योजना राबविली. नंतर तो शासन निर्णयच रद्द करण्यात आला. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

काही काही जिल्ह्यात पथ दिवे लावलेच नाहीत, त्याचे कारण काय आहे? तसेच, ५३ ठिकाणी कामाचे फोटो न घेतल्याचे कारण विभागाने फोटोग्राफर नव्हता असे सांगितलेले आहे, याबाबत सांगावे, अशी सूचना समितीने केली असता, ठाणे, बीड येथे लावलेले नाहीत. ५३ ठिकाण हे ठाण्यातील शहापूर तालुक्यातील आहे. विभाग ३ वेळा फोटो काढतो. शासन निर्णयामध्ये असे नमूद आहे की, काम सुरू करण्याच्या अगोदर व काम पूर्ण झाल्यानंतर फोटो काढायचा. शेवटी १० टक्के निधी द्यायचा असेल तर, विभागाच्या जिल्हा पातळीवरुन समाजकल्याणचा जो विस्तार अधिकारी जातो त्याने फोटो काढल्यानंतर १० टक्के निधी दिला जातो. शहापूर येथे काम सुरू व काम पूर्ण करण्याच्या वेळेस फोटो काढण्यामध्ये अडचण आली. तो दुर्गम भाग आहे. हे खरे आहे की, त्यावेळेस काही काही ठिकाणी फोटोग्राफर उपलब्ध झाले नाहीत. परंतु, कल्याणमध्ये १०० टक्के आहे. ते काम ज्यावेळेस १० टक्के कम्प्लीट झाले, त्याचे फोटो आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

रत्नागिरी बाबत असे नमूद केले आहे की, कामाची माहिती दर्शविणाऱ्या फलकाचा फोटो घेतो. परंतु, विभागाला काम करण्यापूर्वीचा व काम केल्यानंतरचा जागेचा फोटो पाहिजे. त्यांनी असे नमूद केले आहे की, १० टक्के अनुदान वितरित करण्यापूर्वी कामाची माहिती दर्शविणाऱ्या फलकाचा फोटो घेतला जातो. असा फोटो तर घरात बसूनही घेता येईल. हा रिप्लाय प्रॉपर आहे काय? कामाच्या जागेवर लावलेल्या फलकाचा फोटो समितीला नको आहे. समितीला त्या जागेचा काम करण्यापूर्वीचा व काम केल्यानंतरचा फोटो पाहिजे, अशी सूचना समितीने केली असता, कामाचे बोर्ड कामाच्या जागेवर लावण्यात आले आहे, असे म्हटलेले आहे, १० टक्के अनुदान वितरित करण्यापूर्वी कामाची माहिती दर्शविणाऱ्या फलकाचा मूळ फोटो घेतला जातो असे उत्तर आहे, म्हणजे त्या जागेवर ते फलक लावले जातात व शेवटचा हप्ता दिला जातो, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

डिस्ट्रिक्ट सोशल वेलफेअर ऑफिसरने १०० टक्के काम पाहिले पाहिजे. आता विभागाने सन २०१८ मध्ये शासन निर्णयामध्ये दुरुस्ती केली आहे. परंतु, पूर्वी त्यांनी नियमाचे पालन केले नाही. विभागाने समितीला जो चार्ट दिलेला आहे तो ५० टक्के निरीक्षण झालेला आहे. विभागाने त्यावेळेच्या नियमाप्रमाणे त्यांची अंमलबजावणी केली नाही. परंतु, आता काढलेला शासन निर्णय प्रॅक्टिकल आहे. डिस्ट्रिक्ट सोशल वेलफेअर ऑफिसर १०० टक्के इन्सेपक्शन करू शकत नाही हे समितीला मान्यच आहे. आता जो शासन निर्णय काढला आहे, त्याला राज्य स्तरीय, विभागीय स्तरावर व संचालक स्तरावर करावे, अशी सूचना समितीने केली.

**परिच्छेद क्रमांक २.१.४.३ – राज्य सार्वजनिक बांधकाम विभागाला योजनेंतर्गत कामांच्या निष्पादनासाठी अनुदानाचे नियमबाह्य वाटप करण्यात आले.**

**१.११.** सार्वजनिक बांधकाम विभागाने ३०९.६८ कोटी रुपये दिले असून, सद्यःस्थितीत किती रुपये खर्च झाले आहेत आणि किती रुपये शिल्लक आहेत? विभागाने समितीला ८ जिल्ह्यांची माहिती दिली असून, त्यामध्ये १३० कामे अपूर्ण असल्याचे म्हटले आहे. यामध्ये आता काही बदल झालेला आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, सद्यःस्थितीत ३८ कामे अपूर्ण आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीला जिल्हानिहाय माहिती द्यावी असे समितीने निदेश दिले असता, ठाणे जिल्ह्यात १६३ कामे मंजूर होती. ठाणे जिल्ह्यात ३ विभाग आहेत. त्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक (१), सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक (२) आणि सार्वजनिक बांधकाम जव्हार विभाग आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक (१) मध्ये ९३ कामे, सार्वजनिक बांधकाम विभागगक्रमांक (२) मध्ये ५४ कामे आणि जव्हार विभागात १६ आहेत. अशा प्रकारे एकूण ठाणे जिल्ह्यात १६३ कामे मंजूर आहेत आणि त्यापैकी ११२ कामे पूर्ण झालेली आहेत. ५१ कामे रद्द केलेली आहेत. जागेअभावी २० कामे, दलित वस्ती नसल्यामुळे १८ कामे, अन्य योजनेतून कामे झाल्यामुळे ४ कामे आणि इतर कारणास्तव ९ कामे रद्द झाली आहेत असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

या ठिकाणी प्रधान महालेखाकारांचे आक्षेप होते. जिल्हा परिषदेचा ॲक्ट आहे. त्यानुसार निधी सार्वजनिक बांधकाम विभागाला देणे नियमबाह्य होते. हा निधी का दिला? अशी समितीने विचारणा केली असता, त्यावेळी राज्यस्तरावर निर्णय घेण्यात आला होता असे विभागीय सचिवांनी सांगितले.

शासनाने राज्यस्तरावर निर्णय घेतलेला आहे. त्यावेळी सचिवांनी नियमाप्रमाणे नाही म्हणून असा निर्णय घेतला होता काय? राज्यस्तर म्हणजे राज्याची व्याख्या काय आहे? यासंदर्भातील मूळ नस्ती समितीच्या अवलोकनार्थ सादर करावी. सदर नस्तीमध्ये विभागाने काय म्हटले आहे, ते समजून येण्यास मदत होणार आहे अशी सूचना समितीने केली असता सचिव स्तरावर विरोध झालेला नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाला आज तरी प्रधान महालेखाकारांचे म्हणणे खरे वाटते काय? सचिवांनी कर्तव्याचे पालन केले आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, सदरहू योजना जिल्हा परिषदेला देण्यात आली होती. त्या अनुषंगाने मुलतः नवीन योजना तयार करायला हवी होती असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने आपले कर्तव्य पार पाडले नाही. ३०९ कोटी रुपये दिले आता नवीन योजनेखाली निधी दिला जाणार आहे. विभाग आराखड्याच्या बाहेर जाऊन काही करणार आहे काय? असा प्रश्न समितीने केला असता, नवीन योजनेमध्ये आराखड्याचा कोणताही संबंध नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

दलित वस्तीमध्ये देता येईल काय? २० लाख रुपयांची मर्यादा असेल तर २२ लाख रुपये करता येईल काय? नवीन योजना कोणती आहे? नवीन योजनेमध्ये दलित वस्तीची अट आहे की नाही? असा प्रश्न समितीने केला असता, नवीन योजनेमध्ये लोकप्रतिनिधी म्हणून केवळ विद्यमान खासदार व आमदार यांच्याच प्रस्तावांचा विचार होईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याचा अर्थ यामध्ये फक्त विद्यमान खासदार व आमदार यांच्याच प्रस्तावांचा विचार होईल असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी होकारार्थी उत्तर दिले.

इतर लोकप्रतिनिधी, जिल्हा परिषद सदस्य, सभापती यांनी प्रस्ताव दिला तर ते होणार नाही काय? असा प्रश्न समितीने केला असता विभागीय सचिवांनी नकारार्थी उत्तर देत यामध्ये पूर्वीसारखीच पाणी पुरवठा, मलनिःसारण, पोहोच रस्ते, अंतर्गत रस्ते अशीच कामे अंतर्भूत केली आहेत. तसेच, सुलभ शौचालय, ग्रंथालय, अभ्यासिका, व्यायामशाळा व स्थानिक लोकांच्या गरजा लक्षात घेऊन इतर काही नवीन कामेही यामध्ये ॲड केली आहेत असे समितीस अवगत केले.

ही टोटली ओपन दिसत आहेत. तो शासन निर्णय सर्व सन्माननीय समिती सदस्यांना द्यावा ती योजना कार्यान्वित झाली काय? अशी विचारणा समितीने केली असता, ती योजना कार्यान्वित झाली असून या वर्षी १०० कोटी रुपये मिळालेले आहेत. १०० कोटी रुपयांचे प्लानिंग झालेले आहे. कामांची मंजुरी ही मंत्री महोदय स्तरावर प्रलंबित आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सर्वांची मंजुरी एकदम देणार का? असा प्रश्न समितीने केला असता, सर्व जिल्ह्यांची मंजुरी एकत्रच देणार असे विभागीय सचिवांनी सांगितले.

३०९ कोटी रुपये देण्यात आले. विभागाने सांगितले की, काही कामे मंजूर केली, काही कामे रद्द केली तर काही कामे झाली नाहीत. आज रोजी ८ जिल्ह्यातील या ३०९ कोटी रुपयांतील किती कामे शिल्लक आहेत? अशी विचारणा समितीने केली असता, एकूण ८ जिल्ह्यातील ३८ कामे अपूर्ण आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीला जिल्हानिहाय यादी देऊ शकता काय? अशी समितीने विचारणा केली असता, ठाणे जिल्ह्यामध्ये एकही काम शिल्लक नाही. रत्नागिरीमध्ये ७ कामे शिल्लक आहेत. नाशिकमध्ये अपूर्ण कामे शून्य आहेत. औरंगाबादमध्ये अपूर्ण कामे ६ आहेत असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

विभागाने दिलेल्या माहितीमध्ये औरंगाबादमध्ये अपूर्ण कामे शून्य असल्याचे नमूद केले आहे. आता ही ६ कामे कुठून आली? असा प्रश्न समितीने केला असता, औरंगाबादमध्ये दोन डिव्हिजन आहेत. त्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग, पश्चिम औरंगाबाद यांचे शून्य काम शिल्लक आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांची ६ कामे अपूर्ण आहेत. बीडमध्ये ११ कामे शिल्लक आहेत. लातूरमध्ये १४ कामे शिल्लक आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हे कोणत्या वर्षातील आहे, याबाबतची आज रोजीची परिस्थिती काय आहे? सन २०१३-२०१४ मधील ही कामे आता ५ वर्षे होत आली तरी अपूर्ण आहेत. ही कामे आजही अपूर्ण आहेत काय? अशी समितीने विचारणा केली असता, ही आजचीच परिस्थिती आहे. यातील बरीचशी कामे जागेअभावी अपूर्ण आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आपण अगोदर प्लान तयार करतो, नंतर तांत्रिक मान्यता घेतो मग मंजुरी देतो. हे सर्व काम घेण्यापूर्वी अधिकाऱ्यांनी पाहिले नव्हते काय, ही कोणाची चूक आहे? कारण नसताना शासनाचा पैसा अडकून पडला. ते पैसे दुसऱ्या कामांवर खर्च झाले असते. आज ४ वर्षांनंतरही विभाग हेच सांगत आहे ती कामे अपूर्ण आहे. मग ती कामे आतापर्यंत ४ वर्षांमध्ये रद्द केली पाहिजे होती. ती रद्द का केली नाहीत? जागा नाही, ती आज नाही, काल नव्हती व उद्याही उपलब्ध होणार नाही मग काम रद्द केले पाहिजे होते. अकोला येथील कामांबाबत सांगावे अशी सूचना समितीने केली असता, अकोला येथे अपूर्ण कामांची संख्या शून्य आहे. तसेच, चंद्रपूर येथील अपूर्ण कामेही शून्य आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीला पूर्ण राज्यातील एकूण परिस्थिती सांगावी. विभागाने ३०९ कोटी रुपये दिले. त्यापैकी किती कामे मंजूर झाली, किती कामे रद्द झाली, किती कामे प्रगतीपथावर आहेत, ही सर्व कामे यावर्षी दिनांक ३१ मार्च २०१९ पर्यंत संपली तर ठीक आहे नाही तर ही सर्व कामे रद्द

करावीत काम कधी सुरू केले व कधी संपले याचीही माहिती समितीला द्यावी. असे समितीने निदेश दिले तसेच ३०९ कोटी रुपयांच्या कामापैकी किती रुपयांचे काम झाले, किती रुपयांचे काम होणार नाही हे सांगावे. तसेच, दिनांक ३१ मार्च, २०१९ नंतर सर्व पैसे विथ्ड्रॉ करावेत व सर्व कामे रद्द करावीत. जेथे जागा नाही त्यांनी पर्यायी जागा शोधली पाहिजे नाही तर काम रद्द करावे. तसेच, समितीला ॲज ऑन टुडेचा स्टेटसची माहिती विभाग किती दिवसांत देणार? अशी विचारणा समितीने केली असता, ही माहिती १५ दिवसांत देण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीला आश्वास्त केले.

**परिच्छेद क्रमांक २.१.४.४ : सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे कामांची नियोजन आणि निष्पादन यातील त्रुटी**

**१.१२.** यामध्ये आराखड्याच्या बाहेरची कामे देण्यात आलेली आहेत. विभागाने पी.डब्ल्यू.डी.मध्ये काम मंजूर केली ते आराखड्याला पाहून केलीच नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, काही कामे ही आराखड्यातील तर काही कामे ही आराखड्याच्या बाहेरची आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने सर्व माहिती अप्राप्त असे नमूद केले आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, माहिती दिली आहे. ते ए.जीं.नी वेटिंगमध्ये दिलेले आहे. नंतर कंप्लायन्स केला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अनुपालनमध्ये महालेखापाल व समितीलाही माहिती दिली नाही. माहिती अप्राप्त असे नमूद केले आहे. तसेच, ५१७ पैकी १८७ कामे पार्टली झाली. ५० कामे सुरुच झाली नाहीत. ठाणे व रत्नागिरीची माहिती आहे. नाशिक, औरंगाबाद, बीड, लातूर यांची माहिती विभागाने दिलीच नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, लेटेस्ट माहिती दिली आहे विभागीय सचिवांनी असे सांगितले.

यामध्ये विभागाने असे नमूद केले आहे की, ९८० पैकी ३१६ कामे बृहत आराखड्यातील आहेत. ६६४ कामे बाहेरची आहेत. २२१ पैकी १८९ कामे पूर्ण झाली आहेत. २२ कामे अपूर्ण आहेत. यामध्ये सुद्धा १० कामे विभागाने रद्द केलेली आहेत. याबाबत सांगावे असे समितीने निदेश दिले असता, एकूण ६६४ कामे बृहत आराखड्यामध्ये नव्हती. २२१ समाजमंदिरांचे काम आहे. त्यातील १८९ समाजमंदिरांची कामे पूर्ण झाली व २२ कामे अपूर्ण आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२२ कामे अपूर्ण आहेत व १० कामे रद्द केली असा ३२ कामांचा ब्रेकअप दिसत आहे.५० कामे सुरू करण्यात आली नाहीत. ४० कामे इतर संस्थांना हस्तांतरित करण्यात आली. ती विभागाने केली की त्यांनी यु.एल.बी.ला परस्पर हस्तांतरित करून टाकली असा प्रश्न समितीने केला असता, बांधकाम विभागानेच ती परस्पर रद्द केली त्यांनी रद्द कामांचे पैसे परत केले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

'४०कामे अन्य एजन्सीना, नागरी संस्थांना हस्तांतरित करण्यात आली', ती कोणी केली? ते जर पी.डब्ल्यू.डी.ने केले असेल तर चुकीचे आहे. ते जर सामाजिक न्याय विभागाने केले असेल तर ते मान्य करण्याजोगे आहे. ४० कामे यु.एल.बी.ला हस्तांतरित केली. ती कोणी केली असा प्रश्न समितीने केला असता, सदर कामे हस्तांतरित नाही तर ॲक्चुअली ती कामे यु.एल.बी. मार्फत झालेली होती. त्यामुळे ड्युप्लीकेशन होऊ नये याकरिता नंतर ती कामे या योजनेतून घेतली नाहीत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

उत्तरामध्ये विभागाने असे नमूद केले आहे की, ५० कामे पी.डब्ल्यू.डी.द्वारे सुरू करण्यात येऊ शकली नाही. उर्वरित ४० कामे अन्य एजन्सींना हस्तांतरित करण्यात आली. याचा अर्थ सामाजिक न्याय विभागाचीच ४० कामे हस्तांतरित करण्यात आली. हे कोणी केले? If PWD has done this, they have no authority to do so. If you have done it, you can do it. नवीन पुस्तकातील पृष्ठ क्रमांक ४७ वरील उजव्या बाजूचा पहिला कॉलममध्ये नमूद असल्याचे समितीने निदर्शनास आणले असता, विभागाने जो कम्प्लायन्स दिलेला आहे त्यामध्ये असे नमूद केले आहे की, ९८० कामे मंजूर होती आणि ८६६ कामे पूर्ण झालेली आहेत. ७६ कामे विविध कारणास्तव रद्द झाली. जागेअभावी ३५, अनुसूचित जाती नवबौद्ध घटकांची वस्ती नसल्याने १८ व अन्य योजनेतून काम झाले त्यामुळे ड्युप्लीकेशन होऊ नये म्हणून ४ व इतर कारणास्तव म्हणजे जागेचा वाद आहे किंवा आपसात गटबाजी वगैरे आहे त्यामुळे १९ कामे रद्द केलेली आहेत. अशाप्रकारे एकूण ७६ कामे रद्द करण्यात आली आहेत असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

**परिच्छेद क्रमांक २.१.५ : संनियंत्रण आणि मूल्यांकन–**

**परिच्छेद क्रमांक २.१.५.१ संनियंत्रणाचा अभाव–**

**१.१३.** या परिच्छेदासंदर्भात समितीने केलेल्या सूचनेनुसार नवीन शासन निर्णय निर्गमित करण्यात आल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

**परिच्छेद क्रमांक २.१.५.२ : कामांचे मोजमापन न करणे-**

**१.१४.** या परिच्छेदासंदर्भात माहिती देण्यात यावी अशी समितीने सूचना केली असता, यामध्ये ५ टक्के काम तपासण्याच्या संदर्भातील विषय आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये ५ टक्के तपासणी होतेच असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, हे काम पी.डब्ल्यू.डी.ने केले नाही. याची प्रशासकीय कारवाई करण्याची बाब महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागाने याचे सुधारीत उत्तर दिलेले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभाग दरवेळेस नवीन माहिती देते असे समितीने मत व्यक्त केले असता, समितीच्या सूचनेप्रमाणे अपडेट माहिती देण्यात आल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाचे ज्ञापनामध्ये कारवाई करण्यात येईल असे नमूद केले आहे. ही कारवाई कशी करणार, पी.डब्ल्यू.डी. ला सांगणार का? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये पी.डब्ल्यू.डी. मार्फत ५ टक्के तपासणी होतेच. त्या शिवाय ते बिल पास होत नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महालेखाकारांचे असे म्हणणे आहे की, ५ टक्के तपासणी झालेली नाही. विभागाने मागच्या वेळेस सांगितले होते की, " They are not under us. " आता विभाग सांगत आहे की, कारवाई करू. विभाग कारवाई कशी करणार ते सांगावे. पी.डब्ल्यू.डी.ला सांगणार का? विभागाने डायरेक्टली कारवाई करता येत नाही ते समितीला मान्य आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, पी.डब्ल्यू.डी. वर कारवाई करावयाची असेल तर सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग यांना कळविण्यात येईल की, जेथे जेथे ५ टक्के तपासणी झालेली नाही. जिल्हा परिषदेच्या संदर्भात सचिव, ग्रामविकास विभाग यांना जिल्हा परिषदेच्या बाबतीत त्यांचे असे म्हणणे आहे की, हा ९० टक्के निधी ग्राम सेवक व बी.डी.ओ. यांच्या स्तरावर देण्यात येतो. फक्त शेवटचे १० टक्क्यांचे बिल कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद यांच्या लेव्हलला येते. त्या १० टक्के देण्याच्या स्टेजला ते तपासणी करतात. परंतु, ९० टक्क्यांचे जे पेमेंट आहे, त्यामध्ये ५ टक्के तपासणी होत नाही. हे फॅक्ट आहे. कारण हा ९० टक्के फंड ग्राम सेवक व बी.डी.ओ. यांच्या संयुक्त खात्यामध्ये असल्यामुळे ती एम.बी. तपासणीकरिता कार्यकारी अभियंत्यांकडे येतच नाही असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

त्या सर्व कामांची तपासणी सार्वजनिक बांधकाम, जिल्हा परिषदेच्या जे.ई. च्या अंतर्गत होत असते. ग्राम सेवक व ग्राम पंचायती हे काम करतात हे समितीस मान्य आहे. परंतु, त्याची एम.बी. रेकॉर्डिंग ही पी.डब्ल्यू.डी. झेड.पी. चे जे.ई. करतात. ते काम जर पी.डब्ल्यू.डी. झेड.पी. चे जे.ई. करत असतील ते काम एक्झेक्युटिव्ह इंजिनिअर, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद यांच्या अंडर येते. विभागाने हे मान्यही केले की, ५ टक्के केलेच पाहिजे. कारण कोणत्याही स्तरावर चेक होत असेल तरीही ५ टक्क्यांची एकूण तपासणी झाली पाहिजे असा शासनाचा नियम आहे. ५ टक्के कामांची एकूण तपासणी, त्यांच्या बिलाची तपासणी त्या एक्झेक्युटिव्ह इंजिनिअरने केली पाहिजे किंवा त्याने डेप्युट केलेल्या डी.वाय. ने केली पाहिजे. तसे झालेले नाही, असे ए.जीं. चे ऑब्जेक्शन आहे. याबाबत विभागाने पुढे खबरदारी घ्यावी. ज्यांनी केली नाही त्यांच्या बाबत योग्य कारवाई करण्याचे पत्र विभागाने पी.डब्ल्यू.डी.ला द्यावे तसेच विभागाने असे नमूद करावे की, लोकलेखा समितीच्या बैठकीमध्ये या परिच्छेदावर चर्चा करण्यात आली. यावर कारवाई करणे अभिप्रेत होते. त्यांनी केली नाही त्यामुळे संबंधितांवर कारवाई करावी असे समितीने निदेश दिले.

**परिच्छेद क्रमांक २.१.५.३- भौगोलिक माहिती प्रणाली (Geographical Inforomation system- GIS) द्वारे अधिसूचित वस्तींचे रेखांकन (Mapping) न करणे–**

**१.१५.** या परिच्छेदासंदर्भात माहिती देण्यात यावी असे समितीचे निदेश दिले असता, यामध्ये जीआयएस मॅपिंग केलेले नाही असा ऑडीट पॅरा आहे. त्यावेळी जीआयएस मॅपिंगचे आरएफपी तयार झाले नव्हते, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

सन २०१३ मध्ये जीआर निघाला होता. त्या जीआरची अंमलबजावणी न करण्याची काय कारणे आहेत असा प्रश्न समितीने केला असता, जीआयएस मॅपिंगचा इश्यू टेक्निकल आहे, त्यामुळे विभागाने कन्सलटन्टची नियुक्ती केली होती असे विभागीय सचिवांनी सांगितले. विदाऊट कन्सलटन्ट जीआर काढण्यात आला आहे काय? असा प्रश्न समितीने केला असता, त्यावेळी जीआरमध्ये असे नमूद केले होते की, जीआयएस मॅपिंग करण्यात येईल. आता कन्सलटन्टची नियुक्ती करून जीआयएस मॅपिंगचा आरएफपी तयार केला आहे. लवकर ते फ्लोट करित आहोत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ज्ञापनामध्ये असे नमूद केले आहे की, इलेक्ट्रॉनिक डेटाबेस तयार करून तो संबधित जिल्हापरिषदेच्या संकेत स्थळावर उपलब्ध करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र या सूचनेची अंमलबजावणीला झाली नाही असा प्रश्न समितीने केला असता, ही बाब आता प्रोसेसमध्ये आहे. त्याचा आरएफपी आता तयार केला आहे. एजन्सी नियुक्त करून जीआयएस मॅपिंग करण्यात येत आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २०१३ मध्ये अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत. २०१८ मध्ये विभाग ऑर्डर काढणार आहे काय असा प्रश्न समितीने केला असता, वेगळया आदेशाची गरज नाही. आता फक्त एजन्सी नियुक्त करण्यासाठी टेंडर काढायचे आहे. जीआयएसमार्फत दलित वस्त्यांचे मॅपिंग करावयाचे आहे. दलित वस्ती कोठे आहे व कोणती कामे झाली आहेत. ते यातून दिसून येणार आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कामे अपूर्ण असल्याची जी कारणे सांगितली त्यामध्ये एक हे देखील कारण आहे. दलित वस्ती तेथे उपलब्ध नव्हती. तेथे लोक आढळून आले नाही म्हणून काम रद्द केले. सर्व योजनेचा बेस मॅपिंगचा आहे. हा सामाजिक न्याय विभागाचा गाभा आहे. त्याशिवाय विभाग पुढे कोणतेही काम करू शकत नाही. मॅपिंगचे काम पूर्वीच व्हायला पाहिजे होते. या कामामध्ये गतिमानता आणली पाहिजे. सन २०१३ मध्ये जीआर काढला असून आज २०१८ सुरू आहे. तरी देखील या कामात प्रगती झाली नाही त्यामुळे हे काम आता किती दिवसात पूर्ण होणार आहे असा प्रश्न समितीने विचारला असता, आता फक्त निविदा काढायची आहे. आरएफपी तयार झाला आहे. कन्सलटंटकडून आरएफपी तयार केला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने आपण असे नमूद केले आहे की, दिनांक १७ जुलै, २०१८ रोजी शासनास सादर केले आहे. याबाबत आपण ऑर्डर काढली आहे काय? शासनाने आयुक्तांच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, सदर प्रस्ताव आयुक्तांनी विभागाला १७ जुलै, २०१८ रोजी सादर केला आहे. टेंडर काढण्याबाबत विभागाकडून त्यांना आदेश देण्यात येतील. आयुक्तांकडून आता १७ जुलैला प्रस्ताव आलेला आहे त्यास अद्याप मान्यता दिलेली नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जीआयएस मॅपिंगचे काम सुरू करण्यासंदर्भातील जीआर विभाग कधी काढणार आहे असा प्रश्न समितीने केला असता, मॅपिंग करण्याचा निर्णय झालेला आहे निविदा काढण्यासाठी परवानगी लागणार आहे. यासंदर्भातील शासन निर्णय एक आठवड्यात काढण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२०१३ मध्ये निर्णय झाला होता त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. सन २०१८ मध्ये संचालकांनी प्रस्ताव सादर केला आहे. त्यावर आता निर्णय घेण्यात येत आहे. ८ दिवसांच्या आत जीआयएस मॅपिंगच्या कामाला सुरुवात करावी. त्यासाठी आवश्यक ती निविदा काढावी असा आदेश विभागाकडून काढण्यात येणार आहे असे आश्वासन विभागाच्या सचिवांनी दिले आहे.

समाजकल्याण सचिव किंवा त्या विभागावर लोकलेखा समिती ताशेरे ओढते तरी हा विभाग काम करीत नाही. औद्योगिक संस्थांचा विषय तसाच आहे. यामध्ये जी चूक काढली ती दुरुस्त करायचे सोडून इतर कामे केली जात आहे. हा विषय सन २०१३ मध्ये झालेला आहे. पुन्हा तो विषय २०१८ मध्ये येत आहे. हे काम आणखी पाच वर्षे होणार नाही. या विभागाकडून अशा प्रकारची कामे सुरू आहेत.

जीआयएस मॅपिंग बंधनकारक आहे. विभागास बाबी टाळता येणार नाही. दलित वस्ती व तेथे आवश्यक असलेली कामे जीआयएस मॅपिंगशिवाय करता येणार नाहीत. जीआयएस मॅपिंगच्या कामाला प्रथम प्राधान्य देऊन ती कामे करण्यात यावीत. अशी समितीची शिफारस राहणार आहे. या संदर्भात तातडीने ऑर्डर काढण्यात यावी.

१ ऑगस्ट,२०१३ नुसार सर्व जिल्हा परिषदांना सर्व घोषित वस्त्यांचे जीआयएस मॅपिंग करणे, त्यांचा इलेक्ट्रानिक डाटाबेस तयार करणे अशा सूचना दिल्या आहेत. हे काम जिल्हा परिषद करणार की, समाजकल्याण विभाग करणार आहे. नेमके जीआयएस मॅपिंग कोण करणार आहे.

निविदा संचालक काढणार की, जिल्हापरिषद काढणार आहेत. सॅटेलाईटमार्फत करणार की, स्पॉट व्हीजीट करून करण्यात येणार आहे. दलित वस्तीची लोकवस्ती पाहून त्या गावाच्या नोंदी करण्यात येतील काय, विभागाची काय संकल्पना आहे. याबाबत समितीला सविस्तर सांगावे अशी सूचना समितीने केली असता, सुरुवातीला जिल्हापरिषद स्तरावर नियोजन केले होते. जिल्हा परिषद स्तरावर केले तर त्यामध्ये कन्टीन्युटी राहणार नाही. तो डाटाबेस एकसंध राहणार नाही, त्यामुळे मंत्री महोदयांच्या स्तरावर असा निर्णय झाला की, राज्यातील संपूर्ण काम एकत्रित करावे. त्यानंतर कन्सलटंटची नियुक्ती करण्यात आली आहे व आरएफपी तयार केला आहे. हे काम राज्य स्तरावर करण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्हा परिषदेला ते वेगळे करण्याची गरज नाही. आयुक्त, समाजकल्याण स्तरावरुन टेंडर काढण्यात येणार आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आयुक्तांकडे हे सर्व इश्यू राहतील. यामध्ये कालमर्यादा टाकली पाहिजे. पुढील ६ ते १२ महिन्यात पूर्ण राज्याचे जीआयएस मॅपिंग झाले पाहिजे. आधीच खूप उशिर झालेला आहे. जीआर काढतांना त्यामध्ये कालमर्यादा टाकण्यात यावी. मंत्री महोदयांनी सांगितले होते की, एक महिन्यात याचा निर्णय घेण्यात येईल असे असून आठ महिन्यांपासून तो निर्णय झालेला नाही. त्यामुळे ही सर्व कामे किती महिन्यात करण्यात येतील याचा कालावधी निश्चित केला पाहिजे. जीआयएस मॅपिंग २०१३ मध्ये करण्यात येणार होते त्याची अंमलबजावणी झाली नाही. जुलै २०१८ च्या नवीन प्रस्तावाला विभाग मान्यता देत आहे. ही कार्यवाही किती दिवसात अंमलात आणण्यात येईल. याची सिस्टीम काय राहणार आहे. ही माहिती सेटेलाईटच्या माध्यमातून गोळा करण्यात येणार आहे काय? सेटेलाईटची माहिती इथंभूत राहणार नाही. सेटेलाईट व प्रत्यक्ष पाहणी अशा दोन्ही बाबींचा वापर करून तसेच गुगल मॅपिंग करून व ग्राऊंड पातळीवरील वस्तुस्थिती गोळा करावी. प्रत्येकाचा आराखडा विभागाकडे तयार होत आहे. त्यादृष्टीने सर्व नियोजन केले पाहिजे. फक्त टेंडर काढा व इतर कामे सेटेलाईटच्या माध्यमातून झाले तर गाव व वस्ती दिसत नाही. किती लोक राहतात त्याचा डाटा विभागाकडे आहे. या सर्व बाबी जीआरमध्ये नमूद केल्या तर ती कार्यवाही चांगल्या प्रकारे करता येईल असे मत समितीने व्यक्त केले. सन २०१८ ते २०२२ चा आराखडा अंतिम स्टेजमध्ये आहे. ऑक्टोबर अखेरपर्यंत सर्व जिल्ह्यांचा आराखडा मंजूर होईल. नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात प्रशासकीय मान्यतेचे काम पूर्ण होईल असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

आता २० लाख रुपयांची मर्यादा आहे, ही मर्यादा मागील २० ते २५ वर्षापासून आहे. ती मर्यादा संपलेली आहे. ती मर्यादा ३ लाख ते २० लाख रुपये आहे. ही मर्यादा वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. खूप कामे निघतात व आता किंमती वाढलेल्या आहेत. २० लाख रुपयांची मर्यादा ४० लक्ष रुपये करावेत. ३ लाख रुपयांची मर्यादा ५ लाख रुपये करावेत. अशी शिफारस समितीच्या अहवालात करण्यात येणार आहे. आराखडा तयार करताना २० लाख रुपयांच्या मर्यादेत अनेक गावे सुटू शकतील. त्यासाठी काहीही करता येणार नाही. यासर्व बाबींचा पुर्नविचार झाला पाहिजे. समिती तशी शिफारस करणार आहे. यासंदर्भात मंत्री महोदयांना विनंती केली आहे. त्यांनी ही बाब मान्य केली आहे. २० लाख ही रक्कम अत्यंत कमी आहे. दर वाढलेले आहेत, वस्त्या वाढलेल्या आहेत. त्या दृष्टीने हे नॉर्म्स डबल केले पाहिजेत अशी समितीने सूचना केली.

**परिच्छेद क्रमांक २.१.५.४ कार्यसिद्धी लक्ष्य न ठरविणे आणि योजनेचे मूल्यांकन न करणे.**

**१.१६.** या परिच्छेदा संदर्भात विभागाने असे नमूद केले आहे की, सांख्यिकी संचालनालयातर्फे मूल्यमापन करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. याबाबत माहिती देण्यात यावी अशी समितीने सूचना केली असता, मूल्यमापनाचे काम पूर्ण झालेले आहे. रिपोर्ट अप्राप्त आहे. हे काम जुलै २०१८ मध्ये काम पूर्ण झालेले आहे. लवकरात लवकर रिपोर्ट द्यावा अशी त्यांना विनंती करण्यात येणार आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

१५ दिवसांच्या आत सदर अहवाल लोकलेखा समितीला सादर करावयाचा आहे. म्हणून तो त्यांच्याकडून तातडीने मागवून घेण्यात यावा असे समितीने निदेश दिले तसेच आराखड्याचा एक विषय आहे, विभागाने सांगितले आहे की, ऑक्टोबर अखेरपर्यंत सर्व जिल्ह्यांचा आराखडा तयार होईल. याबाबत माहिती देण्यात यावी अशी सूचना समितीने केली असता, बऱ्याच जिल्ह्यांचे आराखडे तयार झाले आहेत. उपायुक्त यांची मंजूरी बाकी आहे. आराखडे ऑक्टोबर अखेरपर्यंत पूर्ण करण्यात येतील असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीने सांगितल्याप्रमाणे गावाचे कम्पलेशन करून देण्यात यावे. बाकीची माहिती सांगितली आहेत ती पूर्ण करण्यात यावी. २० लक्ष रुपयांची मर्यादा ४० लक्ष रुपये करण्यात यावी. जीआयएस मॅपिंगबाबत विचारपूर्वक असे शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा असे समितीने सूचित केले.

**अभिप्राय व शिफारशी**

**२.१.२ "नियोजन"**

**२.१.२.१ "बृहत आराखडा तयार करण्यासाठी कोणतेही प्रमाण प्रपत्रे नसणे"**

**अभिप्राय :**

**१.१९.** अधिसुचित वस्तीच्या स्थानिक परिस्थिती आणि गरजांनुसार ग्राम पंचायती त्या वस्त्यांमध्ये ग्रामस्तरावर करावयाची कामे निश्चीत करून निर्णय पारित करतात. हे निर्णय गटस्तरावर बृहत आराखडा तयार करण्यासाठी पंचायत समितीकडे पाठविण्यात येतात. बृहत आराखडे, नंतर जिल्हा परिषद स्तरावर जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्याव्दारे संकलित करण्यात येतात. आणि संबंधित क्षेत्रिय उपायुक्त (समाजकल्याण) (RDCs) यांचेद्वारे मंजूर करण्यात येतात. हा मंजुर बृहत आराखडा एका जिल्हा परिषदेसाठी पाच वर्षाच्या कालावधीसाठी प्रभावी असतो आणि या कार्यचलित कालावधीत हा बृहतआराखडा बदलण्यात येऊ शकत नाही.

एका विशिष्ट बृहतआराखड्यात जिल्ह्याचे नांव, पंचायत समितीचे नांव, ग्रामपंचायतीचे नांव, वस्तीचे नांव, वस्तीचा सांकेतांक, जनगणनेनुसार अनुसूचित जाती/नवबौद्धांची लोकसंख्या, प्रत्यक्ष लोकसंख्या, लोकसंख्येच्या आधारावर अनुज्ञेय असलेले अनुदान, आधी देण्यात आलेले अनुदान, आधी निष्पादित केलेली कामे, करावयाची असलेली कामे आणि वस्त्यांना अनुदान वितरण आणि कामे निष्पादन करण्यासाठी द्यावयाचा प्राधान्यक्रम नमूद असावयास पाहिजे.

परंतु जरी २००८-२०१३ या कालावधीचा प्रथम बृहत आराखडा २००८-२००९ पासून क्रियाशील असला तरी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने पंचवार्षिक बृहत आराखडा तयार करण्यासाठी कोणतेही प्रमाण प्रपत्र (Standard format) नेमून दिले नव्हते. परिणामी, विविध जिल्हा परिषदेच्या तसेच एकाच जिल्हा परिषदेअंतर्गत असलेल्या पंचायत समिती यांच्याव्दारे तयार करण्यात आलेल्या बृहत आराखड्यात समानता नव्हती. विभागाव्दारे बृहत आराखड्यांसाठी प्रमाण प्रपत्र विहित नसल्यामूळे ग्रामपंचायतीतील वस्तीतील तसेच एकूण सर्व वस्तीतील अनेक कामांचा विकास करण्यासाठी प्राधान्यक्रम ठरविण्यात येऊ शकला नाही. याशिवाय बृहत आराखड्यात समानता नसल्यामूळे वस्तींना अनुज्ञेयतेपेक्षा जास्त अनुदान देण्यात आले. बृहत आराखड्यामधील असमानता व तफावती विशेषतः दोन (कळवण आणि मालेगाव) गटांमध्ये वस्तींना सांकेतांक देण्यात आले नव्हते, चार (अकोट, बार्शिटाकळी, कल्याण आणि शहापूर) गटांमध्ये २०११ च्या जनगणनेनुसार असलेली अनुसूचित जाती / नवबौद्धांची लोकसंख्या नमूद केली नव्हती, सहा (अंबेजोगाई, भद्रावती, चिमूर, कन्नड, पाटोदा आणि सिल्लोड) गटांमध्ये अनुसूचित जाती / नवबौद्धांची प्रत्यक्ष लोकसंख्या नमूद केली नव्हती, दोन (कन्नड आणि सिल्लोड) गटांमध्ये लोकसंख्येनुसार अनुदानाची अनुज्ञेयता नमूद केली नव्हती, पाच (अकोट, कळवण, कल्याण, मालेगाव आणि शहापूर) गटांमध्ये वस्त्यांना आधी देण्यात आलेल्या अनुदानाचे तपशील नमूद केले नव्हते, आठ (अकोट, बार्शिटाकळी, चाकूर, कळवण, कल्याण, लातूर, मालेगाव आणि शहापूर) गटांतील वस्त्यांमध्ये आधी निष्पादित करण्यात आलेल्या कामांची नावे नमूद करण्यात आली नव्हती, दोन (अंबेजोगाई आणि पाटोदा)-गटांमध्ये निष्पादित करावयाची असलेली कामे नमूद केली नव्हती अशा स्वरुपाच्या त्रुट्या होत्या. त्याचप्रमाणे चंद्रपूर जिल्हा परिषदेमध्ये सन २००८-१३ या कालावधीसाठी पंचायत समितीद्वारे गट स्तरावर बृहत आराखडा तयार करण्यात आला नव्हता. तथापि, जिल्हा परिषदेने याबाबत पंचायत समितीकडे विचारणा केली नाही आणि पंचायत समितीनेसुद्धा संबंधीत ग्रामपंचायतीकडे याबाबत विचारणा केली नाही. परिणामी सन २०१३ अखेर ७१ वस्त्या योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्या असे गंभीर आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत. सदरहू आक्षेप विभागाने मान्य केले. तसेच एक समान बृहतआराखडा तयार करणे सुकर व्हावे, यासाठी एक प्रमाण प्रपत्र जारी करण्याचे देखील निश्चित केले व त्याअनुषंगाने दिनांक २२ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रमाण प्रपत्र (Standard Format) विहीत करून तशा सूचना सर्व जिल्हा परिषदांना दिल्या असून सदर विहीत प्रपत्रात आराखडा तयार करण्याचे काम जिल्हास्तरावर सुरू असल्याचे समितीला सांगण्यात आले.

समितीने याप्रकरणी विस्तृत साक्ष घेतली असता प्रत्येक गावातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील लोकसंख्या विचारात घेऊन त्याआधारे दलितवस्त्या घोषित करून त्यांना निधीचे वाटप करणे आवश्यक असताना अनेक जिल्ह्यांमध्ये वस्तीच्या नावासमोर प्रत्यक्षात लोकसंख्याच नमूद करण्यात आलेली नव्हती. त्यातही लोकसंख्या नमूद करताना शासन निर्णयानुसार प्रत्यक्षात असलेली लोकसंख्या विचारात घेऊनच निधीची निश्चिती करणे बंधनकारक असतानाही शासन निर्णयानुसार लोकसंख्येची गणना विचारात घेतली नाही. परिणामी दलित वस्त्यांना झालेले निधीचे वाटप लोकसंख्येला न्याय देणारे नव्हते. वस्त्यांसमोर लोकसंख्या नमूद नसल्याची बाब विभागीय प्रतिनिधींनीदेखील समितीसमोर मान्य केली. महालेखाकारांचा सदरहू अहवाल हा सन २०१४-१५ चा असून त्यात महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप गंभीर असूनही विभागाने त्याची कोणतीही दखल लोकलेखा समितीची साक्ष लागेपर्यंत घेतली नाही. याहीउपर महालेखाकारांनी आक्षेप नोंदवितेवेळी राज्यातील नमुन्यादाखल काही विशिष्ट जिल्ह्यांचीच तपासणी केली. याचाच अर्थ संपूर्ण राज्यात निश्चितच हीच परिस्थिती अस्तित्वात असणार. केवळ समितीची साक्ष लागल्यामुळे

विभागाने याप्रकरणी लक्ष घातले आहे व लोकसंख्या नमूद नसल्याचे मान्य केले. परंतु आजतागायत संबंधितांवर कोणतीही कारवाई विभागाने केली नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे. वास्तविकतः विभागाने या प्रकरणी संबंधितांवर कारवाई करूनच समितीसमोर साक्षीसाठी येणे अभिप्रेत व आवश्यक होते. परंतु विभागाने तसे केले नाही व आता मात्र समितीसमोर हे आक्षेप मान्य केले. या प्रकरणी संबंधितांवर कारवाई न केल्याबाबत समितीने विचारणा केली असता प्रत्यक्ष लोकसंख्या नमूद करण्याची जबाबदारी ग्रामसेवकांची असून गटविकास अधिकाऱ्याकडून त्याचे संकलन केले जाते आणि ग्रामसेवक व गटविकास अधिकारी हे जिल्हापरिषदेच्या अखत्यारीत येत असल्यामुळे जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी ही कारवाई करणे आवश्यक असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. वस्त्यांची प्रत्यक्ष लोकसंख्या नमूद करून बृहत आराखडा शासनाच्या मान्यतेसाठी पाठविणे आवश्यक असते. परंतु लोकसंख्येची कोणतीही खात्री न करता हे प्रस्ताव सादर करण्यात आले. याहीउपर प्रत्यक्षात असलेली लोकसंख्या नमूद करणे बंधनकारक असताना जनगणनेनुसार असलेली लोकसंख्या नमूद करून हा निधी वितरीत करण्यात आला. परिणामी लोकसंख्येच्या निकषावर गुणवत्तेनुसार निधी वाटप झाले नाही ही वस्तुस्थिती कायम राहते. त्याचप्रमाणे ज्यावेळी बृहत आराखड्यास मंजूरी मिळाली त्यावेळी प्रत्यक्ष लोकसंख्येची आकडेवारी त्यात नमूद नव्हती. असे असतानाही समाजकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांनी आराखड्याला मान्यता कशाच्या आधारे दिली हा देखील प्रश्न उपस्थित होतो. प्रत्यक्ष लोकसंख्येची आकडेवारीच विभागाकडे नसल्यामुळे निधीचे नियोजन हे अंदाजाच्या आधारावर व वस्तुस्थितीशी विपरीत झाल्याचे स्पष्ट होते. दलितवस्ती अधिसूचित करताना जनगणनेनुसार व प्रत्यक्षात लोकसंख्येची आकडेवारी नमूद करून केवळ त्याआधारेच वस्तीला अनुज्ञेय असलेले अनुदान निश्चित करता येते. परंतु अशा गंभीर प्रकरणी संबंधितांवर ग्रामविकास विभाग वा समाजकल्याण विभागाने आजतागायत कोणतीही कारवाई केली नाही. पंचवार्षिक बृहत आराखडा तयार करण्यासाठी कोणतेही प्रमाण प्रपत्र विहित केले नव्हते. त्यामुळे वेगवेगळ्या प्रपत्रामध्ये हे आराखडे मंजूर करण्यात येत होते. वास्तविकतः या सर्व उपाययोजना अगोदरच विभागाने करणे अभिप्रेत असून तो विभागांतर्गत नियोजनाचा भाग आहे. बृहत आराखड्यामध्ये प्रत्यक्ष लोकसंख्याच नमूद केली नसल्यामुळे विभागाने प्रपत्राचा आधार घेणे देखील समर्थनीय नाही. परिणामी या सदोष कार्यपद्धतीचे कोणतेही समर्थन विभागाने न करता संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून तात्काळ कारवाई करावी असे समितीने निदेशित केले. परंतु अद्यापही विभागाकडून याप्रकरणी केलेली कारवाई समितीस कळविण्यात आली नाही.

एवढेच नव्हे तर नाशिक व ठाणे जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये पूर्वी देण्यात आलेल्या अनुदानाचा तपशिलच नोंद करण्यात आला नव्हता. या तपशिलाअभावी पूर्वी दिलेले अनुदान व पुढील वर्षी द्यावयाच्या उर्वरित अनुदानाची निश्चिती गुणवत्तेनुसार झाली नाही. परिणामी या सदोष कार्यपद्धतीमुळे देण्यात आलेले अनुदान हे मर्यादेबाहेर देखील असण्याची शक्यता नाकारता येत नाही. विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर अनुदानाचा तपशील नमूद न केल्याचे मान्य केले व भविष्यात याबाबत दक्षता घेण्यात येईल असेही समितीस आश्वासित केले. तसेच पूर्वी दिलेल्या पैशांची नोंद न करतादेखील विभागाने मर्यादेपेक्षा एकही पैसा अधिक दिलेला नसल्याचे समितीसमोर सांगण्यात आले असता यावर समितीने तीव्र आक्षेप नोंदवित विभागाकडे कोणतीही शाश्वत आकडेवारी व तपशील नसताना विभाग अशी खात्री कशाच्याआधारे देवू शकते. त्यामुळे समिती विभागाच्या या खुलाशावर विश्वास ठेवू शकत नाही. एका वस्तीला या योजनेखाली जास्तीत जास्त रु. २० लाखाचा निधी देता येतो. या मर्यादेचे पालन करण्यासाठी दिलेल्या अनुदानाचा तपशील नोंद करणे नितांत आवश्यक आहे. दि.०५ डिसेंबर, २०११ च्या शासन निर्णयानुसार देय असलेल्या निधीबाबत पूर्वी दिलेला निधी वजा करूनच पुढील निधी देणेबाबत स्पष्टपणे नमूद असताना दिलेल्या अनुदानाचा तपशील नोंद करून न ठेवल्यामुळे अनुदानाचे वाटप गुणवत्तेनुसार झाले नाही ही वस्तुस्थिती कायम राहते. वास्तविकतः ही योजना फार अगोदर सुरू झाली असून ही रु. २० लाखाची मर्यादा आता वाढविण्याची नितांत आवश्यकता आहे. परंतु कोणत्याही परिस्थितीत मूलभूत धोरणाचे व त्यासाठीच्या अनिवार्य बाबींचे पालन करताना कोणतेही दोष वा त्रुटी त्यात राहू नयेत याची पूर्ण दखल व नियोजन विभागाने करणे आवश्यक आहे. या प्रकरणी देखील संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी. तसेच महालेखाकारांच्या परिच्छेदात आक्षेपित ४ तालुक्यांमध्ये झालेल्या कामांची तपासणी करून या कामांकरिता जास्तीचा निधी खर्च झाला किंवा कसे याबाबत तालुकानिहाय अहवाल समितीला सादर करण्याबाबतचे निदेश समितीने दिले. परंतु अद्यापही ही माहिती समितीला सादर करण्यात आली नाही.

निधीचे वाटप विभागाकडून जिल्हा परिषदेकडे, जिल्हापरिषदेकडून पंचायत समितीकडे व पंचायत समितीकडून ग्रामपंचायतीकडे केले जाते. अशाप्रकारे निधीचे वाटप करताना ते वेळेत केले तरच या निधीअन्वये करावयाच्या कामाचे नियोजन व खर्च करणे विभागाला शक्य होईल. परंतु दर तीन महिन्यांनी सर्वसाधारण सभेची बैठक घेणे जिल्हापरिषदेला अनिवार्य असतानाही ही बैठक नियमितपणे होत नाही. समाजकल्याण समिती कामाची निश्चिती अखेरपर्यंत करत नसल्यामुळे पंचायत समिती व ग्रामपंचायतीकडे निधी विलंबाने प्राप्त होतो व हा प्राप्त निधी विहित वेळेत खर्च करण्यास अनेक अडचणी येतात. त्यामुळे निधी अखर्चित राहतो. सद्यःस्थितीत प्रथम निधी जिल्हापरिषदेला पाठविला जातो व त्यानंतर आराखडा तयार करण्याचे काम सुरू होते. यासाठी आराखडा तयार करण्यास विहित कालमर्यादा निश्चित करणे अत्यावश्यक आहे. अशा प्राप्त परिस्थितीत लोकसंख्येची मर्यादा आणि वास्तविक असलेल्या लोकसंख्येनुसार जितका निधी देय आहे त्या मर्यादेत ५ वर्षाचा बृहत आराखडा तयार करण्यात यावा असेही समितीने विदित केले.

चंद्रपूरमध्ये तर ७१ दलितवस्त्यांची नोंदणीच केली नाही हे आक्षेपदेखील अतिशय गंभीर असून परिणामी या वस्त्या या योजनेंतर्गत मिळणाऱ्या लाभांपासून वंचित राहिल्या. आराखडाच तयार नसल्यामुळे निधीचे वाटप कशाप्रकारे झाले हा देखील गंभीर प्रश्न समितीसमोर उद्‌भवतो. याबाबत समितीने विचारले असता पहिले आयुक्तांमार्फत निधी काढून तो जिल्हापरिषदेला देण्यात येत होता व जिल्हापरिषद त्यांच्या आराखड्यानुसार कामे घेत होती असे समितीला सांगण्यात आले. त्यामुळे जिल्हापरिषदेला गेलेला निधी हा कामनिहाय गेलेला नाही हे स्पष्ट होते. वास्तविक आराखडा सादर केल्यानंतरच अनुदान देणे आवश्यक आहे. केवळ चंद्रपूर जिल्हापरिषदेमध्येच या बाबी आढळून आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. वास्तविकतः आराखडा तयार नसल्यामुळेच १०५८ पैकी केवळ १०११ वस्त्यांना लाभ मिळाला व ४७ वस्त्यांना कोणताही लाभ मिळू शकला नाही. परंतु आता या ४७ वस्त्यांचा समावेश करण्यात येईल असेही समितीसमोर आश्वासित करण्यात आले.

अशाप्रकारे पंचवार्षिक बृहत आराखड्याशिवाय कामे करण्यात आली तर आराखड्यामध्ये घेतलेल्या वस्त्यांकरिता पुरेशी आर्थिक तरतूद शिल्लक राहत नाही. परिणामी इतरही जिल्हापरिषदांमध्ये काही वस्त्या वंचित राहिलेल्या आहेत व बृहत आराखड्यामध्ये असलेल्या वस्त्यांकरिता पुरेल इतका निधी त्या त्या जिल्हापरिषदेकडे उपलब्ध राहत नाही. या प्रकरणी संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी असे समितीने निदेश दिले असता समितीच्या सूचनेप्रमाणे कारवाई करण्यात येईल असे विभागाच्या प्रतिनिधींनी समितीसमोर आश्वासित केले व भविष्यात आराखडा तयार केल्यानंतरच हा निधी वितरीत करण्यात येईल असे समितीसमोर सांगण्यात आले.

**शिफारस :**

**१.२०. महाराष्ट्र शासनाने दलित वस्तीमध्ये वास्तव्य करणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध लोकांचे राहणीमान उंचाविण्याकरीता त्यांना मुलभूत सुविधा जसे पाणी पुरवठा, मलनिःस्सारण, पोच रस्ते, अंतर्गत रस्ते, वीज पुरवठा, समाज मंदिर इत्यादी पुरविण्यासाठी दलित वस्ती सुधार योजना सुरू केली. या योजनेच्या मार्गदर्शक तत्वांमधील निकषानुसार प्रत्येक गावातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांची लोकसंख्या किती आहे हे विचारात घेऊन त्या वस्त्या दलित वस्त्या म्हणून ग्राम पंचायतीने निश्चित कराव्यात, अशा प्रकारे निश्चित केलेल्या वस्त्या जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या संबंधीत जिल्ह्यातील दलित वस्त्या म्हणून या वस्तीत विकास कार्ये करण्यासाठी अधिसुचित कराव्यात. त्यासाठी ५ वर्षाच्या कालावधीसाठी बृहत आराखडा तयार करून त्यात जिल्ह्याचे नांव, पंचायत समितीचे नांव, ग्रामपंचायतीचे नांव, वस्तीचे नांव, वस्तीचा सांकेतांक, जनगणनेनुसार अनुसूचित जाती/नवबौद्धांची लोकसंख्या, प्रत्यक्ष लोकसंख्या, लोकसंख्येच्या आधारावर अनुज्ञेय असलेले अनुदान, आधी देण्यात आलेले अनुदान, आधी निष्पादित केलेली कामे, करावयाची असलेली कामे आणि वस्त्यांना अनुदान वितरण आणि कामे निष्पादन करण्यासाठी द्यावयाचा प्राधान्यक्रम नमूद असणे बंधनकारक होते. परंतु विभागाने बृहत आराखडा तयार करण्यासाठी कोणतेही प्रमाण प्रपत्र विहित केले नसल्यामुळे बृहत आराखड्यामध्ये समानता नव्हती. परिणामी वस्तींना अनुज्ञेयतेपेक्षा जास्त अनुदान मिळणे, नमूद केलेल्या जनगणनेमध्ये तफावत असणे, प्रत्यक्षात असलेली लोकसंख्या गृहीत न धरणे, आधी देण्यात आलेल्या अनुदानाचे व कामाचे तपशील त्यात नमूद नसणे, एवढेच नव्हेतर काही ठिकाणी बृहत आराखडाच तयार केलेला नसणे, परिणामी अनेक वस्त्या या योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्या. तसेच ज्या दलित वस्त्यांना निधीचे वाटप झाले ते लोकसंख्येला न्याय देणारे नव्हते. त्यामुळे अशा अवलंबिलेल्या सदोष कार्यपद्धतीमुळे अनुदानाचे वाटप गुणवत्तेवर झाले नाही ही वस्तुस्थिती कायम राहते. तसेच पात्र दलित वस्त्या या योजनेंतर्गत अनुदानापासून वंचितही राहिल्या. अशाप्रकारे दलित वस्ती निश्चीत करणे, अनुदानाचे वाटप व उपयोग आणि कामांचे कार्यान्वयन प्रभावीपणे आणि कार्यक्षमतापूर्वक करण्यात आले किंवा कसे, याबाबत खातरजमा करण्यासाठी महालेखाकारांनी हे लेखापरिक्षण केले असता यात अनेक दोष व त्रुटी निदर्शनास आल्या असून अनेक जिल्ह्यांमध्ये विहित मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन झाले असल्याचे गंभीर आक्षेप महालेखाकारांनी नोंदविले आहेत. विशेषतः महाराष्ट्रातील अनुसूचित जाती आणि नवबौद्ध वस्तीच्या विकास योजनेच्या कार्यान्वयनाच्या नियोजनात कमतरता होती. बृहत आराखडा तयार करण्यासाठी असलेले प्रपत्र, ज्यात विकासासाठी निश्चित केलेल्या वस्तींचे तपशील आणि वस्तींची आर्थिक अनुज्ञेयता दर्शविली असते, एकसमान नव्हते. अनुदान वाटपासाठी वस्तींची प्राधान्यता सूचीही तयार करण्यात आलेली नव्हती. ज्यामुळे अनेक गरजू वस्तींना योजनेच्या लाभापासूनच वंचित करण्यात आले. बृहत आराखड्यात विचारात घेतलेली अनुसूचित जाती आणि नवबौद्धांची लोकसंख्या जनगणनेत दर्शविलेल्या लोकसंख्येपेक्षा खूप जास्त होती. ज्यामुळे अनेक वस्तींना अनुज्ञेयतेपेक्षा जास्त अनुदान देण्यात आले. अतः सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने बृहत आराखडा तयार करण्यासाठी व्यापक प्रमाण प्रपत्र याअगोदरच विनिर्दिष्ट करण्याची आवश्यकता होती. जेणेकरून विकासाची गरज असलेल्या अधिसूचित वस्त्या योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या लाभापासून वंचित राहिल्या नसत्या. परंतु महालेखाकारांनी नोंदविलेल्या या गंभीर आक्षेपाकडे विभागाने लोकलेखा समितीची साक्ष लागेपर्यंत गांभीर्याने लक्ष दिले नाही. केवळ समितीची साक्ष**

लागल्यामुळे विभागाने आता या आक्षेपासंदर्भात दखल घेतली आहे. महालेखाकारांनी नमुन्यादाखल केवळ काही जिल्हा परिषदांची तपासणी केली असता या गंभीर बाबी निदर्शनास आल्या आहेत. याचाच अर्थ राज्यात अन्य ठिकाणी देखील हीच कार्यपद्धती अस्तित्वात असण्याची समितीला खात्री आहे. समितीसमोर साक्षीसाठी येण्याअगोदरच या प्रकरणातील दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करूनच विभागाने समितीपुढे येणे आवश्यक होते. परंतु तसे न करता आता समितीसमोर हे आक्षेप विभाग केवळ मान्य करीत आहे व अद्यापही कोणतीही कारवाई संबंधितांवर करण्यात आलेली नाही. समितीने साक्षीदरम्यान दोषींवर तात्काळ कारवाई करण्याबाबत निदेश दिले असता विभागाने दोषींवर कारवाई करण्यासंदर्भात समितीला आश्वासित केले. तरीही केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला अद्यापही सादर करण्यात आला नाही. या संपुर्ण प्रकरणी विभागाची उदासिनता असून या सर्व बाबी समितीचा अवमान करणाऱ्या देखील आहेत याबाबत समिती तीव्र नापसंती व खेद व्यक्त करीत आहे. विभागाने या प्रकरणी दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी. या प्रकरणी सामाजिक न्याय विभाग तसेच ग्रामविकास विभागांतर्गत येणाऱ्या दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर त्या त्या विभागाने तात्काळ कारवाई करावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस २ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.२१ सदरहू योजनेंतर्गत दलित वस्त्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानाची निश्चिती ही लोकसंख्येच्या आधारावर करण्यात आलेली असून विभागाव्दारे १० ते ३०० लोकसंख्या असलेल्या वस्तीसाठी ठरविण्यात आलेली अनुदानाची रक्कम रु. २ लाख ते १५ लाख दरम्यान आहे आणि ३०० पेक्षा जास्त लोकसंख्येसाठी रु. २० लाख आहे. एवढेच नव्हेतर या योजनेंतर्गत करावयाच्या कामाची आर्थिक मर्यादा सद्य:स्थितीत केवळ रु. ३ ते २० लाख एवढी आहे. ही मर्यादा २० ते २५ वर्षापूर्वी निश्चित झालेली आहे. सद्य:स्थितीत या निधीमध्ये कोणतेही काम पुर्ण होणे शक्य नाही. त्यामुळे ही मर्यादा वाढवून रु. ५ ते ४० लाख करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.२२. महालेखाकारांनी आक्षेपित केलेल्या कालावधीदरम्यान योजनेच्या अंमलबजावणीत मार्गदर्शक तत्वांचे अनेक ठिकाणी उल्लंघन झालेले असून त्यात अनेक दोष व त्रुटी दिसून आल्या. त्या सर्व बाबींची विभागाने तपासणी करून दिलेल्या अनुदानाचा त्यातून झालेल्या कामांचा व खर्चाचा तपशील अद्ययावत करून घेण्यात यावा. तसेच नियमितरित्या खर्चाचा ताळमेळ करण्यात यावा. समाजकल्याण विभागाने दि.२२ डिसेंबर, २०१६ अन्वये बृहत आराखडा तयार करण्यासाठी प्रमाण प्रपत्र (**Standard Format**) विहित केले असून सर्व जिल्हा परिषदांना याच प्रपत्रात आराखडा तयार करण्याचे निदेश देण्यात आले. याची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी आवश्यकती उपाययोजना व नियंत्रण विभागाच्या स्तरावरुन ठेवण्यात यावे व कोणत्याही परिस्थिती बृहत आराखड्याशिवाय तसेच सदोष आराखड्यामुळे योजनेच्या अंमलबजावणीत मुलभूत धोरणाचे व त्यासाठीच्या अनिवार्य बाबींचे पालन करताना त्यात अडथळा निर्माण होणार नाही तसेच कोणतेही दोष व त्रुटी राहू नये याची नियोजन व दक्षता विभागाने भविष्यात करावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.२३. या योजनेंतर्गत निधीचे वाटप सामाजिक न्याय विभागाकडून जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्राम पंचायत अशा क्रमाने होत असते. अंतिमतः निधी खर्च करण्यास ग्राम पंचायतीला प्राप्त होईस्तोवर आर्थिक वर्ष संपते. त्यामुळे आर्थिक वर्षात निधी देवूनही त्याचा उपयोग गाव पातळीपर्यंत विहित वेळेत पुर्णपणे होवू शकत नाही. कित्येकदा मंजूर झालेला पुर्ण निधी देखील देण्यात येत नाही. एवढेच नव्हेतर या निधींतर्गत करावयाच्या कामाचे नियोजन करण्यासाठी दर तीन महिन्यांनी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची बैठक घेणे अनिवार्य असताना ती नियमितरित्या न झाल्यामुळे कामांची निश्चिती वर्षअखेरपर्यंत होवू शकत नाही. त्यामुळे हा निधी विहित वेळेत खर्च करण्यास अडचणी येतात, परिणामी निधी अखर्चित राहतो. कित्येकदा निधी खर्च करण्याचे कोणतेही नियोजन विभागाकडे नसताना प्रथम निधी जिल्हा परिषदेला देण्यात येतो व त्यानंतर आराखडा तयार करण्याचे काम सुरू होते. परिणामी आर्थिक वर्षात हा निधी खर्च होवू शकत नाही. अशा परिस्थितीत निधी नियमानुसार व वेळेत खर्च होण्यासाठी प्रथम आराखडा मंजूर केल्यानंतरच अनुदान वितरीत करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी व करण्यात येणारी कामे ही बृहत आराखड्यानुसारच करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

**२.१.२.२ "अनुदान वाटपासाठी वस्तींची प्राधान्यक्रम सुची तयार न करणे"**

**अभिप्राय :**

**१.२४.** सामाजिक न्याय विभागाने वस्तींना खालील प्राधान्य क्रमानुसार अनुदान वाटपाचे निर्देश दिले.

**प्रथम प्राधान्य :** ज्या वस्त्यांनी कधीही कोणतेही लाभ घेतले नाही.

**दुसरे प्राधान्य :** एका विशिष्ट बृहत आराखड्याच्या पाच वर्षांच्या कालावधीत ज्या वस्तींना अंशतः अनुदान देण्यात आले.

**तिसरे प्राधान्य :** एका विशिष्ट बृहत आराखड्याच्या कालावधीत घेण्यात आलेल्या वस्तींची उरलेली कामे पूर्ण करण्यासाठी पुन्हा घेण्यात यावे.

**चौथे प्राधान्य :** ज्या वस्तींना एका विशिष्ट बृहत आराखड्याच्या कालावधीत दोन वेळा घेण्यात आले आहे, त्या वस्तींना उरलेली कामे पूर्ण करण्यासाठी पुन्हा घेण्यात यावे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि. ५/१२/२०११ रोजीच्या शासन निर्णयामधील निर्देशानुसार गट विकास अधिकारी यांनी वस्त्यांची प्राधान्यक्रम यादी तयार करणे व त्यानुसार परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा परिषदेस सादर करून त्या प्राधान्यक्रमानुसार गटविकास अधिकाऱ्यांनी त्यांच्या गटातील वस्तींची प्राधान्यक्रम सुची तयार करून कामांचे प्रस्ताव मंजूरीसाठी जिल्हा परिषदेकडे सादर करावयास पाहिजे होते. परंतु काही गट विकास अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिकार क्षेत्राखालील वस्तींची प्राधान्यक्रम सुची तयार केली नव्हती. त्यामुळे २००८-१३ च्या बृहत आराखड्यातील २१३१ गरजू वस्तींना योजनेच्या लाभापासून वंचित करण्यात आले.

**शिफारस :**

**१.२५. अनुदान वाटपासाठी वस्तींची प्राधान्यक्रम सूची तयार न केलेबाबतचे गंभीर आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आहेत. अनुदान वाटपासाठी वस्तींची प्राधान्यक्रम सूची तयार न केल्याबाबत समितीने विचारणा केली असता संबंधितांना यासंदर्भात कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. यावर समितीने तीव्र आक्षेप नोंदवित महालेखापरीक्षकांचा सदरहू अहवाल सभागृहाला सादर होऊन जवळजवळ ३ वर्षांचा कालावधी उलटूनही या आक्षेपांची कोणतीही गंभीर दखल विभागाने घेतली नाही. केवळ लोकलेखा समितीने या परिच्छेदासंदर्भात साक्ष लावल्यानंतर आता विभागाने या प्रकरणी कारणे दाखवा नोटीस बजावली. यावरुनच विभाग दोषींवर कारवाईबाबत किती गंभीर आहे हे स्पष्ट होते. विभागाच्या शासन निर्णयामध्ये वस्त्यांची प्राधान्यक्रम यादी तयार करणे बंधनकारक असतानाही त्याचे पालन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून झाले नाही. याबाबत समितीने विचारणा केली असता प्राधान्यक्रम सूची जरी तयार केली नाही तरीही कामांचे वाटप करताना शासन निर्णयातील विहित प्राधान्यक्रमाचे कोठेही उल्लंघन न करता कामांचे वाटप केल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. यावर समितीने तीव्र आक्षेप नोंदवित जर प्राधान्यक्रमाची सूचीच तयार नाही तर विभागाने कशाच्या आधारे कामांचे वाटप केले व कोठेही प्राधान्यक्रमाचे उल्लंघन झाले नाही असे विभाग खात्रीलायक रित्या म्हणूच शकत नाही व समिती ते मान्यदेखील करू शकत नाही. लोक आग्रहास्तव किंवा लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार आणि कामाची तातडी व महत्व लक्षात घेता अपवादात्मक परिस्थितीत काही कामांचा प्राधान्यक्रम बदलल्यास एकवेळ समिती मान्य करू शकते. परंतु जर प्राधान्यक्रमच निश्चित नाही तर पुर्ण केलेल्या कामांचा क्रम हा प्राधान्यक्रमानुसारच असल्याची खात्री विभाग देऊ शकत नाही. तरीही विभागाने आजतागायत संबंधितांवर कोणतीही कारवाई केली नाही. विभागाने यासंदर्भात शासन निर्णय निर्गमित केला नसता तर हे आक्षेपदेखील महालेखापरिक्षकांनी नोंदविले नसते. परंतु जर विभाग शासन निर्णय काढून याची अंमलबजावणी बंधनकारक करीत असेल तर त्याचे पालन करणे ही पुर्णतः विभागाच्या अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे. अतः ज्यांनी शासनाच्या निर्देशाचे पालन केले नाही व मागणी वा मनाप्रमाणे कामे केली त्यांचेवर १ महिन्याच्या आत कारवाई करून समितीस सादर करणेबाबत समितीस आश्वासित करण्यात आले. परंतु अद्यापही ही माहिती समितीस अप्राप्त आहे, ही अत्यंत गंभीर बाब असून समितीचा अवमान करणारीदेखील आहे. अतः विभागाने अनुदान वाटपासाठी वस्तींची प्राधान्यक्रम सूची तयार करण्याच्या तरतूदींची काटेकोर व तंतोतंत अंमलबजावणी करावी व त्यातील प्राधान्यक्रमानुसारच निधीचे व कामाचे वाटप व नियोजन करण्यात यावे. तसेच सदरहू आक्षेपित प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी. तसेच समितीला आश्वासित करूनदेखील माहिती न देणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवरदेखील कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस २ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**२.१.२.३ ''बृहत आराखडा तयार करण्यासाठी अधिक लोकसंख्या गृहीत धरणे''**

**अभिप्राय :**

**१.२६.** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने निर्गमित केलेल्या सुचनांनुसार ग्रामपंचायत व पंचायत समित्यांनी २०१३-१८ साठी बृहत आराखडा तयार करतेवेळी अनुसूचित जाती व नवबौद्धांच्या लोकसंख्येचा अंदाज बांधण्यासाठी २०११ च्या जनगणनेचा अवलंब करावयाचा होता.

तरीही जिल्हा परिषद लातूरच्या दोन (चाकूर व लातूर) गटांमधील ६५२ वस्तींपैकी ३७ वस्तींमध्ये जरी जनगणना २०११ नुसार अनुसूचित जाती व नवबौद्धांची लोकसंख्या ३०० पेक्षा कमी होती. तरीही २०१३-१८ च्या बृहत आराखड्यात लोकसंख्या ३०० पेक्षा अतिशय जास्त गृहीत धरली होती. ज्यामूळे या ३७ वस्तींना जास्त अनुदान वाटप करण्यात आले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

लातूर जिल्हा परिषदेमध्ये सन २०१३-१८ या कालावधीत वस्तीची लोकसंख्या बृहत आराखडा तयार करताना ३१ ते ३७८ टक्केच्या फरकाने घेण्यात आली. ज्या दिवशी गावामध्ये ठराव होतो त्या ठरावाच्या वेळी गावातील प्रत्यक्षात लोकसंख्या जी असेल ती ग्राह्य धरुन अनुज्ञेयता ठरविणे अपेक्षित होते. प्रत्यक्ष लोकसंख्या पाहता त्यात इतक्या मोठ्या प्रमाणात वाढ होणे कदापि शक्य नाही. त्यामुळे प्रत्यक्ष लोकसंख्येपेक्षा जास्त लोकसंख्या गृहीत धरुन ही गणना केल्यामुळे ती वस्तुस्थितीदर्शक नसल्याचे दिसून येते. या मागील कारणे समितीने विचारली असता लातूर जिल्ह्यातील १० गावांना अधिकाऱ्यांनी भेट दिली असून लोकसंख्येच्या प्रमाणातच निधी देण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. एखाद्या गावातील लोकसंख्या इतक्या कमी कालावधीत ३७८ टक्के वाढणे शक्य नाही. ग्रामपंचायती क्षेत्रात १० ते ३० टक्क्यांच्या वर लोकसंख्या वाढत नाही. त्यामुळे निश्चितच विभागाने जास्तीची लोकसंख्या गृहित धरल्याचे दिसून येते. त्यामुळे ही लोकसंख्याच मूळात विवादीत आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे.

**शिफारस :**

**१.२७. बृहत आराखडा तयार करण्यासाठी अधिक लोकसंख्या गृहीत धरण्यात आली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत. प्रत्येक गावातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील लोकसंख्या विचारात घेऊन त्याआधारे दलित वस्त्या घोषित करून त्यांना निधीचे वाटप करणे आवश्यक व बंधनकारक आहे. असे असताना ग्राह्य धरण्यात आलेली लोकसंख्याच जर विवादित असेल तर दलित वस्त्यांना झालेले निधीचे वाटप हे निश्चितच लोकसंख्येला न्याय देणारे नाही. परिणामी पात्र दलित वस्त्या अनुदानाच्या लाभापासून वंचित राहिल्या व काही वस्त्यांना अनुज्ञेय मर्यादेपेक्षा अधिक अनुदान प्राप्त झाले. शासन निर्णयानुसार जनगणनेनुसार नव्हेतर प्रत्यक्षात लोकसंख्या गृहित धरणे बंधनकारक आहे. ज्या योजनेच्या अंमलबजावणीसाठी व अनुदानाच्या रकमेच्या निश्चितीसाठी लोकसंख्या हाच जर पुर्ण आधार आहे, तर अशा लोकसंख्येची गणना ही वास्तववादी, वस्तुस्थितीवर आधारित व अचूक असणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष लोकसंख्येच्या गणनेमध्येच जर दोष वा त्रुटी असतील तर निधीचे वाटप हे गुणवत्तेनुसार निश्चितच होऊ शकणार नाही. महालेखापालांनी तपासणी केलेल्या ६५२ पैकी ३७ वस्त्यांमध्ये दिसून आलेल्या या तफावतीबाबत समितीने विचारणा केली असता या ३७ गावांची यादीच विभागाकडे नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. हीदेखील अतिशय गंभीर बाब असून महालेखापालांनी आक्षेप नोंदविल्यानंतर जवळजवळ ३ वर्षांचा कालावधी उलटून गेल्यावरही अद्याप आक्षेपित गावांची यादीच जर विभागाकडे उपलब्ध नाही किंवा ती महालेखाकार कार्यालयाकडून प्राप्त करून घेण्याची तसदीदेखील विभागाने घेतली नाही तर ही निश्चितच अतिशय गंभीर बाब आहे. केवळ लोकलेखा समितीची साक्ष लागल्यामुळे आता ही तपासणी विभागाने सुरू केली. समिती यासंदर्भात तीव्र नापसंती व्यक्त करीत असून विभागाने या ३७ गावांची यादी महालेखाकार कार्यालयाकडून घेऊन त्या गावांमधील सन २०११ च्या जनगणनेनुसार असलेली लोकसंख्या व प्रत्यक्षात असलेल्या लोकसंख्येची आकडेवारी तपासून घ्यावी व त्यातील तफावत निश्चित करून सदरहू माहिती महालेखाकार कार्यालयाकडून तपासून घेऊन १ महिन्याच्या आत समितीस सादर करावी असे निदेश समितीने देवूनही आश्वासित माहिती समितीस देण्यात आली नाही हीदेखील अतिशय गंभीर बाब आहे. अतः विभागाने महालेखाकार कार्यालयाकडून गावांची यादी घेऊन तेथील लोकसंख्येची तसेच झालेल्या अनुदान वाटपाची तपासणी करून त्यासंबंधीचा अहवाल दोषींवरील कारवाईसह महालेखाकारांमार्फत तपासणी करून समितीस सादर करावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**२.१.३ ''आर्थिक व्यवस्थापन''**

**२.१.३.१ ''आयुक्तस्तरावर खर्चाच्या आकडेवारीचे चुकीचे संकलन''**

**अभिप्राय :**

**१.२८.** अधिसुचित वस्तींमध्ये विविध कामे निष्पादित करण्यासाठी सामाजिक न्याय विभागामार्फत जिल्हा परिषद, पंचायत समिती व नंतर ग्रामपंचायत यांना अनुदान वितरीत होते. २०१०-१५ दरम्यान अधिसुचित वस्त्यांमध्ये कामे निष्पादित करण्यासाठी विभागाने ३५ जिल्हा परिषदांना रु. २००२.३१ कोटी वितरीत केले. ज्यात राज्य सार्वजनिक बांधकाम विभाग यांना थेट वितरीत केलेले रु. ३०९.६८ कोटी समाविष्ट होते व रु. २००२.३१कोटीचे संपूर्ण अनुदान २०१०-१५ दरम्यान जिल्हा परिषदांनी खर्च केले. परंतु जिल्हा परिषदांनी रु. ६१३ कोटी एकूण उपलब्ध अनुदानापैकी फक्त रु. ३२४.८६ कोटी पंचायत समित्यांना वितरीत केले. अशा प्रकारे या जिल्हा परिषदेजवळ २०१०-१५ मध्ये रु. २८८.१४ कोटी अखर्चित अनुदान शिल्लक होते. ज्यावरुन असे निदर्शीत होते की, विभागाच्या स्तरावर संकलित केलेली खर्चाची रक्कम (रु. २००२.३१कोटी) बरोबर नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे.

विभागाने जिल्हा परिषदेला या कामांसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिल्यानंतरही तो पुर्णपणे खर्च होवू न शकणे ही बाब देखील योग्य व समर्थनीय नाही. ८ जिल्हापरिषदांमध्ये रु. ६१३ कोटी उपलब्ध करून दिले असताना केवळ रु. ३२४ कोटीचे वाटप करण्यात आले. याचा अर्थ जवळजवळ ४५ टक्के निधी पडून आहे. महालेखाकारांनी नमुन्यादाखल तपासणी केलेल्या या ८ जिल्हा परिषदांच्या तुलनेत संपुर्ण राज्याची परिस्थिती अधिकच गंभीर असण्याची पुर्ण शक्यता आहे. याहीउपर महालेखाकारांनी खर्चाची रक्कम रु. २००२ कोटी अशी नमूद केली असताना विभागाने दिलेल्या माहितीमध्ये मात्र ही रक्कम रु. १६१७ कोटी असल्याचे नमूद आहे. ही रु. ३८५ कोटीची तफावत येण्याची कारणे समितीने विचारली असता रु. २००२ कोटीची आकडेवारी चुकीची असून आता विभागाने तपासलेली आकडेवारी ही रु. १६१७ कोटी असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. विभागाने आता दिलेली माहिती व आकडेवारी समितीने नाकारण्याचे कोणतेही कारण नाही. परंतु त्याचवेळी महालेखाकारांनी विभागाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरुनच ही आकडेवारी निश्‍चित केलेली असताना हा रु. २००२ कोटीचा आकडा कसा व कोठून आला याचेदेखील निराकरण होणे समितीला आवश्यक वाटते. विभागाने दिलेला निधी खर्चासाठी जिल्हा परिषदेकडे केवळ वर्ग केला म्हणजे तो खर्च झाला असे जर विभाग समजत असेल तर ही संपुर्ण आकडेवारीच चुकीची व दिशाभूल करणारी ठरेल असे समितीचे स्पष्ट आहे.

**शिफारस :**

**१.२९. या योजनेंतर्गत सामाजिक न्याय विभागाकडून निधी जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत अशा क्रमाने वितरीत होतो. अशा परिस्थतीत प्राप्त पुर्ण निधी प्रत्येक स्तरावरुन खाली वितरीत होत नाही. निधी या योजनेंतर्गत कामांवर वास्तविकरित्या खर्च होणे अभिप्रेत असताना केवळ जिल्हा परिषदेकडे निधी वर्ग केला म्हणजे तो खर्च झाला असे विभाग कदापि म्हणू शकत नाही. जिल्हा परिषदेमार्फत ग्रामपंचायतीपर्यंत निधी एकाचवेळी पुर्णपणे दिला जात नाही. त्यामुळे तो पुर्णपणे खर्चदेखील होत नाही. जिल्हा परिषदेला निधी खर्च करण्याची मुदत २ वर्षे असल्यामुळे हा निधी जिल्हापरिषदेकडे वर्ग करणे हा सोईस्कर उपाय अवलंबून विभागाच्या स्तरावर हा निधी खर्च झाल्याचे दर्शविण्यात येते व यानंतर विभागाची या निधीबाबत काही जबाबदारी नसल्यासारखे विभाग वागते. परंतु जिल्हा परिषदेच्या स्तरावरुन हा निधी कामाच्या टप्प्याटप्प्याने पंचायत समितीकडे वितरीत होतो. ग्रामपंचायतीपर्यंत निधी वितरीत होऊन त्याचा पुर्ण उपयोग होऊन तो खर्च झाल्याची काळजी विभाग घेत नाही. त्यामुळेच महालेखाकारांनी नोंदविलेले सदरहू आक्षेप वस्तुस्थितीला धरुन तर आहेच परंतु निधीच्या नियोजनासंदर्भात ही बाब निश्‍चितच गंभीर आहे. अशा परिस्थितीत विभागाने पुढे जिल्हा परिषदेला निधी दिला म्हणजे तो खर्च झाला असे न समजता ते पुढे वितरीत केले असे म्हणणे आवश्यक आहे व शेवटच्या स्तरावर हा निधी खर्च झाल्यानंतरच तो खर्च झाल्याचे समजून उर्वरित अखर्चित निधी समर्पित करण्याची भूमिका विभागाने व अंतिमतः शासनाने घेतली पाहिजे. अनेक विभागांतर्गत आर्थिक तरतूदींचे वितरण करताना वित्तीय नियमांचे पालन करूनच व अनेक तांत्रिक कार्यपद्धतीचा अवलंब करूनच हा निधी विभाग, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत अशा क्रमाने वितरीत होतो. अशा परिस्थितीत प्राप्त निधीच्या खर्चाचा वस्तुस्थितीदर्शक तपशील पारदर्शकरित्या उपलब्ध असणे आवश्यक आहे. उपरोक्त आक्षेपान्वये विभागाकडे प्राप्त निधीमधून खर्चाची विगतवारी उपलब्ध नाही. किती निधी प्राप्त झाला, किती जिल्हा परिषदेला दिला, तेथून किती पंचायत समिति व ग्रामपंचायतीला वितरीत झाला व किती निधी वस्तुतः खर्च झाला याचा संपुर्ण तपशील व माहिती विभागाकडे उपलब्ध नसेल तर विभागाने असा थेट निधी देणे बंदच करावे. त्याऐवजी आता ग्रामविकास विभागाने निधी वितरणाची जी नवी पद्धत**

**प्रायोगिक तत्त्वावर अवलंबिलेली आहे त्याचा अवलंब करावा व त्याप्रमाणे कार्यवाही करणे निश्चितच लाभदायक ठरेल. सध्या ग्रामविकास विभागामध्ये अस्तित्वात असलेल्या पद्धतीनुसार विभाग केवळ नियतव्यय मंजूर करते परंतु निधी वितरीत केला जात नाही. जिल्हापरिषदेने त्यांचे देयक केवळ बीडीएस वर सादर केल्यास त्याची प्रतिपूर्ती होते. त्यास विभागाला पुन्हा वित्त विभागाच्या मान्यतेची आवश्यकता नाही. ही प्रायोगिक तत्त्वावरील अवलंबिलेली कार्यपद्धती राज्यात यशस्वी होत आहे. एकीकडे शासन ओव्हरड्राफ्ट घेऊन निधी मंजूर करतो व दुसरीकडे हा निधी खर्च न करता पडून राहणे ही बाब निश्चितच आर्थिक नियोजनाचा अभाव दर्शविणारी आहे. ज्यात शासनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान तर होतेच परंतु शासनस्तरावरुन निधीचे एकत्रित नियोजनदेखील अचूकरित्या होऊ शकत नाही. अतः ग्रामविकास विभागाने प्रायोगिक तत्वावर अवलंबिलेल्या पद्धतीचा अवलंब विभागाने करावा व निधी वस्तुतः खर्च होईपर्यंत ग्रामपंचायत स्तरापर्यंत त्याचा पाठपुरावा करावा ग्रामपंचायतीनेदेखील हा निधी वेळेत खर्च करावा व तसे न झाल्यास अखर्चित निधी ग्रामपंचायतीनेदेखील निधी वेळेत समर्पित करण्याची कार्यवाही करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी. तसेच महालेखाकारांनी आक्षेपात अंतिम केलेली आकडेवारी व विभागाच्या आकडेवारीमध्ये तफावत येत असल्यामुळे अंतिम सुधारीत लेखे मंजूर होईपर्यंत विभागाने महालेखाकारांना दिलेली माहिती ही चूकीची असल्याचे दिसून येते. अशापरिस्थतीत विभागाने महालेखाकार कार्यालयाबरोबर खर्चाचा ताळमेळ (Reconciliation) करून घ्यावा व संपुर्ण आकडेवारीतील तफावत निश्चित करून त्यामागील कारणमीमांसादेखील तपासावी व समितीस १ महिन्यात सादर करावी असे समितीने निदेश दिले. परंतु अद्यापही सदरहू आश्वासित माहिती समितीस अप्राप्त आहे. त्याअनुषंगाने तात्काळ कार्यवाही करून समितीस २ महिन्यांत माहिती देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**२.१.३.२ "अनुदानाच्या वाटपातील विलंब"**

**अभिप्राय :**

**१.३०.** योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार कामांची निवड करणे, कामांना प्रशासनिक मान्यता प्रदान करणे आणि ग्रामपंचायतस्तरापर्यंत अनुदानाचे वाटप करणे ही संपूर्ण प्रक्रिया दरवर्षी सप्टेंबर अखेरपर्यंत पुर्ण व्हावयास पाहिजे आणि शक्यतोवर कामे त्याच आर्थिक वर्षात पूर्ण करावयास पाहिजे किंवा जास्तीस जास्त प्रशासनिक मान्यता मिळाल्याच्या तारखेपासून एक वर्षात पूर्ण करावयास पाहिजेत. परंतु अनेक जिल्हा परिषदांना अनुदान वाटप करण्यात विभागाव्दारे एक ते सहा महिन्यांचा विलंब झाला. २६ प्रकरणांत अगदी आर्थिक वर्षाअखेर अनुदान वाटप करण्यात आले. परिणामी पुढे पंचायत समिती व ग्रामपंचायतींना अनुदान वाटप करण्यात आणखी एक ते सहा महिन्यांचा विलंब झाला असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**शिफारस :**

**१.३१. अनुदानाच्या वाटपातील विलंबामुळे ही कामे त्या त्या आर्थिक वर्षात पुर्ण होत नाहीत. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक दवसु-२०११/प्र.क्र. ४४२/अजाक, दिनांक ५/१२/२०११ मधील तरतूदीनुसार सदर योजनेंतर्गत दरवर्षी माहे सप्टेंबरपूर्वी कामांची निवड करणे अपेक्षित आहे. मात्र प्रत्यक्षात तालुकास्तरावरुन प्रस्ताव प्राप्त होणे, सदर प्रस्तावांची छाननी करणे, सदर प्रस्ताव समाजकल्याण समितीच्या बैठकीत ठेवून त्यास मंजूरी घेणे व त्याबाबतचे प्रशासकीय मान्यता आदेश निर्गमित करणे यासाठी विलंब होतो ही वस्तुस्थिती आहे.**

**सदरहू योजनेंतर्गत राज्य शासनाकडून देण्यात येणारा निधी असला तरीही त्यासाठी या क्लिष्ट व वेळखाऊ कार्यपद्धतीमुळे हा निधी खर्च करणेसाठी फार कमी वेळ उपलब्ध होतो. जिल्हा परिषदेच्या स्तरावर या बैठका नियमित होत नसल्यामुळे निधी अखर्चित राहतो. निधी खर्च करणेबाबत जिल्हा परिषदेच्या अधिकारात कोणतीही बाधा आणण्याचा समितीचा हेतू नाही. परंतु शासनाकडून अशा सार्वजनिक हिताच्या योजनेंतर्गत देण्यात येणारा निधी पुर्णतः व त्या त्या आर्थिक वर्षात व वेळेत खर्च होण्यासाठी आवश्यक त्या कार्यपद्धतीचा अवलंब विभाग/जिल्हा परिषद/पंचायत समिती/ग्रामपंचायत या सर्वांनीच करणे आवश्यक आहे. यासाठी विभाग ते ग्रामपंचायतपर्यंतची संपुर्ण कार्यपद्धती व प्रक्रिया विहित वेळेत पार पाडणे आवश्यक आहे, जेणेकरून हा निधी वेळेत खर्च करणे शक्य होईल. यासाठी शासन निर्णयात नमूद कालमर्यादेचे पालन योग्यरित्या केल्यास ही कामे वेळेत होणे शक्य आहे. ५ वर्षांचा आराखडा मंजूर केल्यानंतर त्याप्रमाणे कामे केल्यास अडचणी निर्माण होवू शकणार नाहीत. सर्व प्राप्त निधीचे निर्धारण करण्याचे अधिकार जिल्हा परिषदेला आहेत. जिल्हा परिषदेला बृहत आराखड्याचे पालन करून कामाची प्राधान्यक्रम सूची तयार करून त्यास जिल्हा परिषदेची मान्यता घ्यावी लागते. जर त्यांना डावलून समाजकल्याण अधिकाऱ्यांच्या शिफारशीवर किंवा समाजकल्याण समितीच्या शिफारशीवर कामाला मान्यता दिली तर त्यांच्या अधिकारांवर गदा आणण्याचे**

**काम होईल. अशा प्राप्त परिस्थितीत शेवटच्याक्षणी व अंशतः निधी वितरणाला समितीचा विरोध आहे. दिलेला निधी वेळेत खर्च करता येऊ शकेल अशा कालमर्यादतेच हा निधी देण्यात यावा. प्राप्त होणाऱ्या निधीचे नियोजन करण्याइतका कालावधी तरी त्या संस्थांना दिला पाहिजे. अतः विभागाने जिल्हा परिषदांना अनुदानाचे वाटप वेळेवर करावयाची खातरजमा करावयास पाहिजे, जेणेकरून ग्रामपंचायतीद्वारे वस्तींना कार्यक्षमतापूर्वक सेवा देता येईल. अशा परिस्थितीत ग्रामविकास विभागाने अवलंबिलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब अन्य विभागाने करणे अधिक उपयोगी ठरेल असे समितीचे स्पष्ट मत आहे. सद्यःस्थितीत निधी वितरणाची पद्धत, स्तर व साखळी ही वेळखावू असून अंतिमतः निधी प्राप्त होईपर्यंत व तो खर्च करेपर्यंत आर्थिक वर्ष संपून जाते. यासाठी बृहत आराखडादेखील विहित वेळेत करणे आवश्यक आहे. त्यामुळे आराखड्याप्रमाणे उपलब्ध निधीच्या मर्यादेत जिल्हा परिषदेने काम मंजूर करून घ्यावे. अशा पद्धतीने या कामांचे व निधीचे नियोजन करावे व त्याप्रमाणे आदेश काढावे असे निदेश समितीने दिले, त्याची अंमलबजावणी करण्यात यावी तसेच ग्रामपंचायतस्तरापर्यंत अनुदानाचे वाटप दरवर्षी सप्टेंबर अखेरपर्यंत पुर्ण करावे व त्यांनीदेखील कामे विहीत वेळेत पूर्ण करून उपयोगिता प्रमाणपत्र पंचायत समितीला सादर करावे. तसेच सामाजिक न्याय विभागाच्या दि.५/१२/२०११ च्या शासन निर्णयात नमूद कालमर्यादेत या कामांचे नियोजन करावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**२.१.३.३ "वस्तींना अनुज्ञेयतेपेक्षा जास्त अनुदानाचे वाटप"**

**अभिप्राय :**

**१.३२.** योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार प्रत्येक वस्तीस द्यावयाच्या अनुदानाची कमाल अनुज्ञेयता अनुसूचित जाती आणि नवबौद्ध यांच्या लोकसंख्येच्या आधारावर ठरविण्यात येते. परंतु अंबेजोगाई, भद्रावती, चाकूर आणि चिमूर या चार गटांमधील आठ वस्तींना २०१०-१५ दरम्यान अनुज्ञेय अनुदानापेक्षा रू.१३.५३ लाख अनुदान जास्त देण्यात आले. या प्रकरणी अनूसूचित जाती आणि नवबौद्धांच्या लोकसंख्येचा अंदाज बरोबर घेतला होता परंतू त्यांनी मार्गदर्शक तत्त्वांनुसार अनुदानाची अनुज्ञेयता ठरवितांना चूक केली होती. यामुळे इतर गरजू वस्तीं योजनेच्या तेवढया रकमेच्या लाभापासून वंचित झाल्या असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**शिफारस :**

**१.३३. सदरहू परिच्छेदाअंतर्गत वस्तींना अनुज्ञेयतेपेक्षा जास्त अनुदान वाटप झाल्याचे आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. नियमाप्रमाणे अनुज्ञेय असलेल्या अनुदानापेक्षा जास्त अनुदान देण्याची कारणमीमांसा समितीने विचारली असता जुन्या पुस्तकातील प्रपत्र-६ नुसार रु. ९० लाख जास्तीचे दिले असल्याचे विभागाने मान्य केले. प्रत्येक जिल्ह्याला लोकसंख्येनुसार अनुदान दिल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. फक्त औरंगाबादबद्दल माहिती प्राप्त झालेली नाही. त्यासंदर्भात उपआयुक्त यांना चौकशीचे आदेश देण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. हा अहवाल १ आठवड्यात प्राप्त करून समितीस सादर करण्यात येईल असे आश्वासित करण्यात आले. विभागाने सिल्लोड तालुक्यातील ५ व कन्नड तालुक्यातील ५ अशा १० ग्रामपंचायतींच्या केलेल्या तपासणीमध्ये जास्त निधी दिल्याचे दिसून आले नाही व उर्वरित जिल्हापरिषदेचा अहवाल मागविण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. अतः वस्तींना अनुज्ञेयतेपेक्षा जास्त अनुदानाचे वाटप झाले आहे किंवा कसे याची पुर्ण तपासणी करावी व ही माहिती महालेखाकारांकडून तपासून घ्यावी व जास्त अनुदानाचे वाटप झालेले असल्यास अतिरिक्त निधीबाबत नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी तसेच यात जबाबदार असणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**१.३४. सदरहू प्रकरणी महालेखाकारांच्या आक्षेपानंतरही तपासणी करण्यास लागलेल्या विलंबाची कारणे समितीने विचारली असता महालेखापरिक्षकांचा अहवाल उशिरा प्राप्त झाल्यामुळे चौकशी करण्यास विलंब झाल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. यावर समितीने तीव्र आक्षेप नोंदवित महालेखापालांनी सदरहू आक्षेप हे सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी नोंदविलेले आहेत व हे आक्षेप नोंदविण्याची कार्यपद्धती अतिशय सुस्पष्ट व पारदर्शक असून तो अहवाल सभागृहाला सादर झाल्यानंतर संकेतस्थळावरच उपलब्ध असतो. गत ३ ते ४ वर्षांत विभागाने या गंभीर आक्षेपांची साधी माहिती व दखलही घेतली नाही. अशा परिस्थितीत लोकलेखा समितीची साक्ष लागेपर्यंत महालेखाकारांच्या अहवालात विभागाबाबत गंभीर आक्षेप नोंदविल्याची माहितीदेखील जर विभागाकडे उपलब्ध नसेल तर ही अधिकच गंभीर बाब आहे. त्यामुळे विलंबाची ही कारणे समिती कदापि मान्य करू शकत नाही. महालेखाकारांच्या प्रत्येक अहवालात आपल्या विभागाशी निगडीत आक्षेपासंदर्भातील परिच्छेद बघण्याची जबाबदारी त्या त्या विभागाचीच आहे. त्यामुळे सदर प्रकरणी विलंबास जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल असे**

**विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर आश्वासित केले. परंतु अद्यापही ही आश्वासित माहिती समितीस अप्राप्त आहे. अतः या प्रकरणी विलंबास जबाबदार असणाऱ्या व समितीस आश्वासित करूनही माहिती न देणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**२.१.३.४ "कामे मंजूर न करणे आणि अनुदान प्रत्यर्पित करणे"**

**अभिप्राय :**

**१.३५.** जिल्हा परिषद, औरंगाबाद आणि जिल्हा परिषद, अकोला येथे बृहत आराखडा २००८-१३ मध्ये आधीच अंतर्भूत असलेल्या कोणत्याही कामांना प्रशासनिक मान्यता दिली नाही जेव्हा की जिल्हा परिषदांजवळ अनुक्रमे रू.१.०६ कोटी आणि रू.५.५५ कोटी अनुदान त्या त्या आर्थिक वर्षाअखेर उपलब्ध होते. याशिवाय, निवडलेल्या आठपैकी चार (अकोला, औरंगाबाद, चंद्रपूर आणि लातूर) जिल्हा परिषदांनी रु. २.४४ कोटी अखर्चित अनुदान विभागाला २०११-१४ दरम्यान प्रत्यर्पित केले आणि बृहत आराखड्यातील अनेक कामे अनिष्पादित सोडून दिली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**शिफारस :**

**१.३६. विभागाला प्राप्त होणाऱ्या निधीमधून कामे मंजूर न करणे व निधी समर्पित करणे हा मूळ आक्षेप महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेला असून जिल्हापरिषदेने कामाचे नियोजन उशिरा केल्यामुळे निधी समर्पित करावा लागलेला आहे. या सर्व प्रक्रियेमध्ये नियोजनाचा अभाव राहिल्यामुळे प्राप्त निधी जिल्हापरिषदेला खर्च करता आला नाही. शासनाकडून निधी मागताना त्याच्या खर्चाचे कोणतेही नियोजन विभागाकडे निधी प्राप्त होईस्तव नसते अथवा त्याची कोणतीही रुपरेषा वा आराखडा तयार नसते. निधी प्राप्त झाल्यानंतर कामांच्या नियोजनासंदर्भातील संपुर्ण कार्यपद्धती नव्याने सुरू होते व हा निधी त्यामुळे विहित वेळेत खर्च होवू शकत नाही. औरंगाबाद, अकोला, रत्नागिरी आणि नाशिक जिल्ह्यात हिच परिस्थिती असून अखेरपर्यंत निधी अखर्चित राहिल्यामुळे तो समर्पित करण्यात आला. या प्रकरणी सर्व संबंधितांवर विभागाने जबाबदारी निश्चित करून १ महिन्याच्या आत कारवाई करून समितीस कळविण्याबाबत निदेशित करण्यात आले. परंतु समितीला आश्वासित करूनही ही माहिती समितीला अद्यापही देण्यात आली नाही. उक्त चारही जिल्हापरिषदांमध्ये अखर्चित राहिलेली रक्कम ही तब्बल रु. ६४७.९५ लक्ष इतकी असून या निधीचा कोणताही उपयोग जिल्हापरिषदांना किंवा शासनाला करता आला नाही. जिल्हा परिषद केवळ निधीची मागणी करतात परंतु त्याच्या कामाचे कोणतेही नियोजन करीत नाही. हा विषय जिल्हा नियोजन समितीकडे असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. जिल्हा नियोजन समिती जिल्हापरिषदेच्या खर्चाचे नियोजन करते परंतु हे प्रस्ताव प्रथम जिल्हा परिषदेच्या समितीकडून येणे आवश्यक असते. त्यानंतरच त्यावर जिल्हाधिकारी शिक्कामोर्तब करीत असतात. या कामांचा आराखडा बघण्याचे व मान्यता घेण्याचे काम जिल्हापरिषदेनेच वेळेत करणे आवश्यक असते. त्यामुळे वर्षभर निधी स्वतःकडे ठेवून त्याचे कोणतेही नियोजन न करता तो वर्षअखेर समर्पित करणे ही बाब निश्चितच गंभीर असून समर्थनीय नाही. अतः विभागाने प्राप्त निधीचे व कामांचे नियोजन योग्यप्रकारे करून निधी समर्पित न करता तो आर्थिक वर्षात खर्च होईल अशाप्रकारे कामांचे नियोजन करावे. जिल्हा परिषदांना पुढच्या वर्षीपर्यंत खर्च करण्याची मुभा असताना निधी मंजूर व वितरीत केल्यानंतर कामे करण्यास बराच कालावधी मिळतो त्यामुळे हा निधी समर्पित होऊ देणे ही अतिशय गंभीर चूक आहे. त्यासाठी संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी व याप्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती समितीस २ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**२.१.३.५ "स्वतंत्र रोकडवही न ठेवणे"**

**अभिप्राय :**

**१.३७.** विभागाने जिल्हा परिषद आणि पंचायत समिती स्तरावर योजनेसाठी स्वतंत्र वेगळी रोकड वही ठेवण्याबाबत विनिर्देश दिले नाही. वेगळया रोकड वह्या नसल्यामुळे लेखापरिक्षेस दोन्ही स्तरावर अनुदान लेखांकनाच्या (जमा, खर्च, अखर्चित रक्कम, अर्जित व्याज इत्यादी) अचूकतेची खातरजमा करता आली नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**शिफारस :**

**१.३८. स्वतंत्र रोकडवही न ठेवणेसंदर्भात महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदविलेले असून जिल्हापरिषद व पंचायत समितीस्तरावर स्वतंत्र रोकडवही ठेवण्याची पद्धत नाही. परंतु विभागाने आता तशा सुचना निर्गमित केल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. स्वतंत्र रोकडवही ठेवण्यामागील उद्देश समजून घेण्याची आवश्यकता असून विभागाकडे प्राप्त अनुदान, जिल्हापरिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या स्तरावर झालेले निधीचे वितरण, त्यामधून योजनेसाठी झालेला खर्च, या सर्व बाबींचा तपशील जर या विविध स्तरावर नमूद केला नसेल तर निधीच्या खर्चाचे विवरणपत्र व अखर्चित रक्कम याची निश्चिती करणे विभागाला अंतिमतः कठीण होईल. योजनेनुसार खर्च कोठे झाला हे स्वतंत्ररित्या निश्चित करण्यासाठी जर ही स्वतंत्र रोकडवही ठेवणे उपयोगी ठरत असेल तर यास विभागाचा कोणताही विरोध असू नये. विभागाचा लेखा सांकेतांक (Account Code) स्वतंत्र असून संपुर्ण निधी जिल्हापरिषदेच्या निधीमध्येच जात असल्यामुळे स्वतंत्र लेखे तयार करणे शक्य नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले असता जिल्हापरिषदेकडे पैसे जातात तेव्हा त्याला जिल्हापरिषदेचा अकाऊंट कोड द्यावा लागत होता व त्या कोडप्रमाणे स्वतंत्र रोकडवही ठेवण्याची तरतूद नाही. तरीही दोन्ही स्तरावर अनुदान लेखांकनाच्या अचूक तपशिलासाठी हे विवरणपत्र अद्ययावत ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. तांत्रिकदृष्ट्या असे करण्यास काही अडचणी असतील तर त्याचे निराकरण विभागाकडून करण्यात यावे अथवा किती पैसे आले, किती खर्च झाले, किती शिल्लक राहिले व किती समर्पित केले व किती व्याज मिळाले या तपशिलांची स्वतंत्र नोंद करण्याची पद्धती मॅन्युअली सुरू करण्यात यावी जेणेकरून लेखापरिक्षणाच्या वेळी ही माहिती उपलब्ध होवू शकेल. तसेच या रकमेवर मिळणाऱ्या व्याजाची रक्कम त्याच योजनेवर खर्च करण्यात यावी व त्यासाठी विभाग एक स्वतंत्र लेजर तथा अनुदान नियंत्रणवही तयार करून या लेजरमध्ये जमाखर्चाची तंतोतंत सांगड नमूद असली पाहिजे. त्या अनुषंगाने विभागाने निदेश द्यावेत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**२.१.४ "योजनेची अंमलबजावणी"**

**२.१.४.१ "कामांच्या निष्पादनात विलंब"**

**अभिप्राय :**

**१.३९.** सन २०१०-१४ मध्ये जिल्हापरिषदेद्वार रू.२५४.६२ कोटी रकमेची ७८०७ कामे मंजूर करण्यात आली होती. ज्यांपैकी ६६२४ कामे पूर्ण करण्यात आली आणि ११८३ कामे ज्यावर रू.२३.६२ कोटी रक्कम खर्च करण्यात आली होती, ती कामे मार्च २०१५ पर्यंत अपुर्ण होती. अपूर्ण कामे पुर्ण करावयाच्या विहित तारखेपेक्षा एक ते तीन वर्ष पर्यंतच्या विलंबाने करण्यात आली. जिल्हा परिषदांनी कामे पूर्ण न होण्यासाठी मुख्यतः विभागाव्दारे अनुदान देण्यातील विलंब आणि कामांची निवड व कामे निष्पादित करण्यासाठी जागा निवडीबाबत ग्रामपंचायत सदस्यांमधील वाद कारणीभूत असल्याचे नमूद केले.

शासन निर्णयानुसार कामाची निवड व निधी वितरणाची कार्यवाही दरवर्षी माहे सप्टेंबर अखेर पूर्ण करणे अपेक्षित आहे. तसेच मंजूर कामे त्याच आर्थिक वर्षात अथवा काम मंजूर दिनांकापासून एक वर्षाच्या आत पूर्ण करणे अपेक्षित आहे. सदर कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांचेवर सोपविण्यात आली आहे. असे असले तरी मंजूर कामे विलंबाने पूर्ण होतात, ही वस्तुस्थिती असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्य केले. सदर योजनेंतर्गत कामे मंजूरीची व निधी वितरणाची कार्यवाही विहीत मुदतीत व्हावी, यासाठी सर्व जिल्हा परिषदांना सुचना दिल्या असल्याचेही समितीसमोर सांगण्यात आले.

कामाच्या निष्पादनात झालेल्या विलंबाबाबत समितीने विचारणा केली असता महालेखाकारांनी आक्षेपित केलेली आकडेवारी व विभागाने समितीसमोर सादर केलेल्या आकडेवारीमध्ये तफावत दिसल्यामुळे यामागील कारणमीमांसा समितीने विचारली असता महालेखाकारांनी सन २०१४-१५ पर्यंतची आकडेवारी दिलेली असून विभागाने सादर केलेली आकडेवारी ही सन २०१६-१७ पर्यंतची असल्यामुळे ही तफावत असल्याचे स्पष्ट करण्यात आले. शासन निर्णयानुसार एक वर्षात काम पुर्ण करणे आवश्यक असताना व त्याची अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणे आवश्यक असताना अशी कोणतीही कारवाई विभागामार्फत करण्यात आली नाही. अनेक कामे विलंबाने पुर्ण झाली व जी कामे पुर्ण झालेली नाहीत ती रद्द करून तो निधी परत घेणे आवश्यक असताना तसेही करण्यात आले नाही. याबाबत समितीने विचारणा केली असता नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेत पैसे अडकलेले असल्यामुळे ही कामे पुर्ण होण्यास अडचण येत होती. परंतु आता या बँकेतून निधी रिलीज होत असून ही अपुर्ण कामे एक ते दीड महिन्यांत पुर्ण होतील. सन २०१४-१५ पर्यंतची सर्व कामे पुर्ण झाली आहेत. काही कामे रु. ३ लाखावरील असल्यामुळे निविदा प्रक्रियेमध्ये थोडा विलंब होत आहे, उर्वरित कामे आता तातडीने पुर्ण करण्याचा विभाग प्रयत्न करीत आहे

असे समितीसमोर सांगण्यात आले. वास्तविकतः ज्यावर्षी निधी दिला जातो त्याच आर्थिक वर्षात ही कामे पुर्ण करून घेण्याचे नियोजन विभागाने केले पाहिजे. परंतु तसे जिल्हा परिषदांना पुढील आर्थिक वर्षापर्यंत निधी खर्च करण्याची मुभा विभागाला आहे असे असतांना यास अमर्याद विलंब होतो व निधीचा उपयोग देखील विहीत वेळेत करणे शक्य होत नाही. यासाठी ज्या आर्थिक वर्षात निधी प्राप्त आहे त्याच आर्थिक वर्षात किमान कामे मंजूर करण्याचे बंधन घातले पाहिजे. त्यामुळे ही कामे विहित वेळेत पुर्ण करण्याची जबाबदारी विभागाची राहिल.

**शिफारस :**

**१.४०. योजनेची अंमलबजावणी करताना कामाच्या निष्पादनात विलंब झाल्याचे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे. जिल्हापरिषदांना अनुदान वाटप करण्यात विभागाद्वारे एक ते सहा महिन्यांचा विलंब झाला. जिल्हा परिषदांनी पंचायत समितींना अनुदान संपूर्णतः दिले नाही आणि २०१०-१५ मध्ये रु. २८८.१४ कोटी एवढी मोठी रक्कम अखर्चित राहिली. या कालावधीत नमुन्यादाखल निवडलेल्या आठ जिल्हा परिषदांसाठी मंजूर केलेल्या पंधरा टक्के कामांना पूर्ण करावयाच्या विहित तारखेपेक्षा एक ते तीन वर्षाचा विलंब मुख्यतः जिल्हा परिषदांना अनुदान देण्यातील विलंबामुळे झाला. परिणामी योजनेची अंमलबजावणी विहित वेळेत होऊ शकली नाही. विभागाकडून जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्राम पंचायत स्तरावर निधी देताना कोणतेही समन्वय दिसून येत नाही. परिणामी आर्थिक वर्षात निधी खर्च होऊ शकत नाही. जिल्हा परिषदेला निधी खर्च करण्याची मुभा पुढील वाढीव एक वर्षासाठी असते. हा निधी एकुण दोन वर्षासाठी (चालु व पुढील आर्थिक वर्ष) ठेवता येत असल्यामुळे याचा पूर्ण फायदा विभाग घेत असून ही दोन वर्षे गृहीत धरुनच निधीचे व कामांचे नियोजन करण्यात येते. जे कदापि योग्य नाही. निधीचे व कामांचे नियोजन करताना प्रथमतः जिल्हा परिषद स्तरासाठी एकच वर्षाची मुदत ग्राह्य धरुन नियोजन करणे आवश्यक आहे. तसे विभागाने आदेश दिल्यास विहीत वेळेत प्राप्त निधी त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे शक्य होईल व कोणत्याही परिस्थितीत हा निधी विभागाकडे समर्पित होणार नाही याची पुर्ण दक्षता भविष्यात विभागाने घ्यावी व या प्रकरणी दिरंगाई करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी तसेच भविष्यात कामांचे नियोजन करतांना कामाची मंजूरी, प्रशासकीय मान्यता निधी वाटपाची कार्यवाही त्याच आर्थिक वर्षात पूर्ण झाली पाहीजे असे आदेश विभागाने काढावे जेणेकरून कर्ज पूर्ण करण्यासाठी ग्रामपंचायतींना आणखी पुढील वर्षाची १ मुभा व कालावधी राहील. व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**२.१.४.२ "निवडलेल्या ग्रामपंचायती विषयी लेखापरिक्षा निरीक्षणे"**

**अभिप्राय :**

**१.४१.** २०१०-१५ दरम्यान निवडलेल्या ८० ग्रामपंचायतीत १७७ वस्त्या होत्या त्यापैकी १३६ वस्तींत २०२ कामे मंजूर केली होती. परंतु ८० पैकी ७४ ग्रामपंचायती मध्ये बृहत आराखडा २०१३-१८ यामध्ये प्रत्यक्ष लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार दर्शविली आहे. जेव्हा की, उर्वरित सहा ग्राम पंचायतीत लोकसंख्या २०११ च्या जनगणनेपेक्षा जास्त दर्शविली आहे. ग्रामपंचायतीत बृहत आराखडे तयार करण्यात आले होते परंतु, त्यांचे स्वरूप एकसमान नव्हते. २१ ग्रामपंचायतीत निष्पादित केलेली ३४ कामे बृहत आराखड्यात समाविष्ट नव्हती. २०२ कामांची मंजूर किंमत रू.६.३७ कोटी होती ज्यापैकी रू.५.२५ कोटी देण्यात आले होते. परंतु पंचायत समित्यांनी त्यापैकी रू.४६.०८ लाख एक ते सहा महिन्यांच्या विलंबाने ग्राम पंचायतींना दिले. २०२ कामांपैकी १७० कामे रु. ५.३१ कोटी वर २०१०-१४ दरम्यान मंजूर करण्यात आली १७० कामांपैकी १५७ कामे रू.४.२० कोटी किंमतीवर पूर्ण करण्यात आली आणि १२ कामे अपूर्ण राहिली, ज्यावर मंजूर किंमत रू.५२ लाख पैकी रू.१३.१७ लाख खर्च करण्यात आले. एक काम रद्द करण्यात आले. पूर्ण केलेल्या १५७ कामापैकी १४६ कामे रू.३.८८ कोटी किंमतीवर एक वर्षाच्या विनिर्दिष्ट कालावधीत पूर्ण करण्यात आली आणि ११ कामे एक ते दोन वर्षाच्या विलंबाने पूर्ण करण्यात आली. १७ ग्रामपंचायतीत १७० सौर ऊर्जा पथदिवे लावण्यात आले ज्यापैकी रू.४.७६ लाख किंमतीचे २७ दिवे निष्क्रीय होते. योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यस्थळावर कंत्राटदाराचे तपशील आणि काम पूर्ण झाल्याची तारीख नमूद केलेले फलक लावावयास पाहिजे. परंतु ४२ ग्रामपंचायतींव्दारे फलक लावण्यात आले नव्हते. तसेच योजनेच्या अंमलबजावणीची पारदर्शिता राहावी यासाठी काम करण्यापूर्वी व काम पूर्ण झाल्यानंतर कार्यस्थळांचे छायाचित्र घ्यावयास पाहिजे. परंतू ५३ कामांमध्ये गटविकास अधिकाऱ्यांनी छायाचित्र घेतले नव्हते. सर्व ८० ग्रामपंचायतींनी योजनेसाठी वेगळी रोकडवही ठेवली होती. ग्रामपंचायतींनी निष्पादित केलेली कामे जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्यांनी तपासावयास पाहिजे. परंतु एकाही ग्रामपंचायतीत तपासणीचे दस्ताऐवज ठेवण्यात आले नव्हते असे गंभीर आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**शिफारस :**

**१.४२. महालेखाकारांनी नोंदविलेले सदरहू आक्षेप अतिशय गंभीर असून योजनेच्या मुलभूत अंमलबजावणीमध्येच दोष व त्रुटी दर्शविणारे आहेत. ग्राह्य धरावयाची लोकसंख्या यामध्ये विविध ग्रामपंचायत स्तरावर नियमांची वेगवेगळया पद्धतीने अंमलबजावणी करण्यात आली. या अंमलबजावणीमध्ये एकसमानता राहण्यासाठी सामायिक मार्गदर्शक तत्वे व एकसमान प्रमाण प्रपत्र निर्गमित होणे आवश्यक असताना ते न झाल्यामुळे ही तफावत दिसून येते. बृहत आराखडे परिपूर्ण व त्याचे स्वरुप एकसमान नव्हते. काही ठिकाणी तर बृहत आराखडाच तयार करण्यात आलेला नव्हता तर काही ठिकाणी प्रत्यक्ष लोकसंख्येऐवजी जनगणनेनुसार लोकसंख्या गृहित धरण्यात आली तर काही ठिकाणी जास्त लोकसंख्या दर्शविण्यात आली. निष्पादित कामे बृहत आराखड्यामध्येच समाविष्ट नसणे, विभागाकडून निधी अमर्याद विलंबाने देणे, कार्यस्थळी योजनेच्या अंमलबजावणीची सद्य:स्थिती व कंत्राटदाराचा तपशील नमूद न करणे, या योजनेंतर्गत लावलेले पथदिवे देखभाल दुरुस्ती अभावी कार्यरत नसणे, केलेल्या कामांची तपासणी न करणे अशा गंभीर बाबी आढळून आल्या. सदरहू लेखापरीक्षण अहवाल सन २०१३-१४ पर्यंतचा असतानाही विभागाने या अहवालातील आक्षेपांची कोणतीही दखल घेतली नाही. आता केवळ समितीची साक्ष लागल्यानंतर विभागामार्फत संबंधितांकडून खुलासा घेण्यात आला आहे. महालेखापालांनी आक्षेप नोंदविल्यानंतर विभागाने हे आक्षेप गांभीर्याने घेऊन त्यावर कोणतीही कारवाई केली नाही ही बाब निश्चितच योग्य व समर्थनीय नाही. यावरुनच विभाग या योजनेच्या अंमलबजावणीबाबत गंभीर नसल्याचे दिसून येते. दरम्यानच्या कालावधीत कित्येक जबाबदार अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त वा मयत देखील झाले असतील. त्यामुळे या सर्व प्रकरणी दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणतीही कारवाई झाली नाही. जर ऐनवेळी काही कामे नव्याने अथवा बृहत आराखड्याबाहेर घेण्याची अथवा कामांमध्ये बदल करण्याची आवश्यकता असल्यास बृहत आराखड्यामध्ये सुधारणा करून या कामांना मंजूरी देणे आवश्यक होते अन्यथा या बृहत आराखड्याला कोणताही अर्थ शिल्लक राहणार नाही. यासाठी कारणे वेगवेगळी असली तरीही विलंब झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे. या संपुर्ण प्रकरणी सर्व ग्रामपंचायतींची स्वतंत्ररित्या तपासणी करून जेथे अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या स्तरावर विलंब झालेला आहे त्यांचेवर कारवाई करण्यात यावी व ज्याठिकाणी कंत्राटदाराने काम उशिरा सुरू केले असेल तेथे कंत्राटदारावर कारवाई करण्यात यावी व भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी या योजनेंतर्गत होणाऱ्या सर्व कामाची तपासणी व पाहणी करणे आवश्यक असून राज्यस्तरीय, विभागीय स्तरावर व संचालक स्तरावर ही तपासणी नियमित करावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**१.४३. या योजनेंतर्गत रत्नागिरी, चंद्रपूर ग्रामपंचायतींमध्ये पथदिवे बसविण्यात आले होते. परंतु ते पथदिवे देखील देखभाल दुरुस्तीअभावी बंद आहेत. ज्याठिकाणी पथदिवे मंजूर आहे त्याच्या देखभाल दुरुस्तीची आर्थिक तरतूद देखील करणे आवश्यक आहे अन्यथा हा खर्च ग्रामपंचायती पूर्ण करू शकणार नाही. त्यामुळे हे दिवे बंद राहतात. दि. ३० जानेवारी, २०१४ रोजी दलितवस्तीमध्ये सौर पथदिवे लावण्याबाबत निर्णय घेण्यात आला. परंतु त्याच्या देखभाल दुरुस्ती संदर्भातील निर्णय होऊ शकला नाही. त्यामुळे हे दिवे देखभाल दुरुस्तीअभावी बंदच राहतात. या सौर पथदिव्यांची वेगळी व स्वतंत्र आर्थिक तरतूद करणे आवश्यक आहे व ही योजना जर यशस्वीपणे चालवावयाची असेल तर त्याच्या दुरुस्तीची जबाबदारी ग्रामपंचायतीवर टाकून चालणार नाही. काही ठिकाणी तर पथदिवे लावण्यातच आले नाहीत, परंतु तरीही निधीची उचल झालेली आहे. अशा प्रकरणांची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात यावी व पथदिव्यांच्या देखभाल दुरुस्तीच्या खर्चासंबंधिचा धोरणात्मक निर्णय शासनाने तातडीने घेऊन याची अंमलबजावणी करण्यात यावी तसेच सौरपथ दिव्यांच्या देखभाल व दुरूस्तीची जबाबदारी जर ग्रामपंचायत घेत असेल तरच पथदिवे मंजूर करावे व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**२.१.४.३ "राज्य सार्वजनिक बांधकाम विभागाला योजनेंतर्गत कामांच्या निष्पादनासाठी अनुदानाचे नियमबाह्य वाटप करण्यात आले"**

**अभिप्राय :**

**१.४४.** सन २०१३-१४ मध्ये विभागाने योजनेंतर्गत विविध कामे निष्पादित करण्यासाठी थेट राज्य सार्वजनिक बांधकाम विभागास डिसेंबर, २०१३ ते मार्च, २०१४ दरम्यान रु. ३०९.६८ कोटीचे अनुदान दिले. परिणामी सार्वजनिक बांधकाम विभाग त्याच आर्थिक वर्षात अनुदान उपयोगात आणू शकले नाही. जे नंतर " सिव्हील डिपॉजिट्स " अंतर्गत (जे आर्थिक वर्ष संपल्यावर व्यपगत होत नाही) ठेऊन ती कामे नंतरच्या वर्षात

केली. परंतु विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाला थेट अनुदान वाटप करणे नियमबाह्य होते. कारण महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १०० च्या पोट-कलम (१) च्या खंड (b) आणि कलम ६ च्या पोट कलम (२) अंतर्गत प्रदान केलेल्या शक्ती अंतर्गत महाराष्ट्र शासनाने नोव्हेंबर,२००० मध्ये दलित वस्ती सुधारणेची योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करण्यासाठी एक अधिसूचना निर्गमित केली. म्हणूनच योजनेंतर्गत असलेली कामे, जी आधीच जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत केली गेली आहेत, त्यांच्या निष्पादनासाठी अनुदान थेट राज्य सार्वजनिक बांधकाम विभागाकडे देणे नियमबाह्य होते आणि यामुळे राज्य शासनाद्वारे पंचायती राज संस्थांच्या स्वायत्तता व कार्यप्रणाली वर अनावश्यक अतिक्रमण झाले.

योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार निष्पादनापूर्वी अधिसूचित वस्तींमधील कामे ग्रामपंचायतीद्वारे निश्चित केली आणि जिल्हा परिषदेद्वारे मंजूर केली असली पाहिजे. परंतु या प्रकरणात सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे योजनेंतर्गत करावयाची कामे विभागाद्वारे मंत्रालय स्तरावर विविध लोकप्रतिनिधींच्या शिफारशींवर निवडण्यात आली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**शिफारस :**

**१.४५. या योजनेंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागाला जवळजवळ रु. ३०९.६८ कोटी दिले असून यासंदर्भात दिलेल्या ८ जिल्ह्यांच्या माहितीमध्ये १३० कामे अपुर्ण असल्याचे सांगण्यात आले. सद्य:स्थितीत ३८ कामे अपूर्ण आहेत. ठाणे जिल्ह्यामध्ये १६३ कामे मंजूर असून ११२ कामे पुर्ण झाली आहेत व ५१ कामे रद्द केलेली आहेत. असे असताना सार्वजनिक बांधकाम विभागाला संपुर्ण निधी देणे नियमबाह्य होते. तरीही अनेक ठिकाणची कामे अपूर्ण आहेत व काही कामे रद्द करण्यात आली. गत ५ वर्षांचा कालावधी उलटूनही ही कामे अद्यापही अपूर्ण आहेत. निधी आल्यानंतर तो विहित वेळेत योजनेवर खर्च न होणे ही देखील गंभीर बाब असून अन्य ठिकाणी देखील तो वापरता येऊ शकला नाही. नोव्हेंबर, २००० पासून जरी ही योजना जिल्हा परिषदांना हस्तांतरीत करण्यात आली असली तरी २०१३-१४ मध्ये विभागाने राज्य सार्वजनिक बांधकाम विभागाला अधिसूचित वस्तींमधील विविध कामांच्या निष्पादनासाठी त्यांना असलेल्या विशेषाधिकाराचा वापर करून रु. ३०९.६८ कोटी दिले.**

**विभागाने या सर्व बाबींचे नियोजन करूनच या सर्व बाबी राज्य शासनाच्या निदर्शनास आणून देऊनच निधीबाबतचा निर्णय घेणे आवश्यक होते. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिनांक ९/३/२०१८ च्या शासन निर्णयाअन्वये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना या नावाने सन २०१८-१९ या आर्थिक वर्षापासून स्वतंत्र योजना लागू केली असून या नवीन योजनेखाली रु. ३०९ कोटी दिले जाणार आहेत. या योजनेतून विद्यमान आमदार व खासदार यांच्या शिफारशीनुसार कामे मंजूर करण्याची तरतूद आहे. यासाठी रु. १०० कोटी प्राप्त देखील झाले आहेत. तसेच या परिच्छेदात आक्षेपित सर्व कामांचा तपशील व कामे कधी सुरू केले व कधी संपले अथवा अपूर्ण राहिले याची तारीखनिहाय माहिती समितीला सादर करावी असे निदेश समितीने दिले असता १५ दिवसात ही माहिती देण्यात येईल असे समितीला आश्वासित करण्यात आले. परंतु ही माहिती अद्यापही समितीस सादर करण्यात आली नसून ती समितीला महालेखाकारांमार्फत तपासून तात्काळ देण्यात यावी. अतः आता विभागाने या सर्व कामांसंदर्भात नियोजन करून त्याची निश्चिती करावी. दि. ३१ मार्च २०१९ पर्यंत ही सर्व कामे संपविण्याचा पुर्ण प्रयत्न करण्यात यावा अन्यथा ही कामे रद्द करण्यात यावीत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**२.१.४.४ "सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे कामांचे नियोजन आणि निष्पादन यातील त्रुटी"**

**अभिप्राय :**

**१.४६.** आठ जिल्हा परिषदांमध्ये २०१३-१५ दरम्यान कामांचे नियोजन आणि निष्पादन यात राज्य सार्वजनिक बांधकाम (PWD) विभागांद्वारे त्रुटी राहिल्याचे दिसून आले. फक्त बृहत आराखड्यात समाविष्ट केलेली कामेच निष्पादित करावयास पाहिजे होती. तथापि, सहा विभागांमध्ये (अकोला, औरंगाबाद, चंद्रपूर, लातूर, नाशिक आणि रत्नागिरी) बृहत आराखड्यात समाविष्ट नसलेली समाज मंदिरे / सामुदायिक भवनांची ३१ कामे रु. २.२३ कोटी खर्चून करण्यात आली. तसेच रु. ४२.२४ कोटी किंमतीच्या मंजूर ५१७ कामांपैकी २४० कामे एक वर्षाच्या विहित कालावधीत पूर्ण करण्यात आली आणि १८७ कामे ज्यावर रु. ५.८३ कोटी खर्च करण्यात आले होते व ती अपूर्णावस्थेत होती. याशिवाय रु. २.६३ कोटी किंमतीची मंजूर ५० कामे सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे सुरू करण्यात येऊ शकली नाही आणि उरलेली ४० कामे अन्य एजन्सींना/ नागरी स्थानिक संस्थांना (ULBS) हस्तांतरीत करण्यात आली. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणेला २०१३-१४ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या ९३ कामांपैकी १८ कामे अधिसूचित वस्तींशी संबंधित नव्हती, १० कामे आधिच ZP/ULB द्वारे करण्यात आली होती आणि तीन

कामांसाठी जागा उपलब्ध नव्हती. २०१३-१४ मध्ये विभागाने तीन (चंद्रपूर, नाशिक आणि रत्नागिरी) सार्वजनिक बांधकाम विभागांना १४ वस्तींमध्ये कामे निष्पादित करण्यासाठी रु. २.३२ कोटी मंजूर केले. जे त्या वस्तीच्या अनुज्ञेयतेपेक्षा रु. १.०१ कोटीने जास्त होते.

सार्वजनिक बांधकाम विभागांना त्यांच्याद्वारे केलेल्या सर्व डिपॉजिट कामांसाठी आस्थापना आणि साधने/संयत्रे यासाठी टक्केवारी खर्च (centage charges) वसूल करावयाचे प्राधिकार आहेत. दोन (अकोला आणि ठाणे) सार्वजनिक बांधकाम विभागांनी त्यांच्याद्वारे योजनेंतर्गत केल्या गेलेल्या कामांसाठी रु. ३७.७३ लाख टक्केवारी खर्च म्हणून वसूल केले. जेव्हा की ही कामे डिपॉजिट कामे नव्हती यामुळे योजनेच्या अनुदानात कमी झाली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**शिफारस :**

**१.४७. सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे कामाचे नियोजन व निष्पादनात अनेक त्रुटी निदर्शनास आल्या. ज्यात विशेषतः आराखड्याबाहेरील कामे मंजूर करणे तसेच ५१७ पैकी १८७ कामे अंशतः पूर्ण झाली, ५० कामे पूर्णच झाली नाहीत व अन्य जिल्ह्यांची माहिती विभागाने दिली नाही. यासंदर्भात विभागाने नमूद केले की, एकूण ९८० कामांपैकी ६६४ कामे बृहत आराखड्यामध्ये नमूद नव्हती. तर ४० कामे महानगरपालिकेमार्फत अगोदरच करण्यात आलेली असल्यामुळे ती सार्वजनिक बांधकाम विभागाने परस्पर रद्द करून टाकली. अशाप्रकारे सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे कामांचे नियोजन आणि निष्पादन यातील त्रुटी प्रकर्षाने दिसून येतात. अशाप्रकारे विभागीय आणि क्षेत्रिय स्तरावर योजनेचे संनियंत्रण कमकुवत होते. विभागाने योजनेच्या उद्देशपूर्णतेबाबत निर्धारण अथवा मुल्यांकन केले नाही. अतः या सर्व कामाची तपासणी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी व भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**२.१.५ "संनियंत्रण आणि मूल्यांकन"**

**२.१.५.१ "संनियंत्रणाचा अभाव"**

**अभिप्राय :**

**१.४८.** योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार पूर्ण झालेल्या कामांपैकी दोन टक्के कामे राज्य शासन स्तरावर, पाच टक्के आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्या स्तरावर आणि १०० टक्के जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्या स्तरावर तपासावयास पाहिजे. परंतु आठ जिल्हा परिषदांमध्ये शासन आणि आयुक्त स्तरावर २०१२-१३ पर्यंत कोणत्याही प्रकारची तपासणी करण्यात आली नव्हती आणि २०१०-१४ दरम्यान पुर्ण झालेल्या ६६२४ कामांपैकी जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्यांनी फक्त १९०० कामे तपासली. परंतु त्यापुष्ट्यर्थ कोणतेही दस्तऐवज लेखापरीक्षेस सादर करण्यात आले नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**शिफारस :**

**१.४९. यासंदर्भात महालेखाकारांसमवेत झालेल्या निर्गमन परिषदेत उपरोक्त टक्केवारीनुसार कामांची तपासणी करणे व्यवहार्यदृष्ट्या शक्य नाही. तरीही तपासणी परिणामाचा आढावा घेण्यात येईल असेही सांगण्यात आले. अतः विभागाने कामांची नियमीत तपासणी आणि योजनेच्या उद्देशपूर्णतेबाबत नियतकालिक निर्धारण करून संनियंत्रण आणि मूल्यांकन पद्धती बळकट करावी व जबाबदारी निश्चित करावयासाठी विभागाने नेमके आणि मुख्य मापनयोग्य कार्यसिद्धी लक्ष्य देखील विहीत करावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**२.१.५.२ "कामांचे मोजमापन न करणे"**

**अभिप्राय :**

**१.५०.** महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ च्या नियम १६८ (१) आणि महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका १९८४ (परिशिष्ठ २४) अनुसार जिल्हा परिषद आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी (EES) त्यांच्या अधीन असलेल्या अभियंत्यांनी नोंद केलेल्या अंतिम मोजमापांचे चालु लेख्यांवर अनुक्रमे रु. २५,००० आणि रु. ५०,००० रकमेच्या प्रत्येक कामाची कमीत कमी ५% या टक्केवारीने तपासणी करावयास पाहिजे. परंतु ६६२४ कामांची कोणत्याही प्रभारी EES नी विहित तपासणी केली नाही. ५ (औरंगाबाद, बीड, नाशिक, रत्नागिरी आणि ठाणे) विभागांमध्ये पूर्ण केलेल्या २४० कामांपैकी ७४ कामांची संबंधित EES द्वारे तपासणी करण्यात आल्याचे सांगण्यात आले परंतू मोजमापांच्या तपासाबाबतचे दस्तावेज लेखापरीक्षेस उपलब्ध करण्यात आले नाहीत. तर लातूर येथे कामांचा भार जास्त असल्यामुळे कामे तपासण्यात येऊ न शकल्याचे सांगण्यात आले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**शिफारस :**

**१.५१. सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये केवळ ५ टक्के कामांची तपासणी होते. ती देखील तपासणी करण्यात आली नाही असे महालेखाकारांचे आक्षेप आहेत. अशा परिस्थितीत सामाजिक न्याय विभागाला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई करता येत नाही. ती विभागाच्या सचिवांना कळवूनच त्यांचेमार्फत ही कारवाई करावी लागते. या कामांसाठीचा ९० टक्के निधी ग्रामपंचायत व गटविकास अधिकारी यांच्या संयुक्त खात्यामध्ये असल्यामुळे मोजमाप पुस्तिके तपासणीकरिता कार्यकारी अभियंत्यांकडे येत नाही. या सर्व कामांची तपासणी जिल्हापरिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत होत असून ग्रामसेवक व ग्रामपंचायती हे काम करतात. समितीला हे काम कोणाचे आहे याहीपेक्षा तपासणीचे काम नियमितपणे झाले पाहिजे यास अधिक महत्त्व आहे. कोणत्या तरी स्तरावर ही तपासणी झाली पाहिजे परंतु सदरहू परिच्छेदात आक्षेपित केल्याप्रमाणे ती कोणीच केली नाही. अतः विभागाने भविष्यात याची खबरदारी घ्यावी व विहित तपासणी नियमितरित्या करण्यात यावी व भविष्यात हे आक्षेप टाळावेत व सदरहू परिच्छेदांतर्गत तपासणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणेसंदर्भात संबंधित विभागास कळविण्यात येऊन आवश्यक ती कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**२.१.५.३ "भौगोलिक माहिती प्रणालीद्वारे (Geographical Information System-GIS) अधिसूचित वस्तींचे रेखांकन (mapping) न करणे"**

**अभिप्राय :**

**१.५२.** विभागाने ऑगस्ट,२०१३ मधील शासन निर्णयाद्वारे सर्व जिल्हा परिषदांना GIS द्वारे अधिसूचित वस्ती रेखांकित करून संकेतस्थळावर त्यांचे इलेक्ट्रॉनिक डेटाबेस अपलोड करावयाचे निर्देश दिले. जिल्हा परिषदेला विभागाद्वारे या कारणास्तव निधी न देण्यात आल्यामुळे GIS रेखांकन करण्यात आले नाही.

यासंदर्भात विभागाने नमूद केले की, GIS रेखांकन करण्याविषयीचा उद्देश दस्तऐवजात उपलब्ध नाही आणि त्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या तोंडी सूचनांवरून शासन निर्णयात समाविष्ट करण्यात आले होते. GIS रेखांकन नसल्यामुळे अधिसूचित वस्तींचे नेमके स्थान, या वस्तीमध्ये आधीच करण्यात आलेली विकास कामे, भविष्यात करावयाची नियोजित कामे, आर्थिक तरतूद इत्यादी माहिती जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर व्यवस्थापन आणि हितसंबंधितांच्या उपयोगासाठी उपलब्ध नाही.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग दि.१/८/२०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार सर्व जिल्हा परिषदांना सर्व घोषीत वस्त्यांचे GIS मॅपिंग करावे व त्यांचा इलेक्टॉनिक डाटा बेस तयार करून तो संबंधीत जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्याच्या सुचना देण्यात आल्या असतानाही या सुचनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेली नाही.

**शिफारस :**

**१.५३. सन २०१३ मध्ये यासंदर्भात शासन निर्णय निर्गमित केलेला असतानाही त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही. जीआयएस मॅपिंगसाठी सल्लागारांची नियुक्ती न केल्यामुळे आरएफपी तयार नव्हते. आता यासंदर्भातील कारवाई सुरू झालेली असून एजन्सी नियुक्त करून जीआयएस मॅपिंगचे काम करण्यात येत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. सन २०१३ मध्ये अंमलबजावणी करण्याचे आदेश असताना सन २०१८ मध्ये याचे कार्यादेश काढणे ही बाब अतिशय गंभीर असून कामाच्या अंमलबजावणीचे कोणतेही नियोजन विभागाकडे नसल्याचे द्योतक आहे. वास्तविकतः या मॅपिंगचे काम फारच अगोदर पुर्ण होणे आवश्यक होते. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी दलितवस्ती म्हणून अधिसूचित झाल्याशिवाय या योजनेचा लाभ वस्तीतील लोकांना देणे शक्य नसताना दलितवस्ती नोटीफाय करण्यासाठीची आवश्यक जीआयएस मॅपिंगची प्रक्रिया इतक्या प्रदीर्घ कालावधीसाठी प्रलंबित राहिली तर योजनेच्या अंमलबजावणीबाबत निश्चितच साशंकता निर्माण होते. आता ही संपुर्ण प्रक्रिया विभागाने सुरू केली असून यासंदर्भातील शासन निर्णय एक आठवड्यात काढण्यात येईल असेही समितीसमोर सांगण्यात आले. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी जीआयएस मॅपिंगशिवाय पुढेही जाता येणार नसल्यामुळे जीआयएस मॅपिंगच्या कामाला प्रथम प्राधान्य देवून कामे करण्यात यावी. कालबद्धपद्धतीने हे मॅपिंग पूर्ण करण्यात यावे व ही कालमर्यादा शासन निर्णयातच नमूद करावी. केवळ सॅटेलाईटच्या माध्यमातून केलेल्या मॅपिंगवर अवलंबून न राहता सोबतच प्रत्यक्ष पाहणी देखील करून माहितीची अचूकता निश्चित करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**२.१.५.४ "कार्यसिद्धी लक्ष्य न ठरविणे आणि योजनेचे मूल्यांकन न करणे"**

**अभिप्राय :**

**१.५४.** जिल्ह्यांचे पंचवार्षिक बृहत आराखडे जरी जिल्हा परिषद स्तरावर संकलित करण्यात येतात तरी एका विशिष्ठ कालावधीत जिल्हा परिषदांनी किती कामे पूर्ण करावयास पाहिजे आणि किती अधिसूचित वस्तींचा विकास करावयास पाहिजे या विषयीचे कार्यसिद्धी लक्ष्य विभागाद्वारे ठरविण्यात आले नाही. त्यामुळे विभाग, जिल्हा परिषद स्तरावर जबाबदारी निश्चित करू शकत नाही. तसेच अशा अधिसूचित वस्ती जेथे सर्व मूलभूत सुविधा पुरविण्यात आल्या आहेत त्यांची संख्याही निर्धारित करू शकत नाही.

याशिवाय कोणत्याही योजनेची परिणाम निष्पत्ती जाणण्यासाठी आणि योजनेचे उद्दीष्ट कितपत साध्य झाले हे ठरविण्यासाठी योजनेंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामांच्या उद्देशपूर्णतेबाबत वेळोवेळी निर्धारण अथवा मूल्यांकन करावयास पाहिजे. परंतु १९७४ मध्ये योजनेचे प्रारंभ झाल्यापासून विभागाने कोणतेही नियतकालिक उद्देशपूर्णता निर्धारण अथवा मूल्यांकन केले नाही. त्यामुळे योजनेचे मूळ उद्दीष्ट (अनुसूचित जाती/नवबौद्धांचे राहणीमान उंचावणे) साध्य झाले अथवा नाही याची पडताळणी करणे अवघड होते.

महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागांच्या सुचनेनुसार संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयामार्फत सदर योजनेंतर्गत २०१२-१३ ते २०१६-१७ या पाच वर्षांच्या कालावधीत झालेल्या कामांचे मुल्यमापन करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्याअनुषंगाने माहे जुलै,२०१८ पासून मूल्यमापनाचे काम सुरू आहे. सदर मुल्यमापन अहवाल प्राप्त होताच त्यातील शिफारशीनुसार योजनेच्या अंमलबजावणीत आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील असे समितीसमोर सांगण्यात आले.

**शिफारस :**

**१.५५. या प्रकरणी सांख्यिकीय संचालनालयातर्फे मुल्यमापनाचे काम पुर्ण झाले असून त्या संबंधीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे. हा अहवाल विभागाने तातडीने मागवून घेण्यात यावा व त्याअनुषंगाने आवश्यक ती पुढील कार्यवाही विभागाच्या स्तरावरुन करण्यात यावी. सर्व जिल्ह्यांचा आराखडा कालबद्ध पद्धतीने पुर्ण करण्यात यावा व तातडीने कामाची सुरुवात करून प्राप्त निधी विहित आर्थिक वर्षात खर्च करण्यात यावा. तसेच विभागाने कामांची नियमित तपासणी आणि योजनेच्या उद्देशपूर्णतेबाबत नियतकालिक निर्धारण करून संनियंत्रण आणि मुल्यांकन पद्धती बळकट करावी व जबाबदारी निश्चित करण्यासाठी विभागाने नेमके आणि मापनयोग्य कार्यसिद्धी लक्ष्य विहित करावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

(शा.म.मु.) एचबी २४०८—१६ (७००—२-२०१९)

# परिशिष्ट-ब

**सोमवार, दिनांक १३ ऑगस्ट २०१८**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक सोमवार, दिनांक १३ ऑगस्ट २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.३० वाजता सुरू होऊन सायंकाळी ४.४५ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख :**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(३) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(४) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(५) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(६) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(७) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

**निमंत्रित :**

**महालेखाकार कार्यालय :**

(१) श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई

(२) श्री. पारडीकर, उप महालेखाकार, नागपूर

**वित्त विभाग :**

श्री. अनुदिप दिघे, उप सचिव, वित्त विभाग

**विभागीय प्रतिनिधी :**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग :**

(१) श्री. दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(२) श्री. मिलिंद शंभरकर, आयुक्त, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्र. २.१ संदर्भात सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक २६ सप्टेंबर २०१८**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक बुधवार, दिनांक २६ सप्टेंबर २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरू होऊन दुपारी ३.२० वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख :**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्री. सुरेश धानोरकर, वि.स.स.

(८) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

**निमंत्रित :**

**महालेखाकार कार्यालय :**

(१) श्री. यशवंत ठाकरे, प्रधान महालेखाकार, मुंबई

(२) श्री. सतीश एन. वासनिक, उप महालेखाकार, नागपूर

**वित्त विभाग :**

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त विभाग

**विभागीय प्रतिनिधी :**

**सामाजिक न्याय विभाग :**

श्री. दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्र. २.१ संदर्भात प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांची साक्ष घेतली.

## मंगळवार, दिनांक १६ ऑक्टोबर २०१८

## लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १६ ऑक्टोबर २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.३० वाजता सुरू होऊन सायंकाळी ४.३५ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख :**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(३) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(४) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(५) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(६) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

**निमंत्रित :**

**महालेखाकार कार्यालय :**

श्रीमती हेमा मुनिवेंकटप्पा, महालेखाकार, नागपूर

**वित्त विभाग :**

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त विभाग

**विभागीय प्रतिनिधी :**

**सामाजिक न्याय विभाग :**

(१) श्री. दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग

(२) श्री. मिलिंद शंभरकर, आयुक्त, सामाजिक न्याय विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्र. २.१ संदर्भात सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक १६ जानेवारी २०१९**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक बुधवार, दिनांक १६ जानेवारी २०१९ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ३.०० वाजता सुरू होऊन सायंकाळी ४.३५ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख :**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(४) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(५) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(६) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(७) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(८) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्र. २.१ संदर्भात सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाशी संबंधित समितीने तयार केलेला प्रारूप अहवाल विचारात घेऊन संमत करण्यात आला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई